मराठी कविता

प्राचीन कालखंड
११५०-१८४०

एकनाथ, मुक्तेश्वर, तुकाराम, बहिणाबाई, रामदास, वामनपंडित, सामराज, तुळशीदास, मोरोपंत, रामजोशी, निवृत्तिनाथ, मुक्ताबाई, चोखामेळा, जनाबाई, सांवतामाळी, दासोपंत, शेखमहंमद, रमावल्लभदास, विठ्ठल, देवीदास, मध्वमुनीश्वर, कृष्णकेशव, रङ्माजनार्दन, सोहिरोबानाथ, प्रभाकर, परशराम, होनाजी, गंगू हैबती, आबाकुमर.

सा हि त्य सं स्था च्या वि द्य मा ने

मराठी कविता : प्राचीन कालखंड

[इ. स. ११५०-१८४०]

मराठी कविता : प्राचीन कालखंड

[इ. स. ११५० ते १८४०]

संपादक

वा० रा० ढवळे

व० दि० कुळकर्णी

मुंबई मराठी साहित्य संघ

प्रकाशक :
दि० वि० आमोणकर
प्रमुख कार्यवाह,
मुंबई मराठी साहित्य संघ
डॉ. भालेराव मार्ग, गिरगाव
मुंबई ४

प्रथमावृत्ती
इ. स. १९६९

मूल्य रु. १०

मुद्रक :
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई

संपादकीय निवेदन

प्राचीन मराठी कवितेचे प्रातिनिधिक संग्रह तयार करण्याचे प्रयत्न आतापर्यंत बरेच झालेले आहेत. पण विविध वाङ्मयीन प्रवृत्ती आणि प्रकार यांचे निदर्शन व्हावे असा निश्चित दृष्टिकोण त्यांच्या मागे नसावा. प्रस्तुत संग्रह सिद्ध करताना संपादकांनी मूलतः ह्याच दृष्टिकोणातून वेच्यांची निवड केलेली आहे.

वस्तुतः सहाहून अधिक शतके प्राचीन मराठी कविता निर्माण होत राहिली; त्यामुळे तिचा विस्तार अफाट झाला आहे. विविध कालखंडातील तिच्या विविध रूपविलासांचे नीट दर्शन घडविण्यासाठी त्यांतील निवडक भागांचे किमानपक्षी तीन तरी मोठे संग्रह काढणे योग्य ठरले असते. मुळात संपादकांचा तोच विचार होता; पण अनेक व्यावहारिक अडचणींमुळे, हा विचार स्थगित करावा लागला; आणि एकाच संग्रहातून का होईना पण प्राचीन मराठी कवितेचे प्रधान रूपप्रकार, स्थल–काल–व्यक्तिपरत्वे त्यांमध्ये होणारे बदल, त्यामागील काव्यविषयक जाणिवा आणि त्या त्या काळातील वाङ्मयाभिरुची यांचे निदर्शन होईल, असे नेमके आणि मोजके काव्यखंड रसिक अभ्यासकांच्या हाती द्यावेत, असा निर्णय घेऊन त्याप्रमाणे प्रस्तुत कविता–संग्रहाचे संपादन करण्यात आले आहे.

या संग्रहामध्ये प्राचीन मराठी कवितेमधील निवडक वेचे कालक्रमानुसार आणि कविपरत्वे छापण्यात आले आहेत. वेचे कालक्रमानुसार दिल्याने हा संग्रह ओळीने अभ्यासताना प्राचीन मराठी कवितेचा कालपट सहजपणे आपल्या मनश्चक्षूंपुढून उलगडत जात असल्याचे जाणवेल, आणि कालपरत्वे कवितेत होत जाणाऱ्या बदलांचे चित्रही नकळत उमटत जाईल! कविपरत्वे ही कविता येथे देण्यातही एक हेतू आहे. त्या त्या कवीची कविप्रकृती, त्याचे काव्यदृष्ट्या वेगळेपण, त्याच्या काव्याची विविधता, त्याच्या काव्याचे मराठी कवितेतील स्थान इत्यादी वैशिष्ट्ये निर्दिष्ट करता यावीत, हा तो हेतू होय. तसेच यामुळे एकेका कवीची कवी म्हणून खास वैशिष्ट्ये स्वतंत्रपणे तर ध्यानी येतीलच पण परस्परांच्या काव्यकृतींच्या तौलनिक अभ्यासाने त्यांचे वाङ्मयीन मूल्यमापनही करणे शक्य होईल. पण असे असले तरी, हे वेचे निवडताना मूलतः प्राचीन मराठी कवितेमधून दिसून येणाऱ्या विविध प्रवृत्ती आणि तिची विविध कलारूपे यावरील दृष्टी मात्र ढळू दिलेली नाही.

प्राचीन मराठी कवितेमध्ये तीनच प्रमुख काव्यप्रकार आढळतात. (१) भाष्यकाव्य (२) कथाकाव्य (३) भावकाव्य.

भाष्यकाव्य हे मराठीचे केवळ वैशिष्ट्य होय. भाष्य हेच जेथे काव्यरूप पावते ते भाष्यकाव्य. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव यांसारखे साहित्य हे भाष्यकाव्य होय. अध्यात्म-विचार किंवा तत्त्वज्ञान प्रतिमांच्या माध्यमातून चित्रित होताना जेव्हा ऐंद्रिय–संवेदनारूप घेतात, तेव्हा भाष्यकाव्य जन्म पावते, असे म्हणायला हरकत नाही. ज्ञानेश्वरीच्या रूपाने गीता-तत्त्वज्ञान हे इंद्रियांकरवी भोगता यावे, असे झाले आहे. ज्या ग्रंथात तत्त्वविवेचन केवळ तर्कनिष्ठ पद्धतीने केलेले असते, तो ग्रंथ 'काव्यात' समाविष्ट होऊ शकत नाही. ते नुसते पद्यरूप भाष्य होय. काही चिंतनपर किंवा नीतिबोधपर स्फुट कविता मात्र भाव-पूर्णतेने रचलेली असते. तिचे स्वरूप भाष्यासारखे नसले, तरी त्यात जीवनभाष्य किंवा वैचारिकतेला महत्त्व लाभलेले असते. भाष्यकाव्यामध्ये तिचा सोयीसाठी समावेश करता येईल. रामदासांच्या 'दासबोधा'ला विचारघन काव्य म्हणताना अडचण येऊ नये.

भारुडे ही एक प्रकारची बौद्धिक स्वरूपाची स्फुट पदरचनाच होय. रूपकाच्या शरीरात येथे अध्यात्माचा प्राण भरलेला असतो.

निरोष्ठ रामायण, दाम रामायण किंवा केवळ शब्दबंध यांमध्ये काव्याचा कसलाच संबंध नसतो. ती रचनेची एक कसरत असते. वानगीदाखल अशा कृत्रिम रचनाप्रकारांचा प्रस्तुत संग्रहात समावेश केलेला आहे.

प्राचीन मराठी कवितेतील दुसरा प्रकार म्हणजे कथाकाव्य होय. कथाकाव्य ही संज्ञा व्यापक अर्थाने योजिलेली आहे. कथा हेच ज्या काव्याचे प्रधान अंग ते कथाकाव्य होय. या कथाकाव्याचे दोन प्रमुख भेद आढळून येतात–(१) विदग्ध कथाकाव्य (२) आख्यान काव्य. नरेंद्राचे 'रुक्मिणीस्वयंवर' काव्य किंवा भास्करभट्ट बोरीकराचे 'शिशुपाल-वध' हे काव्य 'विदग्ध कथाकाव्य' या संज्ञेस पात्र ठरेल. संस्कृतमधील विदग्ध महाकाव्याच्या धर्तीवर रचलेली पण पूर्णपणे त्याच्या लक्षणांनी युक्त नसलेली अशी ही रचना आहे. विदग्ध महाकाव्य आणि आख्यान काव्य यांचा हा सुंदर संकरप्रकार आहे, म्हणूनच त्यास 'विदग्ध कथाकाव्य' असे संबोधिलेले आहे.

'आख्यान काव्या'चे कितीतरी छोटे-मोठे विविध प्रकार प्राचीन मराठी कवितेत पाहावयास मिळतात. जेथे कथा सांगण्याकडे, तिच्या प्रवाहित्वाकडे, गतिमानतेकडे, तिच्या रसवत्तेकडे प्राधान्याने लक्ष दिलेले असते, ती आख्यान–कविता होय. यात ठळकपणे दोन प्रकार आढळतात. (१) दीर्घ आख्यान काव्य. (२) स्फुट आख्यान काव्य.

मुक्तेश्वरी ओवीभारत किंवा मोरोपंती आर्याभारत ही वस्तुतः संस्कृत आर्ष महाकाव्याचे मराठी अवतार होत. पण या अवतरण-क्रियेत मराठी भक्तिसंप्रदायाचे कितीतरी अन्य हेतुप्रवाह मिसळले गेल्याने, त्यांना सुदीर्घ आख्यानांचे रूप आले आहे. श्रीधराचा पांडवप्रताप याच जातीचा ठरेल; भेद इतकाच की पांडवप्रताप ही रचना भाषांतर किंवा रूपांतर स्वरूपाची नाही.

प्राचीन मराठी कवितेचे आणखी एक खास वैशिष्ट्य म्हणून स्फुट काव्याचा उल्लेख करावा लागेल. मोरोपंत–वामन पंडित यांची रेखीव, भावपूर्ण, रसाळ स्फुट–आख्यान–कविता काव्यदृष्ट्या अभ्यसनीय आहे. कटाव आणि चम्पू हे आख्यान–काव्याचेच महत्त्वपूर्ण रचनाबंध होत. एकनाथांचे 'रुक्मिणी-स्वयंवर' हे रूपक आख्यानचे अप्रतिम उदाहरण ठरू शकेल. पोवाडा हे वस्तुतः एक आख्यान–काव्यच होय. पौराणिक कथेवर जशी आख्यानरचना तशीच ऐतिहासिक कथाप्रसंगावर पोवाड्याची रचना! ही सर्व आख्याने कथादृष्ट्या पूर्ण असतात. अशा आख्यान–काव्यातून कितीतरी सुंदर सुंदर प्रसंगचित्रणे, स्थलवर्णने आणि मूर्तिवर्णने आढळतात. प्रस्तुत संग्रहामध्ये त्यांचा समावेश केलेला आहे.

चरित्रात्मक आणि आत्मचरित्रात्मक कविता प्राचीन मराठीमध्ये अल्पांशाने आढळत असली, तरी ती वैशिष्ट्यपूर्ण असल्याने मनात भरणारी आहे. वस्तुतः चरित्र – आत्म-चरित्रात्मक प्राचीन कवितेचे स्वरूप आख्यान–कवितेसारखेच आहे. निवेदनाची पद्धती आणि हेतू व फलश्रुती ही या दोन्हीही काव्य–प्रकारात एकच आहेत. आत्मचरित्रातील निवेदनातील जिव्हाळा आणि मोकळेपणा वेगळा उमटून दिसतो, हे मात्र खरे! बहिणा-बाईंचे आत्मकथन आस्वादिण्यासारखे आहे. 'श्रीज्ञानेश्वरांच्या समाधीचे अभंग' हे चरित्र–आत्मचरित्रात्मक अशा संमिश्र स्वरूपाचे आहेत. हे अभंग म्हणजे भावोत्कट प्रसंगचित्रणात्मक काव्याचे उत्कृष्ट नमुने ठरावेत!

प्राचीन मराठी कवितेतील तिसरा काव्यप्रकार म्हणजे 'भावकाव्य'. खरे तर, कोणत्याही खऱ्या कवितेत भाव–भावना उत्कटत्वाने व्यक्त होत असतात. पण येथे भावकाव्य ही संज्ञा आत्मोद्गारी कवितेला, भावोत्कट आत्माविष्कारी कवितेला अनुलक्षून योजिलेली आहे. संतांची अभंगवाणी ही त्यांच्या आध्यात्मिक जीवनातील भावोत्कट अनुभूतीचा उत्स्फूर्त उद्गार आहे. त्यातील आत्मपरता, स्वयंपूर्णता, स्वतंत्रता, उत्कटता, प्रामाणिकता आणि मुक्तमनस्कता पाहता हे काव्य म्हणजे Romantic lyric च्या जातीचे आहे हे जाणवते. आरती, धावा, विराणी, स्तोत्र, करुणाष्टकादी उपासना-कविता ही वस्तुतः आत्मोद्गारी भावकविताच होय. प्राचीन मराठी कवितेतील कितीतरी पदे भावकाव्यात्मक आहेत. पाळणा, भूपाळी, विडा, गौळणी, लावणी ह्या कवितेत आत्मपरता नसली तरी एकरसात्मकता, स्वयंपूर्णता व स्वतंत्रता आहे. कितीतरी देवतांची मूर्तिवर्णनेही प्रसंगी भावोत्कट बनली आहेत. फार काय प्राचीन मराठीत क्वचित निसर्गवर्णनालाही भावनिर्भरता लाभलेली आढळते.

भावकवितेचाच एक प्रकार म्हणून पदांकडे पाहाता येईल. पदांमध्ये बालगीते, क्रीडा–गीते, लोकगीते, नाट्यगीते (झगडा), अंगाईगीते, फटका, पाळणा, झोपाळ्यावरील ओव्या, विविध रागांत बांधलेली पदरचना, धवळे इत्यादी प्रकार येतात. यात क्वचित चमत्कृतिपूर्ण गेय रचनाबंधही आढळतात. या सर्वांचा समावेश भावकाव्यांतर्गत पदरचनेतच व्हावा.

प्रस्तुत कविता–संग्रहात प्राचीन मराठी कवितेची भाष्य–काव्य, आख्यान–काव्य

आणि भावकाव्य ही तिन्ही अंगे, त्यांच्या ठळक उपांगांसह एकत्रित करण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे. काव्यप्रकारांच्या दृष्टीने या संग्रहाकडे पाहिल्यास कोणत्या कवीने किती व कोणते काव्यप्रकार कसे हाताळले आहेत याचा अभ्यास करणे सोपे जाईल; तसेच प्रत्येक काव्यप्रकाराचा कालानुसार चढउताराचा आलेखही काढता येईल; आणि समग्रतेने प्राचीन मराठी वाङ्मयाची वाटचाल नीटपणे न्याहाळता येईल.

प्राचीन मराठी कवितेचे स्थूलपणे तीन ठळक कालखंड पडतात. (१) यादवकाल (२) शिवकाल (३) पेशवे काल.

यादवकालात प्राचीन मराठी कवितेची सर्व रूपे प्रकट झालेली दिसतात. या काळात महानुभाव कवींनी विदग्ध कथाकाव्य आणि आख्यान कथाकाव्य यांची निर्मिती केली; ज्ञानदेवांनी भाष्यकाव्य निर्मून पुढील मराठी साहित्यमंदिराचा पाया भरला; ज्ञानेश्वरांनी अभंगरूपाने जे भावकाव्याचे इवलेसे रोपे लावले (त्याच्या वेली गगनावेऱ्ही पोहोचल्या त्या पुढील भागवत संतमंडळींच्या अभंगवाणीतून!) या कालखंडात संस्कृत आर्ष महाकाव्याचे मराठी अवतारच तेवढे प्रकट व्हायचे राहिले होते.

ज्ञानेश्वर–नामदेवादींच्यानंतर मराठी कवितेवर दोन शतकांचा दाट अंधार पसरला. या तमोयुगानंतर प्रतिभासूर्य प्रखरनेने तेजाळला तो एकनाथांचा! एकनाथांच्या हाती येताच भाष्यकाव्याने आपल्यातील काव्य कमी करून भाष्यरूपालाच अधिक जोपासले. ज्ञानेश्वरांनी सहज म्हणून लिहिलेल्या मोजक्या भारूडांना एकनाथांनी आपल्या विविध आणि विपुल भारूड–रचनेने स्वतंत्र वाङ्मयीन महत्त्व मिळवून दिले. आणि त्यांच्या आख्यानकाव्याने आध्यात्मिक रूपकांचा आश्रय घेतला. एकनाथांनी जणू ज्ञानेश्वरांच्या भाष्यकाव्याला आख्यान–काव्याची उदाहरणे पुरविली. पंडिती काव्याची आणि कलाकाव्याची बीजेही एकनाथांच्या स्वयंवर-काव्यरचनेत भरपूर प्रमाणात आढळतात. मुक्तेश्वरांसाठी त्यांनी जणू आधीच वाट तयार करून ठेविली.

प्राचीन मराठी कवितेच्या सर्व प्रकारांचा विपुलतेने, समृद्धतेने जर आविष्कार झाला असेल तर तो शिवकाळातच! मुक्तेश्वर, वामन पंडित, सामराज, तुकाराम, रामदास यांसारख्या श्रेष्ठ कविपंचकाचा हा कालखंड. अगीनदास, तुळशीदास हे आद्य मराठी शाहीरही याच काळखंडातले; मोकळ्या मनाने पण जिव्हाळ्याने आत्मचरित्र गाणारी बहिणाबाई ही याच कालखंडातली! या कालखंडात भावकाव्य कळसाला पोहोचले ते 'तुकया'च्या अभंगवाणीत! जीवनभाष्याचे सामाजिकतेशी नाते जोडले गेले आणि पदरचनेत वास्तव अनुभूतींना स्थान लाभून त्यांचा जोरदार आविष्कार होत राहिला तोही शिवकालातच–रामदासांच्या उदंड स्फुट रचनेत! विदग्ध कथाकाव्याला अधिक वैदग्ध्य देण्याचा प्रयत्न झाला तोही याच कालखंडात–सामराजाच्या रुक्मिणीहरणात! आख्यान काव्याला रससंपन्न व सुटसुटीत रूप लाभले ते वामन पंडिताच्या स्फुट प्रकरणात! भाष्यकाव्याला आपले स्वतःचे स्वतंत्र, वास्तवाधिष्ठित, दणगट सामर्थ्य प्राप्त झाले ते रामदासी दासबोधात! आणि ऐतिहासिक घटनांना प्रथमच काव्यक्षेत्रात

ओढून आणले ते अगीनदासाच्या पोवाड्यात! विविधतेच्या, समृद्धीच्या आणि संपन्नतेच्या दृष्टीने शिवकाल हा प्राचीन मराठी कवितेचा सुवर्णकाळच ठरेल! प्राचीन मराठी कवितेने अध्यात्माला कधीच सोडले नाही, किंबहूना अध्यात्माने प्राचीन मराठी कवितेला मोकळेपणाने वावरू दिले नाही. हे जरी खरे असले, तरी हळूहळू मराठी कविता, या कालखंडात, कथाकाव्याचा अधिकाधिक आश्रय घेत घेत परतत्त्वस्पर्शाबरोबर मानवी जीवनस्पर्शाचे वाढते सौख्य अनुभवू लागली होती. सामराज–वामन पंडितादी कवींच्या काव्यातून पांडित्य उघडपणे व्यक्त होऊ लागले होते, त्याची गोडीही त्यांना लागली होती.

पेशवेकालात भाष्यकाव्य अंतर्धानच पावले; मात्र ज्ञानदेवांनी पुरस्कारिलेले आणि पुढिलांनी सतत गुंफित ठेविलेले भक्तिसूत्र या काळातील कवींनीही सांभाळले. या कालखंडात आख्यान–काव्याला बहर आला; वाङ्मयनिर्मिती मुख्यतः कीर्तनाश्रयी बनली. मोरोपंती आख्याने, देवनाथांची स्फुट प्रकरणे, अमृतरायाचे कटाव, निरंजन माधवांची चम्पूरचना ही कवितारूपे याची निदर्शक होत. कूटरचना, श्लेष–यमकादींची बांधणी, अलंकारांची हौस, विविध छंदोरचनेची कसरत, गेय पदबंध इत्यादींना भरती आली. भक्तीच्या नावाखाली, कीर्तनादींच्या माध्यमातून कवितेने पंडिती निर्जीव वळण घेतले. कीर्तनाश्रयी मराठी कविता हा स्वतंत्र अभ्यासाचाच खरोखरी विषय व्हावा इतकी त्याची विविधता आणि व्यापकता आहे. या कालखंडात जिवंत भाष्यकाव्य नाही की उत्स्फूर्त भावकाव्य नाही; जे आहे ते काव्यातले कर्मकांड! या कालखंडात श्रीधराची आख्यानकाव्ये, महिपतीचे चरित्र–काव्य, मोरोपंतांची कांही निवडक स्वतंत्र व आर्या भारतांतर्गत स्फुट आख्यान–रचना, अमृतरायाचे काही कटाव आणि निरंजनमाधवाचा चम्पू–बंध यांतून काही खास संस्कृत वळणाची, तर काही खास देशी मराठी ढशाची कविता प्रभावीपणाने निर्माण झालेली दिसते. रामजोशी—अनंतफंदी–इत्यादी शाहिरांच्या कवनांतून प्रतिभेचा जिवंत झरा उसळतो, पण अल्पावकाशात तोही एका ठरीव पाटातून वाहात चालल्याचे नजरेस पडते.

यादवकाळात मराठी कविता ज्या जिद्दीने व ज्या प्रतिज्ञापूर्वकतेने संस्कृत–प्राकृत कवितेपासून फुटून बाहेर पडली व वेगळी झाली, ती तिची जिद्द पुढे पुढे ओसरत गेली. विश्वात्मक अनुभूतीच्या साक्षात्काराने मोहरलेली मराठी कवितेच्या उगमस्थानची भावकविता हळूहळू लोपत गेली; अरूपाचे रूप करणारे मूळारंभीचे भाष्यकाव्यही आटत गेले आणि अखेर उरले ते सांकेतिक कथाकाव्य. पेशवाईच्या अंती प्राचीन मराठी कवितेच्या जीवनचक्राचा फेरा पुरा झाला होता. जीवनाच्या वाटचालीतील 'अस्ति, जायते, वर्धते, विपरिणमते, अपक्षीयते' या प्रारंभापासून अंतापर्यंतच्या पाच अवस्थांतून प्राचीन मराठी कविता क्रमाक्रमाने गेलेली दिसते. तिचा अपक्षय अव्वल इंग्रजीत अधिकच होत राहिला आणि केशवसुतांच्या आगे–मागे ती केव्हातरी कुठेतरी थांबली ती थांबलीच! वैभवास चढलेल्या एखाद्या प्रचंड, प्रदीर्घ साम्राज्याचा

स्वाभाविक अस्त होताना पाहून जी मूक उदासीनता वाटते, तसे काहीसे, सहाहून अधिक शतके साम्राज्य भोगणाऱ्या प्राचीन मराठी कवितेच्या अस्तसमयी जाणवते.

'अस्ति, जायते......' या अवस्थांतील शेवटच्या 'नश्यति' या अवस्थेचा येथे मुद्दामच उल्लेख केलेला नाही; कारण माणूस मर्त्य असला तरी त्याची कला ही अमर असते. प्राचीन मराठीतील जे जिवंत, चैतन्यमय, रसरशीत, जोमदार आणि स्वभावसुंदर आहे त्याचा कधीही विनाश होणार नाही. देशकाल-परिस्थिति-भेदातीत असे जे केवल मूलभूत काव्यनिकष असतात, त्यांच्याशी ताडून पाहिले तरी हे अस्सल काव्यसुवर्ण पूर्ण कसास उतरणारे आहे. म्हणून प्राचीन मराठी कविता ही थांबली, म्हणून जरी संपली, तरी ती विनाश पावली असे होत नाही !

प्राचीन मराठी कवितेचे असे इतिहासमुखाने आणि कविपरत्वे, पण मूलतः काव्य-प्रकार-भेदरूपाने सम्यग् दर्शन घडविण्याचा एक नम्र प्रयत्न प्रस्तुत संग्रह संपादिताना करण्यात आला आहे.

मराठी कविता संस्कृतप्राकृतापासून वेगळ्या रूपात अवतरताच तिला आणखी एक स्वतःसाठी कार्य करणे अपरिहार्य ठरले. आपल्या नव्या रूपवैशिष्ट्यांचा, आपल्या सामर्थ्याचा आणि सौंदर्याचा वेगळेपणा नेमका कशात आहे, आणि तो जाणण्यासाठी नेमकी कोणती दृष्टी रसिकांनी अंगी बाणणे आवश्यक आहे, हे स्वतःच सांगणे तिला आवश्यक वाटले. क्रांतिकारी कलेला हा आत्मरूपपरिचय नेहमी करून द्यावाच लागतो. तसेच ज्या भाषेतून ही कविता रूप घेत होती त्या भाषेच्याही सामर्थ्याची जाणीव रसिक-मनांत करून देण्याचेही कार्य तिला करावेच लागले. मराठीमध्ये सर्जनशील साहित्या-बरोबरच साहित्यविमर्शात्मक कवितेचाही जन्म झाला आहे. प्रस्तुत संग्रहात प्राचीन मराठी कवींचे साहित्यविचार आणि मराठी भाषाभिमान व्यक्त करणाऱ्या वेच्यांचा यामुळेच समावेश करण्यात आला आहे. ह्या आविष्कारातही रसिकांना भावपूर्णता आढळेल.

वेच्यांची निवड करताना एकाच वाङ्मयप्रकाराची विविध वैशिष्ट्ये जर व्यक्त होत असतील तरच त्या वाङ्मयप्रकाराचे एकाहून अधिक वेचे स्वीकारले आहेत. तसेच विविध भाषाशैली व वाङ्मयीन अभिरुची यांचे निदर्शक वेचे निवडण्याची दक्षता घेतली आहे. विविध धर्मपंथांचे आणि संप्रदायांचे साहित्य, निवडीमागील मूळ भूमिका न सोडता, जितके स्वीकृत करणे शक्य आहे तितके ते स्वीकृत केलेले आहे. काही ठिकाणी वेचे संपादित करून घेणे इष्ट वाटले; तसेच काही वेच्यांच्या बाबतीत पाठभेदचिकित्सा करून वेगळे पाठभेदही स्वीकारणे आवश्यक ठरले.

प्रस्तुत संग्रहातील कविता इ. स. ११५० ते इ. स. १८४० या कालखंडातील, म्हणजे मध्ययुगीन कालामधील आहे. ह्या कालखंडास वस्तुतः 'प्राचीन' म्हणणे अशास्त्रीय ठरेल. पण 'शास्त्रात् रूढिः बलीयसी' या न्यायाने या कवितेस 'जुनी किंवा मध्ययुगीन मराठी कविता' न म्हणता 'प्राचीन मराठी कविता' असेच संबोधिले आहे.

प्रस्तुत संपादकांनी अवलंबिलेल्या दृष्टिकोणापेक्षा वेगळ्या दृष्टिकोणाचा अवलंब करून, प्राचीन मराठी कवितांची उत्तम निवड करता येणे शक्य आहे. एकेका कवींच्या निवडक कविता, एकेका कालखंडातील प्रातिनिधिक कवींच्या कविता, केवळ गीताटीका, केवळ रामायण–काव्य, केवळ भागवत–काव्य, केवळ महाभारत–काव्य, केवळ आख्यान काव्य, केवळ अभंग काव्य, केवळ कीर्तनाश्रयी काव्य, केवळ चरित्रात्मक–आत्मचरित्रात्मक काव्य, केवळ शाहिरी काव्य, केवळ महानुभावीय, केवळ दत्तसंप्रदायी, केवळ दाससंप्रदायी काव्य, इ० इ० प्रकारे प्राचीन मराठी कवितांचे संग्रह काढता येतील. अशा प्रकारचे–म्हणजे कविदृष्ट्या, कालखंडदृष्ट्या, विषयदृष्ट्या, संप्रदायदृष्ट्या, एकेक काव्यप्रकारदृष्ट्या. अनेक संग्रह निघतील तेव्हाच प्राचीन मराठी कवितेचे सम्यक् स्वरूप लक्षात येणे शक्य होईल. तसे आजवर काही प्रयत्न झालेले आहेत. त्यातील विविध कवींच्या कवितांच्या संग्रहांची यादी परिशिष्टात (क्र० ४) दिलेली आहे.

अत्यल्प कालावधीत प्रस्तुत संग्रहाची सिद्धता करणे अटळ ठरल्याने त्यामध्ये काही छोट्या–मोठ्या उणिवा राहिल्या आहेत, याची संपादकांस जाणीव आहे. स्थलमर्यादेमुळे, मनात असूनही कितीतरी महत्त्वाच्या, सुंदर अशा वेच्यांचा येथे समावेश करता आलेला नाही. तथापि त्यांतील काहींचा निर्देश कविपरिचय आणि टीपांमध्ये केलेला आढळून येईल. काव्यप्रकारदृष्ट्या एक स्वतंत्र वर्गीकरण करून, तशी एक स्वतंत्र अनुक्रमणिका संग्रहाच्या शेवटी परिशिष्टामध्ये (क्र० १) दिलेली आहे. प्राचीन मराठी कवितेच्या अभ्यासकास प्रस्तुत संग्रह त्या कवितेचे एक नमुना–पुस्तक वाटेल, आणि त्यामुळे त्या कवितेकडे पाहाण्याचा त्याला एक वेगळा दृष्टिकोण लाभेल, अशी संपादकांना उमेद आहे.

प्रस्तुत संग्रह संपादिताना मुंबई मराठी साहित्यसंघाच्या गजेंद्रगडकर स्मारक संदर्भ ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. रा. स. शिरवलकर आणि पारले महाविद्यालयातील ग्रंथपाल श्री. द. गो. शिवदे यांनी तत्परतेने संदर्भ ग्रंथ उपलब्ध करून दिले. प्रा. डॉ. गं. ब. ग्रामोपाध्ये यांनी कालखंडाच्या स्वरूपाच्या बाबतीत उपयुक्त सूचना केल्या. विशेषतः, अशा प्रकारचा संग्रह अविलंबे व्हावा म्हणून साहित्यसंघाचे सर्वश्री दि. वि. आमोणकर व बापूराव नाईक यांनी वेळोवेळी आस्था दाखविली व संपादकांना उत्साहवर्धित केले. तसेच मौज प्रकाशन गृहाचे मालक श्री. वि. पु. भागवत यांनी मुद्रणाचे कार्य अतिशय तातडीने, तरीही अत्यंत सुबकपणे करून दिले. श्री. प्रकाश मळकर्णेकर यांनी अवचितसुतकाशी कवींच्या चक्रबंधरचनेचे आकर्षक नमुनाचित्र रेखाटून दिले. या सर्वांचे संपादक फार आभारी आहेत. ● ● ●

बलिप्रतिपदा,
कार्तिकमासारंभ
१० नोव्हेंबर १९६९

वा० रा० ढवळे
व० दि० कुलकर्णी

परिशिष्टे

श्री

तीरें संस्कृताचीं गहनें । तोडोनि मऱ्हाटिया शब्दसोपानें ।
रचिलीं धर्मनिधानें । श्रीनिवृत्तिदेवें ॥
म्हणौनि मल्तेणें एथ सद्भावें नाहावें । प्रयागमाधव विश्वरूप पहावें ।
येतुलेनि संसारासि द्यावें । तिळोदक ॥
हें असो ऐसें सावयव । एथ भासिन्नले आथी रसभाव ।
तेथ श्रवणसुखाची राणिव । जोडली जगा ॥

* * *

हें सारस्वताचें गोड । तुम्हींचि लाविलें जी झाड ।
तरी आतां अवधानामृतें वाड । सिंपोनि कीजे ॥
मग हें रसभाव फुलीं फुलैल । नानार्थ फळभारें फळा येईल ।
तुमचेनि धर्में होईल । सुरवाड जगा ॥

* * *

वाचें बरवें कवित्व । कवित्वीं रसिकत्व
रसिकत्वीं परतत्व- । स्पर्शु जाणे ॥

ज्ञानेश्वर

मुकुंदराज

१. वेदशास्त्रांचा मथितार्थु। मऱ्हाटिया जोडे फलितार्थु।

इया बोब्रडेया बोला। श्री चंद्रचूड संतोखला।
मग सौरसु केला। ग्रंथनिर्माणीं ॥ १ ॥
वेदशास्त्रांचा मथितार्थु। मऱ्हाटिया जोडे फलितार्थु।
तरि चतुरीं परमार्थु। कां नेघावा ॥ २ ॥
जाड चार्तुयातें जिणें। यैसें बोलती स्याहाणे।
तरि येथिंचिये परमार्थ खुणे। ग्राहिक कां न होआवें ॥ ३ ॥
धुळि आंतिल रत्न। जरि भेटे न करितां प्रेत्न।
तरि चतुरिं येत्न। कां न करावा ॥ ४ ॥
जऱ्हि रुइचिये झाडीं। भरति मधाचिया कावडी।
तऱ्हि हिंडावेयाचि आडपाडी। कां पडों द्यावी ॥ ५ ॥
जऱ्हि हे आरुष बोल। परि रोकडें ब्रह्मज्ञान हें नवल।
तऱ्हि अवज्ञा कवण करिल। येथ विषईं ॥ ६ ॥
ऊंस किरु दिसे काळा। परि घेणे रसाचा गळाळा।
तैसे आरुष बोल परि झळाळा। दिसे विवेकाचा ॥ ७ ॥
नवरसांचे उपलवणें। ते उघड वाचेसीं नागवणें।
म्हणौनि न प्रवर्त्तती स्याहाणे। तेथ विषईं ॥ ८ ॥
हो का वक्ता नवरसांचा। जऱ्हि चतुर अपाडाचा।
तथापि लाभु परमार्थांचा। तया दुर्लभुच कीं ॥ ९ ॥
तैसी माईक रसवृत्ती। बोलतां आंगासि न ये महंती।
आणि परमार्थसंवित्ती। दुऱ्हीदुऱ्हावें ॥ १० ॥
श्वपचाचिये घरिंचा पाकु। जऱ्हि जाला अपाड रसिकु।
तथापि सदाचार लोकु। तयासि नातळेच कीं ॥ ११ ॥

तैसें संवसारिक बोलणें । जे न स्वीकरिती स्याहाणे ।
तया अखंड अनुभवणें । परमतत्त्व ॥ १२ ॥
जेथ ब्रह्मरसाची गोडी । अखंड अनुभविजे रोकडी ।
तेया बोलाची आवडी । साधूजनांसि ॥ १३ ॥
म्हणौनि विवेकसिंधु येणें नावें । ग्रंथु कीजैल स्वानुभवें ।
तऱ्हिं श्रोतीं अवधान देयावें । म्हणे मुकुंदराजु ॥ १४ ॥
गुरुशिष्याचेनि संवादें । जें बोलिजैल विनोदें ।
तें आइकतु आनंदें । महानुभावें ॥ १५ ॥
कल्पतरूचेनि पडिपाडें । जऱ्हि फळतीं घरिंचीं झाडें ।
तऱ्हि तियें वाडियेचेनि कोडें । न लावावीं कां ॥ १६ ॥
भाषा हो का मऱ्हाटी । परि उपनिषदाचीच राहाटी ।
तेथिंचा अर्थु जीवाचियें गांठी । कां न बांधावा ॥ १७ ॥
आइते शिष्याचे आक्षेप । सिद्धचि गुरुवाक्यदीप ।
जेणें संशयतमविक्षेप । फिटती श्रोतेयांचे ॥ १८ ॥
हा ग्रंथु विचारितां । नाही ज्ञानाचि दुर्लभता ।
आणि मुक्तिसायुज्यता । वेधेंचि वोळगे ॥ १९ ॥
येचि देहीं येचि डोळां । भोगिजे मुक्तीचा सोहळा ।
तऱ्हि वैराग्याचिया तातवेळा । कां सिणावें ॥ २० ॥

◇ ◇

महदंबा

१. रथावरि वाईली वेगीं भीमकाची कुमरी

रात्रि प्रकाळली जाला प्रातु पाहारु :
पंचमा शब्दीं राउळीं नारदुतुंबरु :
प्रेमें आनंदें गोवींद गाती :
यसोदा – देवकादेवी तिया न्हाणीयासीं आइत करीती : ॥ १ ॥
माली – मर्दनां दींधली राया मुरारी :
आल्यवानी करीती वीद्याधरा नारी :
गुण – गंधर्व तेथे रुषी पढती आनंदें :
यादव पंडुसुत सकळै सभा पातले गोवींदे : ॥ २ ॥
मादनें जालें देवकीचया बाळा :
मालगंठी नेसला सोनेसळा :
सर्वांगीं भोरि केली मृगनाभीचा आडा लल्लाटीं :
बासींगें हीरेयाचीं जोती मीरवती वीती वीरगांठी : ॥ ३ ॥
कंठी घाली अमोलीक एकावळी :
रत्नाचे झळंबुके कानी लेइला वनमाळी :
करीं सरी साखळीया चरणीं तोडरु :
कैवल्याचा पुतळा कैसा वर्ण (र्णा) वा सर्वेश्वरु : ॥ ४ ॥
वोवाळीती [दिवों] मंगळ (ळो) चा (च्चा) रीं :
सेस भरीती सांवळिया सुंदरी :
वीप्र देती आसीर्वाद वीजया होय म्हणती देवकीचया कान्हा :
योगीय – भक्तिजन तळउपर जाणवीती पुरुषोत्तमा : ॥ ५ ॥
उद्धवदेवें कीजे हा मंत्रु :
नीकट वर्तत असे शीशूपाळु स (श) त्रु :

सन्नानबध होउनी असा कटकाभीतरी म्हणती पालणा पालाणा
भक्त – आंगवळेसवें रथी आरूढले गोवींदराणा : ॥ ६ ॥
रुक्मीणीसि न्हाणवारे करीति त्या बाळा :
सेलद्रीया आणिती अनेक अलंकार :
कांकणे कळावीया अंदु पायवटे पदक लेववीती :
रत्नाचे हार कृष्णा – राणीं सालंकृत करीती : ॥ ७ ॥
रुक्मीणीं श्रृंघारु देतां जालि पाहाटि :
तवं भीमकें घडिय केली प्रतेष्ठा :
लोणवाण केळवाण मूळ नाहाणयासी आइत करीती :
तवं बाळी वेग्र जाली तिया स्मरीले द्वारकापती : ॥ ८ ॥
रुक्मीणी भीमकातें म्हणे ताता :
नवसीली असे मींयां अंबीके यात्रा :
रावो म्हणे वेगु करा हस्तीं गुदर घाला *(वारु पालाणा)* :
(°अरुढली गजस्कंदीं) ह्रदइं धरीयले गोवींदाचे चरण : ॥ ९ ॥
आंगवळेसवें बहुत दळभारु :
तवं तियसवें भाट पढती कैवाडु :
वाद्यंत्रें सुडावीलीं तवं वीप्रु दावी खुणा :
हा पैल देखै तुझा वल्लभु गोवींदुराणा : ॥ १० ॥
अंबिके भुवनीं प्रविष्ट सुंदरी :
पूजा केली देवी पंचमा उपचारीं :
दोन्ही कर जोडूनी बोले रुक्मीणी सुललित वाचा :
तूं मज वरद होइं वेगीं मिळवी यादवराजाः ॥ ११ ॥
अंबीके रायांगणीं उभी ठेली बाळी :
तवं वीप्रें यतु देखिला वनमाळी :
(°सावळा कमळनयन°) देवी पाहे पां लावण्यसींधु :
तवं तीया रुक्मीणीं दोन्ही करीं जोहरीले गोवींदु : ॥ १२ ॥
हंसागती चाले बाळा :
आनंदें आसुवें कांहीं नेदखेचि डोळा :
कंपीत सासंकित आंगीं रोम स्वेद *(लल्हांटी)* :
तवं तिया रुक्मीणी यादवरावो श्रीकृष्णु देखिला *(थांटी)* ॥ १३ ॥

रुक्मीणी पाहावेया तीन्ही लोकु आले :
भीमकी देखोनि क्षेत्री वीकळ गेले :
हरीयली चैतन्य (न्यें) नाथरायें यका हातीहूनि गळति हातियरें :
स्तवीती ब्रह्मादीक जवळी पातले वसुदेवा कुमरु : ॥ १४ ॥
वेगवतर (पुंढे) पातले मुरारी :
रथावरि वाइली वेगीं भीमकाची कुमरी :
नीसानीं गगन गर्जे मेघडंबरीं *(छत्रीं अंघकारुं)*
घाली गोविंदा माळ ब्रह्मादीक देव करीती जयजयकारु : ॥ १५ ॥
माळ घालितां बाळां श्रीकृष्णातें देखीयलें
अमूर्त ब्रह्म कैसें मूर्तासि आलें :
प्रकटले परमानंद सजळ लोचन सदगद वाचा :
बोलती कृपावंतें देवें अजि केलें साच : ॥ १६ ॥

२. कृष्ण–रुक्मिणीची वरात

वरातेंसी रायें केली आइती :
पाखरीले वारु रथ संजोगीले गुढरींले हस्ती :
पहुपकीं श्रीकृष्ण – रुखमीणी छत्रीं – सुखासनीं अतुरें कुंवर–कुंवररी :
भीमकु चाले परीवारेंसीं जय – वाद्यंत्रें तुरे गौ भेरी : ॥ १ ॥
मेदनी कांपे भारें सूर्यो न दीसे [छत्रांचेनि] अंधकारें :
सैन्यें चालेती श्रीकृष्णरायाचीं अपारें :
दुंधभीनाद आइकौनि त्रीभुवन यत असे दरुसना :
देखोनी श्रीकृष्ण रुखमीणी जग पावतुसे परम साधना : ॥ २ ॥
पेणोवेणा श्रीकृष्णरावो भीमक आले :
द्वारका देखूनी सकलै हर्षीत जाले :
पांची पेरोज हीरे माणीकें कनक पौळी सता :
चातुरदक्ष बनें रम्यें तेथ मेलीकार राजया अच्युता : ॥ ३ ॥
गुढीया – तोरणें द्वारकें निच उछाचो :
वीशेषें श्रीरखमीणीं प्रणूनि आले श्रीकृष्णरावो :
कुंकमाचे सडे मुक्तिचौक तोरणें मखर :

द्वारका नव्हे ब्रह्मविद्यातेजें लोपलें चराचर : ॥ ४ ॥
जालें अस्तमान भीमकें केली मूळरचना :
श्रींगार करूनि दांडीया चढलीया अंगना :
यादव अरूढ गज – वारीकां छत्रां – सीरीगीरीयां बंबाळु दीवीयां नाहीं अंतुः
वाद्यंत्राचा घोषनाद नारद – तुंबर गीतीं गोवींद आइकि [वि] तुः ॥ ५ ॥
देववृंदे ऋषीवृंदे गीतमंत्रध्वनी :
गाजत–वाजत आले जेथ रावो श्रीचक्रपाणी :
वऱ्हाडीया पाये प्रक्षाळूनी पुस्पां तांबोळां [सन्मान केला] :
भीमकीचिये माते कुंकुम–कस्तूरी लावीती तीया बाळा : ॥ ६ ॥
जातिजुती पानें पोफळें परीएळी पाटोळीं :
भीमकीचीये मातेसीं उचलणी केली :
मुगतां – माणीकांचे दांडे गोमेद पद्मराग माणिके उधांती :
श्रींगार श्रीकृष्णां – रखमाणीये देउनी [पार्यतकें] मुगटीं ओळगाविती : ॥ ७ ॥
वऱ्हाड चालीलें नगराभीतरी :
गुढरीं अरूढ श्रीयेसहीत मुरारी :
चवरें वरी कनकदंडे सीरीगीरीं छत्रां नाहीं सेव्रो :
द्वारकेची रचना देखूनी नीव्हां वीस्मति भीमकरावो : ॥ ८ ॥
वहुवर पाहावया तीन्ही लोक आले :
माडीं धवळारीं यक्ष वीमानीं बैसले :
श्रीमंत श्रीचक्रधर द्वारकेचा राणा :
सुंदर गोपीनाथ देखूनी पारुखलें नक्षेत्रांचें भ्रमण : ॥ ९ ॥
गौरा स्यामा रामा करीती आक्षवणी :
नगरु – अस्त्रीया वोवाळीती मृगनयेनी :
जयेजय शब्दीं म्हणती देव पुस्पवरीषावो करीती :
श्रीकृष्णा पाहावेया व्याकुळा सुरांगना खणौखणीं वीमानीं झेंपा घालीती : ॥ १० ॥
समुदायें पेरवणी तेथ सारदा मुखरणी :
कांना (न्हा) मना सुहावना रावो गाती श्रीचक्रपाणी :
भेरी – नीसानें संखाचीया ध्वनीं नीगम ब्रह्मावो करीती :
देव पातले माहाद्वारा तेथ देवकीजननी करी आरती : ॥ ११ ॥

◇ ◇

ज्ञानेश्वर

१. व्यासांचा मागोवा

आणि कृष्णार्जुनीं मोकळीं । गोठी चावळिली जे निराळीं
ते श्रीव्यासें केली करतळीं । घेवों ये ऐसीं ॥ १ ॥
बाळकातें वोरसें । माय जैं जेवऊं बैसे ।
तैं तया ठाकती तैसे । घांस करी ॥ २ ॥
कां अफाटा समीरणा । आपैतेपण शाहाणा
केलें जैसें विंजणा । निर्मूनियां ॥ ३ ॥
तैसे शब्दें जें न लभे । तें घडुनियां अनुष्टुभें ।
स्त्रीशुद्रादि प्रतिभे । सामाविलें ॥ ४ ॥
स्वातीचेनि पाणियें । न होती जरी मोतियें ।
तरी अंगीं सुंदराचिये । का शोभतें तियें ॥ ५ ॥
नादु वाद्या न येतां । तरी कां गोचरु होता
फुलें न होतां घेपता । आमोदु केवीं ॥ ६ ॥
गोडी न होतीं पक्वान्नें । तरी कां फावती रसनें
दर्पणावीण नयनें । नयनु का दिसे ॥ ७ ॥
द्रष्टा श्रीगुरुमूर्ती । न रिगता दृश्यपंथीं ।
तरी का ह्या उपास्ती । आकळता तो ॥ ८ ॥
तैसें वस्तु जें असंख्यात । तया संख्या शतें सात ।
न होती तरी कोणा येथ । फावों शकतें ॥ ९ ॥
मेघ सिंधूचें पाणी वाहे । परी जग तयातेंचि पाहे ।
कां उमप तें नोहे । ठाकतें कोण्हा ॥ १० ॥
आणि वाचा जें न पवे । तें हे श्लोक न होते बरवे ।
तरी कानें मुखें फावे । ऐसें कां होतें ॥ ११ ॥

म्हणौनि व्यासाचा हा थोरु । विश्वासि जाला उपकारु ।
श्रीकृष्णउक्ती आकारु । ग्रंथाचा केला ॥ १२ ॥
आणि तोचि हा मी आतां । व्यासाचीं पदें पाहतां पाहतां ।
आणिला श्रवणपथा । मऱ्हाठिया ॥ १६ ॥
व्यासादिकांचे उन्मेख । राहाटती जेथ साशंक ।
तेथ मीही रंक येक । वाचाळीं करीं ॥ १७ ॥
परी गीता ईश्वरु भोळा । ले व्यासोक्तिकुसुममाळा ।
तरी माझिया दूर्वादळा । ना न म्हणे कीं ॥ १८ ॥
आणि क्षीरसिंधूचिया तटा । पाणिया येती गजघटा ।
तेथ काय मुरकुटा । वारिजतसे ॥ १९ ॥
पांखफुटें पाखिरुं । नुडे तरी नभींच स्थिरु ।
गगन क्रमी सत्वरू । तो गरुडही तेथ ॥ २० ॥
राजहंसाचें चालणें । भूतळीं जालिया शाहाणें ।
आणिकें काय कोणें । चालावेंचिना ॥ २१ ॥
जी आपुलेनि अवकाशें । अगाध जळ घेपे कलशें ।
चुळीं चूळपणा ऐसें । भरुनि न निघे ॥ २२ ॥
दिवियेचां आंगीं थोरी । तरी ते बहु तेज धरी ।
वाती आपुलिया परी । आणीच कीं ना ॥ २३ ॥
जी समुद्राचेंनि पैसें । समुद्रीं आकाश आभासे ।
थिल्लरीं थिल्लराऐसें । बिंबेचि पैं ॥ २४ ॥
तेवीं व्यासादिक महामती । वावरों येती इये ग्रंथीं ।
मा आम्ही ठाकों हे युक्ती । न मिळे कीर ॥ २५ ॥
जिये सागरीं जळचरें । संचरती मंदराकारें ।
तेथ देखों शफरें येरें । पोहों लाहती ॥ २६ ॥
अरुण आंगाजवळिके । म्हणौनि सूर्यातें देखें ।
मा भूतळींची न देखे । मुंगी काई ॥ २७ ॥
या लागीं आम्हां प्राकृतां । देशिकारें बंधें गीता ।
म्हणणे हें अनुचिता । कारण नोहे ॥ २८ ॥
आणि बापु पुढां जाये । ते घेत पाउलाची सोये
बाळ ये तरी न लाहे । पावों कायीं ॥ २९ ॥

तैसा व्यासाचा मागोवा घेतु । भाष्यकारांतें वाट पुसतु
अयोग्यही मी न पवतु । कें जाईन ॥ ३० ॥

२. 'वाग्विलास विस्तारुं । गीतार्थें विश्व भरुं'

एवं जे महाभारतीं । श्रीव्यासें अप्रांतमती ।
भीष्मपर्वीं शांती । म्हणितली कथा ॥ १ ॥
तो कृष्णार्जुनसंवादु । नागरीं बोलीं विशदु ।
सांगोनि दाऊं प्रबंधु । वोवियेचा ॥ २ ॥
नुसधीचि शांतिकथा । आणिजेल कीर वाक्पथा
जे शृंगाराचां माथां । पाय ठेविती ॥ ३ ॥
दाऊं वेल्हाळे देशी नवी । जे साहित्यातें वोजावी ।
अमृतातें चुकी ठेवी । गोडिसेपणें ॥ ४ ॥
बोल वोल्हावतेनि गुणें । चंद्रासि घे उमाणें ।
रसरंगीं भुलवणें । नादु लोपी ॥ ५ ॥
खेचराचियाही मना । आणी सात्विकाचा पान्हा ।
श्रवणासवें सुमना । समाधि जोडे ॥ ६ ॥
तैसा वाग्विलास विस्तारुं । गीतार्थें विश्व भरुं
आनंदाचें आवारुं । मांडूं जगा ॥ ७ ॥
फिटो विवेकाची वाणी । हो कानामनाची जिणी ।
देखो आवडे ते खाणी । ब्रह्मविद्येची ॥ ८ ॥
दिसो परतत्त्व डोळां । पाहो सुखाचा सोहळा
रिघो महाबोधसुकाळा– । माजीं विश्व ॥ ९ ॥
हें निफजेल आतां आघवें । ऐसें बोलिजेल बरवें ।
जे अधिष्ठिला असें परमदेवें । निवृत्ति मी ॥ १० ॥
म्हणोनि अक्षरीं सुभेदीं । उपमाश्लेष कोंदाकोंदी
झाडा देईन प्रतिपदीं । ग्रंथार्थासी ॥ ११ ॥

३. हे शब्देविण संवादिजे । इंद्रियां नेणितां भोगिजे

जैसें शारदीयेचें चंद्रकळे– । माजीं अमृतकण कोंवळे ।
ते वेंचिती मनें मवाळें । चकोरतलगें ॥ १ ॥
तियापरी श्रोतां । अनुभवावी हे कथा ।
अतिहळुवारपण चिता । आणुनियां ॥ २ ॥
हे शब्देविण संवादिजे । इंद्रियां नेणतां भोगिजे ।
बोलाआदि झोंबिजे । प्रमेयासी ॥ ३ ॥
जैसें भ्रमर परागु नेती । परी कमळदळें नेणती ।
तैसी परी आहे सेविती । ग्रंथीं इये ॥ ४ ॥
कां आपुला ठावो न सांडितां । आलींगिजे चंद्रु प्रगटतां ।
हा अनुरागु भोगितां । कुमुदिनी जाणे ॥ ५ ॥
ऐसेनि गंभीरपणें । थिरावलेनि अंतःकरणें ।
आथिला तोचि जाणे । मानू इये ॥ ६ ॥

४. ते कुंडलिनी जगदंबा । जे चैतन्य चक्रवर्तीची शोभा

तंव येरीकडे धनुर्धरा । आसनाचा उबारा ।
शक्ती करी उजगरा । कुंडलिनीये ॥ १ ॥
नागाचें पिलें । कुंकुमें नाहलें ।
वळण घेऊनि आलें । सेजे जैसें ॥ २ ॥
तैशी ते कुंडलिनी । मोटकी औट वळणी ।
अधोमुख सर्पिणी । निजैली असे ॥ ३ ॥
विद्युल्लतेची विडी । वन्हिज्वालांची घडी ।
पंधरेयाची चोखडी । घोटीव जैशी ॥ ४ ॥
तैशी सुबद्ध आटली । पुटीं होती दाटली ।
ते वज्रासनें चिमुटली । सावध होय ॥ ५ ॥
तेथ नक्षत्र जैसें उलंडलें । कीं सूर्याचें आसन मोडलें ।
तेजाचें बीज विरूढलें । अंकुरेंशी ॥ ६ ॥
तैशी वेढियातें सोडिती । कवतिकें आंग मोडिती ।
कंदावरी शक्ती । उठली दिसे ॥ ७ ॥

सहजें बहुतां दिवसांची भूक । वरी चेववली तें होय मिष ।
मग आवेशें पसरी मुख । उर्ध्वा उजू ॥ ८॥
तेथ हृदयकोशातळवटीं । जो पवनु भरे किरीटी ।
तयां सगळेयाचि मिठी । देऊनि घाली ॥ ९॥
मुखींच्या ज्वाळीं । तळीं वरी कवळी ।
मांसाची वडवाळी । आरोगूं लागे ॥ १० ॥
जे जे ठाय समांस । तेथ आहाच जोडे घाउस ।
पाठी एकदोनी घांस । हियाही भरी ॥ ११ ॥
मग तळवे तळहात शोधी । उर्ध्वींचे खंडभेदी ।
झाडा घे संधी । प्रत्यंगाचा ॥ १२ ॥
आधार तरी न संडी । परि नखींचेही सत्व काढी ।
त्वचा धुवूनि जडी । पांजरेशीं ॥ १३ ॥
अस्थींचे नळे निरपे । शिरांचे हीर वोरपे ।
तंव बाहेरी विरूढी करपे रोमबीजांची ॥ १४ ॥
मग सप्तधातूंच्या सागरीं । ताहानेली घोंट भरी ।
आणि सर्वेचि उन्हाळा करी । खडखडीत ॥ १५ ॥
नासापुटौनि वारा । जो जातसे अंगुळें बारा ।
तो गचिये धरुनि माघारा । आंतु घाली ॥ १६ ॥
तेथ अध वरौतें आकुंचे । ऊर्ध्व तळौतें खांचे ।
तया खेंवामाजि चक्रांचे । पदर उरती ॥ १७ ॥
एऱ्हवीं तरी दोन्ही तेव्हांचि मिळती । परी कुंडलिनी नावेक दुश्चित्त होती
ते तयातें म्हणे परौती । तुम्हीचि कायसीं एथें ॥ १८ ॥
आइकें पार्थिव धातु आघवी । आरोगितां कांहीं नुरवी ।
आणि आपातें तंव ठेवी । पुसोनियां ॥ १९ ॥
ऐसी दोनी भूतें खाये । ते वेळीं संपूर्ण धाये ।
मग सौम्य होऊनि राहें । सुषुम्नेपाशीं ॥ २० ॥
तेथ तृप्तीचेनी संतोषें । गरळ जें वमी मुखें ।
तेणें तियेचेनि पीयूषें । प्राणु जिये ॥ २१ ॥
तो आगीआंतूनि निघे । परि सबाह्य निववूंचि लागे ।
ते वेळीं कसु बांधिती आंगें । सांडिला पुढती ॥ २२ ॥

मार्ग मोडिती नाडीचे । नवविधपण वायूचें ।
जाय म्हणौनि शरीराचे । धर्मु नाहीं ॥ २३ ॥
इडा पिंगळा एकवटती । गांठीं तिन्ही सुटती ।
साही पदर फुटती । चक्रांचे हे ॥ २४ ॥
मग शशी आणि भानु । ऐसा कल्पिजे जो अनुमानु ।
तो वातीवरी पवनु । गिंवसितां न दिसे ॥ २५ ॥
बुद्धीची पुळिका विरे । परिमळु घ्राणीं उरे ।
तोही शक्तीसवें संचरे । मध्यमेमाजीं ॥ २६ ॥
तंव वरिलेकडोनि ढाळे । चंद्रामृतांचें तळें ।
कानवडोनी मिळे । शक्तिमुखीं ॥ २७ ॥
तेणें नातकें रस भरे । तो सर्वांगामाजीं संचरे ।
जेथींचा तेथ मुरे । प्राणपवनु ॥ २८ ॥
तातलिये मुसें । मेण निघोनि जाय जैसें ।
कोंदली राहे रसें । वोतलेनी ॥ २९ ॥
तैसें पिंडाचेनि आकारें । ते कळाचि कां अवतरें ।
वरी त्वचेचेनि पदरें । पांघुरली असे ॥ ३० ॥
जैशी आभाळाची बुंथी । करुनि राहे गभस्ती ।
मग फिटलिया दीप्ति । धरुं नये ॥ ३१ ॥
तैसा आहाचवरि कोरडा । त्वचेचा असे पातवडा ।
तो झडोनि जाय कोंडा । जैसा होय ॥ ३२ ॥
मग काश्मीराचे स्वयंभ । कां रत्नबीजा निघाले कोंभ ।
अवयव कांतीची भांब । तैसी दिसे ॥ ३३ ॥
नातरी संध्यारागींचे रंग । काढूनि वळिलें ते आंग ।
कीं अंतर्ज्योतीचें लिंग । निर्वाळिलें ॥ ३४ ॥
कुंकुमाचें भरींव । सिद्धरसाचें वोतींव ।
मज पाहतां सावेव । शांतिचि तें ॥ ३५ ॥
तें आनंदचित्रींचें लेप । नातरी महासुखाचें रूप ।
कीं संतोषतरुचें रोप । थांबलें जैसें ॥ ३६ ॥
तो कनकचंपकाचा कळा । की अमृताचा पुतळा
नाना सासिन्नला मळा । कोवळिकेचा ॥ ३७ ॥

हो कां जे शारदीयेचिये वोलें । चंद्रबिंब पाल्हेलें ।
कां तेजचि मूर्त बैसलें । आसनावरी ॥ ३८ ॥
तैसें शरीर होयें । जे वेळीं कुंडलिनी चंद्रपीये ।
मग देहाकृति बिहे । कृतांतु गा ॥ ३९ ॥
वृद्धाप्य तरी बहुडे । तारुण्याची गांठी विघडे ।
लोपली उघडे । बाळदशा ॥ ४० ॥
वयसा तरी येतुलेवरी । एऱ्हवीं बळाचा बळार्थु करी ।
धैर्यांची थोरी । निरुपम ॥ ४१ ॥
कनकद्रुमाच्या पालवीं ।
रत्नकळिका नित्य नवी । नखें तैसीं बरवीं ।
नवी निघती ॥ ४२ ॥
दांतही आन होती । परि अपाडें सानेजती ।
जैसी दुबाहीं बैसे पांती । हिरेयांची ॥ ४३ ॥
माणिकुलियांचिया कणिया । सावियाचि अणुमानिया ।
तैसिया सर्वांगीं उधवती अणिया । रोमांचिया ॥ ४४ ॥
करचरणतळें । जैसीं कां रातोत्पळें ।
पाखाळीं होते डोळे । काय सांगो ॥ ४५ ॥
निडाराचेनि कोंदाटें । मोतियें नावरती संपुटें ।
मग शिवणी जैशी उतटे । शुक्तिपल्लवांची ॥ ४६ ॥
तशीं पातियांचिये कवळव्यें न समाये । दिठी जाकळोनि निघों पाहे ।
आधिलीचि परी होये । गगना कवळिती ॥ ४७ ॥
आइके देह होय सोनियाचें । परि लाघव ये वायूचें ।
ते आप आणि पृथ्वीचे । अंशु नाहीं ॥ ४८ ॥
मग समुद्रापैलाडी देखे । स्वर्गींचा आलोचु आइके ।
मनोगत वोळखे मुंगियेचें ॥ ४९ ॥
पवनाचा वारिकां वळघे । चाले तरी उदकीं पाउल न लागे ।
येणें येणें प्रसंगें येतीं बहुता सिद्धि ॥ ५० ॥
आइकें प्राणाचा हातु धरुनी । गगनाची पाउटी करुनी ।
मध्यमेचेनि दादरेहूनी । हृदया आली ॥ ५१ ॥

ते कुंडलिनी जगदंबा । जे चैतन्यचक्रवर्तीची शोभा ।
जिया विश्वबीजाचिया कोंभा । साउली केली ॥ ५२ ॥
जे शून्यलिंगाची पिंडी । जे परमात्मया शिवाची करंडी ।
जे प्रणवाची उघडी । जन्मभूमी ॥ ५३ ॥

५. दैवी संपत्ती

आतां तीख होऊनी मवाळ । जैसें जातीचें मुकुळ ।
कां तेज परी शीतळ । शशांकाचें ॥ १ ॥
शके दावितांची रोगु फेडुं । आणि जिभे तरी नव्हे कडु ।
तें वोखदु नाहीं मा घडु । उपमा कैंची ॥ २ ॥
तरी मउपणें बुबुळें । झगडतांही परी नाडळे ।
एऱ्हवीं फोडी कोंराळें । पाणी जैसें ॥ ३ ॥
तैसें तोडावया संदेह । तीख जैसें कां लोह ।
श्राव्यत्वें तरी माधुर्य । पायीं घालीं ॥ ४ ॥
किंबहुना प्रियपणें । कोणातेंही झकवूं नेणें ।
यथार्थ तरी खुपणें । नाही कवणा ॥ ५ ॥
एऱ्हवीं गोरी कीर काना गोड । परी साचाचां पाखाळीं कीड ।
आगिचें करणें उघड । परी जळों तें साच ॥ ६ ॥
कानीं लागतां महुर । अर्थें विभांडीं जिव्हार ।
तें वाचा नव्हे सुंदर । लांवचि पां ॥ ७ ॥
परी अहितीं कोपोनि सोप । लालनीं मऊ जैसें पुष्प ।
तिये मातेचें स्वरुप । जैसें कां होय ॥ ८ ॥
तैसें श्रवणसुख चतुर । परिणमोनि साचार ।
बोलणें जें अविकार । तें सत्य येथें ॥ ९ ॥
आतां घालितांहि पाणी । जैसीं पाषाणीं न निघे आणी ।
कां मथिलिया लोणी । कांजी नेदी ॥ १० ॥
त्वचा पायें शिरीं । हालेयाही फडे न करी ।
वसंतींही अंबरीं । न होती पुष्पें ॥ ११ ॥

नाना रंभेचेनिही रूपें । शुकीं नुठिजेहि कंदर्पें ।
कां भस्मी वन्हि न उद्दीपे । घृतेंही जेवीं ॥ १२ ॥
तेवींचि कुमारु क्रोधें भरे । तैसिया मंत्राचीं बीजाक्षरें ।
तियें निमित्तेंहीं अपारें । मीनलिया ॥ १३ ॥
परि घातयाही पायां पडतां । नुठी गतायु पंडुसुता ।
तैसी नुपजवितां । क्रोधोर्मी गा ॥ १४ ॥
अक्रोधत्व ऐसें । नांव तें ये दशे ।
जाण श्रीनिवासें । म्हणितलें तया ॥ १५ ॥
आतां मृत्तिकात्यागें घटु । तंतुत्यागें पटु ।
त्यजिजे जेवीं वटु । बीजत्यागें ॥ १६ ॥
कां त्यजूनि भिंतिमात्र । त्यजिजे आघवेंचि चित्र ।
कां निद्रात्यागें विचित्र । स्वप्नजाळ ॥ १७ ॥
नाना जळत्यागें तरंग । वर्षात्यागें मेघ ।
त्यजिजती जैसे भोग । धनत्यागें ॥ १८ ॥
तेवीं बुद्धिमंतीं देहीं । अहंता सांडूनि पाहीं ।
सांडिजे अशेषही । संसारजात ॥ १९ ॥
तया नांव त्यागु । म्हणे तो यज्ञांगु ।
हें मानूनि सुभगु । पार्थु पुसे ॥ २० ॥
आतां शांतीचें लिंग । तें व्यक्त मज सांग ।
देवो म्हणती चांग । अवधान देईं ॥ २१ ॥
तरी गिळोनि ज्ञेयातें । ज्ञाता ज्ञानही मायौतें ।
हारपे निरुतें । ते शांति पै गा ॥ २२ ॥
जैसा प्रळयांबूचा उभडु । बुडवूनि विश्वाचा पवाडु ।
होय आपणपें निबिडु । आपणपांची ॥ २३ ॥
मग उगम ओघ सिंधु । हा नुरेचि व्यवहार भेदु ।
परी जलैक्याचा बोधु । तोही कवणा ? ॥ २४ ॥
तैसी ज्ञेया देतां मिठी । ज्ञातृत्वही पडे पोटीं ।
मग उरे तेंचि किरीटी । शांतीचें रूप ॥ २५ ॥
आतां दया ते ऐसी । पूर्ण चंद्रिका जैसी ।
निववितां न कडसी । सानें थोर ॥ २६ ॥

तैसें दुःखिताचें शिणणें । हिरतां सकणवपणें ।
उत्तमाधम नेणें । विंवचूं गा ॥ २७ ॥
पैं जगीं जीवनासारिखें । वस्तु अंगवरी उपखें ।
परी जातें जीवित राखें । तृणाचेंही ॥ २८ ॥
तैसें पुढिलाचेनि तापें । कळवळलिये कृपें ।
सर्वस्वेंसीं दिधलें आपणपें । तरी थोडेंचि गमे ॥ २९ ॥
निम्न भरलियाविणें । पाणी ढळोंची नेणें ।
तेवीं श्रांता तोषौनि जाणें । सामोरें या ॥ ३० ॥
पैं पायी कांटा नेहटे । तंव व्यथा जीवीं उमटे ।
तैसा पोळे संकटें । पुढिलांचेनी ॥ ३१ ॥
कां पावो शीतळता लाहे । कीं ते डोळ्यांचिलागीं होये
तैसा परसुखें जाये । सुखावतु ॥ ३२ ॥
किंबहुना तृषितालागीं । पाणी आरायिलें असे जगीं ।
तैसें दुःखितांचां सेलभागीं । जिणें जयाचें ॥ ३३ ॥
तो पुरुष वीरराया । मूर्तिमंत जाण दया ।
मी उदयजतांचि तया । तृणिया लाभे ॥ ३४ ॥

६. अविद्या-खंडन

अविद्या तंव स्वरूपें । वांझेचें कीर जाऊपें ।
मा तर्काचें खुरपें । खांडी कोणा ॥ १ ॥
इन्द्रधनुषा सितें । कवणें धनवई न घालिजेतें ।
तें दिसे तैसें होतें । साच जरी ॥ २ ॥
अगस्तीचिया कौतुका । पुरती जरी मृगभुस्णिका
तरी मार देतो तर्का । अविद्येसी ॥ ३ ॥
साहे बोलाची वळघी । ऐसी अविद्या असे जगीं
तरी जाळुं ना कां आगी । गंधर्वनगरें ॥ ४ ॥
नातरी दीपाचिये सोये । आंधारु कीर न साहे ।
तेथें कांहीं आहे । जावयाजोगें ॥ ५ ॥

नातरी पहावया दिवसु । वातीया काजे सोसु ।
तेव्हडाहि उद्वसु । उद्यमु पडे ॥ ६ ॥
जेथें साउली न पडे । तेथें नाहीं जेणें पाडें ।
मा पडे तेथें तेव्हडे । नाहींच कीं ॥ ७ ॥
दिसतंचि स्वप्न लटिकें । हें जागरीं होय ठाउकें ।
तेविं अविद्याकाळीं सतुकें । अविद्या नाहीं ॥ ८ ॥
वोडंबरीचिया लेणिया । घरभरी आतुडलिया ।
नागवें नागविलिया । विशेष काई ॥ ९ ॥
मनोरथाचें परियेळ । आरोगिजतु कां लक्षवेळ ।
परि उपवासावेगळ । अनुअथी ॥ १० ॥
मृगजळ जेथें नुमंडे । तेथें असो पां कोरडे ।
मा मंडे तेथें जोडे । वोल्हांशु कायी ॥ ११ ॥
हें दिसे तैसें असे । तरी चित्रींयेनि पाऊसें ।
वोल्हावतु कां माणुसें । आगरां तळीं ॥ १२ ॥
कालऊनि अंधारें । लिहों येती अक्षरें ।
तरी मसीचिये वोरबारें । कां शिणावें ॥ १३ ॥
आकाश काय निळें । न देखती हे डोळे ।
तेवि अविद्येचि टवाळें । जाणोनि घेईं ॥ १४ ॥
अविद्या येणें नावें । मी विद्यमानचि नव्हे ।
ऐसी तेचि स्वभावें । सांगतसे ॥ १५ ॥
आणि इथें अनिर्वाच्यपण । तें दुजेंही देवांगण ।
आपुल्या अभावीं आपण । साधीतसे ॥ १६ ॥
कां हीच जरी आहे । तरी निर्द्धार कां न साहे ।
वरी घटाभावें भोये । अंकित दिसे ॥ १७ ॥
अविद्या नासीं आत्मा । ऐसी नव्हे प्रभा ।
सूर्या आंगी तमा । जया परी ॥ १८ ॥
हे अविद्या तरि मायावी । परि मायावीपणचि लपवी ।
साची आली अभावीं । आपुला हे ॥ १९ ॥
बहुतापरी ऐसी । अविद्या नाहीं आपैसी ।
आतां बोलु हात वसी । कवणावरी ॥ २० ॥

साउलियेतें सावळें । हालयाँ भोय आदळे ।
कीं हालेनि अंतराळें । थोंटावे हातु ॥ २१ ॥
कां मृगजळाचा पानीं । गगनाचा आलिंगनी ।
नातरी चुंबनीं । प्रतिबिंबाचा ॥ २२ ॥
उठावला वोथरे तवंका । तो सुनाथ पडे असिका ।
अविद्यानासिं तर्का । तैसे होय ॥ २३ ॥
ऐसी अविद्या नासावी । वाहेल जो जीवीं ।
तेणे साली काढावी । आकाशाची ॥ २४ ॥
तेणें सेळीगळां दुहावी । गुडघां वास पाहावी ।
वाळवोनि काचरी करावी । सांजवेळेची ॥ २५ ॥
जांभै वांटूनि रसु । तेणे काढावा बहुवसु ।
कालवूनि आळसु । मेंदळा पाजावा ॥ २६ ॥
तो पाटा पांणी परतु । पडली साउली उलथु ।
वारयाचे तांथुं । वळू सुखें ॥ २७ ॥
तो बागुलातें मारु । प्रतिबिंब खोळे भरु ।
तळहातींचे विंचरु । केस सुखें ॥ २८ ॥
घटाचें नाहींपण फोडू । गगनाचिं फुलें तोडू ।
ससयाचें मोडू । सिंग सुखें ॥ २९ ॥
तो कापुराची मसी करु । रत्नदीपीं काजळ धरु ।
वांजेचें लेंकरुं । परणू सुखें ॥ ३० ॥
तो अवसेचेनि सुधाकरें । पोसू पाताळींचीं चकोरें ।
मृगजळींचीं जळचरें । गाळू सुखें ॥ ३१ ॥
अहो हें किती बोलावें । अविद्या रचिली अभावें ।
आतां काई नासावें । शब्दें येणे ॥ ३२ ॥
नाहीं तयाचें नाशें । शब्द न ये प्रमाणदशे ।
आंधारीं आंधारें जैसें । नव्हें रुप ॥ ३३ ॥
अविद्येची नाहीं जाती । तेथें नाहीं म्हणतया उक्ती
जेविं दुपारीं कां वाती । आंगणींचिया ॥ ३४ ॥

७ ज्ञानेश्वरांचे अभंग

घनु वाजे घुणघुणा । वारा वाजे रुणझुणा । भवतारकु हा कान्हा । वेगीं भेटावा कां ॥१॥ चांदवो चांदणें । चापेवो चंदनु । देवकीनंदनु । विण नावडे वो ॥२॥ चंदनाची चोळी । माझे सर्व अंग पोळी । कान्हो वनमाळी । वेगीं भेटवा कां ॥३॥ सुमनाची सेज । सितळ वो निकी । वोले आगिसारिखी । वेगीं विझवा कां ॥४॥ तुम्हीं गातसां सुस्वरें । एकोनि द्या उत्तरें । कोकिळें वर्जावें । तुह्मीं बाईयांनो ॥५॥ दर्पणी पाहातां । रूप न दिसे आपुलें । बापरखुमादेविवरें विठ्ठलें । मज ऐसे केलें ॥६॥

* * *

पैल तो गे काऊ कोकताहे । शकून गे माये सांगताहे ॥१॥ उडरे उडरे काऊ तुझे सोन्यानें मढीन पाऊ ; पाहुणे पंढरीरावो घरा कैं येती ॥२॥ दहिंभाताची उंडी लाविन तुझ्या तोंडीं । जीवा पढिये त्याची गोडी सांग वेगीं ॥३॥ दुधें भरुनि वाटी लावीन तुझे वोंठीं । सत्य सांगे गोठी विठो येईल कायी ॥४॥ आंबया डाहाळीं फळें चुंबी रसाळीं । आजिचेरें काळीं शकून सांगें ॥५॥ ज्ञानदेव ह्मणे जाणिजे ये खुणें । भेटती पंढरीराणे शकून सांगें ॥६॥

* * *

रुप पाहतां लोचनीं । सुख झालें वो साजणी ॥१॥ तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा ॥२॥ बहुता सुकृताची जोडी । ह्मणुनि विठ्ठलीं आवडी ॥३॥ सर्व सुखाचें आगर । बापरखुमादेविवर ॥४॥

* * *

चातकाची तृषा मेघें पुरविली । ब्रह्मस्तनीं पान्हाईली बाई ये वो ॥१॥ निवृत्तिप्रसाद माझ्या मुखीं सुदला । प्रेमरसें धारा फुटल्या दोहीं पक्षीं ॥ध्रु०॥ बाप श्रीगुरु तेणें मज आफाविलें । अवघें ब्रह्म दाविलें ज्ञानदेवा ॥२॥

* * *

तुझिये निढळीं कोटिचंद्र प्रकाशे । कमळनयन हास्यवदन हांसे ॥१॥ कृष्णा हाल कां रे कृष्णा डोल कां रे । घडिये घडिये घडिये गुज बोल कां रे ॥ध्रु०॥ उभा राहोनियां कैसा हालवितो बाहो । बापरखुमादेवीवरु विठ्ठलु नाहो ॥२॥

* * *

मलयानिल शीतळू पालवीं नये गाळूं । सुमनाचा परिमळु गुंफितां नये ॥१॥ तैसा जाणा सर्वेश्वरू ह्मणों नये सानाथोरु । स्वरूपाचा निर्धारु कवण जाणे ॥२॥

मोतियाचें पाणी भरतां नये वो रांजणीं । गगनासि गवसणी घालितां नये ॥३॥ कापुराचे कांडण काढितां नये आड कण । साखरेचें गोडपण पाखडतां नये ॥४॥ डोळियांतील बाहुली करूं नये वो वेगळी । सखी म्हणुनि साउली धरितां नये ॥५॥ विठ्ठलरखुमाईचे भांडणी कोण करी बुझावणी । निवृत्ताचें चरणीं शरण ज्ञानदेव ॥६॥

* * *

इवलेंसें रोप लाविलें द्वारीं । त्याचा वेल गेला गगनावरी ॥१॥ मोगरा फुलला मोगरा फुलला । फुलें वेचितां अति भारु कळियासी आला ॥२॥ मनाचिये गुंती गुंफियेला शेला । बापरखुमादेविवरु विठ्ठलीं अर्पिला ॥३॥

* * *

स्वर्ग जयाचीं साळोंखा । समुद्र-पाळीं पिंड देखा । शेषासारिखी बैसका । जो आधार तिहीं लोकां । लिंग देखिलें देखिलें । त्रि-भुवनीं विस्तारलें । मेघ-धारीं तपन केलें । तारा-पुष्पीं वरी पूजिलें । चंद्र-फळ जया वाहिलें । ओंवाळिलें रवि-दीपें । आत्म-नैवेद्य सर्मार्पिलें । ब्रह्मानंदीं मग वंदिलें । ज्योतिर्लिंग मग ध्याइलें । ज्ञानदेवीं हृदयीं ।

◇ ◇

नामदेव

१. अभंग

१

डोळे शिणले पाहतां वाटुली । अवस्था दाटली ह्रदयामाजी ॥१॥ तूं माझी जननी सरसीये सांगातिणी । विठ्ठले धावोनि घेई क्षेम ॥२॥ तूं माझी पक्षिणी मी तुझे अंडज । क्षुधें पीडलों मज विसरलीसी ॥३॥ तूं माझी कुरंगी मी तुझें पाडस । गुंता भवपाश सोडी माझा ॥४॥ तू माझी माउली मी तुझी तान्हुली । वोरस वो घालीं प्रेम पान्हा ॥५॥ नामा म्हणे आस पुरवावी माझी । तान्हुल्या पाजीं प्रेमपान्हा ॥६॥

२

तूं अवकाश मी भूमिका । तू लिंग मी साळुंका । तूं समुद्र मी द्वारका । स्वयें दोन्ही ॥१॥ तूं वृंदावन मी चिरी । तूं तुळशी मी मंजरी । तूं पावा मी मोहरी । स्वयें दोन्ही ॥२॥ तूं चांद मी चांदणी । तूं नाग मी पद्मिणी । तूं कृष्ण मी रुक्मिणी । स्वयें दोन्ही ॥३॥ तूं नदी मी थडी । तूं तारू मी सांगडी । तूं धनुष्य मी भातोडी । स्वयें दोन्ही ॥४॥ तूं वेद मी स्तविता । तूं शास्त्र मी गीता । तूं गंध मी अक्षता । स्वयें दोन्ही ॥५॥ नामा म्हणे पुरुषोत्तमा । स्वयें जडलों तुझ्या प्रेमा । मी कुडी तूं आत्मा । स्वयें दोन्ही ॥६॥

३

माझें मागणें तें किती । दाता लक्ष्मीचा पति ॥१॥ मेघ वर्षे शिळाधारी । तेथें चातक चंचु भरी ॥२॥ महा डोह गंगाजळ । तृप्त एखादा अंजुळ ॥३॥ साखरेची साठी । तेथें मुंगीची मुखवटी ॥४॥ नामा म्हणे मी सेवेसी । तूं तो उदाराचा राशी ॥५॥

४

पतितपावन नाम ऐकुनी आलों मी द्वारा । पतीतपावन नव्हेसि म्हणुनी जातों माघारा ॥१॥ घ्यावें तेव्हां द्यावें ऐसा अससी उदार । काय धरूनि देवा तुझें

कृपणाचें द्वार ॥२॥ सोडी ब्रीद देवा आतां नव्हेसि अभिमानी । पतीतपावन नाम तुझें ठेवियलें कोणी ॥३॥ झेंगट घेउनी हातीं दवंडी पिटीत तिन्हीं लोकीं । पतितपावन देवा परी तूं मोठा घातकी ॥४॥ नामा म्हणे देवा तुझें न लगे मज कांहीं । प्रेम असोंदे चित्तीं म्हणूनि लागतसे पायीं ॥ ५ ॥

५

मल्हार मढुडें गगनीं दाटलें । विजु खळें गार्जिन्नलें ॥ गे माये ॥ गोविंद पाहाया लौकरी । कसे वरुषताहे मधु धारी ॥ गे माये ॥ आनंदे मयूरें नाचती आपैसे । प्रेमें नीळकंठ झाले ते कैसे ॥ गे माये ॥ नामया स्वामी दृष्टी सोज्वळ । जीव लागला गोपाळे ॥ गे माये ॥

२. श्रीज्ञानदेवांच्या समाधीचे अभंग

१

देव म्हणे असे आठवाल फार । लागे उशीर समाधीसी ॥१॥ रुक्माबाई म्हणे याजलागी जाण । ब्रह्मा ब्रह्म खूण मेळविली ॥२॥ अवतार हे चौघे झाले कैशापरी । सांगा आम्हां हरि उकलोनी ॥३॥ शीव तो निवृत्ति सोपान ब्रह्मस्थिती । ज्ञानदेव मूर्ति विष्णूची हो ॥४॥ ब्रह्मनी हे कळा माय मुक्ताबाई । विचारूनि पाहीं स्वयं मुक्ता ॥५॥ नामा म्हणे याला नाहीं पां उपाधी । पूर्ण हे समाधि ज्ञानदेवा ॥६॥

२

अंतर बाहेर कळलें स्वरूप । स्वयें नंदादीप उजळिला ॥१॥ येणें जाणें कोठें योगी पहा अवीट । सान वैकुंठ करुनि ठेवी ॥२॥ ज्ञानीयला मरण म्हणती अज्ञान । वांयां तुम्ही शीण करूं नका ॥३॥ घटाचियां योगें प्रतीबिंब भासे । काय म्हणे नासे निरालंब ॥४॥ दर्पणाचे योगें दुसरें देखणें । काय मुखें दोन त्यांची झालीं ॥५॥ दृश्याचियामुळें जीव दिसे येथें । काय पां परमार्थ विटंबिले ॥६॥ तंतूचियामुळे पटाला विस्तार । काय निराकार वांयां गेलें ॥७॥ रुक्मादेविवरें केलें समाधान । धरुनि ठेले मौन्य अवघेजण ॥ ८ ॥

३

छत्र चामरें उभा सन्मूख भोंवतीं । रुक्माईचा पति मध्यभागीं ॥१॥ निंबें आणि नारळ गोण्याचीं पोफळें । उदंड तींही केळें आणियलीं ॥२॥ आणिक बहुता

परी घेतली सामुग्री । पीत पीतांबरी मृगछाला ॥३॥ भगवीं आभरणें घेतलें भस्म । अंगें परब्रह्म साह्य त्यासी ॥४॥ नामा ह्मणे स्वामी तिष्ठताती अंगें । मेळविली सांगे साहित्यासी ॥५॥

४

निवृत्ति ज्ञानदेव उभे दोहींकडे । सोपान तो पुढे मुक्ताबाई ॥१॥ देहुडे सुरगण थक्क पडिलें लोकां । सुरू केला डंका वैकुंठींचा ॥२॥ चक्रतीर्थी उभे देव साधुजन । करविले स्नान ज्ञानदेवा ॥३॥ देवाचें हें तीर्थ घेतलें ज्ञानेश्वरें । केला नमस्कार पादपद्मीं ॥४॥ विठ्ठल रुक्मिणी ऋषि सुरवर । पूजा ज्ञानेश्वर करीतसे ॥५॥ नामयाच्या हातीं गंध अक्षता । पूजा महंता मान्य झाली ॥६॥

५

टाळ विणे मृदंग वाजती अपार । नारद तुंबर गीत गाती ॥१॥ शुक नामदेव अंबऋषि सादर । मध्यें ज्ञानेश्वर ब्रह्मरूप ॥२॥ पिपिलिकेसी मार्ग जावया न मिळे । जाती भार मेळे वैष्णवांचे ॥३॥ नामा म्हणे देवा दाविली नवाळी । पुरविली आळी ज्ञानोबाची ॥४॥

६

दशमीचे दिवशी केली प्रदक्षिणा । आणिक कीर्तना संत उभे ॥१॥ रात्रंदिवस त्यांहीं केला हरिजागर । हरिदिनीं थोर कृष्णपक्षी ॥२॥ मग केलें स्नान भागिरथीचे तीरीं । संत महंता भारी पूजियेलें ॥३॥ अवलोकिलें डोळां अंतर बाहेरी । मग सिद्धेश्वरी येते झाले ॥४॥ सिद्धेश्वरालागीं पूजिले निवळ । मागितलें स्थळ समाधीसी ॥५॥ गंगा आणि गिरजा निलकंठ ईश्वर । केला नमस्कार नामा ह्मणे ॥६॥

७

अष्टोत्तरशें वेळ समाधि निश्चळ । पूर्वी तुझें स्थळ वहनाखालीं ॥१॥ उठविला नंदी शिवाचा ढवळा । उघडिली शिळा विवराची ॥२॥ आसन आणि धुनी मृगछालावर । पाहाती ऋषेश्वर वोसंडोनी ॥३॥ बा माझी समाधि पाहिली जुनाट । केवळ वैकुंठ गुह्यगौप्य ॥४॥ नामा ह्मणे देवा पुरातन स्थान । ऐसें नारायणें दावियेलें ॥५॥

८

नारा विठा गोंदा महादा पाठविला । झाडविली जागा समाधीची ॥१॥ हरिदिनीं जागर केला निशिदिनीं । उदईक पारणीं द्वादशीचीं ॥२॥ गंगा गिरजा राही

रुक्माबाई भामा । उठिल्या रांधण्या पारण्याच्या ॥३॥ नाना प्रकारचे पाक ते अपार । मुनि ऋषेश्वर बोलाविले ॥४॥ वैष्णव देव आणि आले सुरगण । करोनियां स्नान इंद्रायणीं ॥५॥ पिंपळाचे पारी बैसविल्या पंक्ती । पात्रें ते श्रीपति वाढूं लागे ॥६॥ नामा ह्मणे देवा करणें साहित्यासी । येतो कासाविसी प्राण माझा ॥७॥

९

सोंवळ्यानें हरि वाढितो सकळां । मनींचा कळवळा कोण जाणे ॥१॥ रुक्माईचे कानीं सांगितली गोष्ट । विस्तारावें ताट ज्ञानदेवा ॥२॥ राहीं रुक्माबाई वाढिती आवडीनें । सोडितो पारणें ज्ञानदेव ॥३॥ नामा ह्मणे देवा परब्रह्म अन्न । जातों बोलावण ज्ञानदेवा ॥४॥

१०

निवृत्ति सोपान मुक्ताई चवथी । अनेक विभूति ज्ञानेश्वरा ॥१॥ नामा पुंडलिक गरूड हनुमंत । परसा भागवता बोलविले ॥२॥ विठ्ठल रुक्माई सत्यभामा राही । इतुके तयेठायीं जमा झाल्या ॥३॥ विसोबा खेचर चांगा वटेश्वर । सांवता कुंभार एकेठायीं ॥४॥ गंगा गिरजा दोघी निळकंठ ईश्वर । मध्यें ज्ञानेश्वर घेतियला ॥५॥

११

निवृत्ति मुक्ताईचें करिती समाधान । घेतला सोपान मध्यभागीं ॥१॥ ऐक्य अहिक्याचीं बैसली एक वटें । विस्तारिलीं ताटें रक्माईनें ॥२॥ एक एकालागीं देताती प्रसाद । आतां ज्ञानराज पाहूं डोळां ॥३॥ नामा ह्मणे स्वस्थ जेवितां पंगती । घृतपात्र हातीं विस्तारीतु ॥४॥

१२

ज्ञानदेवालागीं चंदनाची उटी । पंचारती होती आनंदाच्या ॥१॥ गंध आणि अक्षता पुष्पपरिमळा । घेती वोसंगळा नामदेव ॥२॥ ज्ञानदेव स्वस्थ देवा वोसंगळा । माळा घालीं गळां नामदेव ॥३॥

१३

जेऊनियां स्वस्थ उठिले परिपूर्ण । केलें आचमन वैष्णवांनीं ॥१॥ वैकुंठीचा प्रसाद पावले निवाडे । गोंदा महादा विडे वाटिताती ॥२॥ दोन प्रहरपावेतों आटोपले भोजन । तृतिय प्रहरीं कीर्तन आरंभिले ॥३॥ कीर्तनाच्या नादें मोहिला गोविंद । करावा उद्वेग समाधीचा ॥४॥ नामा म्हणे देवा करितां उशीर । विकळ ज्ञानेश्वर जात असे ॥५॥

१४

लावियेला दीप निरंजन ज्योति । प्रकाशल्या दीप्ती तन्मयाच्या ॥१॥ पुजूनि समाधि निघाले बाहेर । प्रेमें ज्ञानेश्वर डुल्लतसें ॥२॥ अनुमानिलें स्थळ सभोंवतीं सारें । धन्य ज्ञानेश्वरें कृपा केली ॥३॥ देव आणि नामा रुक्माई राही । स्फुंदती ठायीं ठायीं संतजन ॥४॥

१५

निवृत्ति सोपान पुढें मुक्ताबाई । देवा सांगा कांहीं निजगुज ॥१॥ देव ज्ञानेश्वर बैसले जवळी। घेतियेली आळी सोपानानें ॥२॥ ज्ञानदेवें खूण सांगितली देवा । पूर्ण तूं विसांवा सज्जनाचा ॥३॥ सोपानाचे हात देवाचिये हाती । तेव्हां अपमूर्ति कासावीस ॥४॥ म्लान वदनें निवृत्ति सद्गुरू सागर । येउनि ज्ञानेश्वर चरणीं लागे ॥५॥ नामा ह्मणे याचें अंतर परिपूर्ण । नाहीं देहीं भान निवृत्तीसी ॥६॥

१६

पुढें ज्ञानेश्वर जोडोनियां कर । बोलतो उत्तर स्वामिसंगें ॥१॥ पाळिले पोसिले चालविला लळा । बा माझ्या कृपाळा निवृत्तिराजा ॥२॥ स्वामिचीया योगें झालो स्वरुपाकार । उतरलों पार मायानदी ॥३॥ निवृत्तीने हात उतरिला वदना । त्यागिलें निधाना आह्मांलागीं ॥४॥ नामा ह्मणे देवा देखवेना मज । ब्रह्मीं ज्ञानराज मिळविला ॥५॥

१७

वोसंडोनि निवृत्ति आलिंगों लागला । आणिकांच्या डोळां अश्रु येती ॥१॥ अमर्यादा कधीं केली नाहीं येणें । शिष्य गुरूपण सिद्धि नेलें ॥२॥ गीतार्थाचा अवघा घेतला सोहळा । गुह्यगौप्यमाळा लेवविल्या ॥३॥ फेडिलीं डोळ्यांची अत्यंत पारणा । आतां ऐसें कोणी सखे नाहीं ॥४॥ काढोनियां गुह्य देव केले फोल । आठवती बोल मनामाजी ॥५॥ नामा ह्मणे संत कासावीस सारे । लाविती पदर डोळियांसी ॥६॥

१८

निवृत्तिदेव ह्मणे सांगतों या वाचे । राहाणें चौघांचें एकरूप ॥१॥ त्रिवेणीचा ओघ जैसा एके ठायीं । तैसी मुक्ताबाई आह्मांमध्यें ॥२॥ ब्रह्माविष्णुहर जैसें एकेठायीं । तैसी मुक्ताबाई आह्मांमध्यें ॥३॥ रज तम गुण सत्व गुणाठायीं । तैसी मुक्ताबाई आम्हांमध्यें ॥४॥ भूचरीं खेंचरीं चांचरी ते पाही । अगोचरी ठायीं मुक्तगंगा ॥५॥ प्रथम ज्ञानेश्वरें काढियेली वाट । धरियेलें वैकुंठ अलंकापुरीं ॥६॥ इंद्रनील पर्वत

नेमिला सोपाना । निवृत्तीसी जाणा त्रिंबकेश्वर ॥७॥ चौथी मुक्ताबाई नेमियेली तापी । नामा म्हणे ख्याती केली यांनीं ॥८॥

१९

निवृत्तिदेव म्हणे करितां समाधान । कांहीं केल्या मन राहात नाहीं ॥१॥ बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट । ओघ बारा वाट मुरडताती ॥२॥ बांधल्या पेंढीचा सुटलासे आळा । तृण रानोमाळा पांगलेसे ॥३॥ हरिणीवीण खोपी पडियेली वोस । दशदिशा पाडस भ्रमताती ॥४॥ मायबापें आम्हां त्यागियेलें जेंव्हां । ऐसें संकट तेंव्हां झालें नाहीं ॥५॥ नामा ह्मणे देवा पेटला हुताशन । करा समाधान निवृत्तीचें ॥६॥

२०

सर्व स्वस्ति क्षेम वैष्णव मंडळी । बैसलेती पाळी समाधीच्या ॥१॥ पताकांची छाया दुणावली फार । सिद्ध ज्ञानेश्वर तेंव्हां झाले ॥२॥ अजानवृक्षदंड आरोग्य अपार । समाधीसमोर स्थापियेला ॥३॥ कोरड्या काष्टी फुटियेला पाला । तेंव्हां अवघियाला नमस्कारी ॥४॥ नामा म्हणे देवा घार गेली उडोन । बाळें दानादान पडियेली ॥५॥

२१

परसा भागवतें केला नमस्कार । सारे लहान थोर जमा झाले ॥१॥ सकळांचिया पायीं नमियेलें नमना । केली प्रदक्षिणा समाधीसी ॥२॥ प्रथम पायरी बाहेरील जेथें । उभा पंढरिनाथ भेटावया ॥३॥ देव ह्मणे बापा अमृत नेदी पाट । फार केले कष्ट जगासाठीं ॥४॥ नामा म्हणे यांनीं अनुभवाच्या नौका । पार केलें लोकां जडमूढां ॥५॥

२२

देव निवृत्ति यांनीं धरिले दोन्ही कर । जातो ज्ञानेश्वर बैसावया ॥१॥ नदीचिया माशा घातलें माजवण । तैसे जनवन कालवलें ॥२॥ दाही दिशा धुंद उदयास्तावीण । तैसेंचीं गगन कालवलें ॥३॥ जाऊनि ज्ञानेश्वर बैसले आसनावरी । पुढें ज्ञानेश्वरी ठेवियेली ॥४॥ ज्ञानदेव म्हणे सुखी केलें देवा । पादपद्मी ठेवां निरंतर ॥५॥ तीन वेळां तेंव्हां जोडिलें करकमळ । झांकियेले डोळे ज्ञानदेवें ॥६॥ भीममुद्रा डोळा निरंजन मैदान । झाले ब्रह्मपूर्ण ज्ञानदेव ॥७॥ नामा म्हणे आता लोपला दिनकर । बाप ज्ञानेश्वर समाधिस्त ॥८॥

२३

निवृत्तीनें बाहेर आणिलें गोपाळा । घातियेली शिळा समाधीसी ॥१॥ सोपान मुक्ताई सांडिती शरीरा । म्हणती धरा धरा निवृत्तीसी ॥२॥ आणिकांचीं तेथें उद्विग्न तीं मनें । घालिताती सुमनें समाधीसी ॥३॥ नामदेवें भावें केली असे पूजा । बापा ज्ञानराजा पुण्यपुरुषा ॥४॥

२४

अवघीं जयजयकारें पिटियेली टाळी । उठली मंडळी वैष्णवांची ॥१॥ सह मंडळी सारे उठले ऋषीश्वर । केला नमस्कार समाधीसी ॥२॥ पंचद्वारें संत रिघाले बाहेर । सखा ज्ञानेश्वर अलंकापुरीं ॥३॥ इंद्रायणी केलें अवघ्यांही आचमन । करिती समाधान निवृत्तीचें ॥४॥ सोपानासी पोटीं धरिलें देवानें । संवत्सरगांवीं जाणें नेम केला ॥५॥ मुक्ताबाईलागीं सांगितली खूण । जाय तो सोपान स्थीर असा ॥६॥ त्रिवर्ग तीं ऐसीं राहिलीं एकमनें । जाणोनियां खूण नामा ह्मणे ॥७॥

◇ ◇

न रे न्द्र

१. ऐसे आदि-कवीचे बोल : अमृतापासौनि बहुये रसाळ

तया रस–कवींचे शब्द : चंद्र-कलेसी बोलती ब्रीद
ते आइकतां निगे दोंद : क्षीर–सागरासी ॥ १ ॥
कुंकुमाची वेलि लांबी : तिया मुक्ताफळांचिया तुरंबी
तैसिया अक्षेरांचिया लोंबी : कविता–लते ॥ २ ॥
प्रबंधिचा झळके परिमळु : तेथ खांचनां होय मळयानिळु
सराड दे पदाचा ढाळु : कामिनीं–कटाक्षांसी ॥ ३ ॥
साहित्य–सेत्रंतियांचां घाटौलीं : जे ग्रंथ-देवते वाति लाखोली
विणेया पासौनि तयांचा बोलीं : वोता रंगु दिसे ॥ ४ ॥
उन्मेख चंद्राचां तुषारीं : कथा कापुरकेळीचां उदरीं
प्रमयांचा पोतास कवणे परी : निफजे जाणांलागी ॥ ५ ॥
कविता–कामिनीयेचा धरूनि हातु : भावो दोहीं आंगीं मलपतु
चाले साहित्य–साबरेया आंतु : रसु खेडकुळिये ॥ ६ ॥
ऐसे आदि–कवीचे बोल : अमृता पासौनि बहुये रसाळ
वाढवीति आनंद दोंदिल : ब्रह्म–सुखातें ॥ ७ ॥
तें महाकवीं मानिलें : जें जाणौनि देवा वालभैले
तेथ येरां काई बोलें : जे नेणौनि जाणते ॥ ८ ॥
काई पूर्ण चंद्र–मंडळ : पाहुनि सोळाके मुक्ताफळ
कीं अमृताचें हातजौळ : कुपी चरणोदकाची ॥ ९ ॥
तैसें वेदज्ञा कवीसीं : मज प्राकृता केउती सरिसी
पुन सुख नाहीं आणिके कथेसी : मुरारी–वांचौनिया ॥ १० ॥
श्रीकृष्णांचां गुणीं जीविनला : माझा जिउ श्रीचक्रधरा विनटला
तो आंतुल आनंदु वोसंडला : कवितेचेनि मिसें ॥ ११ ॥

जें विरहिणींचां मनीं वसें । तें बोलतां होए आनरिसें
जें वाचितां ये रस-डोळसें : भाव–लिखित ॥ १२ ॥
तसें देवाचां गुणीं विसंवतां : मि बियाळ बोलें उसणतां
भावो वोळखवा श्रोतां : प्रेम–गर्भ ॥ १३ ॥
जाण अवधारितु स्थानिचे : जे भावरीय शब्द –ब्रह्मीचे
ते नाणें पारखीतु यां बोलांचें : जें देशीं सरतें ॥ १४ ॥
जैसें मेघांचियें जवळिके : जरि बापैये नव्हेति बोलिके
तरि भू–गोळकाची पव्हे उदकें : कवण भरिते ? ॥ १५ ॥
तसें कळाविदाचेनि रितु– राजें : सुरंग शब्द कोकिळ कुजे
तया सुखाचिये सेजे : विसंवतिये रस– राजहंसें ॥ १६ ॥
जाणिवेचेनि चंद्र–मंडळें : रस–समुद्रा भरितें चढें आगळें
यऱ्हवीं उपेखे वडवानळें : नेणिवेचेनी ॥ १७ ॥
जरि रसु वोडवे शब्दवेधी : तेरि नेणिवेचिया लोहातें वधी
तेवीचि अमरा होति देहसिद्धी : कवितेसी ॥ १८ ॥
आतां सुमन देतु अवधान : धुमकुसें साहित्याचेन
जग भोजें नाचवीन : आनंदाचां ॥ १९ ॥

२. संध्यारजनी

तवं उचित–चंद्रिका म्हणे : "सूर्या अस्ताचळीं होत उपेणें
जैसे तेजाचें सांटवतें वोपणें : मढीं पवळेयाचां ॥ १ ॥
कीं कुंकुम–वनीं सरागू : झेंपावत श्रृंघार–विहिंगू
कीं त्रिनेत्रें तातला अनंगू : रिगत पश्चम–समुद्रीं ॥ २ ॥
कीं ठेविला प्रकाशाचा मुडा : पाताळीं पेणें होत गरुडा
कीं श्रीकृष्णु आर्घिला पश्चमिलीं कडां : कमळ कांतिचेनि ॥ ३ ॥
कीं संध्या–सरोवरीं सारसिचा गिवसू : करुं आला सोनेयाचा सारसू
तैसा सूर्या होताय प्रवेशु : अस्ताचेळीं ॥ ४ ॥
तेथ फुटले इंद्रनिळाचे बोरे : तैसा माथा उधविला आंधारे
कीं डोंगर उन्मळीले गरुडोद्गारें : पाचिचे हे ॥ ५ ॥

कीं दाटत कस्तुरीयेचे मेघ माजिरे : कीं पिल्ळीं पसरिलीं गगन–सागौरें
कीं ब्रह्म–गोकुळ भरला पुरे : कृष्ण–गंगेचेनि ॥ ६ ॥
कीं बांबळेली तमाळाची वाडी : महा–मोहाची धुपाडी
कीं चरत द्यावा–पृथ्वीयेचां पाडीं : टौळ कांति–लोहाचें ॥ ७ ॥
नां तरी कमळौनि असासितें : कंदर्पाचेनि दळवयें वसंतें
भवंरांचें घातलें अवचितें : विरहिणींवरी ॥ ८ ॥
कीं भू–गोळकाचां देउळीं : रती अनंगें पूजिली गगन–काळीं
ते पुजा दिसतसे निळी : निळोत्पळांची ॥ ९ ॥
कैसी मेहलनी माजिरी : उजियेडातें आंधळेया करी
दिवे नेइजाति घरोघरीं : हातीं धरूनियां ॥ १० ॥
नगरीं उजळैले कुळैवे : ठाइं ठाइं अखंड लाखैवे
जैसीं निधानें चरेति सदैवें : यादव–प्रतापाचीं ॥ ११ ॥
कीं सहस्रकरें निगतां : आंधार सिंथिला माताइता
तीयें सलें ठेविलीं मज पांता : सतें सांकिकाचीं ॥ १२ ॥
कीं आंधारें अंतुर–नायकें : सूर्याचिया धुरा धरिलिया तवंकें
कीं काळत्रखेयाचां समुद्रीं माणिकें : प्रथम–जातें ॥ १३ ॥
सांजवेल जिणौनि मेहेलनी : आणि संध्या–रागांची वोपणी
कीं त्रिजूचे गर्भ गळिनले धरणी : घाडि गडवेचिया ॥ १४ ॥
तव गगनीं नक्षत्रें उमटत : जैसी आकाशीं घाटौलि कुलत
ना तरि मेघ वीणि साधित : मोतियांची ॥ १५ ॥
कीं पाख–धुनि करीती चकोरें : ते सैग मंदाकिनीचे थेंब गोरे
कीं दीसति बाणलिंगे ऐतारे : गगन–नर्मदेचीं ॥ १६ ॥

(अ) कीं गगन–मंडपीं चंद्रिका–वेली । नक्षेत्रांचीं फुलें लागलीं

कीं गगन–मंडपी चंद्रिकावेली : नक्षेत्रांचीं फुलें लागलीं
कीं अमृताचेनि बिजें विरूढलीं : आकारें चंद्राचेनि
कीं आकाशाचिये वोपे-आंतु : कैलासु असे प्रतिबिंबतु
कीं मन्मय–नाथाचा गुढरू स्वेतु : कापडिला खीरोदकें ॥ १८ ॥

कीं गगनाचियें गरुडीं : घातली कर्पुर-चुरी चोखडी
सरावो द्यावया चहुबुडीं : अनंगें आचार्यें ॥ १९ ॥
कीं देवाचियें कीर्ति-हंसीं : मिळौनी ब्रह्म-हंसेसीं
साकुवें गाळिलें आकासीं : रूपें चंद्राचेनि ॥ २० ॥
कीं क्षीराब्धिचें दूध उमप : सिंपावेया चौ-गांविचें रोप
गगनांचां राहाटीं माप : सुधांकराचें ॥ २१ ॥
कीं घेउनि सिद्ध-रसाची उटी : यकांकीं जिणांवया धूर्जेटी
कांस घालौनि गगनांचां हटीं : कुसुमायुधु हा ॥ २२ ॥
कीं चंद नव्हे ते स्वेत-दीप : माझारि सांवळें ते श्रीकृष्णाचे रूप
वरि टाकौनि पाहों आले स्वरूप : श्रीचक्रधराचें ॥ २३ ॥
कीं भू-गोळकाचां प्रासारीं जैसा : गाळिवा अमृताचा आरिसा
तेथ श्रीकृष्णांचा बिंबला ठसा : कळंकु नव्हे तो ॥ २४ ॥
कीं गोपि-नाथु जोडावेया नोवरा : स्वर्गिंचिया मिनलिया तारा
गगन-गंगे मोतियाचा वाळु-सराः पुजिला निळोत्पळी ॥ २५ ॥
कीं चंद्राचिया उघडिया भूजा : कुमोद-कळेयांचेया सेजा
बांधेति भवरांचिया पुजा : अमोद-देवते ॥ २६ ॥
कळाविंदु नाहीं चंद्रासारिखा : जो बाणेंविन विंधी दो लांखां
चंद्रकांतीं उदक वरिखा : जेणें दाविला ॥ २७ ॥
नेणों ते कैसी चांदिणेयांची माधवी : जडा समुद्रातेंही माजवीं
भारितेयाचेनि मिसें बोल्हावी : पृथ्वियेसी ॥ २८ ॥
कुचि-टाळें चंद्र-कराचें उघडीति मढ शूक्तिकांचे
ठेवणे ठेविती मोतियांचें : मेघां मिळौनि ॥ २९ ॥
चंद आपुला सोळा कळीं : केळीचेया गाथेवनाचां नळीं
यशाचे बी पेरी भूतळी : मिसे कापुराचेनि ॥ ३० ॥
चंद्र-बिंबाचा पाणि-पात्री : चंद्रिकेचि वारुणि पवित्र वक्त्री
पान करूनि रात्रीं : ढुलती चकोरें ॥ ३१ ॥
गगन-सरोवरिचे राजहंस : तैसे चांदिणेनि दिसती सारस
कीं ते वीमि साधिताय आकास : चंद्र-बिंबाची ॥ ३२ ॥
चंद्रिकां चक्रवाकें गवसतें : राजहंसा सारिखीं दिसते
म्हणोनि रात्रीं विघडतें : नोळखेति येकमेकांतें ॥ ३३ ॥

चांदिणेया – सारिखा नाहीं लाघवी : जो चंद्रकांताचें डोंगर लपवी
आंधारें–विण आंगीं थोकवी : क्षीर–सागरातें
नक्षेत्रां – सारिखीं आंगें गोरीं : तिया कामिनिया भांल्पळती चंद्रकरीं
चंद्राचिये राणिवे – भीतरी : जग वेढी वालिपेची ॥ ३५ ॥
धाकुटिया देखति समोर : द्राक्ष–मंडपीं सीरेति चंद्रकर
ते गळाळिया घेति चकोर : वरिचां वरी ॥ ३६ ॥
जे मांडवाचां जंत्रीं सुलेख : चकोर चांचूंचें कागमुख
चांदिणेयांचिया सारिया सदमुख : काढितातिं ॥ ३७ ॥
कीं द्राक्ष–मंडपु नव्हे मेहुडें : वरिखत नवरसांचें वांकडें
कीं अनंगाचीं सुटेति नळकांडें : विरहिणीं–वरी ॥ ३८ ॥

(आ) भीमकीची विरहावस्था

कीं भीमकिये सारिखिये धुरे : कुसुम–बाणांचें हाथियेर गोरें
तया बांधले बांधरे : मदनें मैळैनि पैं ॥ ३९ ॥
समोर चांदिणें देखौनि दृष्टी : तेणें लक्ष्मिये सुटली चटपटी
म्हणे "हा वडवाळाळु न संडी पाठी : आमचीये क्षीराब्धिचा ॥ ४० ॥
कीं नवल मेघें–विण अंतराळी : अखंड चंद्राची विजू वाटोळी
हे अनिष्ट करिताय शरिर–पोकळीं : मज देवें वीण ॥ ४१ ॥
कीं वसंतिय रूतुचां वेळीं : नवल अनंगें पाजळिली होळी
चांदणेयांची धुळिवाडी वेगळी : वनवित आंगातें" ॥ ४२ ॥
आधींची विरह ज्वरें तेथें : गुसळत चंद्र–कराचे सामथे
तंव जंत्रे वाजिनलीं अनुहातें : वेळुवा–वरी ॥ ४३ ॥
दामोधराचां खणोखणीं विचित्रें : वारेनें वाजिनलीं जंत्रें
तियें सेलीत सप्त–स्वराचीं शस्त्रें : कानाचेनि निरोतें ॥ ४४ ॥
जंत्राचिये श्रुती–सवें आसुडें गीतें कानांसि अनुघड पडे
वेळोवळां आवघडे : ध्वनि कळ हंसाची ॥ ४५ ॥
राजहंस देखौनि दचके : चकोरां चक्रवाकां चवके
शब्दासवें विथानकें : सोगौराचेया ॥ ४६ ॥

कस्तुरी–मृगाचियें वोसाइलिये भांबावे : भवराचिये श्रुती आडवे
कोकिळा–कुंजनीं जिऊ मुसावे : तेणें वेगें ॥ ४७ ॥
तेथ साळैया राजसुक : पढताति भाका चित्रेंश्लोक
तिया भारणिया घूमेति दाटिक : काय–काळडंकाचे ॥ ४८ ॥
मुखें दीर्घ स्वासु घालित : तेंणें फुंकें विरहाग्नि पेटत
नंदनवन पाजळत : अवयेवांचे ॥ ४९ ॥
विकळता बहु सर्वांगीं : दामोधर वोतिजताय धर्गीं
तो विरहो–उपचारु रसिकां–लाजी : म्हणैल नरींद्र ॥ ५० ॥

◇ ◇

एकनाथ

१. ती भीमकी वर्णावी कैसी । वेध लागला श्रीकृष्णासी ।

जिच्या सौंदर्यासी । वेध लागला श्रीकृष्णासी ।
ती भीमकी वर्णावी कैसी । सीमा रूपासी न करावे ॥ १ ॥
नाहीं स्रष्ट्यानें स्रजिली । कृष्णप्रभावें रूपा आली ।
बरवेपणासी गे चढली । साकारली सौंदर्यें ॥ २ ॥
गगन शून्यत्वा उबगलें । कृष्णभेटीसी उदित जाहले ।
भीमकीमस्तकासीं आलें । निरालंबें शोभत ॥ ३ ॥
मस्तकींचे नील कुंतल । तेंचि नभ अति सुनीळ ।
तळीं मुखचंद्र निर्मळ । भीमकीमुखी उगवला ॥ ४ ॥
चंद्र क्षीण कृष्णपक्षीं । म्हणे हा पूर्वील माझा बंधु कीं ।
म्हणूनी कळवळली भीमकी । निजमुखीं धरियेला ॥ ५ ॥
भीमकीमुख निष्कलंक । क्षयातीत पूर्ण शशांक ।
कृष्णप्राप्तीसी सम्यक । भीमकीमुखीं उगवला ॥ ६ ॥
चंद्र संपूर्ण पौर्णिमा एकीं । येरवीं क्षयवृद्धी त्या लोकीं ।
तो सदा भीमकीमुखीं । निजात्मसुखीं परिपूर्ण ॥ ७ ॥
चंद्रमंडळा मागेंपुढें । जैसे तारांगणाचे वेढे ।
तैशीं मोतिलग तानवडें । दोहींकडे तळपती ॥ ८ ॥
श्रीकृष्णवेधें वेधली खरी । म्हणउनी विसरली ते भोंवरी ।
भोंवरी कृष्णमाये करीं । ये अवसरीं ते नाहीं ॥ ९ ॥
भोंवरी नसतां पक्षपाती । पंखे दोहींकडे झळकती ।
भोंवरियामार्गीं मिरवती । भेटी होईल निजकर्णी ॥ १० ॥
भीमकी थोर कपाळाची । कृष्णदैवें ते दैवाची ।
निढळीं प्रभा श्यामेची । तोचि कस्तूरी मळवट ॥ ११ ॥

चंद्राबिंबीं श्यामरेखा । तैसा भाळीं मळवटू देखा ।
भोंवया रेखिल्या कृष्णरेखा । अतिसुरेखा व्यंकटा ॥ १२ ॥
कृष्ण पाहावया जगजेठी । भोंवई सांडिली व्यंकटी ।
कृष्णा मीनलिया दिठी । सहज गांठी सुटेल ॥ १३ ॥
श्रीकृष्णरंगें सुरंग । अहेवपण तिचें अभंग ।
तेचि कुंकमें पैं चांग । मुखचंद्री चंद्रमा ॥ १४ ॥
नभीं इंद्रधनुष्यरेखा । तैसा भांगीं शेंदुर देखा ।
भुलवावया यदुनायका । मोहिनीमुखा पूजियेलें ॥ १५ ॥
ना ते सरस्वती वोघीं । आली कृष्ण भेटीलागीं ।
जीव शिव हांसळिया दोन्ही भागीं । मुक्तलगीं तटस्थ ॥ १६ ॥
जैसीं नक्षत्रें नभमंडळीं । तैसी मुक्त मोतियांची जाळी ।
लेइलीसे भीमकबाळी । तेणें वेल्हाळी शोभत ॥ १७ ॥
त्याहीवरी भक्तिफरारा । झळकतसे नवरत्नांचा खरा ।
खुणावीतसे सुरनरां । भजा यदुवीरा नित्यभावें ॥ १८ ॥
दृश्य देखतां शिणले नयन । धणीचें घ्यावया कृष्णदर्शन ।
एकत्र होऊनि देखणेपण । भीमकीं लोचना पैं आलें ॥ १९ ॥
पाहावया घनसांवळा । कृष्णश्यामता आली बुबुळां ।
आसावली दोहीं डोळां । सबाह्य देखणें समदृष्टी ॥ २० ॥
कृष्ण देखावया निधान । नयनीं सूदलें अंजन ।
सोंगयाचें झळंबपण । कटाक्ष बाण पिसारे ॥ २१ ॥
भीमकी कटाक्षाच्या घाईं । मदन पाडिला ठाईंच्या ठायीं ।
सुरनरांचा पाड कायी । निधडा पाहीं श्रीकृष्ण ॥ २२ ॥
मुखा मुखशोभा निक । श्लेष्मागमनें शिणलें निक ।
तो भीमकीनाका येऊनि देख । नाका बिक पैं चढलें ॥ २३ ॥
कृष्ण सुवास आवडी । तेणें नासिकेसी आली गोडी ।
दोहीं नाकपुड्यांबुडी । दिधली बुडी वसंतें ॥ २४ ॥
अधर दोन्ही जाले सादर । बिंबीफळ रंगाकार ।
ते तंव परिपाकें नैश्वर । हे अनैश्वर हरिरंगें ॥ २५ ॥
भीमकीअधरामृत गोडी । श्रीकृष्णाची जाणे फुडी ।
एकाएकीं घालून उडी । नेईल रोकडी प्रत्यक्ष ॥ २६ ॥

मुखामाजी दंतपंक्ती । जैशा ओंकारामाजी श्रुती ।
चौकींचे चौरी झळकती । सोऽहं अस्मि सोलिव ॥ २७ ॥
अधरातळीं हनुवटी । गोरपणें असे गोमटी ।
तेथेंही श्यामप्रभा उठी । कृष्णपर्व गोंदलें ॥ २८ ॥
वनिताअधरीं सुवर्णफांसा । पडोन मुक्त आलें नासा ।
भेटावया कृष्णपरेशा । उपाव कैसा देखिला ॥ २९ ॥
भीमकीनाकींचे सुपाणी । सहज देखे शारंगपाणी ।
अधोमुख अनुष्ठानीं । बोळकंबुनी हरीलागीं ॥ ३० ॥
हळदी मीनली हेमकळा । तेणें उठिलें मुखकमळा ।
तेज झळके गंडस्थळा । सूर्यकळा लाजल्या ॥ ३१ ॥
भीमकीमुख कमळ सुंदर । कृष्णनयन हेचि भ्रमर ।
आमोदभावाचें शेजार । निजमंदिर हरीचे ॥ ३२ ॥

२. गौळणी

१

भिंगाचें भिंगुलें खांद्यावर आंगुलें । नाचत तान्हुलें यशोदेचें ॥ १ ॥
येती गौळणी करती बुझावणी । लागती चरणीं कान्होबाच्या ॥ २ ॥
गोविंद बाळिया वाजविती टाळिया । आमुचा कान्हया देवराव ॥ ३ ॥
कडेदोरा बिंदलीं वाघनखें साजिरीं । नाचत श्रीहरी यशोदेचा ॥ ४ ॥
पायीं घागरीया वाक्या साजरीया । कानींच्या बाळया ढाळ देती ॥ ५ ॥
एका जनार्दनीं एकत्व शरण । जीवें निंबलोण उतरती ॥ ६ ॥

२

कशी जाऊं मी वृंदावना । मुरली वाजवी कान्हा ॥ ध्रु० ॥
पैलतीरीं हरी वाजवी मुरली । नदी भरली यमुना ॥ १ ॥
कासे पीतांबर कस्तुरी टिळक । कुंडल शोभे काना ॥ २ ॥
काय करूं बाई कोणाला सांगूं । नामाची सांगड आणा ॥ ३ ॥
नंदाच्या हरीनें कौतुक केलें । जाणे अंतरींच्या खुणा ॥ ४ ॥
एका जनार्दनीं मनीं ह्मणा । देव माहात्म्य कळेना कोणा ॥ ५ ॥

३

वारियानें कुंडल हाले। डोळे मोडित राधिका चाले ॥ध्रु०॥ फणस–जंवीर–कर्दळी दाटा। हातीं घेउनी नारिंगी फाटा॥ राधा पाहून भुलले हरी। बैल दुभवी नंदाघरीं॥ हरि पाहुनि भुलली चित्ता। राधा घुसळी डेरा रिता॥ ऐसी आवडी मिनली दोघां। एकरूप होय अंगा॥ मन मिनलेंसे मना। एका भुलला जनार्दना॥

३. भारुडे

१. *पाखरूं*

कृष्णा एक पाखरूं आहे। तें मुखावीण चारा खाय रे। डोळे नाहीं परि ते पाहे। वाचेविण स्वयें गाय रे॥१॥ सख्या त्याचें नांव कान्होबा। कृष्ण ह्मणती सर्व रे। त्याचें वास्तव्य कोठें आहे। पर नाहीं परि तें उडे रे॥२॥ तिहीं लोकीं हिंडतें। त्रिभुवन त्याला थोडें रे॥३॥ त्याचें नखांत आकाश बुडे। तो सन्मुख चहूंकडे रे॥४॥ अहो त्याला मायबाप दोन्ही नाहीं रे। एकपणेंविण पहाती जनार्दनाचे पायीं रे॥५॥

२. *मोतीं*

धूतांचें मोतीं जळीं हरपलें सखोले मोठें पाणी। चला पाहूं साहा चार अठराजणी॥ध्रु०॥ प्रपंच धोंडा मृगजळपाणी आपटीत होतें चोळी। विसरलें सुख घसरलें तळीं॥ सखी मायेनें मोतीं दडविलें भवसिंधूच्या जळीं। होती गडे भ्रांति बहिण जवळी॥ तिणेंच मजला गोष्टी विनविल्या चित्त गेलें भुलोनि॥ १॥ आठ जणींनी मोती दडविले वर ठेविला धोंडा। अशाच पहाती अवघ्या रांडा॥ बारा सोळा तळी उरल्या त्यांनीं धरिला दांडा। ठाऊक सत्राविला झेंडा॥ त्यामधें मी गर्क झाल्यें एकलीच बाई वनीं॥ २॥ चवघी जणी सत्वर मिळोनि डोळीं अंजन घाला। माझ्या मोत्याला प्रेमें न्याहाळा॥ ज्ञान-बोधाची लावून दिवटी बरवी वात उजळा। माझे मोत्याला सर्वकळा॥ प्रपंच-पडदा फाडून गुरुपदीं लावा गे ठिकाणीं॥ ३॥ चौवीजणी मोक्ष नाइका मजला धरा हातीं। उतरा सागर पैल पंथी॥ या मोत्याच्या साठीं मजला जाणे आहे सती। म्हणून मी येतें काकुळती॥ एका जनार्दनीं चिन्मय मोतीं न मिळे गुरुवांचुनी॥ ४॥

३. *रोडगा*

सत्वर पाव गे मला। भवानीआई रोडगा वाहिन तुला॥ १॥ सासरा माझा गांवीं गेला। तिकडेच खपवी त्याला॥२॥ सासू माझी जाच करती। लवकर

निर्दाळीं तिला ॥३॥ जाऊ माझी फडफड बोलती । बोडकी कर ग तिला ॥४॥ नणंदेचें पोर किरकिर करितें । खरूज होऊं दे त्याला ॥५॥ दादला मारून आहुती देईन । मोकळी कर गे मला ॥६॥ एका जनार्दनीं सगळेंचि जाऊं दे । एकटीच राहूं दे मला ॥७॥

अर्जदस्त

अर्जदस्त अर्जदार । बंदगी बंदेनवाज । आलेकम् सलाम ।
साहेबाचे सेवेशीं । बंदे शरीराकार । जीवाजी शेकदार ।
बुधाजी कारकून । प्रगणे शरीराबाद । किल्ले कायापुरी ।

सरकार साहेबाची आज्ञा घेऊन स्वार जाहलों । तों परगणे मजकुरीं येऊन सरकारकाम सुरू करावयास लागलों । तों परगणे मजकूरचे जमादार दंभाजी शेटे । कामाजी महाजन । मनीराम देशमुख । ममताई देशपांडीन । क्रोधाजी नाईकवाडी । ऐसे हरामजादे फार आहेत । ते सरकार कामाचा कयासा चालू देत नाहींत । तमाम परगण्याची फितुरी करितात ।

दंभाजी शेट्या कचेरींत येऊन जोम धरून बसतो । मनीराम देशमुख आपलें परभारें काम करून घेतो । ममताई देशपांडी इनें तमाम परगणा जेरदस्त केला । क्रोधाजी नाईक यानें तमाम तफरका केला ।

तों साहेबांपासून जरासंध चोपदार आला । त्यानें खबर केली कीं । मागून यमाजी पंताची तलब होणार । त्यास त्या धास्तीनें तमाम परगणा ओस जाहला । बीतपशील कलम । ढोळसवाडीस मात्र कांहीं सई रुई वस्ती राहिली । कानगांव तो बंद जाहले । दोनीं वेशींची कवाडें लागलीं । नाकापुरास वाहव सुटलें । तोंडापूर तो तफरका झालें । दंताळवाडी ओस पडली । दिवे लावणी देखील राहिली नाहीं । केस गावची पांढर जाहली । शीरापुरचे लोक दरोबस्त थरथरा कांपूं लागले । हातगाव कसाल्यानें जर्जर जाहले । त्यांच्यानें आतां कांही लावणी होत नाहीं । पायगांवची मेटें बसलीं । ढोरापुरची राहटी राहिली । चरणगांवची चाली सरली । गांडापूर वाहूं लागले । लिंगस्थान भ्रष्ट जाहलें । उठूं पळूं लागले । धीर धरवेना । ऐशी परगण्याची कीर्ति बुडाली ।

यावर सरकार काम सुरू करीत होतों । तों यमाजीपंताची परवानगी आली कीं । हुजूर येणें आपणास साहेबाच्या कलमांना आश्रय आहे ।

एका जनार्दन का बंदा । बंदगी रोशन होय हे अर्जदस्त ॥

कौलपत्र

चिरंजीव जिवाजीपंत ठाणेदार। यासी आत्मारामपंत कमाविसदार। कसबे ब्रह्मपुरी। आशिर्वाद उप्परी।

तुह्मांस देहगांवचें ठाणे दिल्हें आहे। तर ठाण्यांत सावधपणें वर्तणूक करणें। तेथें ममताई पाटलीण। तिनें लटिकेंच दंभ उभें केलें आहे। कामक्रोधादि षड्-वैरी चाकर ठेवून। लोभमोहाचे फांसे सिद्ध करून ठेविले आहेत। म्हणून तुह्मांस सूचना मात्र लिहिली।

विषयाचा लोभ न धरणें। निजहितासी अंतर न करणें। सत्य मिथ्या जाणोन। विचाराची वाट धरणें। अविचारपणा सोडून देणें। विवेक सद्भाव यांसी मित्रत्व विशेष असूं देणें। त्याचे बुद्धीनें गांवची लावणी करणें। उत्तम चार वर्णास कौल देऊन। धैर्याचा नांगर धरून। शेतांमधील खडे काढून। वासनेच्या पालव्या तोडून। संशयाच्या काशा गोळा करून। भूमिका शुद्ध करून। मग भक्ति ज्ञान वैराग्य तिफनी करून। सद्गुरु मुखीं निजबीज पेरणें। तेथें शुद्धसत्वाचा मेघ वर्षेल। तेथें सत्याचा माळा घालून। कुतर्क पांखरूं उडवून देणें। जागोजागीं विश्वास रक्षण ठेवून। शेतांतील माल अवघाच गोळा करून। समस्त षड्गुण ऐश्वर्य बैल जुंपून। अवघा माल खळ्यांत आणून। पुष्कळ काढून। स्वानंदाची रास करणें। तेथें सिद्ध साधकें मागुतें येतील। त्याला भक्तीच्या पायलीनें। अवघाच माल मोजून देऊन। सहहुजूर ब्रह्मपुरास येणें।

सांगितल्या गोष्टींत बाकी ठेवाल तर। चौऱ्यांयशी लक्ष योनी फिरणें लागेल। मग पुनरपी तुह्मांवर कोणाचा दस्त लादेल। खरें चालावें जन्म मरणाची वाट खुंटेल।

ह्मणून जनार्दन सद्गुरुकृपेचा सागर। तेणें एकाजनार्दनीं आनंदमय समाधान झालें। द्वैताचा लेश उरला नाहीं। सच्चिदानंदरूप। प्रत्ययास येऊन। समाधान पावले। हें कौलपत्र ॥ १ ॥

४. पद

तें मन निष्ठुर कां केलें। जें पूर्ण दयेनें भरलें॥ ध्रु० ॥ गजेंद्राचे हांकेसरिसें। कळवळुनीं गेलें ॥ १ ॥ प्रल्हादाच्या भावार्थासी। स्तंभीं गुरगुरलें ॥ २ ॥ पांचाळीच्या करुणावचनें। धावुनियां आलें ॥ ३ ॥ एका जनार्दन पूर्णकृपेनें। निशि-दिनिं पदिं रमलें ॥ ४ ॥

◇ ◇

मुक्तेश्वर

१. पवित्र शीतळ जळ माथां मंदाकिनी

पवित्र शीतळ जळ माथां मंदाकिनी । कंठी धरियला वन्हि नवल काय ॥ ध्रु०
गरूडारूढ मधुसूदन हृदयीं वसिजे पूर्ण । कंठीं सर्पाभरण नवल काय ॥ १
सिंहावरी ओळंगत अंकीं गिरिजा स्वस्थ । मारिला कुंजर दैत्य नवल काय ॥ २
अहो लीला–विश्वंभरा कृपामूर्ती जगदोद्धारा । तारिसी मुक्तेश्वरा नवल काय ॥ ३

२. वर्षाकाळ

सूर्यकिरण मृगसमुदाय । निस्तेज होऊनी पावले भय ।
लपावया शोधीत ठाय । अभ्रें आड करूनियां ॥ १ ॥
किं पृथ्वीखंड त्या शाळुंखा । अनेक पर्वत शिवपिंडिका ।
इंद्रें मांडिलें अभिषेका । गगनपात्री बहुधारा ॥ २ ॥
मयूर चातक कपोतक । दर्दुर करिती महाघोष ।
मेघ जगाचा पाळक । सर्व लोकां जाणविती ॥ ३ ॥
विद्युल्लतांचे कडकडाट । घनगर्जना गडगडाट ।
गंगादि सरितांचे संघाट । महापूर माजले ॥ ४ ॥
अठराभार वनस्पती । अंकुरवसनें वेढिली जगती ।
फल शाका धान्य संपत्ती । पृथ्वी पिके जगातें ॥ ५ ॥
विष्णु जगाचा प्रतिपाळिता । तोचि मेघ होय तत्त्वतां ।
प्रमाण करुनी चंद्र सविता । आपवोपी अयनांशें ॥ ६ ॥
चारी मास दीपदानें । पादुका छत्रें ऊर्णावसनें ।
ऋषीश्वरां कुरुभूषणें । अपरिमित वोपिलीं ॥ ७ ॥
असो वृष्टिकाळ सरला । कार्तिकाचा प्रवेश झाला ।
ऋषीसहित धर्म वहिला । काम्यकारण्या पातला ॥ ८ ॥

३. '...तेवी श्रीकृष्ण पांडवभेटी चालला'

ऐकोनि सुहृदांची वाणी । राजा आल्हादला मनीं ।
म्हणे, 'सर्वज्ञ पुरुष हो ! वचनीं । जाणोनि बोले हृदयींचें ॥ १ ॥
जे इच्छिजे माझेंनि जीवें । तेंचि वदलेती मनोभावें, ।
शकुनारंभीं, देइजे देवें । उजवें फूल ज्या परि ॥ २ ॥
जो संपन्न सकळ ऐश्वर्यें । धरी धीरत्व ज्याचेनि धैर्यें ।
तो कृष्ण पातल्या सर्व कार्ये । सुफळ होतीं तात्काळीं' ॥ ३ ॥
शुद्ध भावार्थ निकटवर्ती । बैसवूनियां निश्चयरथीं ।
प्रेरिला अंतर द्वारावती । शीघ्र श्रीपती आणावया ॥ ४ ॥
मनोगती पावला दूत । नीरोप उठविला त्रैलोक्यनाथ ।
म्हणे, 'मज आत्मया समान आप्त । धर्म इच्छीं भेटीतें ॥ ५ ॥
आतांचि केलें पाहिजे गमन,' । म्हणोनि उठिला करुणाघन ।
संगीं सुवात तैसा सगुण । इंद्रसेन सांगाती ॥ ६ ॥
जेथें वसे सात्त्विक गुण । तेथें वैराग्य आणी ज्ञान ।
टाकूनि येती, तेविं श्रीकृष्ण । धर्मभेटी निघाला ॥ ७ ॥
अभेदभक्ताचें दर्शन । घ्यावया शंकर नारायण ।
आदरें येती, तेवी श्रीकृष्ण । पांडव भेटी चालला ॥ ८ ॥
रथ नेटका निर्मळ भजन । चारु वारुचतुष्टय मन ।
एकनिष्ठेचें वरीं आसन । गुढार शोभे समाधी ॥ ९ ॥
कुशळ सारथी सुविचारु । नेमरश्मीनें आंवरी वारु ।
समागमें विवेक चतुरु । अर्धासनीं जवळिकें ॥ १० ॥
शमदमाचीं उभय चाकें । चूर्ण करिती विकल्प खडकें ।
वासनासरितांचीं तटाकें । उल्लंघिती अवलीळा ॥ ११ ॥
ऐसिये रथीं आत्मारामा । बैसका झाली पुरुषोत्तमा ।
यावेगळी आगळी उपमा । काय द्यावी कवीनें ? ॥ १२ ॥
लंघोनि अनेक देशांतरें । पुरंदरप्रस्था यादवेश्वरें ।
पावतां परिसोनी प्रेमादरें । धर्म धावे सामोरा ॥ १३ ॥
क्षेमालिंगन आल्हादकोटी । पुरीं नागरीं पुष्पवृष्टी ।
मंगळवाद्यांचे बोभाटीं । राजालया पातले ॥ १४ ॥

पितृभगिनीतें वंदोनी । भीमार्जुना आलिंगोनी ।
मोहें माद्रीतनय दोन्ही । कोमळहृदयीं कवळिले ॥ १५ ॥
द्रौपदी सुभद्रेचे माथे । स्नेहसंभ्रमें स्पर्शिले हातें, ।
ते वेळीं त्यांचिया आनंदातें । पारावर असेना ॥ १६ ॥
भोजन सारूनियां स्वपंक्ती । बैसका घालूनि एकांतीं ।
धर्म म्हणे, 'सर्वज्ञमूर्ती ! । विचार सांगे मज आतां' ॥ १७ ॥

४. मयसभा

घेउनि यक्षगणाचा मेळा । मय पातला मैनाचळा ।
बिंदु सरोवर देखिलें डोळा । अति रमणीय साजिरे ॥ १ ॥
सुवर्ण-श्रृंगांचे पर्वत । रत्नशिखरें विराजित ।
कल्पवृक्ष-पारिजात । असंख्यात दाटले ॥ २ ॥
सदा पुष्पित तरु फळले । परिमळें दिग्मंडळ दाटलें ।
परम सुकृती सुकृतबळें । पक्षी झाले ते वनीं ॥ ३ ॥
पूर्वी पवित्र राजेश्वरीं । इंद्रादिक सुरासुरीं ।
यज्ञ केले ती सामुग्री । उरली अपार पडली असे ॥ ४ ॥
सुवर्णरत्नाचिया रासी । भव्य दक्षणा देतां ऋषीं ।
उबगोनि सांडिलें धनासी । नेता घेता असेना ॥ ५ ॥
हेमकुंडें हेममंडप । हेमचैत्य हेमयूप ।
शाला निकेतनें अमूप । हेमरत्नीं बांधिली ॥ ६ ॥
बाळार्क कंदा निघाले कोंब । तैसे रत्नमणींचे खांब ।
विशाळवेदिका शातकुंभ । जांबूनदें निर्मिले ॥ ७ ॥
पद्मसहित पद्मनेत्र । तपें आचरोनि पवित्र ।
सहस्रवर्षे दीर्घसत्र । आचरला ते ठाई ॥ ८ ॥
पूर्वी तेथेंचि भगीरथ नृपु । तपस्तेजें कर्षिता वपु ।
प्रसन्न होऊनि कंदर्परिपु । गंगाप्रसाद दीधला ॥ ९ ॥
नरनारायण चतुरानन । यमधर्म – महेशान ।
विश्वपाळणालागीं यज्ञ । तेचि ठाईं आचरले ॥ १० ॥

प्रयुत अर्बुद–पद्म संख्येंत । खर्व निखर्व शतानुशात ।
हिंरण्यदक्षिणेचिया गणित । सृष्टीकर्त्या न करवे ॥ ११ ॥
असो ते अपरमित सामोग्री । रत्नसुवर्णे कोटींवरी ।
देऊनि यक्षगणांचे शिरीं । मयदानव पातला ॥ १२ ॥
सूर्यकांत सोमकांत । काश्मीरगर्भ शुद्ध धुत ।
स्फटिक स्तंभावरी शोभत । स्फटिक फळिया शुद्ध शिळा ॥ १३ ॥
हिरे माणिकें मुक्ताफळें । पुष्कराज गोमेद निळें ।
पाचू वैडूर्य सुढाळें । नाना रत्नें अपार ॥ १४ ॥
स्वयंभू रत्नांचें रांजण । पद्मरागें भरले पूर्ण ।
ऐसे घेउनि राक्षसगण । शक्रप्रस्था पातले ॥ १५ ॥
अष्ट मुक्ताफळांच्या जाती । मेघ मच्छ सर्प हस्ती ।
वंश शंख वराहशुक्ती । यांपासाव जन्मले कां ॥ १६ ॥
गदा वोपिली भीमसेना । देवदेत्त शंख दिधला अर्जुना ।
मुहूर्त अवलोकोनि रचना । सभामंडपा मांडिली ॥ १८ ॥
अठरा सहस्र राक्षस बळी । सामुग्री द्यावया तात्काळीं ।
मयें ठेविले हाताजवळी । चपळ चतुर जाणते ॥ १९ ॥
निष्क म्हणजे गुढ शब्द । पुरुष हस्तप्रमाण सिद्ध ।
दहासहस्र लांब रुंद । सूत्रप्रमाण मंडपा ॥ १९ ॥
ध्वज धूम शुनक वृष । खर कुंजर ध्वांक्ष मृगेश ।
गृही रक्षिजे विशेष । वास्तुविधानीं बोलिजे ॥ २० ॥
अष्ट आय साधिलें निगुतीं । अष्टौ लोकपाळांच्या मूर्ती ।
अष्टकोनी ठेविल्या दीप्ती । अष्ट आदित्य पैं जैसे ॥ २१ ॥
पाया शोधून धरातळीं । तळवट बांधिला रत्नप्रवाळीं ।
त्यावरी स्फटिकाचिया ओळी । विशाळ पौळिया उभविल्या ॥ २२ ॥
सप्तरंगी विशाळ शिळा । कोरीव टेकिल्या अंतराळा ।
त्या बाहेर जनाच्या डोळां । चित्र विचित्र भासती ॥ २३ ॥
नवरत्नाचिया चिरियावरी । जडित जोडिल्या कळाकुसरी ।
जेविं उगवली येकसरी । रविमंडळें आकाशीं ॥ २४ ॥
इंद्रनीळाचे अखंड हस्ती । गाडया रचिल्या चक्राकृती ।
त्यावरी मांडिली आइती । मंडपाची विचित्र ॥ २५ ॥

पद्मरागाचे तोळंबे । पाईं दडपिले मरगजस्तंभें ।
म्हणऊनि वज्रमणीचे क्षोभे । वरी उथाळी वळघती ॥ २६ ॥
जांबूनदाचे तुळवट । गरुडपाचूच्या किलचा-पाट ।
पेरोजांचे उंबरवट । कनकोदकें चित्रिले ॥ २७ ॥
पुष्कराजाच्या सुरेखा । चौकटी जडल्या अमोलिका ।
माणिकाच्या विनायका । अष्टभुजे वरौते ॥ २८ ॥
घोंटीव पाचूचे पाषाणीं । चौक साधिला मंडपांगणीं ।
ढालोनि सोनियाचें पाणी । कमळवेली रेखिल्या ॥ २९ ॥
गोमेदाचिया मदालसा । वरी बैसका राजहंसा ।
कामाविल्या आकृति ठसा । मुक्ताफळी सोज्वळ ॥ ३० ॥
वदनी विद्रुमराजहंस । धरिले मुक्ताफळांचे घोंस ।
नीळ रत्नाचे डोळस । नीळकंठ चित्रांगी ॥ ३१ ॥
शुद्ध पाचूची पाखरें । मुखीं माणिकें मनोहरे
रत्नमणींची सालंकारें । जंबूफळें कार्षिलीं ॥ ३२ ॥
हस्तलाघवकळेची थोरी । मयूर नाचती किंकारी ।
पुतळिया गाती सप्तस्वरी । नृत्य करिती सुताले ॥ ३३ ॥
सभानायकाचें चोज । पुतळिया करिती चिंतिलें काज ।
महिष कुंजर जुझती जुंझ । आज्ञा होता प्रभूची ॥ ३४ ॥
मरगजस्तंभी सिंहमूर्ती । साचारासारख्या हुंकारती ।
जिव्हा-नखे-दंत-दीप्ती । पद्मरागें झळकती ॥ ३५ ॥
टाळ मृदंग वाद्य यंत्रास । रागोद्धारविणे सुरस ।
लेपें वाजविती विशेष । कळा विश्वकर्म्याची ॥ ३६ ॥
कौस्तुभमणी सीमंतमणी । खेवणी जडिली खणोखणी ।
यालागी प्रवर्तला रजनी । काज नाही दीपांचें ॥ ३७ ॥
सुवर्णमणीची शिखरे । तेवीं शतखणी दामोदरें ।
प्रवेश करितां जळधरें । सूर्यकिरणे शंकती ॥ ३८ ॥
मेघी तळपती सौदामिनी । तैशा पताका झळकती गगनी ।
कनककलशांचिया श्रेणी । हिणविती ग्रहातें ॥ ३९ ॥
पद्मरागाची कपाटें । शृंगारश्रियेचीं अधरपुटें ।
स्तंभ दशनींचे न संठे । तेज फांके उघडितां ॥ ४० ॥

ज्योती हिरियाची विशाळें । चित्रशाळा विश्रामस्थळें ॥
वलभीवरी गोळांगुळे । अतिविचित्र शोभती ॥ ४१ ॥
मोल विसरोनी नामगुणिया । लसणे सूदले पाउठणिया ।
सुवर्ण सुंगध बैसोनियां । वरी सन्मानें जडियेली ॥ ४२ ॥
सुदृढ सुवर्णाचिया भिंति । चतुर्दश भुवनाची आकृती ।
कुसरीये जडली रत्नदीप्ती । साच कीं चित्र लक्षेना ॥ ४३ ॥
पाचुरत्नी विष्णुभुवना । पुष्कराज ब्रह्मसदना ।
हिरें मुक्तें स्वस्थाना । कर्पूरगौर गणेशा ।
इंद्र चंद्र वरुण कुबेर । यम वायुवन्ही भास्कर ।
गण गंधर्व यक्ष किन्नर । मनोहर काढिले ॥ ४५ ॥
मत्स्य कूर्म वराह स्थळें । शेष वासुकी फणिपाळ कुळें ।
रेखिली सप्तही पाताळें । त्रिविक्रम बळीसीं ॥ ४६ ॥
द्वीपें खंडें शैल सागर । काननें सरिता मनोहर ।
छपन्न देशींचे राजेश्वर । मनुजाकृती विचित्र ॥ ४७ ॥
लिहिले रामायण भारत । अवतारचरित्रें भागवत ।
शक्ती आख्यानें अद्‌भुत । असुर सुर रेखिलें ॥ ४८ ॥
योगीसिद्ध चौऱ्यांसी आसनें । तितुकी कामशास्त्राचीं भिन्ने ।
देखता अभ्यासमार्गी मनें । योगी भोगीं प्रेरिती ॥ ४९ ॥
सोमकांताच्या पाषाणीं । विचित्र वापिका पुष्करणी ।
माजी पुष्करें नानावर्णी । विकाशती सुवासें ॥ ५० ॥
चिंतामणीचें देवागार । स्वर्शमणीचे नंदिकेश्वर ।
नाद निधीचे मनोहर । सोमसूत्री शिवलिंगें ॥ ५१ ॥
उष्णोदकाच्या वापिका । सुगंधतैल चर्चून देखा ।
मंगळ स्नानें करितां लोकां । कळावरी श्रियेची ॥ ५२ ॥
सुगंधोदके खडकुलिया । रत्नें बाणली मंचकी शैय्या
आसनें वितानें गादिया । इंद्रगोपवर्णाचीं ॥ ५३ ॥
स्फटिकभूमिकें भ्रमती डोळे । स्थळें तेथें दिसतीं जळें ।
वस्त्रे सांवरुनि बळें । चालतां चतुर हांसती ॥ ५४ ॥
जळ असतां स्थळ भासत । चालतां पडती वस्त्रासहित ।
बुचकळिया देतां होत । महाविनोद जनांतें ॥ ५५ ॥

काश्मीर भिंतीवरी अभंग । असोनि पुढें न दिसे मार्ग ।
मार्ग म्हणोनि चालता आंग । भिंती मार्गीं आदळें ॥ ५६ ॥
झांकलीं दिसती मुक्त कवाडें । लोटल्या पडती पुढल्या तोंडें ।
मुक्त म्हणोनि चालतां पुढें । संघट्ट कपाटें आदळती ॥ ५७ ॥
सोमकांत कासारजीवनीं । मच्छकच्छपाची तळपणी ।
चक्रवाक हंस हंसिनी । क्रीडा करिती विनोदें ॥ ५८ ॥
माणिकाचीं सुरंग नाळें । नीळ पाचूची सुनीळ दळें ।
सहस्रपत्रीं सुवर्णकमळें । विकाशली साजिरी ॥ ५९ ॥
तेथें उद्भव होतों परिमळा । हे अद्‌भुत दानवी कळा ।
हारोहारीं मुक्तमाळा । हेमपत्रीं तोरणें । ॥ ६० ॥
रत्नस्तंभावरीं कौतुकी । वेष्टण केलें कनकलतिकी ।
मुक्तफळें आणि माणिकीं । घोंस केले फळांचे । ॥ ६१ ॥
तेथें गरुड पाचूचे कीर । मुखें चुंबिती सुकुमार ।
सुवर्ण-पत्री पुष्पी भ्रमर । नीळरत्नी झळकती ॥ ६२ ॥
भोंवतीं देवद्रुमांची दाटी । पुष्पी फळी करिती वृष्टी ।
द्विपद षटपदांचिया कोटी । स्वादामोदीं लोभलें ॥ ६३ ॥
द्राक्षी फळांचे मंडप दाट । तळी वाहाती रसाचे पाट ।
अमृत निश्चळ सुस्वादिष्ट । हेमजंबू दाळिंबी ॥ ६४ ॥
क्षीरबोरी अमृतफळी । रंभा खर्जूरी नारिकेळी ।
बिल्व आंवळी पोफळी । मातुलिंगी सुफळित ॥ ६५ ॥
चंपकवनें दवनवनें । कृष्णागरु हरिचंदनें ।
कर्पूरकेशरकर्दळीविपिनें । कनक केतकी शोभती ॥ ६६ ॥
लवंगलतिका नागलतिका । बकुळ शतपत्र मल्लिका ।
जाती कंकोळ वल्लिका । पारिजातका वेष्टित ॥ ६७ ॥
असो ऐसी सुखाडभरित । सभा निर्मिली अत्यद्‌भुत ।
उपमे तुळितां गगनांत । स्वर्गपारडें वरुतें ॥ ६८ ॥
विश्वकर्म्यानें धरुनि मुष्टी । पासंगा घातले तेतीस कोटी ।
तरी न बैसे तळवटीं । हाळवटपणें अद्यापी ॥ ६९ ॥
जे सभा अवलोकितां दृष्टी । देखिली होय ब्रह्मसृष्टी ।
नाहीं देखिली ऐसीं पोटी । असोसी कांहीं उरेना ॥ ७० ॥

ब्रह्मसभा इंद्रसभा । सुधर्मा जे यादवी सभा ।
त्याहूनि साजरी धर्मसभा । मयनिर्मित आगळी ॥ ७१ ॥
चतुर्दशमासांनिरुपम । पूर्ण झालें सभेचें काम ।
धर्मा सांगे दानवोत्तम । सभा दृष्टीं पाहींजे ॥ ७२ ॥
मित्र बंधु प्रधान कुमर । सर्वे पवित्र ऋषेश्वर ।
सुमुहूर्ते राजेश्वर । सभा पाहों पातला ॥ ७३ ॥
मंगळघोष गर्जती वाद्ये । मागधवीर वाखाणितीं ब्रिदें ।
मार्ग सिंपोनि सुगंधें । पुष्पभार विखुरले ॥ ७४ ॥
सभाद्वारप्रवेशकाळीं । द्विजी वोपिल्या पुष्पांजळी ।
भक्ष्य भोज्य नानाफळी । बळी सांडिले अपार ॥ ७५ ॥
सभा अवलोकितां दृष्टीं । शोभा समुद्र हेलावे पोटीं ।
चक्षु पोहणार उठाउठी । ऐलकांठीं चुबकले ॥ ७६ ॥
पावावया पैल प्रांतीं । उडोनि जाता आपुले शक्ति ।
मनोविहंगम आवर्ती । ऐलीकडे राहिले ॥ ७८ ॥
खणोखणीं पहाता नयनें । ब्रह्मांडेंचि दिसती भिन्नें ।
बैसका घेतल्या जनमनें । त्या चालतां न चलती ॥ ७८ ॥
म्हणती स्वर्ग मृत्यु पाताळीं । हे प्रतिमा नाहीं आणिली ।
धन्य धन्य गुण याचे करतळी । ईश्वरी–कळा वसतसे ॥ ७९ ॥
अपार वोपोनि संपत्ती । सुहृद्भाव धरूनि चित्ती ।
बहुत मानें स्वस्थळाप्रती । मय दानव बोळविला ।

५. कीचकवध

दिवस गेलिया अस्तातें । सुदेष्णा म्हणे सैरंध्रीते । तृषा लागली असें मातें । मद्य आणी प्राशना ॥ १ ॥ जाऊनीयां कीचकाच्या घरा । आणीं भक्ष आणी मदिरा, । अप्रीत उपजे त्या प्रकारा । नाचरावें शाहाणीये !' ॥ २ ॥ येरी म्हणे 'वो जनस्वामिणी ! । परिचारिका पाठवीं कोण्ही, । भक्ष आणि मद्य दोन्हीं । क्षणें आणील तव आज्ञा' ॥ ३ ॥ येरी म्हणे, वो शुचिस्मिते ! । तूंचि आणी अपुले हातें, । आणिकें आणिल्या तें मातें । रुची नेदी सर्वथा' ॥ ४ ॥ आग्रह जाणोनी वचनें । कृष्णा गेली उद्विग्न मनें, । कीचकें सन्मानुनी मानें । म्हणे, बैसें

आसनीं' ॥ ५॥ अति लगबगां धांवे धरुं, । ते म्हणे, 'केला अंगिकारु, । स्वस्थ नावेक धरीं धरूं, । गुज कांहीं बोलतसें ॥ ६ ॥ बृहन्नळानृत्यागारीं । दिवसा नाचवी बहुत कुमरी, । रात्रीं आपुलाले घरीं । प्रवेशती सकळीक ॥ ७ ॥ तो एकांत असे बरवा, । तो ठाव आणिकां न ठावा, । तेथे नेमिल्या काळीं तुवां । शीघ्र यावें ममाज्ञा ॥ ८ ॥ आजि मातें उपोषण, । नाहीं तांबूल भक्षण, । केलें नाहीं जळ प्राशन । नेम जाणे सुवृत्ती ॥ ९ ॥ उदईक होतां सूर्यास्तू । पूर्ण होईल मनोरथू, । हा दोन्हीचा संकेतू । नृत्यशाळे मिळूं मिळणीं ॥ १० ॥ जे कां कुंकुमतांबोलहीना, । रुदीत, क्षुधीत, दुर्मुखी, जाणा । भोगीं वर्जिली अंगना । मन्वादिकीं निर्धारीं. ॥ ११ ॥ उदईक चारी प्रहर दिवसू । धैर्यें आंवरीं मानसू, । त्यानंतरीं सुखसंतोषू । जन्मवर भोगिसी ॥ १२ ॥ गंधर्व अथवा अन्य लोकातें । प्रगट न करीं वारियातें, । तरीच येणें घडेल मातें । हें निर्धारें जाण पां. ॥ १३ ॥ निबीड पाडिजे अंधकारू, । न कीजे शब्द साचारू.' । कीचक म्हणे, 'हा विचारू । मज बहुत मानला.' ॥ १४ ॥ संतोष मानूनिया ह्रदयीं । आवडीं हस्त ठेविला पायीं । आज्ञा देवोनि म्हणे, 'जायीं । शीघ्र येईं नेमातें.' ॥ १५ ॥ कृष्णा पाहोनि एकांत । भीमसेना जाणवी मात, । 'उदईक कीचक असे येत । नेम करूनि मजलागीं; ॥ १६ ॥ नृत्यशाळे तो आलिया । तुम्हीं जावें तया ठाया.' । भीम म्हणे, 'माझीया कार्या । न लगे मातें सांगणें.' ॥ १७ ॥ सूर्योदयीं कीचक जाणा । मातला भगिनीच्या दर्शना, । म्हणे, 'आजि माझ्या मना । परमानंद न संडे ॥ १८ ॥ सैरंध्री देऊनियां अनुमोदना । आजी येतसे भोगसदना, । सूर्य न वचे अस्तमाना । लागवेगें मंदटू. ॥ १९ ॥ मुहूर्त लोटतां सांज वेळे, । एकटा पातला नृत्यशाळे, । जैसा पाश घालूनि काळें । मृत्युठाया वोढिजे. ॥ २० ॥ चांदवा बांधिला, सूर्यपुट । आड केलें, कपटपट । अरळ दाटलें घनदाट । हेममंचकीं स्वहस्तें ॥ २१ ॥ कामभोगाचे तवंगें । डोळ्या पातया पातें न लागे, । विरहताप माजला अंगें । प्रळयानळासारिखा. ॥ २२ ॥ उठे बैसे क्षणक्षणीं, । सांचुल होता भावी मनीं, म्हणे, 'पातली याज्ञसेनी । नेमकाळीं नेमिष्ट,' ॥ २३ ॥ यानंतरें अर्धराती । भीम पातला भद्रजाती, । कामीक म्हणे, "परमप्रीती । बैसें मंचकीं वल्लभे!" ॥ २४ ॥ म्हणे, 'उशीर लाविला बहुत.' वक्षस्थळीं टाकिला हात । कठीण लागतां निभ्रांत । काममोहें नोळखे. ॥ २५ ॥ 'वाट पाहतां शीणले नयन, । युगासमान वाटला क्षण, । आतां देईं आलिंगन । अंगसंगीं निववीं कां.' ॥ २६ ॥ पुढा करूनियां वदना ।

घेऊं धांवें मुखचुंबना, । भीमे ताडिला चडकणा । हस्तभारें निष्टुरें. ॥२७॥ मग म्हणे, 'कोण रे ! धीट ?' । येरू म्हणे, 'मी गंधर्व श्रेष्ठ । द्रौपदी भोगाचा स्वाधिष्ट । स्वाद चाखवूं पातलों.' ॥२८॥ हस्त धरूनि हासडिला, । तंव कीचक झोंबीये मिसळला, । दोघां संग्राम माजला । अत्यद्भुत ते काळीं. ॥२९॥ अंतरें पाहे पांचाळी । तव दोघे मिसळले केशकवळीं, । मुष्टी मारितां वक्षस्थळीं । धरातळीं थरकंपु. ॥३०॥ घाय घालिती परस्परें, । दणाणती दिगंतरें, । महाप्रासादांची शिखरें । खचोनि पडती दडदडा. ॥३१॥ लोक म्हणती, 'महामारी । कोठोनि पातली इये नगरीं ?' । कोण्ही न निघती बाहेरी । भयें अंतरीं दडाले. ॥३२॥ उडोनि हृदयीं मारिली लात । वक्षस्थळीं मुष्टिघात । पृष्ठीं ताडितां निघात । दणदणाट माजला ॥३३॥ कोपर, ढुमणीया, चपेट । ताडितां अस्थि होती कुट; । कीचक म्हणे 'भरीन घोट । मित्रावर्णासारिखा.' ॥३४॥ भीम म्हणे, 'नृसिंहें तबकें । असूर विदारिला नखें, । तैसें अंग एकून एकें । छिन्नभिन्न करूनि टाकिन.' ॥३५॥ शत्रू नवनागसहस्त्रबळी । भीमें कवळितां कंठनाळीं । बळें ताडूनि बाहुबळीं । हस्त उखळोनी टाकिला, । ॥३६॥ भिडती नक्र आणि गजेन्द्र, । शरदपक्षी आणि मृगेंद्र, । रत्नासुर आणि देवेंद्र, । मूळ वैरी झुंजती, ॥३७॥ महामाया महिषासुर, । शंकर आणि अंधकासुर । हनुमंत आणि अखयाकुमर । अशोकवनीं ज्यापरी. ॥३८॥ पूर्वी सुग्रीव आणि वाळी । झुजिन्नले किस्किंदातळीं । तैसा कीचक आणि भीम बळी । युद्धकंडना मिसळले ॥३९॥ भीम म्हणे, 'आंगवणें । दाऊनि, शेखीं जासी प्राणें ; जैसीं व्याघ्राप्रती हरणें । शिंगें पुढां झाडितीं' ॥४०॥ मागें सरोनी धांवती पुढें । हृदयीं थडका मारिती गाढे । एकमेकां इडेपाडे । महापर्वत पैं जसे ॥४१॥ यानंतर भीम जगजेठी । वर्मस्थळीं सहस्त्रमुष्टी । बळें ताडितां भूतटीं । मुर्छा दाटोनि पडियेला ॥४२॥ पुढती उचलोनियां, शीरीं । भोवंडोनी टाकिला पृथ्वीवरी । सव्य पाय देवोनि उरीं । हस्त दोनी उपटिले ॥४३॥ अंगुष्ट रोवोनि नाभीस्थानीं । छेदोनि, सांडिले चरण दोनी, । शीर पिळोनियां धरणी । भिन्न करूनि टाकिले ॥४४॥ जैसा किरात शस्त्रघातें । चारी पाद ग्रींवा हातें । छेदोनियां कूर्मातें । भिन्न करी भक्षावया ॥४५॥ तैसें निवटूनि अस्थिजाळ । शीर केलें गोळांगुळ । सोडले रक्ताचे खळाळ । नदीलोटासारिखे ॥४६॥ सुरीं गर्जोनि जयजयकारीं । पुष्पें टाकिलीं भीमावरी । म्हणती, 'मारूनि कौरव वैरी । जगीं होय यशस्वी.' ॥४७॥

◇ ◇

तुकाराम

१. अभंगवाणी

१

सुंदर तें ध्यान उभें विटेवरी । कर कटावरी ठेवूनियां ॥ १ ॥
तुळसीहार गळां कासे पीतांबर । आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥ २ ॥
मकरकुंडलें तळपती श्रवणीं । कंठी कौस्तुभमणि विराजित ॥ ३ ॥
तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ॥ ४ ॥

२

घेईं घेईं माझे वाचे । गोड नाम विठोबाचें ॥ १ ॥
तुम्ही घ्यारे डोळे सुख । पाहा विठोबाचे मुख ॥ २ ॥
तुम्ही आइकारे कान । माझ्या विठोबाचे गुण
मना तेथें धांव घेईं । राहे विठोबाचें पायीं ॥ ४ ॥
तुका म्हणे जीवा । नको सोडूं या केशवा ॥ ५ ॥

३

कन्या सासऱ्यासी जाये । मागे परतोनि पाहे ॥ १ ॥
तैसें जालें माझ्या जिवा । केव्हां भेटसी केशवा ॥ २ ॥
चुकलिया माय । बाळा हुरूहुरू पाहे ॥ ३ ॥
जीवनावेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ॥ ४ ॥

४

ओस जाल्या दिशा मज भिंगुळवाणें । जीवलग नेणें मज कोणी ॥ १ ॥
भय वाटे देखें श्वापदांचे भार । नव्हे मज धीर पांडुरंगा ॥ २ ॥
अंधकारापुढें न चलवे वाट । लागतील खुंट कांटे अंगा ॥ ३ ॥
एकला निःसंग फांकती मारग । भितों नव्हे लाग चालावया ॥ ४ ॥
तुका म्हणे वाट दावूनि सद्गुरु । राहिला हा दुरू पांडुरंग ॥ ५ ॥

५

पंढरीची वाट पाहें निरंतर । निडळावरी कर ठेवूनियां ॥ १ ॥
जातियां निरोप पाठवीं माहेरा । कां मज सासुरा सांडियेलें ॥ २ ॥
पैल कोण दिसे गरुडाचे वारिकें । विठ्ठलासारिकें चतुर्भुज ॥ ३ ॥
तुका म्हणे धीर नाहीं माझ्या जीवा । भेटसीं केधवां पांडुरंगा ॥ ४ ॥

६

वाट पाहे हरि कां नये अझुनी । निष्ठुर कां मनीं धरियेलें ॥ १ ॥
काय करूं धीर होत नाहीं जीवा । काय आड ठेवा उभा ठेला ॥ २ ॥
नाहीं माझा धांवा पडियेला कानीं । कोठें चक्रपाणी गुंतलेती ॥ ३ ॥
नाहीं कळो आलें अंतरा अंतर । कृपावंत फार ऐकतों ॥ ४ ॥
बहुतां दिसांचें राहिलें भातुकें । नाहीं कवतुकें कुरवाळिलें ॥ ५ ॥
तुका म्हणे देई एक वेळां भेटी । शीतळ हें पोटीं होईल मग ॥ ६ ॥

७

भेटीलागीं जीवा लागलीसे आस । पाहे रात्रंदिवस वाट तुझी ॥१॥
पूर्णिमेचा चंद्र चकोरा जीवन । तैसें माझें मन वाट पाहे ॥२॥
दिवाळीच्या मूळा लेकी आसावली । पाहातसे वाटुली पंढरीची ॥३॥
भुकेलिया बाळ अति शोक करी । वाट पाहे परी माऊलीची ॥४॥
तुका म्हणे मज लागलीसे भूक । धांवुनी श्रीमुख दावीं देवा ॥५॥

८

देऊन आलिंगन प्रीतीच्या पडिभरें । अंगें हीं दातारें निववावीं ॥१॥
अमृताची दृष्टीं घालुनिया वरी । शीतळ हा करीं जीव माझा ॥२॥
घेई उचलोनि पुसे तहान भूक । पुसीं माझे मुख पीतांबरें ॥३॥
बुझावोनि माझी धरीं हनवटी । ओवाळूनि दिठी करूनि सांडीं ॥४॥
तुका म्हणे बापा अहो विश्वंभरा । आतां कृपा करा ऐसी कांहीं ॥५॥

९

कोण आम्हां पुसे सिणलें भागलें । तुजविण उगलें पांडुरंगा ॥१॥ध्रु०॥
कोणापाशीं आम्हीं सांगावें सुखदुःख । कोण तानभूक निवारील ॥१॥
कोण या तापाचा करील परिहार । उतरील पार कोण दुजा ॥२॥
कोणापें इच्छेचें मागावें भातुकें । कोण कवतुकें बुझावील ॥३॥
कोणावरी आम्हीं करावी हे सत्ता । होईल साहाता कोण दुजा ॥४॥
तुका म्हणे अगा स्वामी सर्व जाणां । दंडवत चरणां तुमच्या देवा ॥५॥

१०

शीतळ साउली आमुची माउली । विठाई वोळली प्रेमपान्हा ॥१॥ जाऊनि वोसंगा रिघेन वोरस। लागलें ते इच्छे पीइन वरी॥ध्रु०॥ कृपा तनु माझी सांभाळी दुभूनि। अमृतजीवनी लोटलीसे॥२॥ आनंदाचा ठाव नाहीं माझे चित्तीं। सागर तो किती उपमेसी ॥३॥ सैर जाये पडे तयेसी सांकडें। सांभाळीत पुढें मागें आस ॥४॥ तुका म्हणे चिंता कैसी ते मी नेणें। लडिवाळ तान्हें विठाईचें ॥ ५ ॥

११

तूं माउलीहून मयाळ चंद्राहूनि शीतळ। पाणियाहूनि पातळ कल्लोळ प्रेमाचा॥१॥ देऊं काशाची उपमा दुजी तुज पुरुषोत्तमा ॥ ओवाळूनि नामा तुझ्या वरूनि टाकिलों॥ध्रु.॥ तुवा केलें रे अमृता गोड त्या ही तूं परता। पांचां तत्त्वांचा जनिता सकळ सत्तानायक ॥२॥ काहीं न बोलोनि आतां उगा च चरणीं ठेवितों माथा। तुका म्हणे पंढरिनाथा क्षमा करीं अपराध ॥३॥

१२

स्थिरावली वृत्ति पांगुळला प्राण ॥ अंतरींची खुण दावूनिया ॥१॥ध्रु०॥
पुंजाळले नेत्र जाले अर्धोन्मीळित। कंठ सद्‌गदित रोमांच आले ॥२॥
चित्त चाकाटलें स्वरूपा माझारी। न निघे बाहेरी सुखावलों ॥३॥
सुनीळ प्रकाश उदैजला दिन ॥ अमृताचें पान जीवनकळा ॥४॥
शशिसूर्या जाली जीवे ओवाळणी। आनंदा दाटणी आनंदाची ॥५॥
तुका म्हणे सुखें प्रेमासी डुलत। वीरालों निश्चित निश्चितीनें ॥६॥

१३

आपुले मरण पाहिलें म्यां डोळां। तो जाला सोहळा अनुपम्य ॥१॥
आनंदें दाटलीं तिन्ही त्रिभुवनें। सर्वात्मकपणें भोग जाला ॥२॥
एकदेशी होतों अहंकारें आथिला। त्याचा त्याग जाला सुकाळ हा ॥३॥
फिटलें सुतक जन्ममरणाचे। मी माझ्या संकोचें दुरी जालों ॥४॥
नारायणें दिला वसतीस मला। ठेवूनियां भाव ठेलों पायीं ॥५॥
तुका म्हणे दिले उमटूनि जगीं। घेतलें तें अंगीं लावूनियां ॥६॥

१४

आनंदाचे डोहीं आनंदतरंग। आनंदचि अंग आनंदाचें ॥ १ ॥ ध्रु०
काय सांगों जालें कांहींचियाबाही। पुढें चाली नाहीं आवडीनें ॥ २ ॥
गर्भाचे आवडी मातेचा डोहळा। तेथींचा जिव्हाळा तेथें बिंबे ॥ ३ ॥
तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा। अनुभव सरिसा मुखा आला ॥ ४ ॥

१५

याजसाठीं केला होता अट्टाहास । शेवटींचा दिस गोड व्हावा ॥१॥
आतां निश्चिंतीनें पावलों विसांवा । खुंटलिया धांवा तृष्णेचिया ॥२॥
कवतुक वाटे जालिया वेंचाचें । नांव मंगळाचें तेणें गुणें ॥३॥
का म्हणे मुक्ति परिणिली नोवरी । आतां दिवस चारी खेळीमेळीं ॥४॥

१६

अणुरणीयां थोकडा । तुका आकाशाएवढा ॥१॥ गिळुनि सांडिले कळिवर । भवभ्रमाचा आकार ॥२॥ सांडिली त्रिपुटी । दीप उजळला घटीं ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां । उरलों उपकारापुरता ॥ ४ ॥

१७

जेथें जातो तेथें तूं माझा सांगाती । चालविसी हातीं धरूनियां ॥१॥
चालों वाटे आम्ही तुझाचि आधार । चालविसीं भार सवें माझा ॥२॥
बोलों जातां बरळ करिसी तें नीट । नेली लाज धीट केलों देवा ॥३॥
अवघे जन मज जाले लोकपाळ । सोइरे सकळ प्राणसखे ॥४॥
तुका म्हणे आतां खेळतों कौतुकें । जाले तुझें सुख अंतर्बाहीं ॥५॥

१८

कृष्ण माझी माता कृष्ण माझा पिता । बहिणी बंधू चुलता कृष्ण माझा ॥१॥
कृष्ण माझा गुरु कृष्ण माझा तारू । उतरी पैलतीरू भवनदीचा ॥२॥
कृष्ण माझें मन कृष्ण माझें जन । सोइरा सज्जन कृष्ण माझा ॥३॥
तुका म्हणे माझा श्रीकृष्ण विसावा । वाटे न करावा परता जीवा ॥४॥

१९

वृक्ष वल्ली आम्हां सोयरीं वनचरें । पक्षीही सुस्वरें आळविती ॥ १ ॥
येणें सुखें रुचे एकांताचा वास । नाहीं गुणदोष अंगायेत ॥ २ ॥
आकाश मंडप पृथिवी आसन । रमे तेथें मन क्रीडा करी ॥ ३ ॥
कंथाकमंडलु देहउपचारा । जाणवितो वारा अवसरु ॥ ४ ॥
हरिकथा भोजन परवडी विस्तार । करोनि प्रकार सेवूं रुचि ॥ ५ ॥
तुका म्हणे होय मनासी संवाद । आपुला चि वाद आपणांसी ॥ ६ ॥

२०

याती शूद्र वंश केला वेवसाय । आदि तो हा देव कुळपूज्य ॥ १ ॥
नये बोलों परि पाळिलें वचन । केलियाचा प्रश्न तुम्हीं संतीं ॥ ध्रु० ॥

संवसारें जालों अतिदुःखें दुःखी । मायबाप सेखीं क्रमिलिया ॥ २ ॥
दुष्काळें–आटिलें द्रव्यें नेला मान । स्त्री एकी अन्न अन्न करितां मेली ॥३॥
लज्जा वाटे जीवा त्रासलों या दुःखें । वेवसाय देखें तुटी येतां ॥ ४ ॥
देवाचें देऊळ होतें तें भंगलें । चित्तासी जें आलें करावेंसें ॥५॥
आरंभी कीर्तन करीं एकादशी । नव्हतें अभ्यासीं चित्त आधीं ॥ ६ ॥
कांहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें । विश्वासें आदरें करोनियां ॥ ७ ॥
गाती पुढें त्यांचें धरावें धृपद । भावे चित शुद्ध करोनियां ॥८॥
संतांचें सेविलें तीर्थ पायवणी । लाज नाहीं मनीं येऊं दिली ॥९॥
टाकला तो कांहीं केला उपकार । केलें हें शरीर कष्टवूनि ॥ १० ॥
वचन मानिलें नाहीं सुहृदांचें । समूळ प्रपंचें वीट आला ॥ ११ ॥
सत्यअसत्यासी मन केलें ग्वाही । मानियेलें नाहीं बहुमतां ॥ १२ ॥
मानियेला स्वप्नीं गुरूचा उपदेश । धरिला विश्वास दृढ नामीं ॥ १३ ॥
यावरि या जाली कवित्वाची स्फूर्ति । पाय धरिले चित्तीं विठोबाचे ॥ १४ ॥
निषेधाचा कांहीं पडिला आघात । तेणें मध्यें चित्त दुखविलें ॥ १५॥
बुडविल्या वह्या बैसलों धरणें । केलें नारायणें समाधान ॥ १६ ॥
विस्तारीं सांगतां बहुत प्रकार । होईल उशीर आतां पुरे ॥ १७॥
आतां आहे तैसा दिसतो विचार । पुढील प्रकार देव जाणे ॥ १८ ॥
भक्ता नारायण नुपेक्षी सर्वथा । कृपावंत ऐसा कळों आलें ॥ १९ ॥
तुका म्हणे माझें सर्व भांडवल । बोलविले बोल पांडुरंगें ॥ २० ॥

२१

आम्ही वैकुंठवासी । आलों याचि कारणासी । बोलिले जें ऋषी । साच भावें वर्ताया ॥१॥ झाडूं संतांचे मारग । आडरानें भरलें जग । उच्छिष्टाचा भाग । शेष उरलें तें सेवूं ॥२॥ अर्थे लोपलीं पुराणें । नाश केला शब्दज्ञानें । विषयलोभी मन । साधनें बुडविलीं ॥३॥ पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासीं दरारा । तुका म्हणे करा । जयजयकार आनंदे ॥ ४ ॥

२२

मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास ॥ कठिण वज्रास भेदूं ऐसे ॥ १ ॥
मेले जित असों निजोनियां जागे । जो जो जें जें मागे तें तें देऊं ॥ २ ॥
भले तरी देऊं गांडीची लंगोटी । नाठाळाचे काठी देऊं माथां ॥ ३ ॥

मायबापाहूनि बहु मायावंत ॥ करूं घातपात शत्रूहूनि ॥ ४ ॥
अमृत तें काय गोड आम्हांपुढें । विष तें बापुडें कडू किती ॥ ५ ॥
तुका म्हणे आम्ही अवघे चि गोड । ज्याचें पुरे कोड त्याचेपरि ॥ ६ ॥

२३

मोक्षपदें तुच्छ केलीं याकारणें । आम्हां जन्म घेणें युगायुगीं ॥ १ ॥
विटे ऐसें सुख नव्हे भक्तिरस । पुडतीपुडती आस सेवावें हें ॥ २ ॥
देवा हातीं रूप धरविला आकार । नेदूं निराकार होऊं त्यासी ॥ ३ ॥
तुका म्हणे चित्त निवांत राहिलें । ध्याई तीं पाउलें विटेवरि ॥ ४ ॥

२४

सेवितों हा रस वाटितों आणिकां । घ्यारे होऊं नका रानभरी ॥ १ ॥
विटेवरी ज्याचीं पाउलें समान । तोचि एक दानशूर दाता ॥ २ ॥
मनाचे संकल्प पाववील सिद्धी । जरी राहे बुद्धि याचे पायीं ॥ ३ ॥
तुका म्हणे मज धाडिलें निरोपा । मारग हा सोपा सुखरूप ॥ ४ ॥

२५

माझ्या बापें मज दिधलें भातुकें । म्हणोनि कवतुकें क्रीडा करीं ॥ १ ॥
केली आळी पुढें बोलिलों वचन । उत्तम हें धन आलें त्याचें ॥ २ ॥
घेऊनि विभाग जावें लवलाह्या । आलेति या ठाया आपुलिया ॥ ३ ॥
तुका म्हणे ज्ञानदेवीं समुदाय । करावा मी पाय येइन वंदू ॥ ४ ॥

२६

ज्ञानियांचा राजा गुरु महाराव । म्हणती ज्ञानदेव ऐसें तुम्हां ॥ १ ॥
मज पामरा हें काय थोरपण । पायींची वाहाण पायीं बरी ॥॥ २ ॥
ब्रह्मादिक जेथें तुम्हां वोळगणे । इतर तुळणें काय पुरे ॥ ३ ॥
तुका म्हणे नेणें युक्तीची ते खोली । म्हणोनि ठेविली पायीं डोई ॥ ४ ॥

२७

काय वाणूं आतां न पुरे हे वाणी । मस्तक चरणीं ठेवितसें ॥ १ ॥
थोरींव सांडिली आपुली परिसें । नेणे सिवों कैसें लोखंडासी ॥ २ ॥
जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती उपकारें ॥ ३ ॥
भूतांची दया हें भांडवल संतां । आपुली ममता नाहीं देहीं ॥ ४ ॥
तुका म्हणे सुख पराविया सुखें । अमृत हें मुखें स्त्रवतसे ॥ ५ ॥

२८

नामदेवें केलें स्वप्नामाजी जागें । सवें पांडुरंगें येऊनियां ॥ १ ॥
सांगितलें काम करावें कवित्व । वाउगें निमित्त बोलों नको ॥ २ ॥
माप टाकी सळ धरिली विठ्ठलें । थापटोनि केलें सावधान ॥ ३ ॥
प्रमाणाची संख्या सांगे शत कोटी । उरले शेवटीं लावी तुका ॥ ४ ॥

२९

आपुलिया बळें नाहीं मी बोलत । सखा कृपावंत वाचा त्याची ॥ १ ॥
साळुंकी मंजुळ बोलतसे वाणी । शिकविता धणी वेगळाची ॥ २ ॥
काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें । परि त्या विश्वंभरें बोलाविलें ॥ ३ ॥
तुका म्हणे त्याची कोण जाणे कळा । वागवी पांगुळा पायांविण ॥ ४ ॥

३०

अधिकार तैसा करूं उपदेश । साहे ओझें त्यास तेंचि द्यावें ॥ १ ॥
मुंगीवरी भार गजाचें पाळण । घालितां ते कोण कार्यसिद्धी ॥ २ ॥
तुका म्हणे फांसे वाघुरा कुऱ्हाडी । प्रसंगी तो काढी पारधी तो ॥ ३ ॥

३१

साकरेची गोणी बैलाचिये पाठीं । तयासी शेवटीं करबाडें ॥ १ ॥
मालाचे पैं पेटे वाहताती उंटें । तयालागीं कांटे भक्षावया ॥ २ ॥
वाउगा हा धंदा आशा वाढविती । बांधोनियां देती यमाहाती ॥ ३ ॥
ज्यासी असे लाभ तोचि जाणे गोडी । येर तीं बापुडीं सिणलीं वांयां ॥४॥
तुका म्हणे शहाणा होईं रे गव्हारा । चौऱ्यासीचा फेरा फिरों नको ॥५॥

३२

ढालतरवारे गुंतले हे कर । म्हणे मीं जुंझार कैसा झुंजों ॥ १ ॥
पेटी पडदळे सिलेटोप ओझें । हें तों जालें दुजें मरणमूळ ॥ २ ॥
बैसविलें मला येणें आश्वावरी । धांवूं पळूं तरी कैसा आतां ॥ ३ ॥
असोनि उपाय म्हणे हे अपाय । म्हणे हायहाय काय करूं ॥ ४ ॥
तुका म्हणे हा तों स्वयें परब्रह्म । मूर्ख नेणे वर्म संतचरण ॥ ५ ॥

३३

भगवें तरी श्वान सहज वेष त्याचा । तेंथें अनुभवाचा काय पंथ ॥ १ ॥
वाढवुनी जटा फिरे दाही दिशा । तरी जंबुवेषा सहज स्थिति ॥ २ ॥
कोरोनियां भूमी करिती मधीं वास । तरी उंदरांस काय वाणी ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसें कासया करावें । देहासी दंडावें वाउगें चि ॥ ४ ॥

३४

पुण्य परउपकार पाप ते परपीडा। आणीक नाहीं जोडा दुजा यासी ।। १ ।।
सत्य तो चि धर्म असत्य तें कर्म । आणीक हें वर्म नाहीं दुजें ।। २ ।।
गति ते चि मुखीं नामाचें स्मरण । अधोगति जाण विन्मुखता ।। ३ ।।
संतांचा संग तोचि स्वर्गवास । नर्क तो उदास अनर्गळा ।। ४ ।।
तुका म्हणे उघडें आहे हित घात । जयाचें उचित करा तैसें ।। ५ ।।

३५

जे कां रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुलें ।।१।। तोचि साधु ओळखावा । देव तेथें चि जाणावा ।।२।। मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनांचें चित्त ।।३।। ज्यासि आपंगिता नाहीं । त्यासि धरी जो ह्रदयीं ।।४।। दया करणें जे पुत्रासी । ते चि दासा आणि दासी ।।५।। तुका म्हणे सांगूं किती । तो चि भगवंताची मूर्ति ।।६।।

३६

जोडोनियां धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेंच करी ।।१।। उत्तमचि गति तो एक पावेल । उत्तम भोगील जीवखाणी ।।२।। परउपकारीं नेणें परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया ।।३।। भूतदया गाईपशूचें पाळण । तान्हेल्या जीवन वनामाजी ।।४।। शांतिरूपें नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्त्व वडिलांचें ।।५।। तुका म्हणे हेंचि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचें ।। ६ ।।

३७

तुम्हांपाशीं आम्ही येऊनियां काय । वृथा सीण आहे चालण्याचा ।। १ ।।
मागावें हें अन्न तरी भिक्षा थोर । वस्त्रासीं हे थार चिंध्या ब्रिदी ।। २ ।।
निद्रेसी आसन उत्तम पाषाण । वरी आवरण आकाशाचें ।। ३ ।।
तेथें काय करणें कवणाची आंस । वायां होय नाश आयुष्याचा ।। ४ ।।
राजगृहा यावें मानाचिये आसे । तेथें काय वसे समाधान ।। ५ ।।
रायाचिये घरी भाग्यवंता मान । इतरीं सामान्यां मान नाहीं ।। ६ ।।
देखोनियां वस्त्रें भूषणांचे जन । तात्काळ मरण येतें मज ।। ७ ।।
ऐकोनिया मानाल उदासता जरी । तरी आम्हां हरि उपेक्षीना ।। ८ ।।
आतां हेंचि तुम्हां सांगणें कौतुक । भिक्षेएसें सुख नाहीं नाहीं ।। ९ ।।
तपव्रतयाग महा भले जन । आशाबद्धहीन वर्तताती ।। १० ।।
तुका म्हणे तुम्ही श्रीमंत मानाचे । पूर्वींच दैवाचे हरिभक्त ।। ११ ।।

३८

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेदभ्रम अमंगळ ॥ १ ॥
आइका जी तुम्ही भक्त भागवत । कराल तें हित सत्य करा ॥ २ ॥
कोणाही जीवाचा न घडावा मत्सर । वर्म सर्वेश्वरपूजनाचे ॥ ३ ॥
तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुख दुःख जीव भोग पावे ॥ ४ ॥

३९

पर्जन्यें पडावें आपुल्या स्वभावें । आपुल्याला दैवें पिके भूमि ॥ १ ॥
बीज तेंचि फळ येईल शेवटीं । लाभहानि तुटी ज्याची तया ॥ २ ॥
दीपाचिये अंगीं नाहीं दुजा भाव । धणी चोर साव सारिखेची ॥ ३ ॥
काऊळें ढोंपरा कंकर तित्तिरा । राजहंसा चारा मुक्ताफळें ॥ ४ ॥
तुका म्हणे येथें आवडी कारण । पिकला नारायण जयां तैसा ॥ ५ ॥

४०

हरिनामवेली पावली विस्तार । फळीं पुष्पीं भार वोल्हावली ॥ १ ॥
तेथें माझ्या मना होईं पक्षिराज । साधावया काज तृप्तीचें या ॥ २ ॥
मुळींचिया बीजें दाखविली गोडी । लाहो करीं जोडी जालियाची ॥ ३ ॥
तुका म्हणे क्षणाक्षणां जातो काळ । गोडी ते रसाळ अंतरेल ॥ ४ ॥

४१

घोटवीन लाळ ब्रह्मज्ञान्याहातीं । मुक्तां आत्मस्थिती सांडवीन ॥ १ ॥
ब्रह्मभूत होते काया च कीर्तनीं । भाग्य तरी ऋणी देवा ऐसा ॥ २ ॥
तीर्थभ्रामकासी आणीन आळस । कडु स्वर्गवास करिन भोग ॥ ३ ॥
सांडवीन तपोनिधां अभिमान । यज्ञ आणि दान लाजवीन ॥ ४ ॥
भक्तिभाग्यप्रेमा साधीन पुरुषार्थ । ब्रह्मींचा जो अर्थ निजठेवा ॥ ५ ॥
धन्य म्हणवीन येह लोकीं लोकां । भाग्य आम्हीं तुका देखियेला ॥ ६ ॥

४२

पैल आले हरि । शंख चक्र शोभे करीं ॥१॥ गरुड येतो फडत्कारें । ना भी ना भी म्हणे त्वरे ॥२॥ मुगुट कुंडलांच्या दीप्ति । तेजें लोपला गभस्ति ॥३॥ मेघश्यामवर्ण हरि । मूर्ति डोळस साजिरी ॥४॥ चतुर्भुज वैजयंती । गळां माळ हे रुळती ॥५॥ पीतांबर झळके कैसा । उजळल्या दाही दिशा ॥ ६ ॥ तुका जालासे संतुष्ट । घरा आलें वैकुंठपीठ ॥ ७ ॥

४३

आम्हीं जातों आपुल्या गांवा। आमुचा रामराम घ्यावा ॥ १ ॥ तुमची आमची हेचि भेटी। येथुनियां जन्मतुटी ॥ २ ॥ आतां असों द्यावी दया। तुमच्यां लागतसें पायां ॥ ३ ॥ येतां निजधामीं कोणी। विठ्ठल विठ्ठल बोला वाणी ॥ ४ ॥ रामकृष्ण मुखीं बोला। तुका जातो वैकुंठाला ॥ ५ ॥

आरती

[अ] *कांकड आरती*

भक्तिचिये पोटीं बोध-कांकडा ज्योती। पंचप्राण जीवेंभावें ओवाळूं आरती ॥१॥
ओवाळूं आरती माझ्या पंढरीनाथा। दोन्ही कर जोडूनि चरणीं ठेविला माथा ॥ध्रु०॥
काय महिमा वर्णूं आतां सांगणें तें किती। कोटी ब्रह्महत्या मुख पाहता जाती ॥२॥
राई रखुमाबाई उभ्या दोन्ही दों बाहीं। मयुरपिच्छचामरें ढाळिती। ठाईंच्या ठाईं ॥३॥
विटेसहित पाय म्हणुनी भावें ओंवाळूं। कोटी रवि-शशी दिव्य उगवले हेळू ॥४॥
तुका म्हणे दीप घेउनी उन्मनींत शोभा। विटेवरी उभा दिसे लावण्यगाभा ॥५॥

[आ] *अद्वैत-पूजा*

कासियानें पूजा करूं केशीराजा। हा चि संदेह माझा फेडीं आतां ॥ ध्रु० ॥
उदकें न्हाणूं तरी स्वरूप तें तुझें। तेथें काय माझें वेचे देवा ॥ १ ॥
गंधाचा सुगंध पुष्पाचा परिमळ। तेथें मी दुर्बळ काय करूं ॥ २ ॥
फळदाता तूंच तांबोल अक्षता। तरी काय आतां वाहों तुज ॥ ३ ॥
वाहूं दक्षिणा जरी धातु नारायण। ब्रह्म तें चि अन्न दुजें काई ॥ ४ ॥
गातां तूं ओंकार टाळी नादेश्वर। नाचावया थार नाहीं कोठें ॥ ५ ॥
तुका म्हणे मज अवघें तुझें नाम। धूप दीप रामकृष्णहरि ॥ ६ ॥

[इ] *विठोबाची शेजारती*

पावला प्रसाद आतां विठो निजावें। आपला तो श्रम कळों येतसे भावें ॥१॥
आतां स्वामी सुखें निद्रा करा गोपाळा। पुरले मनोरथ जातों आपुलिया स्थळा ॥२॥
तुम्हांसी आम्हीं जागविलें आपुलिया चाडा। शुभाशुभकर्म दोष हरावया पीडा ॥३॥
तुका म्हणे दिधलें उच्छिष्टाचें भोजन। नाहीं निवडिलें आम्हां आपुलिया भिन्न ॥४॥

◇ ◇

ब हि णा बा ई

१. तें सुख सांगतां वाचे पडे मौन

कृपा उपजली जयराम स्वामींसी । आले पाहायासी भाव माझा ॥
देखोनी तयांसी आनंद वाटला । कंठ कोंदाटला आनंदानें ॥
मनेंचि आरती केला नमस्कार । पूजिला साचार मनामाजीं ॥
बहिणी म्हणे त्याचे मनांतील हेत । ओळखे निश्चित पांडुरंगा ॥१॥

मजवरी दृष्टी कृपेची ओतिली । प्रेमाची गुंतली माय जैसी ॥
अंतरींची पूजा घेऊनी जयराम । गेला तो सप्रेम स्वस्थानासी ॥
उगाचि बैसला आसनीं नेमस्त । करोनियां स्वस्थ चित्तवृत्ति ॥
तंव कांहीं एक अपूर्व वर्तलें । तुकारामें दिलें दर्शनासी ॥
केला नमस्कार भेटुनी आनंदें । अत्यंत आल्हादें स्वामी सखा ॥
मजही दर्शन दिधलें अळुमाळ । घातला कवळ मुखामाजीं ॥
मज म्हणे आलों जयराम–भेटीसी । तुजही मानसीं ओळखिलें ॥
तुम्हीं आता येथें नको राहों कदा । आत्मज्ञान बोधा न संडीं वो ॥
बहिणी म्हणे हें तो दर्शन दुसरें । मनाच्या व्यापारें तुकोबाचें ॥२॥

भ्रतार म्हणतसे आम्ही कीं ब्राह्मण । वेदाचें पठण सदा करूं ॥
कैंचा शूद्र तुका स्वप्नींचे दर्शनीं । बिघडली पत्नी काय करूं ॥
कैंचा जयराम कैंचा पांडुरंग । माझा झाला भंग आश्रमाचा ॥
आम्ही काय जाणो नाम हरिकथा । भक्ति हे तत्त्वतां नसे स्वप्नीं ॥
कैंचे संत साधु कैंची भावभक्ती । भिक्षुकांचे पंक्तीं वसो सदा ॥
बहिणी म्हणे ऐसें चित्तांत भ्रतारें । चिंतोनि निर्धारें विचारिलें ॥३॥

विचारिलें मनीं भ्रतारें आपण । आतां हें त्यागोन वना जावें ॥
इशी नमस्कार करितील जन । आम्ही इशी तृण वाटों परी ॥

स्त्रियेशीं बोलती अनुवाद कथेचा । आम्ही इशी नीचापरी वाटो ॥
पुसतचि येती इशी पहा जन । आम्ही कीं ब्राह्मण मूर्ख जालों ॥
इचें नांव घेती गोसाविण ऐसें । आम्हां कोण पुसे इजपुढें ॥
बहिणी म्हणे ऐसें भ्रतार मानसीं । चिंतुनी चित्तासी बोध करी ॥४॥

काय पाप केलें पूर्वील ये जन्मीं । आतां पुरुषोत्तमीं अंतरलें ॥
लाधलें नरदेह स्त्रियेचेनि रूपें । असंख्यात पापें फळा आलीं ॥
अधिकार नाहीं वेदार्थ श्रवणीं । गायत्री ब्राह्मणीं गुप्त केली ॥
करूं नये मुखें प्रणवाचा उच्चार । बीजाचा संचार ऐकों नये ॥
बोलों नये बोल पराचिया संगें भ्रतार तो अंगें जमदग्नी ॥
बहिणी म्हणे होतो जीव कासावीस । नये देवाजीस करुणा माझी ॥५॥

काय म्यां अदृष्टा करावें आपण । आलें जें टाकून सोसी जेथें ॥
नाहीं येत वारें अंगासी माझिया । घुमारीन काया नव्हे माझी ॥
स्वधर्म आपुला रक्षूनिया मनें । शास्त्राच्या श्रवणें देव साधु ॥
भ्रताराची सेवा तोचि आम्हां देव । भ्रतार स्वयमेव परब्रह्म ॥
तीर्थ भ्रताराचें सर्व तीर्थ जाण । तया तीर्थावीण निरर्थक ॥
भ्रतारवचनासी उल्लंघीन जरी । पापें माझ्या शिरीं पृथिवीचीं ॥
धर्म अर्थ काम मोक्षासी अधिकारी । भ्रतार साचारी वेद बोले ॥
हा माझा निश्चय मनांतील हेत । भ्रतारेंसी चित्त लाविलेंसे ॥
भ्रतारसेवेनें सांग हा परमार्थ । भ्रतारेंच स्वार्थ सर्व आहे ॥
भ्रतारावांचोनी अन्य देव जरी । येईल अंतरीं ब्रह्महत्या ॥
सद्‌गुरु भ्रतार साधन भ्रतार । सत्य हा निर्धार अंतरींचा ॥
बहिणी म्हणे देवा भ्रताराचे मनीं । तुवां प्रवेशोनी स्थिर केलें ॥६॥

भ्रतार गेलिया वैराग्य घेऊनी । पांडुरंगा जनीं जिणें काय ॥
प्राणाविण देह काय पावे शोभा । रात्रीविण प्रभा चंद्राचिये ॥
भ्रतार तो जीव देह मी आपण । भ्रतार कल्याण सर्व माझें ॥
भ्रतार जीवन मी मीन तयांत । कैसेनि वांचत जीव माझा ॥
भ्रतार तो रवी मी प्रभा तयासी । वियोग हा त्यासी केवीं घडे ॥
बहिणी म्हणे माझ्या जीवाचा निर्धार । बोलें पैं विचार हरि जाणे ॥७॥

भ्रतारें बैराग्य घेतलियावरी । जीव हा निर्धारीं देईन मी ॥
वत्सासाठीं देह अचेतन पडे । हें तंव रोकडें परब्रह्म ॥
भ्रताराचें तीर्थ न सांपडे जरी । अन्न खाय तरी मांस आम्हां ॥
भ्रताराचें शेष न सांपडे तरी । पापें माझ्या शिरीं त्रैलोक्याचीं ॥
चित्त हें भ्रताराविण जरी जाये । तरी वास होय नरकीं आम्हां ॥
भ्रतारदर्शनाविण जाय दीस । तरी तोचि रास पातकांची ॥
बहिणी म्हणे मज आज्ञाचि प्रमाण । ब्रह्म सनातन स्वामी माझा ॥८॥

भ्रतारें निश्चय केला मनामाजीं । जावें उद्यां आजी टाकोनिया ॥
तंव त्यासी व्यथा जाली शरीरास । झाला सात दिवस ज्वाळ देहीं ॥
ओळखीचे जन नायके उत्तर । आपण अहोरात्र तयापासीं ॥
दिधल्या औषध नेदी तया मान । जीव व्यथा पूर्ण फार सोसी ॥
एक मासवरी अन्नविवर्जित । व्यथा हे अद्‌भुत सोसीतसे ॥
नाना देव कुळें देवतांची भाष । ठेविल्या विशेष बहु कांहीं ॥
परी तया व्यथेंलागीं न ये गुण । म्हणे तो मरण आलें मज ॥
काय पांडुरंगा तुकोबासी निंदी । व्यथा तेचि संधी आली मज ॥
जरी तुकाराम निंदिला त्या गुणें । असेल दुखणें व्यथा मज ॥
तरी चमत्कार दाखवावा सद्या । जीवीं विश्ववंद्या तुकारामा ॥
बहिणी म्हणे झाला अनुताप भ्रतारा । पांडुरंग पुरा अंतरसाक्ष ॥९॥

वृद्धसा ब्राह्मण येऊनी बोलत । म्हणे कां रे मृत्य इच्छितोसी ॥
वैराग्य कां तुज आलें असे मना । स्त्रीचा त्याग कोणा गुणें केला ॥
आधीं इचा विचारी अपराध अंतरीं । मग कोपा करी प्रवर्तावें ॥
वाचण्याची इच्छा असलिया मानसीं । तरी तूं इयेसी अंगिकारीं
स्वधर्मविरहित वर्तेल ही जरी । तरी तिचा करी त्याग वेड्या ॥
ही आहे विरक्त निश्चित हरिभक्त । तुवां पाहीं सत्य तैसें व्हावें ॥
होईल कल्याण बोलत ब्राह्मण । भ्रतारें चरण वंदियेले ॥
सांगितलें सर्व कारण आपण । देई जीवदान आजी मज ॥
ये व्यथेपासोनी वांचवीं स्वामिया । जीव तुझ्या पायां वाहीन मी ॥
स्त्रियेसी सर्वथा न बोले आपण । हरीसी शरण जीवेंभावें ॥
केला नमस्कार प्रत्यक्ष उठोन । होईल कल्याण म्हणे द्विज ॥

आइकतें मीही दोघांचें बोलणें । घालीं लोटांगणें भ्रतारासी ॥
झाला तो अदृश्य ब्राह्मण तात्काळ । आरोग्य कुशल देह झाला ॥
बहिणी म्हणे देव कृपा करीं तरी । सर्व सिद्धी द्वारीं तिष्ठतील ॥१०॥

आरोग्य तात्काळ व्यथेचा हा ऱ्हास । झाला दिसंदीस भ्रताराचा ॥
मग करी कृपा बोले समाधानें । द्वेषाचें हें ठाणे दूर केलें ॥
म्हणे आतां सर्व जावें येथुनीया । आपुलिया ठाया स्वस्थानासी ॥
देवें आपणांसी ब्राह्मणाच्या वेजें । सांगितला शेष प्राक्तनाचा ॥
तेंचि आतां करूं हरीची वो भक्ती । मिरासीची खंती वाटियेली ॥
माझीं माय-बापें तयांसी सांगत । तुम्ही जा निवांत देवगांवा ॥
आपण अरण्यांत दोघें करूं वास । देवाच्या बोलास धरोनिया ॥
हो आतां कल्याण किंवा अकल्याण । आम्हीं तो संपूर्ण भक्ती करूं ॥
तुकोबाचे गांवां जाऊनिया राहों । मनींचा दृढावो धरोनिया ॥
ऐसी पालटली भ्रताराची बुद्धी । स्वामी कृपानिधी अंतरसाक्ष ॥
काय एक देव करील तें नव्हे । प्रत्यक्ष अनुभवें सर्वं जनां ।
बहिणी म्हणे अवघीं घेऊनी चालिलों । तुकोबाच्या आलों दर्शनासी ॥११॥

वत्साचीही माय कपिला सांगातें । धांवे एकचित्तें आम्हांपुढें ॥
मायबाप बंधु भ्रतारासहित । इंद्रायणी जेथ तेथें आलों ॥
करोनिया स्नान पांडुरंगी-भेटी । आनंदली सृष्टी अंतरंगें ॥
तुकोबा आरती करीत होते तेथें । नमस्कारें स्वस्थ चित्त केलें ॥
स्वप्नीं जो देखिला तेंच ध्यान तेथें । देखिलें नेमस्त पूर्ण दृष्टीं ॥
बहिणी म्हणे तेथ भ्रतारें साष्टांग । केला अंतरंग भावयुक्त ॥ १२ ॥

महदाजी कुळकर्णी तयाचीये घरीं । असोनी निर्धारी काळ क्रमूं ॥
येताती हेलावे दुःखाचे अनेक लक्ष्मीनायक जाणतसे ॥
घालोनीं संकटीं देवावरी भार । असो निर्विकार एकनिष्ठ ॥
तंव तये काळीं झालीये प्रसूत । कन्या झाली तेथ आपणासी ॥
काशीबाई तिचें ठेवियेलें नांव । दाखविला भाव पूर्ण काहीं ॥
बहिणी म्हणे वत्स मेलें कोल्हापुरीं । तेंचि आलें उदरीं ऐसें वाटे ॥१३॥

तुटकें संचित जालें शुद्ध चित्त । अंतरींचा हेत ओळखिला ॥
कृपा केली देवें इंद्रायणीतीर । देहुग्रामीं थोर भक्तिपंथ ॥

तेथें पांडुरंग देवाचें देऊळ । रहावया स्थळ प्राप्त झालें ॥
तुकाराम संत संताचें कीर्तन । तिन्ही काळ तीन दृष्टिपुढें ॥
नमस्कार तया न घडे पतिभयें । परि चित्त राहे सदा पायीं ॥
बहिणी म्हणे ऐसे मास झाले सात । अवघेंचि संचित सरों आलें ॥१४॥

आनंद वोवरी होती तये ठायीं । वाटे तेथें कांहीं बसावेंसें ॥
करूनिया ध्यान लावावें लोचन । करावें स्मरण विठोबाचें ॥
तुकाराम तंव देखतां देखत । आले अकस्मात गुप्तरूपें ॥
बहिणी म्हणे तेथ पुसोनी मातेसी । क्रमियल्या निशी तीन तेथें ॥१५॥

नेणें जपतप नेणें अनुष्ठान । घालावें आसन कळेना तें ॥
ध्यानाचें लक्षण इंद्रियांचा रोध । नाहीं याचा बोध ऐकियला ॥
पाषाणप्रतिमा विठोबाचें ध्यान । हृदयीं चिंतन नाममुद्रा ॥
तुकारामकथा करावी ती द्वारीं । ऐसा हा अंतरीं हेत होता ॥१६॥

टाळ चिपोळ्यांचा ध्वनी आयकतां । आनंद हा चित्ता सामावेना ॥
लावियले नेत्र निद्रेंत जागृती । तुकाराममूर्ति देखियली ॥
ठेवियला हस्त मस्तकीं बोलून । दिधलें वरदान कवित्वाचें ॥
बहिणी म्हणे नेणें स्वप्न कीं जागृती । इंद्रियांच्या वृत्ती वोसरल्या ॥१७॥

आनंदें सद्‌गद जाहलीं इंद्रियें । तुकाराम–पाय आठवले ॥
होऊनी सावध उघडिले नेत्र । आठवला मंत्र षडक्षरी ॥
ठसावला ध्यानीं मनाचिये ठायीं । आणिक तें कांहीं आठवेना ॥
बहिणी म्हणे हात घातला मस्तकीं । देह तो या लोकीं आढळेना ॥१८॥

तें सुख सांगतां वाचे पडे मौन । जाणता ते धन्य गुरुभक्त ॥
झालासे आनंद इंद्रियांचे द्वारीं । बैसलें शेजारीं चैतन्याचे ॥
घट हा बुडावा जैसा डोहा आंत । न फुटतां ओतप्रोत पाणी ॥
बहिणी म्हणे तैसें झालें माझे मना । तुकाराम खुणा ओळखी त्या ॥१९॥

वाटे उठों नये जीव जाय तरी । सुख तें अंतरीं हेलावलें ॥
आनंदें निर्भर होउनिया मन । करूं आलें स्नान इंद्रायणी ।
घेतलें दर्शन पांडुरंग मूर्ति । तंव झाली स्फूर्ति वदावया ॥

तुकोबासीं तेथें करूनी नमस्कार । आलें मी सत्वर बिऱ्हाडासी ।।
बहिणी म्हणे जैसा लोटला समुद्र । हृदयाकाशी चंद्र बोले वाचा ।।२०

२. अभंग

संत कृपा झाली । इमारत फळा आली ।।
ज्ञानदेवें रचिला पाया । रचियलें देवालया ।।
नामा तयाचा किंकर । तेणें केला हा विस्तार ।।
जनार्दन एकनाथ । ध्वज उभारिला भागवत ।।
भजन करा सावकाश । तुका झालासे कळस ।।
बहिणि म्हणे फडकती ध्वजा । निरूपणा केलें वोजा ।।

◇ ◇

रामदास

१. दासबोध : काही उतारे

गणेशस्तवन

ओं नमोजि गणनायका । सर्व सिद्धिफळदायका । अज्ञान भ्रांतिछेदका । बोधरूपा ॥१॥ माझिये अंतरीं भरावें । सर्वकाळ वास्तव्य करावें । मज वाक्शून्यास वदवावें । कृपाकटाक्षेंकरूनी ॥२॥ तुझिये कृपेचेनि बळें । वितुळती भ्रांतीचीं पडळें । आणी विश्वभक्षकें काळें । दास्यत्व कीजे ॥३॥ वंदूनियां मंगळनिधी । कार्य करितां सर्वसिद्धी । आघात अडथाळे उपाधी बाधूं सकेना ॥४॥ जयाचें आठवितां ध्यान । वाटे परम समाधान । नेत्रीं रिघोनियां मन । पांगुळे सर्वांगीं ॥५॥ सगुण रूपाची ठेव । महा लावण्य लाघव । नृत्य करितां सकळ देव । तटस्थ होती ॥६॥ सर्वकाळ मदोन्मत्त । सदा आनंदे डुल्लत । हरुषें निर्भर मुदित । सुप्रसन्नवदनु ॥७॥ भव्यरूप वितंड । भीममूर्ति माहाप्रचंड । वितीर्ण मस्तकीं उदंड । सिंधूर चर्चिला ॥८॥ नाना सुगंध परिमळें । थबथबां गळती गंडस्थळें । तेथें आलीं षट्पदकुळें । झुंकार शब्दें ॥९॥ मुर्डीव शुंडादंड सरळे । शोभे अभिनव आवाळें । लंबित अधर तिक्षण गळे । क्षणाक्षणा मंदसत्त्वी ॥१॥ चौदा विद्यांचा गोसांवी । ऱ्हस्व लोचन ते हिलावी । लवलवित फडकावी । फडै फडै कर्णथापा ॥११॥ रत्नखचित मुगुटीं झळाळ । नानासुरंग फांकती कीळ । कुंडलें तळपती नीळ । वरी जडिले झमकती ॥१२॥ दंत शुभ्र सद्द्ट । रत्नखचित हेमकट्ट । तया तळवटीं पत्रें नीट । तळपती लघुलघु ॥१३॥ लवथवित मलपे दोंद । वेष्टित कट्ट नागबंद । क्षुद्र घंटिका मंदमंद । वाजती झणत्कारें ॥१४॥ चतुर्भुज लंबोदर । कासे कासिला पीतांबर । फडके दोंदिचा फणीवर । धुधुकार टाकी ॥१५॥ डोलवी मस्तक जिव्हा लाळी । घालुन बैसला वेंटाळी । उभारोनि नाभिकमळीं । टकमकां पाहे ॥१६॥ नाना-याति कुसुममाळा । व्याळपरियंत रुळती गळा । रत्नजडित ह्रदय-कमळावरी पदक शोभे ॥१७॥ शोभे फरश

आणी कमळ। अंकुश तिक्षण तेजाळ। येके करीं मोदकगोळ। तयावरी अतिप्रीती ॥१८॥ नट नाट्य कळांकुसरी। नाना छंदें नृत्य करी। टाळ मृदंग भरोवरी। उपांग हुंकारे ॥१९॥ स्थिरता नाहीं येक क्षण। चपळविषईं अग्रगण। साजिरी मूर्ति सुलक्षण। लावण्यखाणी ॥२०॥ रुणझुणां वाजती नेपुरें। वांकी बोभाटती गजरें। घागरि यासहित मनोहरें। पाउलें दोनीं ॥२१॥ ईश्वरसभेस आली शोभा। दिव्यांबरांची फांकली प्रभा। साहित्यविषईं सुल्लभा। अष्टनायका होती ॥२२॥ ऐसा सर्वांगें सुंदरु। सकळ विद्यांचा आगरु। त्यासी माझा नमस्कारु। साष्टांग भावें ॥२३॥

कवेश्वरस्तवन

आतां वंदू कवीश्वर। जे शब्दसृष्टीचे ईश्वर। ना तरी हे परमेश्वर। वेदावतारी ॥१॥ कीं हें सरस्वतीचें निजस्थान। कीं हें नाना कळांचें जीवन॥ नाना शब्दांचें भुवन। यथार्थ होय ॥२॥ कीं हें पुरुषार्थाचें वैभव। कीं हें जगदीश्वराचें महत्व। नाना लाघवें सत्कीर्तीस्तव। निर्माण कवी ॥३॥ कीं हे शब्दरत्नांचे सागर। कीं हें मुक्तांचे मुक्त सरोवर। नाना बुद्धीचे वैरागर। निर्माण जाले ॥४॥ अध्यात्मग्रंथाची खाणी। कीं हे बोलके चिंतामणी। नाना कामधेनूंचीं दुभणीं। वोळलीं श्रोतयांसीं ॥५॥ कीं हे कल्पनेचे कल्पतरु। कीं हे मोक्षाचे मुख्य पडिभरु। नाना सायुज्यतेचे विस्तारु। विस्तारले ॥६॥ कीं हा परलोकींचा निस्वार्थु। कीं हा योगियांचा गुप्त पंथु। नाना ज्ञानियांचा परमार्थु। रूपासि आला ॥७॥ कीं हे निरंजनाची खूण। कीं हे निर्गुणाची वोळखण। माया विलक्षणाचे लक्षण। ते हे कवी ॥८॥ कीं हा श्रुतीचा भावगर्भ। कीं हा परमेश्वराचा अलभ्य लाभ। ना तरी होये सुल्लभ। निजबोध कविरूपें ॥९॥ कवि मुमुक्षाचें अंजन। कवि साधकांचें साधन। कवि सिद्धांचें समाधान। निश्चयात्मक ॥१०॥ कवि स्वधर्माचा आश्रयो। कवि मनाचा मनोजयो। कवि धार्मिकाचा विनयो। विनयकर्ते ॥११॥ कवि वैराग्याचें संरक्षण। कवि भक्तांचें भूषण। नाना स्वधर्मरक्षण। ते हे कवी ॥१२॥ कवि प्रेमळांची प्रेमळ स्थिती। कवि ध्यानस्थांची ध्यान-मूर्ती। कवि उपासकांची वाढकीर्ती। विस्तारली ॥१३॥ नाना साधनांचें मूळ। कवि नाना प्रयत्नांचें फळ। नाना कार्यसिद्धी केवळ। कविचेनि प्रसादें ॥१४॥ आधीं कवीचा वाग्विलास। तरी मग श्रवणीं तुंबळे रस। कवीचेनि मतिप्रकाश। कवित्वास होय ॥१७॥ कवि व्युत्पन्नाची योग्यता।

कवि सामर्थ्यवंतांची सत्ता । कवि विचक्षणाची कुशळता । नाना प्रकारें ॥ १६ ॥ कवि कवित्वाचा प्रबंद । कवि नाना धाटी मुद्रा छंद । कवि गद्यपद्य भेदाभेद । पदप्रासकर्ते ॥ १७ ॥ कवि सृष्टीचा अळंकार । कवि लक्ष्मीचा शृंगार । सकळ सिद्धींचा निर्धार । ते हे कवी ॥१८॥ कवि सभेचें मंडण । कवि भाग्याचें भूषण । नाना सुखांचें संरक्षण । ते हे कवी ॥१९॥ कवि देवांचे रूपकर्ते । कवी ऋषींचें महत्ववर्णीते । नाना शास्त्रांचें सामर्थ्यातें । कवि वाखाणिती ॥२०॥ नस्ता कवींचा व्यापार । तरी कैचा अस्ता जगदोद्धार । म्हणोनि कवि हे आधार । सकळ सृष्टीसी ॥२१॥ नाना विद्या ज्ञातृत्व कांहीं । कवेश्वरेंविण तों नाहीं । कवीपासून सर्वही । सर्वज्ञता ॥२२॥ मागां वाल्मीक व्यासादिक । जाले कवेश्वरे अनेक । तयांपासून विवेक । सकळजनासी ॥२३॥ पूर्वी काव्यें होतीं केलीं । तरीच व्युत्पत्ती प्राप्त जाली । तेणें पंडिता आंगीं बाणली । परम योग्यता ॥२४॥ ऐसे पूर्वीं थोर थोर । झाले कवीश्वर अपार । आतां आहेत पुढें होणार । नमन त्यांसी ॥२५॥ नाना चातुर्याच्या मूर्ती । कीं हे साक्षात् बृहस्पती । वेदश्रुती बोलों म्हणती । ज्यांच्या मुखें ॥२६॥ परोपकाराकारणें । नाना निश्चय अनुवादणें । सेखी बोलिलें पूर्णपणे । संशयातीत ॥२७॥ कीं हे अमृताचे मेघ वोळले । कीं हे नवरसाचे वोघ लोटले । नाना सुखाचे उचंबळले । सरोवर हे ॥२८॥ कीं हे विवेकनिधींची भांडारें । प्रगट जाली मनुष्याकारें । नाना वस्तूंचेनि विचारें । कोंदाटले हे ॥२९॥ कीं हे आदिशक्तीचे ठेवणें । नाना पदार्थास आणी उणें । लाधलें पूर्व संचिताच्या गुणें । विश्वजनासी ॥३०॥ कीं हे सुखाचीं तारुवें लोटलीं । आक्षै आनंदें उतटलीं । विश्वजनास उपयोगा आलीं । नाना प्रयोगाकारणें ॥३१॥ कीं हे निरंजनाची संपत्ती । कीं हे विराटाची योगस्थिती । ना तरी भक्तीची फळश्रुती । फळास आली ॥३२॥ कीं हा ईश्वराचा पवाड । पाहतां गगनाहून वाड । ब्रह्मांड रचनेहून जाड । कविप्रबंध-रचना ॥३३॥ आतां असो हा विचार । जगास आधार कवेश्वर । तयांसी माझा नमस्कार । साष्टांगभावें ॥३४॥

परंतु येथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥

सकळ जनांसी प्रार्थना । लगेच उदास करावेना ॥ निरूपण आणावें मना । प्रत्ययाचें ॥१॥ प्रत्यय राहिला येकेकडे । आपण धांवतो भलतेकडे । तरी सारासाराचे निवाडे । कैसे होती ॥२॥ उगीच पाहतां सृष्टी । गल्बला दिसतो

दृष्टीं। परी ते राजसत्तेची गोष्टी। वेगळीच असे ॥३॥ पृथ्वीमध्यें जितुकीं शरीरें। तितुकीं भगवंताचीं घरें। नाना सुखें येणें द्वारें। प्राप्त होती ॥४॥ त्याचा महिमा कळेल कोणाला। माता वांटून कृपाळु जाला। प्रत्यक्ष जगदीश जगाला। रक्षितसे ॥५॥ सत्ता पृथ्वीमध्यें वांटली। जेथें तेथें विभागली। कळेनें सृष्टि चालिलि। भगवंताचे ॥६॥ मूळ जाणत्या पुरुषाची सत्ता। शरीरीं विभागली तत्त्वता। सकळ कळा चातुर्यता। तेथें वसे ॥७॥ सकळ पुरांचा ईश। जगामध्यें तो पुरुष। नाना शरीरीं सावकाश। करूं लागे ॥८॥ पाहातां सृष्टीची रचना। ते येकाचेन चालेना। येकचि चालवी नाना। देह धरूनी ॥९॥ नाही उंच नीच विचारिलें। नाहीं बरें वाईट पाहिलें। कार्ये चालो ऐसें जालें। भगवंतासी ॥१०॥ किंवा नेणणें आडवें केलें। किंवा अभ्यासीं घातलें। हें कैसकैसें केलें। त्याचा तोचि जाणे ॥११॥ जगदंतरीं अनुसंधान। बरें पाहाणें हेंचि ध्यान। ध्यान आणीं तें ज्ञान। एकरूप ॥१२॥ प्राणीं संसारास आला। कांहींएक शाहणा जाला। मग तो विवरों लागला। भूमंडळीं ॥१३॥ प्रगट रामाचें निशाण। आत्माराम ज्ञानघन। विश्वंभर विद्यमान। भाग्यें कळे ॥१४॥ उपासना धुंडीनसी वासना धरिली। तरी ते लांबतचि गेली। महिमा न कळे बोली। यथार्थ आहे ॥१५॥ द्रष्टा म्हणिजे पाहता। साक्षी जाणिजे जाणता। अनंतरूपी अनंता। वोळखावें ॥१६॥ संगती असावी भल्यांची। धाटा कथा निरूपणाची। कांहीं येक मनाची। विश्रांती आहे ॥१७॥ त्याहीमध्यें प्रत्ययज्ञान। जाळून टाकिला अनुमान। प्रचीतीविण समाधान। पाविजेल कैचें ॥१८॥ मूळ संकल्प तो हरिसंकल्प। मूळमायेमधील साक्षेप। जगदंतरीं तेंचि रूप। देखिजेतें ॥१९॥ उपासना ज्ञानस्वरूप। ज्ञानीं चौथा देह आरोप। या कारणें सर्व संकल्प। सोडून द्यावा ॥ २० ॥ पुढें परब्रह्म विशाळ। गगनासारिखें पोकळ। घन पातळ कोमळ। काय म्हणावें ॥२१॥ उपासना म्हणिजे ज्ञान। ज्ञान पाविजे निरंजन। योगियांचे समाधान। येणे रीतीं ॥२२॥ विचार नेहटूनसा पाहे। तरी उपासना आपणचि आहे। येक जाये एक राहे। देह धरूनी ॥२३॥ अखंड ऐसी घालमेली। पूर्वापार होत आली। आतांहि तैसीच चालिली। उत्पत्तिस्थिती ॥२४॥ बनावरी बनचरांची सत्ता। जळावरी जळचरांची सत्ता। भूमंडळीं भूपाळां समस्तां। येणेंचि न्यायें ॥२५॥ सामर्थ्य आहे चळवळीचें। जो जो करील तयाचें। परंतु येथें भगवंताचें अधिष्ठान पाहिजे ॥२६॥

आधीं प्रपंच करावा नेटका

आधीं प्रपंच करावा नेटका। मग घ्यावें परमार्थविवेका॥ येथें आळस करूं नका। विवेकीहो॥१॥ प्रपंच सांडून परमार्थ कराल। तेणें तुम्ही कष्टी व्हाल। प्रपंच परमार्थ चालवाल। तरी तुम्ही विवेकी॥२॥ प्रपंच सांडून परमार्थ केला। तरी अन्न मिळेना खायाला। मग तया करंट्याला। परमार्थ कैंचा॥३॥ परमार्थ सांडून प्रपच करिसी। तरी तूं यमयातना भोगिसी। अंतीं परम कष्टी होसी। यमयातना भोगितां॥४॥ साहेबकामास नाहीं गेला। गृहींच सुरवाडून बैसला॥ तरी साहेब कुटिती तयाला। पाहाती लोक॥५॥ तेव्हां महत्वचि गेलें। दुर्जनांचें हासें जालें॥ दुःख उदंड भोगिलें। आपुल्या जीवें॥६॥ तैसेंचि होणार अंतीं। म्हणोन भजावें भगवंतीं॥ परमार्थाची प्रचीती। रोकडी घ्यावी॥७॥ संसारीं असतांच मुक्त। तोचि जाणावा संयुक्त॥ अखंड पाहे युक्तायुक्त। विचारणा हे॥८॥ प्रपचीं जो सावधान। तोचि परमार्थ करील जाण॥ प्रपंचीं जो अप्रमाण। तो परमार्थी खोटा॥९॥ म्हणोनी सावधानपणें। प्रपंच परमार्थ साधणें॥ ऐसें न करतां भोगणें। नाना दुःखें॥१०॥ पर्णाळी पाहोन उचले। जीवनसृष्टि विवेकें चाले। आणि पुरुष होऊन भ्रमले। यासी काय म्हणावें॥११॥ म्हणोन असावी दीर्घ सूचना। अखंड करावी चाळणा॥ पुढील होणार अनुमाना। आणून सोडावें॥१२॥ सुखी असतो खबर्दार। दुःखी होतो बेखबर॥ ऐसा हा लौकिक विचार। दिसतचि आहे॥१३॥ म्हणोन सर्वसावधान। धन्य तयांचें महिमान॥ जनीं राखे समाधान। तोचि येक॥१४॥ चाळणेचा आळस केला। तरी अवचिता पडेल घाला॥ ते वेळे सावरावयाला। अवकाश कैंचा॥१५॥ म्हणोन दीर्घसूचनेचे लोक। त्यांचा पाहावा विवेक॥ लोकांक रितांचि लोक। शाहाणे होती॥१६॥ परी ते शाहाणे वोळखावे। गुणवंतांचे गुण घ्यावें॥ अवगुण देखोन सांडावे। जनामध्यें॥१७॥ मनुष्य पारखूं राहेना। आणि कोणाचे मन तोडीना॥ मनुष्यमात्र अनुमाना। जाणून पाहे॥१८॥ दिसे सकळांसी सारिखा। पाहातां विवेकी नेटका॥ कामी निकामी लोकां। बरें जाणें॥१९॥ जाणोन पाहिजेत सर्व। हेंचि तयाचें अपूर्व॥ ज्याचें त्यापरी गौरव। राखों जाणें॥२०॥

करंट लक्षण

धान्य उदंड मोजिलें। परी त्या मापें नाहीं भक्षिलें। विवरल्याविण तैसें झालें। प्राणिमात्रांसी॥१॥ पाठ म्हणतां आवरेना। पुसतां कांहींच कळेना। अनुभव

पाहातां अनुमाना–। मध्यें पडे ॥२॥ शब्दरत्नें परीक्षावीं। प्रत्ययाचीं पाहोनि घ्यावीं। येर तीं अवघीं सांडावीं। ऐकीकडे ॥३॥ नांवरूप आवघें सांडावें। मग अनुभवास मांडावें। सार असार एकचि करावें। हें मूर्खपण ॥४॥ लेखकें कुळ समजवावें। किंवा उगेंचि वाचावें। येणें दृष्टांतें समजावें। कोणीतरी ॥५॥ जेथें नाहीं समजावीस। तेथें आवघी कुसमुस। पुसों जाता वसवस। वक्ता करी ॥६॥ नाना शब्द येकवटिले। प्रचीतीविण उपाव केले। परी तें अवघेचि व्यर्थ गेले। फडप्रसंगीं ॥७॥ पसेवरी वैरण घातलें। तांतडीनें जातें वोढिलें। तेणें पीठ बारीक आलें। हें तों घडेना ॥८॥ घांसामागें घांस घेतला। अवकाश नाहीं चावायाला। अवघा बोकणा भरिला। पुढें कैसें ॥९॥ ऐका फडनिशीचें लक्षण। विरंग जाऊं नेदीं क्षण। समस्तांचें अंतःकरण। सांभाळीत जावें ॥१०॥ सूक्ष्म नामें सुखें घ्यावीं। तितुकीं रूपें वोळखावीं। वोळखोन समजवावीं। श्रोतयांसी ॥११॥ समस्या पुरतां सुखी होती। श्रोते अवघे आनंदती। अवघे क्षणक्षणा वंदिती। गोसावियासी ॥१२॥ समस्या पुरतां वंदिती। समस्या न पुरतां निंदिती। गोसांवी चिण चिण करिती। कोण्या हिशेबें ॥१३॥ शुद्ध सोनें पाहून घ्यावें। कसीं लावुनी तावावें। श्रवणमननें जाणावें। प्रत्ययासी ॥१४॥ वैद्याची प्रचीत येना। व्यथा परती होयेना। आणी रागेजावें जना। कोण्या हिशेबें ॥१५॥ खोटें कोठेंचि चालेना। खोटें कोणास मानेना। याकारणें अनुमाना। खरें आणावें ॥१६॥ लिहिणें न येतां व्यापार केला। कांही येक दिवस चालिला। पुसतां सुरनीस भेटला। तेव्हां खोटे ॥१७॥ सर्व अवघें हिशेबी ठावें। प्रत्यय साक्षीनें बोलावें। मग सुरनीसें काय करावें। सांगाना कां ॥१८॥ स्वयें आपणचि गुंते। समजावीस कैसी होते। नेणता कोणीयेक ते। आपदों लागती ॥१९॥ बळेंविण युद्धास गेला। तो सर्वस्वें नागवला। शब्द ठेवावा कोणाला। कोणें कैसा ॥२०॥ जें प्रचीतीस आलें खरें। तेंचि घ्यावें अत्यादरें। अनुभवेंविण जीं उत्तरें। तीं फलकटें जाणावीं ॥२१॥ सिकवूं जातां राग चढे। परंतु पुढें आदळ घडे। खोटा निश्चय तात्काळ उडे। लोकांमध्यें ॥२२॥ खरें सांडुन खोटें घेणें। भकाधेस काय उणें। त्रिभुवनीं नारायणें। न्याय केला ॥२३॥ तो न्याय सांडितां शेवटीं। अवघें जगचि लागे पाठीं। जनीं भांडभांडो हिंपुटी। किती व्हावें ॥२४॥ अन्यायें बहुतांस पुरवलें। हें देखिलें ना ऐकिलें। वेडे उगेचि भरीं भरलें। असत्याचे ॥२५॥ असत्य म्हणिजे तेंचि पाप। सत्य जाणावें स्वरूप। दोहींमध्यें साक्षेप। कोणाचा करावा ॥२६॥ मायेमध्यें बोलणें चालणें

साचें। माया नसतां बोलणें कैंचें। याकारणें निःशब्दाचें। मूळ शोधावें ॥२७॥ वाच्यांश जाणोनी सांडावा। लक्ष्यांश विवरोन घ्यावा। याकारणें निःशब्द मूळचा गोवा। आडळेना ॥२८॥ अष्टधा प्रकृती पूर्वपक्ष। सांडून अलक्षीं लावावें लक्ष। मननसीळ परम दक्ष। तोचि हें जाणे ॥२९॥ नाना भूस आणि कण। येकचि म्हणणें अप्रमाण। रस सांडूनी चोइटिया कोण। शाहणा सेवी ॥३०॥ पिंडीं नित्यानित्यविवेक। ब्रह्मांडी सारासार अनेक। सकळ शोधूनियां येक। सार घ्यावें ॥३१॥ मायेकरितां कोणी येक। अन्वय आणि व्यतिरेक। ते माया नसतां विवेक। कैसा करावा ॥३२॥ तत्त्वें तत्त्व सर्व शोधावें। महावाक्यीं प्रवेशावें। आत्मनिवेदनें पावावें। समाधान ॥३३॥

२. स्फुट रचना

१. करुणाष्टकें

अनुदिन अनुतापें तापलों रामराया।
परम दिनदयाळा! नीरसीं मोहमाया॥
अचपळ मन माझें नावरे आवरीता।
तुजविण शिण होतो धांव रे धांव आतां ॥१॥

भजनरहित रामा सर्वही जन्म गेला।
स्वजनजनधनाचा वेर्थ म्यां स्वार्थ केला॥
रघुपति! मति माझी आपुलीशी करावी।
सकळ त्यजुनि भावें कांस तूझी धरावी ॥२॥

तनुमनधन माझें राघवा! रूप तूझें।
तुजविण मज वाटे सर्व संसार वोझें॥
प्रचलित न करावी सर्वथा बुद्धि माझी।
अचळ भजनलीळा लागली आस तूझी ॥३॥

चपळपण मनाचें मोडितां मोडवेना।
सकळस्वजन माया तोडितां तोडवेना॥
घडिघडि बिघडे हा निश्चयो अंतरींचा।
म्हणउनि करुणा हे बोलतों दीन वाचा ॥४॥

जळत हृदय माझें जन्म कोट्यानुकोटी ।
मजवरि करुणेचा राघवा पूर लोटीं ॥
तळमळ निववीं रे राम कारुण्यसिंधू ।
षडरिपुकुळ माझें तोडिं याचा समंधू ॥५॥

तुजविण करुणा हे कोण जाणेल माझी ।
सिणत सिणत पोटीं पाहिली वास तुझी ॥
झडकरि झड घालीं धांव पंचानना रे ।
तुजविण मज नेती जंबुकी वासना रे ॥६॥

स्वजनजनधनाचा कोण संतोष आहे ।
रघुपतिविण आतां चित्त कोठें न राहे ॥
जिवलग जिव घेती प्रेत सांडूनि जाती ।
विषम सकळ नेती मागुता जन्म देती ॥७॥

सकळ जन भवाचे आथिले वैभवाचे ।
जिवलग मज कैंचे चालते हेचि साचे ॥
विलग-विषमकाळीं सांडिती सर्व माळीं ।
रघुविर सुखदाता सोडवी अंतकाळीं ॥८॥

२. *आठवलें रामचंद्रध्यान चित्तीं*

सर्वकाळ माझे मनीं आठवण । युगासम क्षण जात आहे ॥१॥ जात आहे वय वेचोनीयां माझें । रूप राया तुझें दिसेना कीं ॥२॥ दिसेना कीं रूप सांवळें सुंदर । कासे पीतांबर कासियेला ॥३॥ कासियेली आंगीं चंदनाची उटी । मुक्तमाळा कंठीं डोल देती ॥४॥ डोल देती माळा पदकीं रत्नकीळा । मृगनाभीं टीळा रेखीयेला ॥५॥ रेखीयलें भाळीं सुगंध परीमळ । लोधले अळिकुळ झुंकारती ॥६॥ झुंकारती वास घेती सावकाश । राम राजाधीश शोभतसे ॥७॥ शोभतसे माथां मुगट रत्नकीळ । कीरीटी तेजाळ रम्य शोभा ॥८॥ रम्य नीमासुर श्रीमुख साजिरें । दिव्य मकराकारें तळपताती ॥९॥ तळपती कुंडलें बाहीं बाहुंवाटे । दोर्दंड गोमटे चाप बाण ॥१०॥ चाप बाण करीं नवरत्नें भूषण । आणी वीरकंकण कीर्तिमुखें ॥११॥ मुख मुरडुनी सिंह जाती वनीं । जघन देखोनी संकोचले ॥१२॥ संकोचले दैत्य पुतळे तोडरीं । गर्जती गजरीं अंदू

वांकीं ॥१३॥ आंदु वांकीं पांई शोभे वीरासन। माझे मनीं ध्यान आठवलें ॥१४॥ आठवलें रामचंद्रध्यान चित्तीं। सन्मुख मारुती उभा असे ॥१५॥ उभा असे सर्व बंधु समुदाव। त्रिकुटीचा राव बिभीषण ॥१६॥ बिभीषण आणी किष्किंधेचा राव। सर्व समुदाव वानरांचा ॥१७॥ वानरांसहीत राम अयोध्येसी। आनंद जनांसी थोर जाला ॥१८॥ जाला यशवंत राम सूर्यवंसी। रामी रामदासीं भेटी जाली ॥१९॥

३. चाफळीं श्रीरामाचे शुभागमन

लवे नेत्रपातें स्फुरे आजि बाहे।
दिनानाथ हा राम येणार आहे॥
जयाचेनि योगें सुखानंद लोटे।
तया देखतां अंतरीं बाष्प दाटे॥ १॥

लळे पाळितो राम आम्हीं दिनांचे।
कृपासागरू भाव जाणे मनाचे॥
नुपेक्षा कदा, संकटीं धांव घाली।
तया देखतां मानसें तीं निवालीं॥ २॥

लघू लाघवी राम कोदंडधारी।
मनीं चिंतितां शोकसंताप हारी॥
महासंकटें नाम घेतां निवारी।
भवसागरीं मूढ पाषाण तारी॥ ३॥

४. आम्ही काय कुणाचें खातो रे

आम्ही काय कुणाचें खातो रे। तो राम आम्हाला देतो रे॥ ध्रु०॥
बांधिले घुमट किल्ल्याचे तट। तयाला फुटती पिंपळ-वट।
तेथें कोण लावितो मोट। बुडाला पाणी घालितो ? ॥ १॥
खडक फोडितां सजिव रोडकी। पाहिली सर्वांनी बेडकी।
सिंधु नसतां तियेचे मुखीं। पाणी कोण घालितो ? ॥ २॥
पहा रे पहा मातेचीये स्तनीं। चिंतिता रक्त-मांस-मलखाणी।
तिथें विमल दुग्ध घालोनी। कोण पोसीतो ॥ ३॥
नसतां पाण्याचे बुडबुडे। सदासर्वदा गगन कोरडें।
दास म्हणे जीवन चहुंकडे। पाडुनि सडे पीक उगवितो ? ॥ ४॥

५. राज्य या रघुनाथाचे

राम विश्राम देवांचा । राम भक्तांसि आश्रयो ।
राम योगीमुनिध्यानीं । राम रक्षी ऋषिकुळा ॥ १ ॥
कीर्ति या रघुनाथाची । पाहतां तुळणा नसे ।
येकवाणी येकवचनी । येकपत्नीच धार्मिकु ॥ २ ॥
राज्य या रघुनाथाचें । कळिकाळासि नातुडे ।
बहुवृष्टि अनावृष्टि । हें कदा न घडे जनीं ॥ ३ ॥
उद्वेग पाहतां नाहीं । चिंतामात्र नसे जनीं ।
व्याधि नाहीं, रोग नाहीं । लोक आरोग्य नांदती ॥ ४ ॥
युध्य नाहींच अयोध्या । राग ना मत्सरू नसे ।
बंदनिर्बंदही नाहीं । दंडदोष कदा नसे ॥ ५ ॥
कुरूपी पाहतां नाहीं । जरामृत्यु असेचिना ।
आदरु सकळै लोकां । सख्यप्रीति परस्परें ॥ ६ ॥
बोलणें सत्यन्यायाचें । अन्याय सहसा नसे ।
अनेक वर्तनी काया । येकजीव परस्परें ॥ ७ ॥
दरिद्री धुंडितां नाहीं । मूर्ख हा तो असेचिना ।
परोपकार तो मोठा । सर्वत्र लोकसंग्रहो ॥ ८ ॥
अद्भूत पिकती भूमी । वृक्ष देती सदा फळें ।
अखंड दुभती धेनु । आरोग्यें वाहती जळें ॥ ९ ॥
नद्या सरोवरें वापी । डोलती नूतनें बनें ।
फळती फुलती झाडें । सुगंध वनवाटिका ॥ १० ॥
उदंड वसती ग्रामें । नगरें पुरेंचि पट्टणें ।
तीर्थें क्षेत्रें नाना स्थानें । शिवालयें गोपुरें बरीं ॥ ११ ॥
मठ माड्या पर्णशाळा । ऋषिआश्रम साजिरे ।
वेदशास्त्रधर्मचर्चा । स्नानसंध्या तपोनिधि ॥१२॥
चढता वाढता प्रेमा । सुखानंद उचंबळे ।
संतोष समस्तै लोकां । रांमराज्य भूमंडळीं ॥१३॥
हरिदास नाचती रंगीं । गायनें कीर्तनें बरीं ।
रागरंग तानमानें । टाळबंधें विराजती ॥१४॥

रामदास □

नाना युक्ति नाना बुद्धि । नाना विद्या नाना कळा ।
नाना संगीत सामर्थ्यें । नाना वाद्यें परोपरी ॥१५॥
सर्वही तोषले तोषें । नामघोषेंचि गर्जती ।
रामराजा दयासिंधु । बोळला सेवकांवरी ॥१६॥
रामदासीं ब्रह्मज्ञान । सारासार विचारणा ।
धर्मस्थापनेसाठी । कर्मकांड उपासना ॥१७॥

६. *येथें उभा कां श्रीरामा*

येथें उभा कां श्रीरामा । मनमोहन मेघश्यामा ॥
चाप बाण काय केलें । कर कटावरी ठेविले ॥
कां बा धरिला अबोला । दिसे वेष पालटला ॥
काय जाली अयोध्यापुरी । येथें वसविली पंढरी ॥
शरयुगंगा काय केली । कैंची भीमा मेळविली ॥
किल्किलाट वानरांचे । थवे न दिसती तयांचे ॥
दिसे हनुमंत एकला । हा कां सैन्यांतुनि फूटला ॥
काय जाली सीतासती । येथें बहुत जन दिसती ॥
रामदासीं सद्भाव जाणा । राम जाला पंढरिराणा ॥

७. *भीमरूपी स्तोत्र*

भीमरूपी महारुद्रा, वज्र हनुमान मारुती ।
वनारी अंजनीसूता, रामदूता प्रभंजना ॥१॥
महाबळी प्राणदाता, सकळा उठवी बळें ।
सौख्यकारी शोकहर्ता, धूर्त वैष्णव गायका ॥२॥
दीननाथा हरीरूपा, सुंदरा जगदंतरा ।
पातालदेवता हंता, भव्यसिंदूरलेपना ॥३॥
लोकनाथा जगन्नाथा, प्राणनाथा पुरातना ।
पुण्यवंता पुण्यशीळा, पावना परितोषिका ॥४॥
ध्वजांगें उचली बाहो, आवेशें लोटला पुढें ।
काळाग्नि काळरुद्राग्नि, देखतां कांपती भयें ॥५॥
ब्रह्मांडें माइलीं नेणों आंवाळे दंतपंगती ।
नेत्राग्नी चालिल्या ज्वाळा, भ्रुकुटी ताठिल्या बळें ॥६॥

पुच्छ तें मुर्डिलें माथां, किरीटी कुंडलें बरीं ।
सुवर्ण कटिकांसोटी, घंटा किंकिणि नागरा ॥७॥
ठकारे पर्वताऐसा, नेटका सडपातळू ।
चपलांग पाहतां मोठें, महाविद्युल्लते परी ॥८॥
कोटिच्या कोटि उड्डाणें, झेपावे उत्तरेकडे ।
मंद्राद्रीसारखा द्रोणू, क्रोधें उत्पाटिला बळें ॥९॥
आणिला मागुतीं नेला, आला गेला मनोगती ।
मनासी टाकिलें मागें, गतीसी तुळणा नसे ॥१०॥
अणूपासोनि ब्रह्माण्डाएवढा होत जातसे ।
तयासी तुळणा कोठें, मेरु-मंदार धाकुटे ॥११॥
ब्रह्मांडाभोंवते वेढे, वज्रपुच्छें करूं शके ।
तयासी तुळणा कैंची, ब्रह्मांडीं पाहतां नसे ॥१२॥
आरक्त देखिलें डोळां, ग्रासिलें सूर्यमंडळा ।
वाढतां वाढतां वाढे, भेदिलें शून्यमंडळा ॥१३॥
धनधान्य पशुवृद्धि, पुत्रपौत्र समस्तही ।
पावती रूपविद्यादि, स्तोत्रपाठें करूनियां ॥१४॥
भूतप्रेत समंधादि रोगव्याधि समस्तही ।
नासती तुटती चिंता, आनंदे भीमदर्शनें ॥१५॥
हे धरा पंधरा श्लोकी, लाभली शोभली बरी ।
दृढदेहो निसंदेहो, संख्या चंद्रकळा गुणें ॥१६॥
रामदासीं अग्रगण्यू, कपिकुळासि मंडणू ।
रामरूपी अंतरात्मा, दर्शनें दोष नासती ॥१७॥

८. *पाळणा श्रीरामाचा*

जो जो जो जो रे श्रीरामा । निजसुख गुणविश्रामा ॥ जो जो० ॥ध्रु०॥
ध्याती मुनियोगी, तुजलागीं । कौसल्यावोसंगीं ॥ जो जो० ॥१॥
वेदशास्त्रांची, मति जाण । स्वरूपीं झाली लीन ॥ जो जो० ॥२॥
चारी मुक्तींचा, विचार । चरणीं पाहती थोर ॥ जो जो० ॥३॥
भोळा शंकर, निशी-दिनीं । तुजला जपतो मनीं ॥ जो जो० ॥४॥
दास गातसे, पाळणा । राम-लक्ष्मणा ॥ जो जो० ॥५॥

रामदास □

९. आरती शंकराची

लवथवती विक्राळा ब्रह्मांडीं माळा । वीषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा ।।
लावण्यसुंदर मस्तकीं बाळा । तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझुळा ।।१।।
जयदेव जयदेव जय श्रीशंकरा । आरती ओवाळूं तुज कर्पुरगौरा ।।ध्रु०।।
कर्पुरगौरा भोळा नयनीं विशाळा । अर्धांगीं पार्वती सुमनांच्या माळा ।।
विभुतीचें उधळण शितिकंठ नीळा । ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ।।२।।
देवीं दैत्यीं सागरमंथन पैं केलें । त्यामाजीं अवचित हाळाहळ जें उठलें ।।
तें त्वां असूरपणें प्राशन केलें । नीलकंठ नाम प्रसिद्ध झालें ।।३।।
व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी । पंचानन मनमोहन मुनिजन सुखकारी ।
शतकोटीचें बीज वाचे उच्चारी । रघुकुळटिळक रामदासा-अंतरीं ।।४।।

१०. गिरीचे मस्तकीं गंगा

गिरीचे मस्तकीं गंगा तेथुनी चालिली बळें ।
धबाबां लोटल्या धारा धबाबां तोय आदळे ।।
गर्जतो मेघ तो सिंधु ध्वनिकल्लोळ ऊठिला ।
कडयासी आदळे धारा वात-आवर्त होतसे ।।
तुषार उठती रेणु दुसरे रज मातले ।
वातमिश्रित ते रेणु सीतमिश्रित धूकटें ।।
दराच तुटला मोठा झाडखंडें परोपरीं ।
निबीड दाटली छाया त्यामधें वोघ वाहती ।।
गर्जती श्वापदें पक्षी नाना स्वरें भयंकरें ।
गडद होतसे रात्री, ध्वनिकल्लोळ ऊठती ।।
कर्दमु निवडेना तो, मनासीं सांकडें पडे ।
विशाळ लोटली धारा तीखालें रम्य वीवरें ।।

११. योग हा सुकृताचा

मनासारखी सुंदरा ते अनन्या । मनासारिखे पुत्र जामात कन्या ।
सदासर्वदा बोलती रम्य वाचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ।।१।।
भलीं मायबापें भले मित्रबंधु । भले सोइरे राखती स्नेहवादु ।
मुलें लेकुरें येकमेळा सुखाचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ।।२।।

त्रें अळंकार चीरें । विसोरें घरें सुंदरें रम्य सारें ।
ा सर्व आरोग्य ज्याचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥३॥
ग्राम ग्रामाधिकारी । मनासारिखे लोक शोकापहारी ।
ा संग साधूजनाचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥४॥
चिंतितां देव पावे । मनासारिखे भक्त भावें मिळावे ।
ी बोल सारांश वाचा । जनी जाणिजे योग हा सुकृताचा ॥५॥

१२. सर्व संसार बुडाला

वेळें पाऊस पडेना । नासकवणी उघडेना ॥
ऐसें कुळवाड्याचें भंड । दुःख जाहलें उदंड ॥
बहु पडी आले शेत । रेडयापाडयांचें आऊत ॥
काहीं केल्यानें पिकेना । धान्य वेळेसि विकेना ॥
फाळा लाविला उदंड । अवघें जाहलें थोतांड ॥
वारीं रोगांचीं वाजतीं । नाना आभाळें फिरतीं ॥
टोळ पक्षी मूषकादिक । खाती श्वापदें अनेक ॥
दावेदाराची यातना । चोर चोरटें राहेना ॥
नित्य पोटाचा मजूर । वेठीखालीं निघे बूर ॥
घर खोपट मोडकें । एक फटकुर फाटकें ॥
बरेगानें गुरें गेलीं । धारणेनें मुलें मेलीं ॥
सर्व संसार बुडाला । दास म्हणे जोगी जाला ॥१॥

१३. संभाजीस पत्र

सावधान असावें । दुश्चित कदापि नसावें ॥ तजवीजा करीत बसावें ।
ळीं ॥१॥ कांहीं उग्र स्थिती सांडावी । कांहीं सौम्यता धरावी ॥ चिंता
ारावी । अंतर्यामीं ॥२॥ मागील अपराध क्षमावे । कारभारी हातीं
ुखी करूनि सोडावे । कामाकडे ॥३॥ पाटवणीं तुंब निघेना । तरी
चालेना ॥ तैसें सज्जनांच्या मना । कळलें पाहिजे ॥४॥ जनाचा
लिला । म्हणजे कार्यभाग आटोपला ॥ जन ठायीं ठायीं तुंबला ।
टें ॥५॥ श्रेष्ठीं जें जें मिळविलें । त्यासाठीं भांडत बसलें ॥ मग जाणावें
गलिमांसी ॥६॥ ऐसे सहसा करूं नये । दोघे भांडतां तिसऱ्यासी जये ।

धीर धरोन महत्कार्य। समजून करावें ॥७॥ आधींच पडला धास्ती। म्हणजे कार्यभाग होत नास्ती ॥ या कारणें समस्तीं। बुद्धि शोधावी ॥८॥ राजीं राखितां जग। मग कार्यभागाची लगबग ॥ ऐसे जाणोनियां सांग। समाधान राखावें ॥९॥ सकळ लोक एक करावे। गलीम निपटून काढावे ॥ ऐसे करितां कीर्ति धांवे। दिगंतरी ॥१०॥ आधी गाजवावे तडाके। मग भूमंडळ धाके ॥ ऐसें न होतां धक्के। राज्यास होती ॥११॥ समय प्रसंग ओळखावा। निपटून काढावा। आलो तरी कळों न द्यावा। जनांमध्यें ॥१२॥ राज्यामध्यें सकळ लोक। सलगी होऊन करावे सेवक ॥ लोकांचे मनामध्यें धाक। उपजोंचि नये ॥१३॥ बहुत लोक मिळवावे। एक विचारें भरावे ॥ कष्टें करोनि घसरावें। म्लेंछांवरी ॥१४॥ आहे तितुके जतन करावें। पुढे आणिक मिळवावे ॥ महाराष्ट्रराज्य करावें। जिकडे तिकडे ॥१५॥ लोकीं हिंमत धरावी। शर्तीची तरवार करावी ॥ चढती वाढती पदवी। पावाल तेणें ॥१६॥ शिवरायास आठवावें। जीवित्व तृणवत् मानावें ॥ इहलोकीं परलोकीं राहावें। कीर्तिरूपें ॥१७॥ शिवरायाचें आठवावें रूप। शिवरायाचा आठवावा प्रताप ॥ शिवरायाचा आठवावा साक्षेप। भूमंडळी ॥१८॥ शिवरायाचें कैसें चालणें। शिवरायाचें कैसें बोलणें ॥ शिवरायाची सलगी देणें। कैसें असे ॥१९॥ सकल सुखांचा त्याग। करूनि साधिजे तो योग ॥ राज्यसाधनाची लगबग। कैसी असे ॥२०॥ त्याहूनि करावें विशेष। तरीच म्हणावे पुरुष ॥ याउपरी आतां विशेष। काय लिहावें ॥२१॥

◇ ◇

वामन पंडित

१. भरतभाव

भरत जवळिं नाहीं मातुल-ग्राम-वासी ।
भरत-जननि धाडी कानना राघवासी ॥
दशरथ मृत झाला राम जातां वियोगें ।
तृण बहुत दिसांचें अग्निच्या जेविं योगें ॥१॥

मग भरत वसिष्ठें आणिला जों अयोध्ये ।
नगरि गत-धवा तों आणि निर्वीर्य योद्धे ॥
जन मृत-सम देखे हेतु कांहीं कळेना ।
जननिकृत कु-चेष्टा बुद्धितें आकळेना ॥२॥

वृत्तांत सांगे भारतासि माय । स्वानंद जीचा त्रि-जगीं न माय ॥
भेदूनि वक्षःस्थल शब्द तीचा । करी महा-क्षोभ महा-मतीचा ॥३॥
जाळील तीतें निज-दृष्टि-पातें । पाहे असा हालविनाच पातें ॥
म्हणे अवो पापिणि पाप-रूपे । जळो तुझें तोंड जड-स्वरूपे ॥४॥

जाळीन हें तोंडचि जाण आधीं । मुखें जया देशि अनंत आधी ॥
न माय तूं वैरिण होसि साची । माझे मनीं भाव खरा असाची ॥५॥

केला तुवां देखत भर्तृ-घात । क्षणें ति-वाटा रचिल्या तिघांत ॥
शत्रुघ्न मी, लक्ष्मण राम, जोडे । राजा तिजा, तींस अनर्थ जोडे ॥६॥

वना, धाडिलें जेधवां राम-राया । तुवां हेतु केला स्व-भर्ता मराया ॥
अहा, राम-सीता अशा दंपतीतें । वना धाडिलें, मारिलें कां पतीतें ॥७॥

न कळत पतिताचें खादलें अन्न वोकी ।
तरि पतित नव्हे तो पाप-रूपें अवो कीं ।
म्हणुनि उदरिं तूझ्या देह हा जन्मला गे ।
त्यजिन तरि मला हें पाप तूझें न लागे ॥८॥

मारील सद्य मज खाइन त्या विखातें ।
कीं पापियास निज-पातक जेविं खातें ॥
तूं पापिणी त्वरित जाशिल रौरवासी ।
होसी सदा निरय-दारुण-लोक-वासी ॥९॥

अवो कैकयी हें काय । केलें तुवां हाय हाय ॥
न म्हणावे तुज माय । जन्मोजन्मीं वैरिणी ॥१॥
सर्व-जगदभिराम । वना धाडिला तो राम ॥
केलें विख्यात कुनाम । कीं हे पति-मारिणी ॥२॥
तुझ्या वधें न अ-धर्म । तूज मारावें हा धर्म ॥
परि निंदील हें कर्म । राम पाप-कारिणी ॥३॥
नाहींतरी प्राण आज्य । तुझे घालूनियां प्राज्य ॥
जाळूनियां राम-राज्य । दाखवितों करणी ॥४॥ ॥१०॥

धिक्कारुनी गोष्टि मातेसि सांगे । कौसल्येच्या ये गृहा सानु-रागें ।
त्यातें देखे जेधवां राम-माय । श्रीरामाचा शोक लोकीं न माय ॥११॥

मोकळा करुनि कंठ तेधवां । आठवूनि मनिं जानकी-धवा ।
ते रडे भरतही तसा रडे । जोंवरी नयन होति कोरडे ॥१२॥

म्हणे वासरा घात झाला असा रे । तुझ्या माउलीचेच हे खेळ सारे ।
वृथा धाडिला राम माझा वनासी । न देखों शके त्या जगज्जीवनासी ॥१३॥

अरे राघवें व्यापिले लोक सारे । तरी नावरे शोक माझा कसा रे ।
तृषाक्रांत डोळे घनःशाम रामा । पहायास रे सर्वलोकाभिरामा ॥१४॥

जानकी जनक-राजकुमारी । पाय कोमल जिचे, सुकुमारी ।
चालली जसि वना अनवाणी । बोलली कटकटा जनवाणी ॥१५॥

सून सूनुहि वनाप्रति जाती । आणि जो नित असेल कु-जाती ।
मानवी तनु पशूंत गणावी । ते शिळा परि स-जीव म्हणावी ॥१६॥

भरत शोक अनेक तिचे असे । परिसतां मग बोलत तो असे ।
जननि गोष्टि समस्तहि हे खरी । परिस येविषयीं मम वैखरी ॥१७॥

मी ब्रह्म-हत्या-शत-पाप लाहें । ठावें असे लेश जरी मला हें ।
खड्गें वसिष्ठासि अरुंधतीतें । वधीं जरी ठाउक हें मतीतें ॥१८॥

म्हणे राम-माता अरे वासरा मी । तुझा जाणतें प्रेम-उल्हास रामीं ।
तुला राम-सेवेविणें काम नाहीं । न राज्यादिकांची जया कामनाही ॥१९॥

तों वसिष्ठ वदला भरतातें । राम-पाद-निज-लाभ-रतातें ।
पाळिं यावरि समस्त धरा हे । राज-नीति करिं, सावध राहें ॥२०॥

रायें तुतेंचि दिधलें स्व-नृपासना रे ।
संपूर्ण तूं जननिची करिं वासना रे ।
शब्दार्थ हे न कळती गुरु-लाघवाचे ।
साचे म्हणूनि पद आठवि राघवाचे ॥२१॥

म्हणे भरत हा राम । त्राहे त्राहे मेघश्याम ।
वसिष्ठ हा गुरु नाम । तोही मज कोपला ॥१॥
अंतरले तुझे पाय । तया राज्याचे उपाय ।
सांगे मज हाय हाय । नव्हे गुरु आपला ॥२॥
अग्नि-तुल्य वाटे राज्य । मज जाळिल साम-राज्य ।
वरी ऋषी घाली आज्य । त्याणें जीव तापला ॥३॥
दावीं सत्वर चरण । किंवा स्वामी दे मरण ।
तुझ्या नामाचें स्मरण । त्याचा भव संपला ॥४॥ ॥२२॥

स्मरोनि ऐसें रघुनंदनातें । त्या राघवाच्या पद-वंदनातें ।
जावे असा भाव धरूनि साच । बोले वसिष्ठाप्रतिही तसाच ॥२३॥

राजाधिराज रघु-राजचि एक जाणा ।
पाहों चला सकळ जाउनि त्या सु-जाणा ।
आम्ही समस्त जन किंकर राघवाचे ।
जे राम-नाम जपतों अजि नित्य वाचे ॥२४॥

विना राक्षसी-कैकयी काननातें । चला सर्व पाहूं मृगांकाननाते ।
प्रयत्नेंचि घेऊनि येऊं गृहातें ॥ न येतां समर्पूं शरीरें स्व-हातें ॥२५॥

येणार ते या अथवा नकाही । राहेन मी हें न घडेचि कांही ।
बोलोनियां स्पष्टचि चालिला हो । शोकांतही घे प्रभु-नाम-लाहो ॥२६॥

हा राम हा राम असेंचि वाचे । चित्तांत पाय प्रभुराघवाचे ।
त्यजी कुलाचार्यहि राम-वाटे । कीं तो गुरू त्यास गुरू न वाटे ॥२७॥

पायीं निघे भरत सानुज राम-वाटे ।
रामाविणें इतर इष्ट न काम वाटे ।
माथां जटामुकुट, वल्कल नेसला हो ।
श्री-राम-वेष, वदनीं प्रभु-नाम-लाहो ॥२८॥

राम-वल्कल-जटादिक-रीती । वेष तो उभय बंधु करीती ।
राम सानुज तसें भरतातें । देखती सकळ राम-रतातें ॥२९॥

तों भेटला गुहक-नाम किरात वाटे ।
श्री-राम-भक्त परमाप्त तयास वाटे ।
गंगा-तटीं रघुपति-शयनास दावी ।
ते भक्ति काय म्हणुनी मुखिं वो वदावी ॥३०॥

दर्भ-निर्मित तया शयनातें । देखतां उदक ये नयनातें ।
भू-तलीं भरत घालुनि घे हो । त्या स्थळींहुनि न चित्त निघे हो ॥३१॥
राम-वृत्त रघुवंश-वरातें । सर्व वर्णुनि गुहाख्यकिरातें ।
लंघुनी सुर-नदी भरतातें । ने स-सैन्य रघु-राज-रतातें ॥३२॥

ब्रह्मा रमा वंदिती नित्य ज्यातें । त्या राघवाच्या चरणांबुजातें ।
पाहूं त्वरें हे भरता असोसी । वियोग तों प्राण-वियोग सोसी ॥३३॥

कैकेयीच्या दुष्ट-भावें जळाला । इच्छी रामाच्या पदाच्या जळाला ।
तों स्वामीच्या देखिलें आश्रमातें । कांहीं चित्तें टाकिलें हो श्रमातें ॥३४॥
पाद-चिन्हित तये वसुधेतें । देखतां तृषित जेविं सुधेतें ।
रामचंद्र-पद-सारस-मुद्रा । वाढवी भरत-सौख्य-समुद्रा ॥३५॥

घालुनि घे भरत देखुनि त्या रजातें ।
शत्रुघ्नही अनुसरोनि निजाग्रजातें ।
चित्तीं स्मरे प्रभुचिया पद-नीर जा तें ।
प्रेम—प्रवाह नयनीं सुख-नीरज्यातें ॥३६॥

तनुवरी गुढियाच उभारती । कवि-मुखें किति वर्णिल भारती ।
भरत ये रितिनें अजि लोळला । प्रभु-पदाब्ज-रजीं बहु घोळला ॥३७॥

हा राम राम रघु-नंदन हेंचि वाचे ।
चित्तांत ते चरण दीसति राघवाचे ।

ते रेणु हे मुकुट-मंडण जे शिवाचे ।
ऐसें म्हणे त्यजुनि भाव अहो जिवाचे ॥३८॥

भरत पद-रजीं त्या घोळला दीर्घकाळ ।
त्रि-भुवनिंहि सुखाचा होय तेव्हां सुकाळ ।
न मिळति पद-रेणू जे विरिंच्यादिकांही ।
सु-लभ मज म्हणे हें भाग्य माझेंचि कांहीं ॥३९॥

देखोनि राघव-पदाब्ज-रजास वाटे ।
लोटांगणीं गडबडे सुख फार वाटे ।
आनंद-नीर हृदयीं नयनांबुजांचें ।
चित्तांत राम शिव घे पद-अंबु ज्याचें ॥४०॥

वाम-अंक-गत भूमि-कुमारी । वाम-बाहु-सु-रता सु-कुमारी ।
वल्कलांबर-जटा-अभिरामा । देखतो भरत त्या रघु-रामा ॥४१॥

दूर्वा-दल-श्यामल दीप्ति देहीं । सेवी पदें लक्ष्मण तो वि-देही ।
गंगा-तटीं सेवित मंद-वातें । देखे अशा श्री-रघु-पुंगवातें ॥४२॥

देखोनि ऐसे रघु-नंदनातें । धांवे त्वरेनें पद-वंदनातें ॥
अ-लभ्य जो हर्ष सुरादिकांही । तो होय, त्यामाजिच शोक कांहीं ॥४३॥

रडे, फुंदफुंदे, शिरीं पाद-पद्मा । धरी, सद्म मानी जया नित्य पद्मा ।
बळें क्षेम दे त्यासि वोढूनि राम । स्व-भक्त-प्रिय स्वामि विश्वाभिराम ॥४४॥

मांडियेउपरि बैसविला हो । अश्रु-नीर पुसि, दे सुख-लाहो ॥
वासरा न रड, सांग सु-वार्ता । शब्द हा निववि दुःखदवार्ता ॥४५॥

तों देखिला गुरु वसिष्ठ तयासि वंदी ।
ब्रह्मण्य देव जडला चरणारविंदीं ।
तों माउल्या तिघिहि सत्वर पावल्या हो ।
भेटोनियां तिघिहि सत्वर सेविल्या हो ॥४६॥

पिता सुखी कीं म्हणतांचि रामा । रडोनि त्या सांगति सूपरामा ।
रडे अहो रामहि लोक-रीती । स्त्रिया पुन्हा शोक महा करीती ॥४७॥

सपिंडी-क्रिया राम गंगा-तटाकीं । करी, आणि ते पिंड गंगत टाकी ।
रडे लोक-दृष्टीस शोक-श्रमातें । प्रभू दाउनी ये पुन्हां आश्रमातें ॥४८॥

तों वदे भरत गोष्टि मनाची । प्रार्थना बहुत आगमनाची ।
मांडिली, परि न राघव मानी । देखतां सुर-वरांस विमानीं ॥४९॥

झणि फिरे स्व-पुरीप्रति राम हा । म्हणुनि आधि मनीं अमरां महा ।
भरत-शब्द तदर्थ न ये मना । पुरवणें प्रभुला सुर- कामना ॥५०॥

आज्ञा पित्याची मज मोडवेना । वत्सा तुझी गोष्टहि तोडवेना ।
घालूं नको बा मज संकटांत । नको पडों या सहसा हटांत ॥ ५१ ॥

असी आयके जेधवां राम-वाणी । मुखश्री करी बंधु तो दीनवाणी ।
म्हणे तात-आज्ञा मृगांकानना रे । मला सांग जाईन मी कानना रे ॥५२॥

बापा ऐसें वर्ततां तो विशेषें । आज्ञा-भंग प्राप्त दोघां अशेषें ।
एवं राज्यातें तुवां रे भजावें । ताताज्ञेनें कानना म्यांच जावें ॥ ५३ ॥

येना असें भरत देखुनि राम-राया ।
गंगातटीं रचुनि दर्भ बसे मराया ।
पाहे वसिष्ठ-मुनि-वक्त्र-सरोरुहातें ।
श्रीराम आणि खुण दाखवि हो स्व-हातें ॥५४॥

कीं सांग गुह्य अवतार-चरित्र याला ।
जें तारितें चहुं युगांत जगत्त्रयाला ।
बोले वसिष्ठ मग सन्निध जाउनीयां ।
कां प्राण टाकिसि म्हणे समजावुनीयां ॥५५॥

हा राम मारील दशाननासी । यालागिं जातो प्रभु काननासी ।
नको निवारूं भरता तयाला । ब्रह्मादिकांच्या पद-दातयाला ॥५६॥

येणार मागुति चतुर्दश वत्सरांतीं ।
राहो वनांत तितुके दिन आणि राती ।
आत्माच तो तुज वियोग तयासि नाहीं ।
येऊनि हे करिल जे तव कामनाही ॥५७॥

हें आयकोनि जरि शोकहि दूर केला ।
प्रत्यक्ष दर्शन-सुखास बहू भुकेला ॥
तेव्हां उठोनि भरतें पद-वंदनातें ।
केलें, दुरूनि म्हणतो रघु-नंदनातें ॥५८॥

देखोनियां गमन-निग्रह राघवाचा ।
बोले उभा भरत निश्चय-रूप वाचा ।
वर्षें चतुर्दशवरीच धरीन देहा ।
त्यानंतरें त्यजिन यास निरोप दे हा ॥५९॥

वर्षें द्वि-सप्तभरि काल समाप्त झाला ।
त्यानंतरें अजि तुझ्या चरणांबुजाला ॥
स्पर्शें शिरें न जरि देह, तयाच वारीं ।
यातें त्यजीनचि विरिंचि जरी निवारी ॥६०॥

वर्षें चतुर्दशाहि रक्षिन शासनातें ।
अंगीकरीन न बसेन नृपासनातें ॥
सिंहासनावरि तुझ्या पद-पादुका मी ।
पूजीन तों तव पदांबुज-लाभ-कामीं ॥६१॥

पादुका जडित आणुनि हातें । रामचंद्र–चरणांबु–रुहांतें ।
लावुनी निज-शिरीं भरतानें । वंदिल्या रघुवरांघ्रि–रतानें ॥६२॥

◇ ◇

सामराज

१. ते भीमकी हळुच त्याजसमीप आली.

ते भीमकी सकळलोक मनोभिरामा,
वैकुंठनाथपदपंकजबद्धकामा,
सौंदर्यसाररसनिर्मित मूर्ति जीची,
उत्कृष्टता परम याहुन काय तीची? १

वक्त्रेंदु हा सहज सिंधु सुधारसाचा
याचा धरी नियत इंदु उधार साचा
आहे असाच बहुधा अपवाद लोकीं
हा अन्यथा हरिणलांछन कां कळंकी २

अत्यंत निर्मळ, अमोलिक, ज्या अभुक्ता;
सीमंतसीमपदवीस बसेत मुक्ता,
साजे बरा बिजवरा तिजला ललाटीं
येकावळीयुत मनोहर हार कंठीं ३

शोभे तिचें मृदु भुजद्वय बाजुबंदीं
तें नीळ तेज झळके हृदयारविंदीं
हातीं तिच्ये सहजरत्नजडीत चूडा
त्या मुद्रिका सकळ अंगुळिकाधिरूढा ४

आकर्ण विस्तृत तिच्या विलसेत दृष्टी;
तन्मध्य हा सहज सुंदर माय मुष्टी
तीचा महा रुचिर नाभि गभीर शोभे
वक्त्रांबुजी परम षट्पदवृंद लोभे ५

ते भीमकीस सिसफूल शिरीं विराजे.
नाकीं तिच्ये अति मनोहर मोर साजे
पायीं तिच्ये जडित नूपुरयुग्म वाजे
तीच्ये गतीस गगनीं गजराज लाजे ६

जे देवमाया, वरवीरमोहिनी,
व्यंजत्स्तनी जे कळहंस गामिनी,
श्यामा नितंबार्पितरत्न मेखळा,
पायीं जिच्ये शोभति हेमशृंखळा ७

कृशोदरी, कुंडलमंडितेक्षणा,
शुचिस्मिता, जे सुंदरी सुलक्षणा,
जे पक्वबिंबीफळसोदराधरा.
ते होय वीरा मग दृष्टिगोचरा ८

व्रीडावलोकनदिमिश्र तदीय हासा
देखोन, ते पडति धीर मनोजफांसां
उत्साह जे बहुत थोर धरून आले,
राजन्य ते परम मूर्च्छित सर्व जाले ९

हस्ताबुंजींहुन गळोन पडेत शस्त्रें
चित्रांपरी धरितिं भूषण आणि वस्त्रें
यानावरून कितियेक पडेत खालें.
येकायकीं नृपतिमंडळ मुग्ध जालें. १०

जों पावलें सकळ राजक हे अवस्था
तों चालिली सहज तेथुन पद्महस्ता
कृष्णार्पण प्रकट देह करूनि राहे,
ते भीमकी भगवदाप्तिस इछिताहे ११

वारून वामकर जी अळकांस बाळा,
तैसें अपांगविशिखीं अपरा नृपाळां,
आलोकिते समय सादर अच्युतातें
सव्रीड साचिवदना, पुरुषोत्तमातें १२

ते सांवळे, सगुण ब्रह्म, कृपाकटाक्षीं
सस्मेर तन्मुखसरोरुह हें अवेक्षी
दृष्टीस दृष्टि जंव नीट मिळोन गेली,
ते भीमकी हळुच त्याजसमीप आली १३

कीं चक्रवाकरमणीच वियुक्त जाली
ते चक्रवाक उमगीतच काय आली ?
कीं मानसा तजुन मानसराजहंसी
आसक्त हे परमहंसकुळावतंसी ? १४

कल्पद्रुमाजवळि जंगम कल्पवल्ली
कीं येय हे हळुच चालत पायचाली.
कीं चातक प्रणयिनीच निदाघतप्ता
धांवोन ये नवघनाभिमुख तृषार्ता १५

किंवा त्यजून विषयांकुरमात्रचारा
मेध्या मृगी अनुसरे निज कृष्णसारा;
किंवा महोदधि गवेषित येय गंगा;
कीं भेटली रतिच येऊनि या अनंगा १६

हे भीमकी सहचरीसहित त्रिवेणी;
प्रत्यक्ष हा वटमयीरुह चक्रपाणी.
जेणें सुटे सहज हा भवबंध, राया;
तो तीर्थराज प्रकटे जग उद्धराया. १७

तत्काळ इंद्रियपराङ्मुख वृत्ति जाली.
श्रीकृष्णमूर्ति हृदयीं विवरीं निघाली.
हारोन जाय मकरध्वज कोटिशोभा
पाहे न्यहाळुन तया मग पद्मनाभा १८

तुळशीदास

सिंहगडचा पोवाडा

राजगड राजाचा। प्रतापगड जिजाबाईचा ॥ सिंहगड पन्हाळा। पहा त्या मोंगलाचा ॥ सरजा शिवाजी शिवभजन। काबिज केलें तळकोंकण ॥ गड माहुली घेतली। कल्याण भिवंडी काबिज केली। खबर त्या विजापुराला गेली। ठाणें राजाचें बसलें ॥ शिवाजी महाराज। राजगड किल्ल्यावर बसले ॥ जिजाबाई माता। आहे प्रतापगडावरी ॥ सोमवाराच्या दिवशीं। हातीं हस्तनाची फणी ॥ उगवते बाजुला नजर केली। नजर सिंहगडावर गेली ॥१॥

बारा मावळ पुण्याखालीं। बारा मावळ जुनराखालीं ॥ पुण्याच्या तोंडाला जेजुरीच्या बारीला। किल्ला सिंहगड पाहिला ॥ नवें कोंबडीचें अंडें। ऐसा किल्ला झळकला ॥ ऐसा पंतोजी तो काका। त्यानें हुजऱ्या बोलाविला ॥ जावें राजगड किल्ल्याला। सांगा शिवाजी महाराजाला ॥ जेवावें राजगड किल्ल्याला। अंचवावें प्रतापगडाला ॥२॥

शिवाजी महाराज पांच पोषाख नटला। पाईं तुमानी सुरवारी चढविल्या ॥ अंगीं किनखाप घातले। शिरीं जिरीटोप घातला। हातीं वाघनखें घालून। कृष्णघोडीला जिन केला। ढाल पाठिवरी टाकिता झाला। सोनसळी पट्टा हातांत घेतला। कृष्णघोडीला चाबुक केला। आला मढ्याच्या घाटाला। घाट मढ्याचा उतरला। आला बिरवाडी गांवाला। गांव बिरवाडी सोडिला। आला कोलानपुराला। कोलानपुर सोडिलें। घाट पाराचा वेंधला। आले प्रतापगड किल्ल्याला। सलाम जिजाबाईला केला ॥३॥

[शिवाजी महाराज आणि जिजाबाई फांशाचा डाव खेळतात. शिवाजी हरतो : जिजाबाई जिंकतात.]

ऐक जिजाबाई। सत्ताविस किल्ल्यांचा मी राजा। माग माग जिजाबाई।

जें मागाल तें देतो तुज । नाशकाची बारी सांवताची वाडी । ह्यांतून किल्ला मागून घ्यावा । तुंग तिकोना लघुगड किल्ला विसापुर । त्यांतून कंचा मागून घ्यावा। ह्यांतून नको मला बाळा । पुण्याचे तोंडाला। आहे जेजुरीच्या बारीला। पुरंदर किल्ल्याला । बारे पुरंदर किल्ला । आहे सिंहगड किल्ला। घेऊन द्यावा मला । आयुष्य मागेन तुझ्या राज्याला । नांव घेतां सिंहगडाचे । राजा थरथरा कांपला । हा किल्ला उदेभान मोंगलाचा । बाई उदेभान मोगलाचा । जे उमराव गेले सिंहगडाला । त्यांच्या पाठी ग पाहिल्या । नाहीं पुढे पाहिले । किल्ला आहे वाघाचा जबडा । सत्ताविस किल्ल्यांची बारी । ह्यांतून मागावा बाईनें । नाहीं सिंहगड किल्ला दिल्या । मी शाप देईन । राज्य जाळून टाकीन उभे । नको बाई चल माझ्या राजगड किल्ल्याला ॥४॥

[जिजाबाई आणि शिवाजी महाराज राजगडावर जातात. सिंहगड घेण्याला तान्हाजीशिवाय दुसरा कोणीच उमराव दिसत नसल्याने, शिवाजी महाराज उमरठ्याला लखोटा घेऊन पंतोजी काकाला पाठवितात.]

जासूद महाराजांचा पाहिला । तानाजी सुभेदार सुखी झाला । पोटीं रायाबा तो बेटा । स्वयंवर बाळाचें मांडिलें । काढल्या पंचमीच्या हळदी । काढलें षष्टीचें लगिन । लगिन बाळाचें मांडिलें । आली सिंहगडची कामगिरी। लगिन रायाबाचें राहिलें । ज्याने उमराव बोलाविले । ज्याचा शेलार तो मामा । ज्याचा सूर्याबा तो बंधु । येसा कणकर रूमाजी दादा । ज्यानें सरदार बोलाविला । माझ्या शेलार तूं मामा । आली सिंहगडाची कामगिरी । मामा बोलाया तो लागला । ऐंशी बर्षांचा म्हातारा । माझ्या तानाजी सुभेदारा । जे गेले सिंहगडाला । त्याचे पाठिरे पाहिले । नाहीं पुढारे पाहिले । ज़्याने आंबा रे खाईला । बाठा बुरजा लाविला। त्याचे झाड होउनि आंबे बांधले । किल्ला हातीं नाहीं आला ॥ असें बोलू नको रे मामा । आम्ही शूर मर्द क्षत्रीय नालें भिणार मरणाला ॥५॥

लखोटा (सुभेदाराने) हातात घेतला । ज्याने एका लखोट्याचे बारा लखोटे केले । धाडले कागद खोऱ्याला । मोठया मोठया सरदारांला । पंधरा गांवचे पारूचे । त्याने आपणाजवळ बोलाविले । दसपटिचे मोकाशी । त्यानें आपणाजवळ बोलाविले । उमरठयाचे शिरके । त्याने आपणाजवळ बोलाविले । नांदविचे सावंत त्याने आपणाजवळ बोलाविले । वडघरचे नाईक । त्याने

आपणाजवळ बोलविले। सिलमाचे ठाकूर । त्याने आपणाजवळ बोलविले। बाराहजार फौजेला ज्याचा लखोटा पोंचला ॥६॥

अरे फलाणाचे फलाणा। घात्र घाला निशाणा। बारा हजार लोक बिनहत्यारी। हातें सैन्य बोलाया लागलें। बिनहत्यारी लोक। कसे जाऊं महाराजांचे भेटिला। ज्यानें सैन्य पाहिलें। बारा हजार लोक बिनहत्यारी आले। आंकड्या कोयत्या त्या कमरेला। टापसीच्या खोळा डोईवर घेतल्या। हातीं सोटा घेऊन। सलाम त्यांनीं केला सुभेदाराला। माझे तानाजीची हिम्मत। म्हणून मिळाली जमात। ज्याने पेटारा उघडिला। बाराहजार रुपया बाहेर काढिला। बारा हजार मनुष्यें। त्यांच्या हातांमधिं दिला। दाढी डोई रे करावी। चिरीमिरी रे घ्यावी। चला महाराजांचे भेटिला। राजगड किल्ल्याला ॥७॥

बारा भोयांची पालखी सवारिली। तोरण पालखीला बांधिलें। पाय दिला पालखीमध्यें। हात पालखीला दिला। रायबा तो बेटा। बाबाच्या आडवा येणार झाला। माझें लगीन करिल कोण। तुम्हीं जातां सिंहगडाला। भिऊं नको माझे बेटा। तुझे मी येतों लग्नाला। आधीं लगीन सिंहगडचें। मग करीन रायाबाचें॥ हुकूम ज्यानें भोयाला केला। आले नगरीचे वेशीला। तोरण पालखीचें तुटून। उजव्या बाजूवर पडलें। माझ्या शेलार तूं मामा। आम्ही जातों सिंहगडला। अपशकुन झाला। माझ्या तानाजी सुभेदाराला। तानाजी सुभेदाराने। ह्याचा गुमान नाहीं केला। गेला गांवाच्या शिवेवर। ज्याला आडवा तास गेला। मग तो शेलार मामा बोलला। तानाजी सुभेदाराला। तानाजी सुभेदारा। मोहोरें बरें नाहीं होणार। राजा शिवाजीचें देणें। अढळपदीं सोनें। अपशकून मानूं नये। ज्यानें हर हर वाहिला॥ गांव उमराठे सोडिलें। पांच कर्णांचा बाजा केला ॥८॥

बारा हजार फौज चाले। धुरळा गगनास गेला। बारा हजार फौज घेऊन। सुभेदार दरवाजाला (राजगडाच्या) आला। पहिल्या सदरे जमाडिला। सूर्या गगनीं लखाकला। दुसऱ्या सदरेमधीं। कमर कमर कापुस टाकला। तिसऱ्या सदरेमधीं। ज्यानें चांदवे बांधले। चवथ्या सदरेमधीं। हंड्या झुंबर बांधिले। पांचव्या सदरेमधीं। महाराज शिवाजी बैसले। सुभेदार सलामाला गेला। महाराजावर घुसा केला। मागचे दिवस मागल्यापरी। मोहरिल दिवस

मोहरल्यापरी। माझ्या बेट्याचे लगीन तुम्ही जासूद धाडिला। तुमचा काय वाद केला। ऐक तानाजी सुभेदारा। आमची कामगिरी नव्हे तुम्हाला। जिजामातेनें बोलाविलें। दोघांचा जबाब जिजामातेने ऐकिला। जिजाबाई बोलाया लागली। मी जातीनें बाईल। आतां सुभेदार येईल। माझी अबरू घेईल ॥९॥

सर्व शृंगार नटली। धांवा अंबाबाईचा मांडिला। भले भले अंबाबाई। तानाजी सुभेदार आला। इच्छेप्रमाणे होऊं दे। सिंहगड किल्ल्याची पंचारती केली। गेली सुभेदाराला ओंवाळायला। तुझे गाऊं अलाबला। तानाजी सुभेदारा। चढत्या दवलतीचें राज्य येऊं दे तुला। सुभेदाराला ओवाळितां। त्याचा राग निघून गेला। ज्याला वर्तली चिंता। ही आहे महाराजांची माता। इच्या आरतीला। मी घालूं काय आतां। ज्याने मंदिल काढिला। बाईचे पायांवर ठेविला। जिजाबाई बोलली। तानाजी सुभेदाराला। माझा सुभेदार शाहाणा। हात मस्तकी ठेविला। माग माग जिजाबाई। जें मागशील देतों तुला। काय मागूं सुभेदारा। ह्या म्हातारपणीं सिंहगड किल्ला। घेऊन द्यावा मला। आयुष्य मागेन तुझ्या राजाला। माझा शिवाजी थोरला। माझा तानाजी धाकटा। लेकाचें वाण दिलें त्याला ॥१०॥

[फौजेच्या जेवणाची तयारी जिजाबाईने केली.]

बारा हजार फौज घेऊन। आला दरवाज्याचें तोंडीं। ज्यानें सैंपाक पाहिला। बारा हजार पाट मांडिला। बारा हजार दुरून। बारा हजार पंचपात्री। बारा हजार लाविला ठाव। सैंपाक वाढून त्वरीत झाली।....ऐंशी वर्षांची उमर। ह्यारे जिजाबाईची। एकटी वाढील रे कुणाला। मामा बोले सुभादाराला।....पांचजणी देवी धावुनिया आल्या। सैंपाक वाढाया लागल्या। ऐकेनात कुणाला। ज्याचा मापट्याचा आहार। त्याचा अधोलीचा झाला। ज्याच्या मोहरें पांच पोळ्या। त्याच्या पंधरा पोळ्या झाल्या। खाववतील त्यानें खाव्या। उरतील त्यांनी गडाखालीं टाकाव्या ॥११॥

बारा हजार फौज जेऊन तृप्त झाली। तानाजी सुभेदार गेला। शिवाजीच्या मुजऱ्याला। आम्हीं जातों सिंहगडाला। आमचा रायाबा सांभाळा। जर आलों सिंहगडाहून। लगीन करीन रायाबाचें। जर गेलों तिकडें मेलों। लगीन करा रायाबाचें। मज बापाची सरदारी। द्यावी रायाबा बेट्याला। दिवटी बुदलीची जहागीर। द्यावी रायाबा बेट्याला। डोंजगांव द्यावा पानसुपारीला।

मालसऱ्याचा दंड द्यावा इनाम खायाला । सुभेदार तेथून निघाला । आला बाईचे भेटीला । डोईचा मंदिल काढला । बाईच्या चरणावर ठेविला । आम्ही जातो सिंहगडाला । माझ्या बेट्याला सांभाळा । बाईनें पेटारा उघडिला । पांच पोषाख काढिले । त्या ग सुभेदाराला दिले । यांतून जरि जगून तूं आला । नवा पोषाख करीन तुला । ज्यानें पोषाख तो केला फौजेमधीं गेला ॥१२॥

[एकट्या तानाजीला जिजाबाईनें पोषाख दिला यानें शेलारमामाला राग आला. बारा हजाराला पोषाख दिला तरच तू हा पोषाख घे नाहीतर परत करून टाक. असे त्यानें तानाजीला सांगितलें. जिजाबाईनें सर्वांना पोषाख दिला. कोणी उमराव समजेना. एकापेक्षा एक अधिक असे झाले. सिंहगडाची माहिती काढण्याचा विडा तानाजीनें उचलला.]

सूर्याबा रे बंधु आरता येरे माझ्या दादा । आम्हीं जातों सिंहगडाला । जगुनशानि आलों । लगीन करूं रायाबाचें । गेलों तिकडे मेलों । लगीन कर रायाबाचें । तानाजी सुभेदार त्यानें पोषाख काढिला । पाटलाचा थाट केला । जंगल लागलें दारुण । वेळु करकरां वाजती । लागलें चिंबारीचें रान । लागलें आळविचें रान । आरीबोरीचें दारुण । वाट नाहीं रे जावयाला । वन धुंडाया लागला । वाट मिळेना जावयाला । सुमार पाहाया लागला । बारे धोंडीवर चढला । गेला कोळ्याचे ग्याटाला ॥१३॥

[तानाजीला चोर समजून अंगावर आलेल्या बारा कोळ्यांना त्याने सांगितले की पुण्याला सरकारी धार भरण्यास गेलो होतो. परतताना वाघाने आडविले—म्हणून इकडे आलो—तुमच्या आश्रयाला. 'घाईने निघालो । पान घ्यायला विसरलो । पान द्यावे खायाला' म्हणून त्याने अस्सा विडे केले व त्यांतून कोळ्यांना माजूम दिला—ते झिंगले...त्यांना तोडा-कंठी मौल्यवान गोष्टी बक्षीस दिल्या व मग विचारले की 'मला गडाची माहिती द्या—,तुम्हांला गडाची सरदारी देईन; मी शिवाजीचा सुभेदार आहे', ते घाबरले तेव्हा तानाजी म्हणाला—]

ऐक खंडोजी नाईका । इमान तूं रे मला दिलें । द्यावी शेजेची बाइल । पण इमान देऊं नये । येवढ्या जाबावरून । कोळी सांगायाला लागला । ऐक सिंहगडची माहिती । तीन कोसांचा आहे बा घेरा । दीड कोसाची आहे बा रुंदी । आहे अठराशें पठाण सिंहगडाला । आहे उदेभान मोंगल । दीड गाई दीड शेळी सवामण तांदुळ वेळेला । अठराजणी बिब्या । आहेत त्याच्या पलंगाला । घेतो

तेल्याची पहार। मणगटावर घालता। सरी करून घालतो। बिबिच्या गळ्यांत। चांदवडी रुपया। दोहों बोटांनी तोडितो॥ १४॥

आहे बाच्छा याचा हत्ती। त्याचें नांव चंद्रावळी। एक बाच्छा याचा हत्ती। करिल सब दुनयेची माती। उदेभानाचा प्रधान। आहे सिद्दी हिलाल। एक शेळी अर्धी गाई। आदमण तांदुळ त्याचे एका वेळेला। नउजणी बिब्या। सिद्दी हिलालाच्या पलंगाला। बाराजण होते लेक। उदेभानाच्या पेक्षा भारी। उगवत्या बाजुला। कडा आहे डोणागिरी। तेथें आहे सोलाची जागा। डोणागिरीच्या कड्याला।........

सुभेदार तेथुनि निघाला। आला आपल्या फौजेला। ज्याचा शेलार तो मामा। त्याच्या पुढें धांवत आला। तुम्ही गेला सिंहगडाला। नवस केला बहिरोबाला। माझा सुभेदार येऊं दे। बारा बकरे देईन तुला। तुम्ही चला हो किल्ल्याला। जातो नवस फेडायाला। ऐक ऐक शेलार मामा बारा द्यावयाचे ते चोवीस देऊं। पण किल्ला येऊं दे हाताला। बहिरोबा आहे ओंगळ। त्याचा नवस पाहिजे फेडला। ऐक ऐक शेलारमामा। माझ्या महाराजाचें देणें। अढळ पदीं सोनें। नाहीं आम्हीं बहिरोबा जाणित। साडेतीनशें देव पाणी रांजणांत भरतात। ऐसा शिवाजी महाराजा। आहे तळकोंकणाचा राजा॥ १५॥

चला माझे दादांनो। हुकूम सैन्याला केला। बारा हजार फौज गेली। कल्याण दरवाज्याला। ज्याने पेटारा उघडिला। काढिली यशवंत घोरपड। सात शेर शेंदुर। तिच्या मस्तकीं थापिला। भांग मोत्यांचा भरला। चरणीं मस्तक ठेविलें। सांखळी कमरेला बांधिली। यशवंत घोरपड त्यानें किल्ल्याला लाविली। अर्ध्या किल्ल्याला गेली। घोरपड माघारी परतली। आउक्ष तानाजीचें समजली। घोरपड फिरली ती सुभेदारानें पाहिली। सत्ताविस किल्ले मी घेतले। घोरपड कधीं मागें नाहीं फिरली। राग आला त्या मर्दाला। मी आहे मराठ्याचा पोर नाहीं भिणार मरणाला। एक हात टाकीन। अठरा खांडोळीं पाडीन शिळ्या भाकरीसंगें खाईन। त्या मरणाचे धास्तीनें। सात वेढे जी फिरली नखें रोऊन बसली॥ १६॥

[शेलारमामाने सोल घट्ट बसल्याचे पाहिले. आणि आधी कोण चढतो म्हणून पैजेचा विडा लावला. सगळ्यांच्या माना खाली. 'बांगड्या भरा' असे तानाजी टोचून बोलताच मग प्रत्येक जण वीरश्रीने पुढे आला. 'बारा हजार फौजेने एकच गर्दी केली.']

अरे फलाणाचा फलाण । घाव घाला निशाणा । घस्त आली मोंगलांची । त्यानें कानोसा घेतला । हांक मारिली गेटाला । खंडोजी नायकाला । किस्का गलबला मेरे भाई । येवढा सांगावा आम्हांला । खालून कोळ्याने जबाब दिला । जंगलमें धनगराचा वाडा । त्यामध्यें बडा वाघ शिऱ्या । गाईकी बचडी खाते । रांड पोर किचाड करते । वरती सुखी राज्य करा ।

सुभेदार बोलतो सेनेला । पहिली सोल शिवाजी महाराजांची । दुसरी सोल अंबाबाईची । तिसरी सोल तानाजी सुभेदाराची । पट्टे घेतले तोंडामधीं । सल धरली ह्रातांमधीं । आपल्या बेताचे माणुस पन्नास मोजीले । सुभेदार गडावर चढले । पन्नास कमी बारा हजार फौज । खालीं होती त्यानें एकच गर्दी केली । दादा वरती गेला । बारा हजार फौजेने हात सोलाला घातला । तीन पुरुष वरती गेले । सोल मधीच तुटली । पचास कमी बारा हजार । फौज धरणीवर पडली । ....काय सांगूं सुभेदारा । सोल ते तुटली आली मरणाची वेळा । सुभेदार बोलाया लागला । नाहीं सोल रे तुटली माझें आयुष्य तुटलें । ऐक ऐक शेलार मामा । माझ्या रायाबा बेट्याला रामराम सांगा ।

[किल्ल्याखाली उडी टाकण्याची तोड शेलार मामा सांगतो, तेंव्हा तानाजी उद्गारतो-]

भला भला शेलारमामा । उडी टाकिली तरी प्राणजयाचा । पन्नास माणसाचा सरदार । सत्तावीस किल्ल्यांचा मी सरदार नाहीं भिनार मरणाला । शूर मर्दांची कीर्ति । धावा केला अंबाबाईचा । प्रतापगडची भवानी । पाव माझ्या नवसाला । सातारची मंगळाई । मग पुण्याची पर्वती । तुळापुरची भवानी । माता पाराची वरदानी । पाच देवी पुढें धांवत आल्या । गळ्यांत कवड्यांच्या माळा । हात मारिला पाठीवर । भिऊं नको सुभेदारा । यश तुझ्या तरवारीला । बळ देवीचें सांपडलें । जोर हातींचा चढविला । मागची पुढची आशा सोडली । खून डोळ्यावर चढला । ऐक माझ्या शेलार मामा । जेथें सुभेदाराचा पटा । तेथें पन्नासांचा पटा । जेथें सुभेदाराची मान । तेथें पन्नासांची मान । चलचल माझ्या मामा ॥ १७ ॥

[तानाजी पहिल्या दरवाजाला गेला व तेथे एकच गर्दी केली]

खाणाखण वाजिती । व्हाळ आसुदाचे वाहती । रक्त आंगाला लागलें खुन डोळ्याला चढला ।....पहिला दरवाजा मारिला । गेला दुसऱ्या दरवाजाला ।

....तानाजी सुभेदार जैसा ठाणांत । वाघ लोटला सेनांत । पांच पट्टयाचा मारा केला । सवा घटकेमधिं तीनशें पठाण कापिला । गेला तिसऱ्या दरवाजाला । होता चारशें पठाण । दिन दिन ज्यानें वाहिला । चारशें पठाण कापिला । एकंदर हिशेब । नऊशें मनुष्यांचा झाला ॥....त्यांत बोंब्या निघून गेला । उदेभान मोंगलापाशीं गेला । अठरा तो पेले अफूचे । उदेभान एकटा प्याला । भंगीच्या जुड्या आणि अफुच्या वड्या खाल्ल्या । उदेभान मोंगल मगरमस्त झाला । अठरा पलंग ज्याने बिब्यांचे सवारिले ।....तों म्होरें बोंब्या अवचित गेला । अरे उदेभान मोंगला । सिंहगड किल्ला डुब होया । भाई नऊशें पठाण कापिला ' काळोखी रात्र नाहीं गलीमाची माहित । नऊशें पठाण काट्या ।

[तेव्हा अफू–दारु पाजून हत्ती तानाजीच्या अंगावर सोडा असा उदेभानूने हुकूम केला...]

....मोहरें हत्ती धावत आला । किस्का उमराव । मेरा भाई सांगावा मजला । उंबराव शिवाजी महाराजाचा । नऊशें पठाण कोणी काट्या सांगावें मजला । नऊशें पठाण आम्ही काट्या । महात बोले सुभेदारा । कुणब्याच्या पोरा । काय तुझा एवढा तोरा । जंगलामधी तूं रे जावें । लकडी तोडावी त्याची मोळी बांधावी जाऊन बनियाला ओपावी । ज्यानि धानोऱ्या आणाव्या । रांडा पोरा रे घालाव्या । एवढ्या बड्या बड्या सरदारी । एवढ्या बड्या तलवारी । कोठें होत्या तुझ्या बाला । सुभेदार बोले महाताला । ऐक भुसाऱ्याच्या पोऱ्या जाऊन नाग तूं पेरावा । गोणी ताटुक वळावा । यावे कुणब्याच्या वाड्याला । भात रुपयाचें ध्यावें । तुझ्या रंडीनें भरडावें । कणी कोंडा आपण खावा । तांदूळ बनियाला ओपावा । एवढ्या बड्या बड्या अंबाऱ्या एवढ्या बड्या तल्वारा । कोठे होत्यारे मुंसंड्या तुला ॥१८॥

सलाम सलाम मेरे भाई । पहिला हात येऊं दे रे तुझा । पहिलवान हत्तीवर बसला । शिवी दिली हत्तीला । तेरी रंडीका नर । ह्याला पाहून घ्यावा । हत्ती सात पावलें मागें गेला । पांच पट्याचा मार केला । संभाळ संभाळ मेरे भाई । आता संभाळ सुभेदारा । हा हत्ती बाच्छाईचा । मी रे आहे महाराजाचा । पहिला हत्तीनें डोईवर मारा केला । सुभेदार भला हत्तीच्या पोटाखाल्न निघून गेला । हत्तीनें मारा केला । बंदुकीचा गजभर चिरा जो तुटला । वरून पहिलवान बोलला । सहाही पाताळ गाडिला । राग आला सुभेदाराला । सात हात जमीन

उडाला। लाथ मारिली महाताला। अल्ला म्हणून बोलला। शब्द हत्तीने ओळखला हत्तीने उलटा पाठीवर मारा केला। ह्या वैऱ्याला मारायाला। सुभेदार सराईत भला। कावा नदरेचा राखिला। सळ पट्याचा सोडिला। नऊ तुकडे सोंडेचे नऊ सांखळीचे। अठरा खांडोळीं पाडिलीं। सुभेदार खालीं उतरला। पन्नास माणूस लागलें हत्तीला भोकाया॥ १९॥

[बोंबला = हेर) पुन्हा उदेयभानाकडे गेला-त्याने सिद्दी हिलालाला घेऊन जा म्हणून सांगितले-तानाजीने त्याला 'बेंब्रीपावेतो चिरीत नेला.' नंतर उदेभानाने आपल्या बारा मुलांना पाठविले. तानाजीने त्या 'बाराजण लडक्यांचीं। चोवीस खांडोळीं पाडिलीं' ही बातमी बोंब्यानें उदेभानूच्या कानी घालताच उरात घाव बसल्यासारखे त्याला झाले.]

उदेभान तेथुन निघाला। आला पिराच्या दरग्याला। फोडल्या कापसाच्या उदी। ओतले तेलाचे बुधले। ज्याने आग जी लावली। ज्यानें उजेड तो केला। गलीम किती मोजून पाहिला। पन्नास माणूस ह्याच्या आले हिशोबाला। उदेभान माणूस पाहून। त्याच्या भुजा त्या थरारल्या। पन्नास माणूस। माझी आंबाडाची भाजी। मोंगल मागें परतला। गेला आखाडखान्यामधीं। पायीं तुमान सुरवार घातल्या। अठरा खंडीचे किनखाप त्यानें अंगांत घातलें। बारा आतबडीचा जोडा। त्यानें पायांमधीं घातला। ज्यानें वाघनखें चढविलीं। जिरेटोप डोईस घातला। अठराजागीं बिब्या। हारोहारीनें उभ्या केल्या। सळ पट्याचा सोडिला। अठरा बिब्यांचीं खांडें केलीं। आसुदाचा टिळा त्याला। गाभणीगाई जो काढली। गेला पिराच्या दरग्याला। सवामण उद जाळिला। एका हातीं गुरदा एका हातीं घेतला पट्टा। दो पट्ट्याचा मारा केला। आला कल्याण दरवाज्याला। ज्यानें सलाम वाहिला। दादा नउशें पठाण। ज्यानें जिमतीला घेतला॥ २०॥

[हजार रुपयांची तैनात देतो, सिंहगडचा हवाला देतो, मोंगलांची नोकरी धर, असे उदेभान् तानाजीला सांगतो. तेंव्हा 'तूच चल राजगडला' असे तानाजी प्रत्युत्तर करतो. उदेभानूला ग़ुस्सा येतो...तानाजीने अंबेचा धावा केला–]

नऊ हात जमीन उडाला। मोगलाला माराया गेला। हातामधीं हात ज्यानें अठरा टाकिले। गुंजभर नाहीं जो सरला। ऐका उदेभान मोगला। पहिला हात माझा झाला। दुसरा हात येऊं दे तुझा। सुभेदार बोलतो मामा ऐक निर्वाणीची वेळा। लग्न करा रायबाचें। दोहों हातांचा मुजरा सांगा शिवाजी

महाराजाला। उदेभान मोंगल बारा हात जमीन उडाला। वचक सुरबाईचा दाविला। मारा कैफाचा केला। पन्नास वेढे पागोट्याचे पन्नास वेढे मंदिलाचे बेंबीपावेतों चिरित नेला। सुभेदार धरणीला लोटिला ॥ २१ ॥

['वाघाच्या रानात आणून आम्हांला एकट्याला सोडून तूं कसा निघून गेलास' म्हणून लोक खळखळा रडू लागले...पण तेवढ्यात—]

सुभेदार मेलेला मुरदा इरयानें झाला। ऐशी वर्षाचा तो मामा त्याच्या अंगांत संचारला। यश आलें मोंगलाला। मोंगल मागें जाइत होता। मग तो सुभेदारांचा पट्टा। शेलारमामाने घेतला। फिर ग मर्दाचे लंडे फीर ग मर्दाचे लंडे। मोगल मागें पहात होता। दोहों हातांनी कचका दिला। बेंबीपावता चिरित नेला। खुदा खुदा बोलला। बुधा धरणीला पाडिला।

[मग उदेभानूचे नऊशे पठाण आणि तानाजीची पन्नास माणसे यांच्यात लढाई जुंपली. त्यात तानाजीचे पंचवीस लोक कामी आले. अंबाबाईला संकट पडले. तिने स्वतः कल्याण दरवाजा उघडला आणि सूर्याजीला व त्याच्या सैन्याला आत घेतले. शेलारमामाने सूर्याजीला 'तानाजी आत बालेकिल्ल्यात आहे' असे खोटेच सांगितले. पुन्हा लढाई जुंपली]

मग त्या बारा हजार फौजेनें। ज्यानें हर हर वाहिला। एका एकाच्या मागे तिघे तिघे लागले। नऊशें पठाण कापिला। पांढरें निशाण उपटलें। भगवा झेंडा शिवाजीचा। पाच तोफा जों मारिल्या। त्या तोफांचा आवाज। गेला राजगड किल्ल्याला। शिवाजी महाराज बोलला। माझ्या सुभेदारानें सिंहगड सही केला। शिवाजी महाराजानें। यशाच्या दहा तोफा सोडिल्या ॥

[सूर्याजीला वस्तुस्थिती काय ती कळून आली. त्याने तानाजीने दिलेले वचन पूर्ण करीन असा कोळ्यांना हवाला दिला आणि—]

अबिर गुलाल। ज्याचे मुर्द्यात भरला। दोरा रेशमाचा घातला। मुर्दा पालखींत ठेविला। पंचवीस कमी बारा हजार लोक सगळे घेतले। वाजत-गाजत मुर्दा गेला रायगड किल्ल्याला। आले किल्ल्याचे पोटाला। पांच कर्णांचा बाजा केला।....सुभेदाराची पालखी। नेली राजाचे सदरेला। शिवाजी महाराजानें। मुर्दा पहिला सुभेदाराचा। शिवाजीचे राज्यांत ऐसा। उंबराव होणें नाहीं सुभेदारासारखा। जिजाबाई धांवत आली। पालखी पाहिली। गर्व आला सुभेदाराला। नाहीं आला भेटायाला। बाई पालखीपाशी आली। बाईने शेला

उघडिला। मुर्दा सुभेदाराचा पाहिला। आंग धरणीला टाकिलें। सुभेदारासारखा। ऐसा क्षत्रीं होणार नाहीं ॥ २२ ॥

[शिवाजीमहाराज पालखीबरोबर उमराठ्याला आले...रायबा पुढे आला—]

शिवाजी राजानें। मुलगा पोटासंगें धरिला। भिऊं नको माझे बेटा। शिवाजी महाराज तो गेला, तान्हाजी सुभेदार आहे तुला। बारा दिवसांचें सुतक धरलें। शिवाजीमहाराजांनी सुभेदाराचें ॥

[तेराव्या दिवशी रायबाचें लग्नाचा मांडव घातला. पहिली नवरी रद्द केली व दुसरी नवरी नेमस्त केली. लग्न थाटात झाले.]

बापाची सरदारी। दिली रायाबा बेट्याला। दिवट्या बुदलीची जहागिर। दिली रायाबा बेट्याला। पन्नास माणसांची सरदारी। दिली रायाबा बेट्याला। डोनजं तें गांव। दिलें पानसुपारीला। मालुसऱ्याचा दंड। दिला इनाम खायला। रायाबा तो बेटा ज्यानें संगतिला घेतला। आले राजगड किल्ल्याला ॥....

शूरमर्दाचा पोवाडा शूरमर्दानें ऐकावा। शिवाचीचे राज्यांत। ऐसा उमराव होणें नाहीं। पोवाडा गात्याला उद्राण ऐकत्याला घडो पुण्य। सत्ययुगींचा पोवाडा। कलियुगीं वर्तला। सत्तावीस किल्ल्यांचा सरदार निघूनशानी गेला। ऐसा पुनः होणें नाहीं ॥ २३ ॥

◇ ◇

श्रीधर

१. द्रौपदीवस्त्रहरण

श्रीगणेशाय नमः । अजातशत्रु धर्मराज । धर्मपरायण धर्मात्मज । स्वधर्माचरण देवद्विज–। भजन न सोडी सर्वथा ॥१॥ कौरव जे परम दुर्जन । कपटद्यूत तयांशीं खेळोन । राज्य सेना देश धन । द्रौपदीसहित हारविलें ॥२॥ पांच पांडव पंचानन । कपटकूपीं पडिले येऊन । कीं पंच मराळ नेऊन । पंकगर्तेत रोविले ॥३॥ विदुरासी म्हणे दुर्योधन । पांडव जिंकोनि केले दीन । जैसे दग्धवनीं हरिण । तेजहीन क्षुधित पैं ॥४॥ द्रौपदी जाहली आमुची दासी । ऊठ बोलावूनि आणीं सभेसीं । तिचें पतिव्रतापण जनांसी । दाखवूं आजी तत्त्वतां ॥५॥ विदुर म्हणे पापखाणी । तुज निकट आली प्राणहानी । काय अपवित्र बोलसी वाणी । महादुर्जना कपटिया ॥६॥ दुर्योधन म्हणे देखा । हा पांडवांचा पाठिराखा । कृत्रिम सांगत विवेका । हितशत्रु घातक पैं ॥७॥ प्रातिकामी सूतपुत्र जाण । त्यासी सांगे दुर्योधन । आणी पांचाळीस बोलावून । भीड सोडून सभेसीं ॥७॥ हेर प्रवेशला मंदिरीं । म्हणे अहो द्रुपदराजकुमारी । दुर्योधने तेथवरी । बोलाविलें जाण पां ॥९॥ धर्में हारविलें समस्त । कोणाचा शब्द न चाले तेथ । द्रौपदी म्हणे मनांत । मांडला अनर्थ निर्धारें ॥१०॥ वाटे काळिजीं घातली सुरी । कीं सौदामिनी पडली शिरीं । कीं सुकुमार कमलिनीवरी । वज्रघाय पडियेला ॥११॥ मग द्रौपदी म्हणे तयासी । जाऊनि सांगें भीष्म-द्रोणांसी । तुम्ही श्रेष्ठ असतां सभेसी । विपरीत करणी काय हे ॥१२॥ धर्में हारविले आपणास । तरी तो तुमचा जाहला निःशेष । धर्मास आणि आम्हांस । मग संबंध कायसा ॥१३॥ मी पंचपुरुषांची ललना पाही । मज सर्वथा जिंकिलें नाहीं । नारदें नेमिले दिन सर्वही । सीमा केली अलोट ॥१४॥ पांचा ठायीं वाटिलें वर्ष । दोन मास द्वादश दिवस । यांत मी स्त्री भीमाची निःशेष । तरी धर्म केवीं हारवी ॥१५॥ सभेंत येऊनि सूतनंदन । सांगे सुयोधनासी वर्तमान ।

ऋतुस्नात द्रौपदीनिधान । कैसी आणूं सभेंत ॥१६॥ त्यासी निर्भत्सी दुर्योधन । मग उठविला दुःशासन । म्हणे धांव आणीं ओढून । केश धरून येथवरी ॥१७॥ आमुची ते जाहली दासी । मग तिची भीड कायसी । दुःशासन धांवला वेगेंसी । द्रौपदीपाशीं पातला ॥१८॥ हरिणीवरी क्रोधयुक्त । महाव्याघ्र जेवीं झेंपावत । कीं तस्कर जैसा संचारत । राज्यभांडारीं एकलाचि ॥१९॥ कीं मेदिनी गर्भरत्न । धरूं धांवला द्विपंचवदन । तैसा याज्ञसेनीजवळीं येऊन । काय बोले दुरात्मा ॥२०॥ ऊठ आतां वेगें येथून । राजा पाचारी दुर्योधन । तुझे पंच भ्रतार दास करून । आम्हीं जिंकून ठेविले ॥२१॥ तूं आमुची दासी निर्धारें । ऊठ सभे चाल सत्वरें । तुझें भाग्य उदेलें चतुरे । दुर्योधना वरीं आतां ॥२२॥ आयुष्यांतीं यमदूत । तैसा द्रौपदीसी तो भासत । कंठ होऊनि सद्गदित । काय मात बोलिली ॥२३॥ म्हणे देवरा तूं अवधारीं । सभेसी कैसी नेतां नारी । जेष्ठ सहोदराची अंतुरी । गांधारीसम तुम्हांते ॥२४॥ देवरा ऐकें ये समयीं । माझा कैवारी तूंचि होईं । निर्दोष यश पदरीं घेईं । कळेल शिष्टाई करीं तैसी ॥२५॥ देवरा तूं होईं माउली । लज्जा रक्षीं आजि आपुली । माझा द्रुपदराज ये वेळीं । तूंचि होई दयाळा ॥२६॥ किंवा शस्त्र घेऊनि तत्त्वतां । वधीं मज येथेंचि आतां । लोक धन्य म्हणती ऐकतां । वर्णितील कीर्ति तुझी ॥२७॥ निर्दय बोले पापराशी । ऊठ वाचाळे चाल सभेसी । तुज धरूनि नेईन केशीं । जहालीस दासी आमुची तूं ॥२८॥ हिंसकासी कैंची दया । मार्गघ्नासी कैंची माया । उपरति पैशून्यवादिया । कदाकाळीं घडेना ॥२९॥ धनलुब्धासी नावडे धर्म । जारासी कायसें सत्कर्म । साधुनिंदका नावडे प्रेम । भजनमार्ग कदाही ॥३०॥ शांत नव्हे कदा विखार । दुर्जन न बोलती कधीं मधुर । ध्यान करूं बैसले खर । कालत्रयीं घडेना ॥३१॥ असो ओढवला काल कठिण । पांचाळी उठली तेथोन । गृहांत चालली देखोन । दुःशासन धांवला ॥३२॥ अर्धयोजन आसमास । जिचे तनूचा जाय सुवास । चहूंकडे फांके जिचा प्रकाश । तिचे केश धरियेले ॥३३॥ हांक फोडी श्रीकृष्ण भगिनी । आसडूनि पाडिली मेदिनीं । ब्रह्मांड डळमळलें ते क्षणीं । उसळे पाणी सागरींचें ॥३४॥ रोहिणीवर वासरमणी । खचों भाविती तेव्हां धरणीं । वैकुंठ कैलास ते क्षणीं । डळमळले अतिदुःखें ॥३५॥ केशीं आकर्षोनि वेल्हाळ । सभे चालिला चांडाळ । जैसा हरिणीसी धरूनि शार्दूल । घेऊनि जाय त्वरेनें ॥३६॥ रोदन करी अधोवदनीं । नयनोदकें भिजे कुंभिनी । म्हणे वीरगुंठी करें करूनी । हळूच तरी धरीं पै ॥३७॥ भूषणें जाहलीं विगलित । ठायीं

ठायीं गळोन पडत । मुक्तें वाटेसी विखुरत । तेजे कविगुरूंसारिखीं ॥३८॥ म्हणे राजसा सखया देवरा । हळूचि चालें न करीं त्वरा । केश ओढिसी एकसरा । सुढाळ मुष्टीं धरीं पै ॥३९॥ उभा राहें एक क्षण । कासावीस जाहले माझे प्राण । रसना अधर गेले वाळोन । जीवनावीण एधवां ॥४०॥ द्रोणगुरूची तुम्हांसी आण । धांवडूं नका मजलागून । तुटोनि पडों पाहती चरण । परी कुलक्षण नायके तो ॥४१॥ सभेसी आणितां सुंदरी । उजेड पडला सकलांवरी । विद्युल्लता जैसी अंधारीं । नभोमंडळीं प्रकाशे ॥४२॥ देखतां द्रौपदीनिधान । संतभक्तीं झांकिले नयन । परम संतोषले दुर्जन । स्वरूप देखोन तियेचें ॥४३॥ जिचिया स्वरूपावरून । कुर्वंडी करिजे रतिरमण । जे अपर्णेची अपरप्रतिमा जाण । गुणनिधान द्रौपदी ॥४४॥ पाकशासन कमलजन्मा ॥ त्यांचेनि न करवे जिची प्रतिमा । रंभा उर्वशी तिलोत्तमा । चरणांगुष्ठीं न तुळती ॥४५॥ कृष्णाचऐसी कृष्णभगिनी । कीं ओतिली इंद्रनील गाळूनी । खंजन मृग मीन लोचनांवरुनी । ओंवाळूनि टाकावे ॥४६॥ दंत जेवीं हिरेखाणी । बोलतां उजेड पडे मेदिनीं । जिचा मुखप्रकाश देखोनी । रोहिणीवर लज्जित ॥४७॥ कर्ण म्हणे द्रौपदीस । तूं दुर्योधनाचे अंकीं बैस । भोगीं आतां राज्यविलास । सोडीं आशा पांडवांची ॥४८॥ ऐसें ऐकतां ते पद्माक्षी । भीमार्जुनां क्रोधें लक्षी । परी पक्षहीन अंध पक्षी । तैसे दीन दिसती ते ॥४९॥ भीमासी नावरे क्रोध तदा । सांवरूनि करें आकर्षी गदा । म्हणे कौरवांच्या शिरच्छेदा । करीन आतां क्षणार्धे ॥५०॥ पांचालीनें पाहतां विलोकून । माझें हृदय जाहलें शतचूर्ण । दावानल जाळी तृणकानन । तेवीं दुर्जन मारीन हे ॥५१॥ धर्म म्हणे ऐके भीमा । तिहीं पण करूनि जिंकिलें आम्हां । क्रोध आवरीं करी क्षमा । वेगें पाहें विचारुनि ॥५२॥ तुज क्रोध नावरेचि कदा । तरी माझिये मस्तकीं प्रेरी गदा । परी स्वधर्मसत्यमर्यादा । सर्वथाही न सांडी तूं ॥५३॥ चळतील मेरुमांदार । पश्चिमेसी उगवले जरी मित्र । हेंही अघटित घडेल परी सज्जन नर । असत्य मार्गे न जाती ॥५४॥ उष्णता धरील रोहिणीपती । शिळेवरी कमळें उगवती । हेंही अघटित घडेल परी न वर्तती । भगवद्भक्त असत्यें पै ॥५५॥ मग भीम म्हणे एकांतीं । वडिलीं तुज सांगितली नीती । नारद-व्यासांचिया उक्ती । द्यूतीं रत होऊं नको ॥५६॥ वर्जितां खेळोनि कपटद्यूता । व्यसनीं पाडिलें समस्तां । तोडीन आतां तुझे हस्ता । गदाघायें तत्काल ॥५७॥ अवश्य म्हणे महाराज धर्म । गदा उचली क्रोधें भीम । तों सद्विवेकी पार्थ परम ।

हस्त धरीत भीमाचा ॥५८॥ म्हणे या ब्रह्मांडमंडपांत । धर्माऐसा सत्य शांत । नाहीं नाहीं यथार्थ । साक्ष देत सरस्वती ॥५९॥ जो निश्चलगंगेचा लोट । जो विवेकरत्नांचा मुकुट । की भक्तिवैरागरींचा सुभट । दिव्य हिरा जन्मला ॥६०॥ सद्बुद्धिसरोवरींचा राजहंस । भक्तयुद्यानींचा तापस । जो अजातशत्रु निर्दोष । पंडुसमान आम्हांतें ॥६१॥ तेणें शब्द गोंविला नेमा । तो निश्चय तुम्हां आम्हां । धर्मासी मारूनि भीमा । अपकीर्तीच वरावी ॥६२॥ संसार मृगजलन्याय । याचा भरंवसा असे काय । ये अवनीसी बहुत राय । भोगोनि गेले पुढें जाती ॥६३॥ भीमाचा क्रोधाग्नि अत्यंत । चालिला विवेकवन जाळीत । तों सुशब्द वर्षला मेघपार्थ । तेणें शांत जाहला तो ॥६४॥ धर्माचे चरण वंदूनी । भीम बैसला स्वस्थानीं । तों दुःशासन केश कवळूनी । झोंका देत द्रौपदीतें ॥६५॥ इंदुवदना पद्मलोचनी । जे पद्मजजनकाची भगिनी । सुकुमार एकवसनी । जाचिली दुर्जनीं तेधवां ॥६६॥ पूर्वी जाहला राजसूय यज्ञ । शेवटीं जाहलें अवभृथस्नान । तेव्हां केश मोकळे करून । वीरगुंठी बांधिली ॥६७॥ ते हस्तीं दृढ धरूनि दुःशासन । झोंके देतसे हिंसक दुर्जन । तेव्हां द्रौपदी गुणनिधान । भीष्मद्रोणांकडे पाहे ॥६८॥ तुम्ही वडील न्यायसागर । अन्याय होतो परम दुस्तर । इंहीं मज जिंकिलें काय साचार । वदा उत्तर येधवां ॥६९॥ भीष्म वदे ते क्षणीं । ऐकें वो सद्गुणरत्नखाणी । धर्म बोले स्वमुखेंकरूनी । आम्हांसी पणीं जिंकिलें ॥७०॥ तेथें आमुचे न्यायवचन । कोण मानील सांग प्रमाण । मग बोले गुरु द्रोण । भीड धरून कौरवांची ॥७१॥ समुद्राहूनि अगणित । धर्माचें माते न गणवे तत्त्व । निर्मल अंतर शांत दान्त । वचन विपरीत न बोले ॥७२॥ कोणी भीड टाकून । न बोलेचि यथार्थ वचन । हें देखोनि विकर्ण । बोलता जाहला उठोनियां ॥७३॥ द्रौपदी जिंकिली म्हणतील कोणी । गलितकुष्ठें झडेल वाणी । त्यांसी निकट आली प्राणहानी । येचि क्षणीं जाणिजे ॥७४॥ त्रिवार हांक फोडोनी । म्हणे नाहीं जिंकिली याज्ञसेनी । हे अन्यायी अवघे या स्थानीं । साधु कोणी नसे येथें ॥७५॥ अंतर्बाह्य धृतराष्ट्र अंध । पुत्रलोभें जाहला मंद । अरे हे भीष्म द्रोण वृद्ध । सत्य येथें न बोलती ॥७६॥ कुलक्षयासी कारण । तो हा शकुनि आणि कर्ण । अधिकाधिक दुर्योधन । इंहीं बोधून खवळिला ॥७७॥ राजा केवळ राक्षस जाण । व्याघ्ररूपी अवघे प्रधान । केवळ ते सेवकश्वान । मग अन्योन्य वर्ततसे ॥७८॥ दुर्योधनासी सुख वाटत । परी समीप

आला अनर्थ । द्रौपदी केली उभी येथ । भुलले मूर्ख सर्वही ॥७९॥ गांजीत द्रौपदी वेल्हाळा । परी हे प्रलयाग्नीची ज्वाला । तुम्हां पतंगां सकळां । भस्म करील क्षणार्धे ॥८०॥ ऐकोनि विकर्णाची वाणी । सुर वर्षती दिव्य सुमनीं । माथे आणि तर्जनी । डोलविती आनंदे ॥८१॥ ऐसें देखोनि ते क्षणीं । कर्ण कोपला शतगुणीं । धर्मे बोली करूनि पणीं । याज्ञसेनी हारविली ॥ ८२ ॥ तें असत्य अवघें करूनी । भलतेंचि जल्पसी सभास्थानीं । तुज वधितों येचि क्षणीं । परी दुखवेल मनीं गांधारी ॥ ८३ ॥ शतमूर्ख तूं त्रिशुद्धी । वडिलांसी शिकविसी बुद्धी । येथें काय जाहला अविधी । दासी सभेसी आणिल्या ॥ ८४ ॥ एक स्त्री भ्रतार पांच जण । कोणे शास्त्रीं केलें लेखन । हे दोषखाणी जारीण । करा नग्न येथें आतां ॥ ८५ ॥ वस्त्रें भूषणें संपूर्ण । आधीं घ्या पांडवांचीं हिरोन । ऐसें ऐकतां पांचही जण । वल्कलें वेष्टून बैसले ॥ ८६ ॥ जानु उघडी करून । द्रौपदीसी दावी दुर्योधन । म्हणे बैसें अर्धांगीं येऊन । पट्टराणी होईं माझी ॥ ८७ ॥ भीमें गदा उचलोनि लवलाहें । म्हणे अंधपुत्रा इकडे पाहें । तुझा अंक गदाघायें । चूर्ण करीन जाण पां ॥ ८८ ॥ हें जरी न करवेल माझेनी । तरी विऊनि वंध्या कुंती जननी । लज्जा आली सोमवंशालागूनी । कृष्णदास्य व्यर्थ केलें ॥८९॥ ऐसें ऐकतां वचन । प्रकट बोले दुर्योधन । म्हणे गे द्रौपदी येऊन । बैसें निःशंक मांडीवरी ॥९०॥ ऐसें बोलतां दुर्योधन । द्रौपदी बोले तीक्ष्ण वचन । बळेंचि चेतविला प्रलयाग्न । कौरवकुल जाळावया ॥९१॥ बळें खवळिला भुजंग । कीं शुंडे पिळिला मत्तमातंग । निद्रित व्याघ्र सवेग । नासिकेवरी ताडिला ॥९२॥ तैसी ते पांडवललना । म्हणे चांडाळा दुर्योधना । गलितकुष्ठ भरोनि रसना । झडों दे तुझी पापिया ॥९३॥ महाप्रलय सौदामिनी । हिंसका पडो तुजवरी येऊनी । तुझे दृष्टीचे कोळसे होऊनी । भस्म होऊं दे दुर्जना ॥९४॥ भीमें गदा नेमिली नोवरी । रणचत्वरीं घेई मांडीवरी । पंचप्राण घालोनि बाहेरी । प्रलयाग्नि लावीं पैं ॥ ९५ ॥ तुझ्या स्त्रिया हृदय पिटूनी । वाद्यें वाजविती भयंकर वदनीं । रक्तमृत्तिका मिळोनी । हळदी सहजचि लागेल ॥ ९६ ॥ मग ते गदा हृदयीं धरून । समरमंचकीं करीं शयन । बंधूसमवेत यमसदन । पावोनि करीं साडे तेथें ॥ ९७ ॥ शब्दशस्त्रांचे घाय तीक्ष्ण । लागतां खवळला दुर्योधन । म्हणे इचे तुकडे करून । सर्षपप्राय टाका रे ॥ ९८ ॥ जिव्हा नासिक आणि कर्ण । हस्त शस्त्रें टाका छेदून । दुःशासना फेडीं वसन । दावीं नग्न सभेंत ॥९९॥

वामहस्तें केश कवळून । सव्यहस्तें फेडीं वसन । नगरलोक सभाजन । झांकिती नयन अतिदुःखें ॥१००॥ कृष्णासी करावया श्रुत । वेगें पिटिला मनोदूत । म्हणे मांडिला थोर आकान्त । धांवें त्वरित कैवारिया ॥१०१॥ सुभद्रकारिके भवानि । मूलपीठद्वारका विलासिनि । आदिमाये कुलस्वामिनि । धाव जननि लौकरी ॥१०२॥ मनमोहने गोकुलवासिनि । हृदयवृंदावनविहारिणि । सांवळे गोवर्धनोद्धारिणि । वेगें करूनि धांवें कीं ॥१०३॥ म्हणे दुर्योधन दुःशासन । हेचि शुंभ निशुंभ दैत्य पूर्ण । ययां मर्दूनियां जाण । रक्षी लज्जावसन माझें ॥१०४॥ खगवरकेतना इंदीवरनेत्रा । इंदिरावरा जलदगात्रां । विश्वव्यापका त्रिनेत्रमित्रा । सुत्रामा महिमा नेणे तुझा ॥१०५॥ यादवकुलमुकुटावतंसा । कंसांतका क्षीराब्धिविलासा । सच्चिदानंदा मनोहरवेषा । शरणागता रक्षीं तूं ॥१०६॥ सनकादिवंद्या जगदुद्धारा । पद्मजातजनका त्रिभुवनसुंदरा । पांडवपालका रणरंगधीरा । अति उदारा श्रीरंगा ॥१०७॥ मायाचक्रचालका निरंजना । महारजतपूर्णवसना । मधुमुरकैटभदैत्यभंजना । जगज्जीवना धांवें कां ॥१०८॥ अवतारचक्रचरित्रपालका । धांव अनंतब्रह्मांडनायका । ब्रह्मानंदमुखमृगांका । दावीं एकदां ये वेळे ॥१०९॥ मुचुकुंदोद्धारका गिरिधरा । पंचशरजनका परात्परा । निगमागमवंद्या अनंतनेत्रा । संकट माझें न देखसी ॥११०॥ अंध जातां घोरकांतारीं । समागमी टाकोनि गेले दूरी । मग तो तळमळी नानापरी । मज मुरारि तेवीं जाहलें ॥१११॥ व्याघ्रें पाडस धरिलें वनीं । तें दिनरजनीं चिंती जननी । वैकुंठपुरविहारिणी । ध्यायीं मनीं तेवीं तूतें ॥११२॥ प्रसूतसमयीं माध्यान्हीं । तृषित धेनु दग्धवनीं । तों सहस्र व्याघ्रीं येऊनी । गर्जना करूनि ओढिली ॥११३॥ भक्तवत्सला स्नेहाळा हरी । तेवीं मज गांजिलें दुराचारीं । कोठे गुंतलासी कैवारी । कमलायतना हृदयस्था ॥११४॥ ये समयीं न येसी करुणार्णवा । उणें येईल कीं बिरुदा नांवा । भक्तवत्सला रमाधवा । बाहतां कंठ शोषला ॥११५॥ गांजिती कौरव दुर्जन । विसाव्या कां सांडिला अभिमान । पांचाळी श्रीरंगा तुझी बहीण । घोष गाजे त्रिभुवनीं ॥११६॥ कौरवकुबुद्धिसमुद्रांत । बुडालें हरि देईं हात । दीनवदन जाहले पंडुसुत । बांधलें दृढ कपटपाशें ॥११७॥ कौरवपीडा वणवा दारुण । जाळितो केशवा वर्षे घन । भीष्मद्रोणांचें न चले वचन । म्लानवदन बैसले ॥११८॥ कौरवसभाभूतमेळीं । पडली तुझी दासी पांचाळी । पंचाक्षरी तूं वनमाळी । धांव वेळीं त्वरेनें ॥११९॥ हरि तूं कंठीरव दयाब्धी । तुझी कन्या मी येथें द्रौपदी । कौरवगजीं वेढिली त्रिशुद्धी । धांव आधीं हांक देत ॥१२०॥ चिंतारोग जडला

दारुण । धांवें कृपारसपात्र होऊन । तुजपाशीं धाडीन प्राण । कुणप येथें टाकुनि हें ॥१२१॥ लपावया तुझे हृदयीं । हरि मजला ठाव देई । लाज गेलिया लवलाहीं । मग काय उरेल ॥१२२॥ करुणाकरा गोपाला । विलंब कां फार लाविला । जाहलिया भगिनीची अवकळा । मग काय डोळां पाहसी ॥१२३॥ कामधेनु श्रीरंग माउली । कोणते वनीं आजि गुंतली । द्रौपदीवत्स विसंबली । कौरववृकसभेंत ॥२४॥ अहा श्रीकृष्णा यादवेंद्रा । तुज काय लागली योगनिद्रा ॥ द्रौपदीकन्या एकसरा । हांक फोडितां सोकली ॥१२५॥ आपण वाढविलें म्हणून । जड काष्ठ तारी जीवन । पाळिलें जातां बुडोन । ब्रीदें गळोन गेलीं पैं ॥१२६॥ यदुकुलकमलविकासमित्रा । पांडवमानसचकोरचंद्रा । जगद्वंद्या कृपासमुद्रा । करीं त्वरा ये वेळे ॥१२७॥ द्रौपदीचे करुणाशब्द । हेचि उडाले प्रेममिलिंद । श्रीकृष्णकमलीं सद्गद । गुंजारव जाणिविती ॥१२८॥ कौरवसभा कंटकस्थल । जाणोनि द्रौपदीचे शब्दमराल । कृष्णमानससरोवर विशाल । जाऊनि तेथें बैसले ॥१२९॥ पूर्णस्वानंदरूप पर्यंक । तेथें पहुडला वैकुंठनायक । चरण तळहातीं तेथें देख । ज्ञानकला रुक्मिणी ॥१३०॥ अनुभवबोधें सुस्वर । गाती नारद आणि तुंबर । तेथें उद्धव आणि अक्रूर । सुगंध वायु जाणविती ॥१३१॥ सप्रेमलक्ष जोडले करीं । उभा सन्मुख तो सर्पारी । चरण तळहातीं भीमकुमारी । देखे नखमुकुरीं ब्रह्मांडें ॥१३२॥ कौरवसभा कालरात्री दारुण । द्रौपदीचें वस्त्रहरण । करावया तस्कर दुःशासन । घाला घालूं पहातसे ॥१३३॥ तों द्रौपदीचे शब्द सुरेख । ते द्वारकेंत घालिती हांक । जागा झाला वैकुंठनायक । घाबरेपणे विलोकी ॥१३४॥ ज्ञानें पाहे तों यादवेंद्र । पांडव भांडारींचे कौरवतस्कर । द्रौपदीलज्जाधन अपार । नेऊं पाहती हरूनियां ॥१३५॥ रुक्मिणीचे हातींचा चरण । आसडोनि उठिला मनमोहन । धांव घेतली उठोन । न बोलतां कोणाशीं ॥१३६॥ पीतांबराची रुळत कांस । ती न सांवरीच ऋषीकेश । मुकुट राहिला रुळती केश । सुगंधसुमनें सांडती ॥१३७॥ कौस्तुभमाला वैजयंती । नीट न सांवरी श्रीपती । खेद पावला श्रीतनूप्रती । कंठ सद्गद जाहला ॥१३८॥ श्रीरंगाच्या वेगापुढें । मन पवन कायसे बापुडें । चिंतिलिया ठाया जावें गरुडें । परी तोही मंद राहिला ॥१३९॥ धांवा केला हें भक्तिलक्षण । परी तो हृदयींच नांदे नारायण । सर्वव्यापक जगन्मोहन । गमनागमन नसेचि ॥१४०॥ नारद पुसे रुक्मिणीलागून । कां घाबरेपणें गेले जगज्जीवन । ते म्हणे द्रौपदी गांजिली म्हणवून । न सांवरत धांवले ॥४१॥ इकडे द्रौपदीचें वसन । फेडूं पाहात दुःशासन । तंव तो पाठीसीं

येऊन। उभा ठाकला कैवारी ॥४२॥ जो पीतांबर आपुला। तेणें झांकिली द्रौपदी बाला। प्रकाश असंभाव्य झळकला। कौरवसभा चमकली ॥४३॥ कृष्णवसन तेजाळ सुहास। तेणें सुगंधें भरलें आकाश। उभा पाठिशीं आदिपुरुष। सद्भक्तींच देखिला ॥४४॥ आल्हादली पांचाळी। म्हणे कैवारिया वनमाळी। मज गांजिलें दुर्जनीं सकळीं। हरिमाउली नसतां तूं ॥४५॥ हरि म्हणे द्रौपदीसी। जें जें बोलिले पापराशी। तें तें गांजिलें देवकीसी। मी हें मानसीं भावितों ॥४६॥ आला जाणोनि भगवंत। धर्म बंधूंसी खुणावीत। नयनीं वाहती अश्रुपात। कंठ सद्गदित जाहला ॥४७॥ देखोनि पाठीशीं दयार्णव। विदुरासी नावरती अष्टभाव। भीष्मद्रोणादिक भक्त सर्व। ब्रह्मानंदें डोलती ॥ ४८॥ क्रोध नावरे दुर्योधना। म्हणे रे मंदा दुःशासना। भीड कायसी धरिसी वसना। फेडीं पाहूं दे सभेंत ॥४९॥ तेणें जों आसुडिलें चीर। तों आंत क्षीरोदक सुंदर। म्हणती अद्भुत स्त्रीचरित्र। वस्त्रांत वस्त्र नेसली ॥१५०॥ तेंही ओढितां दुर्जन। आंत देखे सुवर्णवर्ण। द्रौपदी झांकिली संपूर्ण। चरणांगुष्ठही दिसेना ॥५१॥ सभा जाहली तटस्थ। म्हणती वस्त्रभार असंख्यात। अमोलिक तेजाद्भुत। कोण पुरवी न कळे हें ॥५२॥ हांवे चढोनि दुःशासनें। दोहीं हातीं फेडिलीं वसनें। गणती दशशतवदनें। करितां ठायीं पडेना ॥५३॥ कनकवर्ण वस्त्र ओढी। तों आंत देखे जरीची साडी। त्या आंत कुसुंबी चुनडी। तेही ओढी अपवित्र ॥५४॥ पाटाव ओढी जरतारी। तों कल्हारवर्ण त्याअंतरीं। जरीचे शिखी मराळ पदरीं। तेंहीं आवरी वेगें तो ॥५५॥ कुसुमवर्ण पदर। करवीरवर्ण कोविदार। रक्तोत्पलवर्ण सिंदूर। चंपकवर्ण साजिरीं ॥५६॥ केशरी हरिद्राकुंकुमवर्ण। दूर्वांरंग जंबू चंदन। सप्तरंगे रंगीत पूर्ण। केतकीदलवर्ण एक पै ॥५७॥ कीररंगी नीलोत्पलवर्ण। सहस्रचौकडी कांठ सुवर्ण। पाचू पेरोज वैडूर्य पूर्ण। वर्णांची निघती असंख्य ॥५८॥ मिलिंदवर्ण अपार। चंद्रसूर्यकला सुकुमार। निराळवर्ण परिकर। नक्षत्रठसे झळकती ॥५९॥ गुंजारंग अग्निवर्ण। रंभागर्भ कास्मीरवसन। दुग्धवर्ण कनकसुमनवर्ण। जगज्जीवनें पुरविलीं ॥१६०॥ कंबुवर्ण रजतहंस। चामीकरवर्ण पद्मकोश। इंद्रगोपमाणिकरंगविशेष। हृषीकेश पुरवीतसे ॥६१॥ काशी कांची अंवतींचीं। अयोध्या मथुरा मायापुरींचीं। वसनें आणिलीं द्वारकेचीं। भगिनीलागीं श्रीधरें ॥६२॥ भरत रमणक सप्तविधि वंश हिरण्य। कीर्तिद्राक्ष हरित सुवर्ण। या नवखंडींचीं वस्त्रें संपूर्ण। जगज्जीवनें पुरविलीं ॥६३॥ जंबू शाक प्लक्ष शाल्मली। क्रौंच केतुमाल श्वेतवल्ली।

या सप्तद्वीपींचीं वस्त्रें वनमाळी । पांचाळीतें पुरवीत ॥६४॥ अंग वंग दशार्ण कलिंग । कुलिंग काश्मीर भोज सुरंग । सौवीर सौराष्ट्र श्रीरंग । वसनें सवेग आणीत ॥६५॥ बंगाल माग मागध नेपाळ । केरल चोल पांचाल । गौड मल्याळ स्त्रीराष्ट्र सिंहल । द्राविड कर्नाटक आंध्र पैं ॥६६॥ करहाटक महाराष्ट्र घोरण । घोंट नाट पंजाब पुलिंद हूण । भिल्ल गांधार विदेह चैद्य जाण । विदर्भ विऱ्हल केरल ॥६७॥ कोशल कुंतल किरात । शूरसेन सेव्रन समस्त । कोंकण गोकर्ण मत्स्य सत्य । मद्र शाल्व सिंधावती ॥६७॥ सैंधव पारसीक गुर्जर । यवन बर्बर जालंधर । छपन्नदेशींची वस्त्रें श्रीधर । देत अपार पांचाळीतें ॥६९॥ चीन मुलतान लाहोर । काबुल बैगळूर फिरंगाण थोर । खुरासन आणि कृष्णवस्त्र । वस्त्रें तेथींचीं अपार पैं ॥१७०॥ विष्णुकांची शिवकांची कुंभकोण । चिदंबर अरुणाचल मल्लिकार्जुन । शेषाचल किष्किंधापट्टन । प्रतिष्ठान करवीर पैं ॥७१॥ स्वर्ग मृत्यु नागलोक । वैकुंठ कैलास ब्रह्मपद सुरेख । सुरांसहित शचीनायक । वस्त्रीं प्रत्यक्ष रेखिला ॥७२॥ दशावतार अष्टदिक्पाल । चवदा मनु लिहिले भूगोल । द्वादश मित्र एकादश रुद्र सकल । वस्त्रांवरी पुतळे हे ते ॥७३॥ रामायण भारत भागवत । शिवविष्णुचरित्रें अद्भुत । एक सहस्रनामें मंडित । कनकाक्षरीं रोखिलीं ॥७४॥ ऋषिमंडळी सिद्ध चारण । सोळा सिद्ध नव नारायण । चौऱ्यायशीं आसनें योगसाधन । ऐशीं वस्त्रें निघालीं ॥७५॥ शक्रप्रस्थ हस्तिनापुर । कुरुक्षेत्रीं युद्ध पुढें होणार । रणीं पडले कौरव पामर । प्रेतें समग्र रेखिलीं ॥७६॥ मांडीवरी गदा घालून । भीमें मारिला दुर्योधन । दुःशासनाचें वक्षःस्थळ फोडून । रक्तपान केलें असे ॥७७॥ इतुकें दुर्जन पाहती । परी सावध कोण न होती । द्रौपदीचा कैवारी जगत्पती । अनंतहस्तें नेसवी ॥७८॥ अनंत कोटी ब्रह्मांडें । भरली जवळी अक्षय्य दिंडें । श्रीकृष्णनायकाचीं प्रचंडे । वस्त्रें शेषा न गणवती ॥७९॥ द्वारकेचा सभाग्य चाटा । वस्त्रश्रेणी पुरवी अचाटा । न कळे हें कौरवांचे थाटा । कांहीं कुचेष्टा न चालती ॥१८०॥ रुई रहाट चिवट भाग । कांहीं न घालितां श्रीरंग । अचाट पटसृष्टि सुरंग । पुरवीतसे ते काळीं ॥८१॥ आपुला पीतांबर शेवटीं । द्रौपदीसी नेसवीत जगजेठी । रत्नदशान रोंवूनि ओठीं । सुदर्शन उचलिलें ॥८२॥ म्हणे या वसना लावितां हात । दग्ध करीन कौरव समस्त । विदुर द्रोण गंगासुत । हणती अनर्थ मांडला ॥८३॥ धृतराष्ट्रासी जाणविती मात । सर्वांचा येथें मांडला अंत । दुर्योधन भयभीत । दुःशासनासी वारीतसे ॥८४॥ दुर्योधन म्हणे

वस्त्रभार । भांडारीं ठेवा हे समग्र । तो एकही तेथें न दिसे साचार । अभाग्यासी तेधवां ॥८५॥ तों अवचिन्हें जाहलीं बहुत । गगनीं उठले त्रिविध केत । मेघ रक्तधारा वर्षत । भयभीत कौरव पै ॥८६॥ भक्त साधु नगरजन । द्रौपदीसी करिती सप्रेम नमन । कौरवांसी वाचे निंदून । वर्णिती यश पांडवांचे ॥८७॥ दुर्योधनासी म्हणे भीमसेन । तुझी मांडी मी करीन चूर्ण । नातरी पूर्वज पावती पतन । जीतचि जाण प्रेत मी ॥८८॥ गांधारी हृदय पिटीत । भीम बोले तें करील यथार्थ । धृतराष्ट्रें पांडव समस्त । द्रौपदीसहित बोलविले ॥८९॥ आलिंगूनि पांचही जण । म्हणे चांडाळ हा दुर्योधन । येणें तुम्हांसी कष्टविलें पूर्ण । तें कांहीं आठवूं नका ॥१९०॥ मी वृद्ध चक्षुहीन । धर्मा करीं तूं माझें पालन । तथास्तु म्हणे भीमसेन । ऐसेंचि होईल शेवटीं ॥९१॥ द्रौपदीच्या माथां हस्त । ठेवूनि धृतराष्ट्र बोलत । माये तूं कुलतारक यथार्थ । दुर्जनीं कष्ट दिले तूं ते ॥९२॥ इच्छा असेल जे मनांत । ते तूं माग पुरवीन सत्य । येरी म्हणे पांडव मुक्त । पणीं जिंकिले ते करावे ॥९३॥ शस्त्रें वस्त्रें राज्य रथा । देऊनि बोळवावें इंद्रप्रस्था । दास न म्हणावें आतां । इतुकेंचि ताता देइंजे ॥९४॥ ते तत्कालचि केले मुक्त । उपहासूनि कर्ण हांसत । म्हणे धन्य रे तुम्ही पंडुसुत । षंढतीळ संसारीं ॥९५॥ बंदीं पाडिलां समस्त । ते स्त्रीप्रयत्नें जाहलां मुक्त । जारकर्म करूनि पाळीत । पति जैसी स्वैरिणी ॥९६॥ अर्जुन म्हणे रे मशका । भ्रष्टा कौलिकान्न भक्षका । कुलहीना सहस्रमूर्खा । ऐकें आतां प्रतिज्ञा हे ॥९७॥ आम्ही नपुंसक कीं रणशूर । पुढें कळेल हें समग्र । तुझें रणीं छेदूनि मिरवीन शिर । तरीच पुत्र पंडूचा ॥९८॥ असो रथीं बैसोनि पांचही जण । माता कुंती द्रौपदीनिधान । शिबिकारूढ होऊन । नगरांतून चालिलीं ॥९९॥ पूर्वद्यूत संपलें । आतां अन्य द्यूत आरंभिलें । तें पुढें असे कथिलें । श्रवण केलें पाहिजे ॥२००॥ अंतरीं येऊनि ते वेळां । श्रीरंग सकळांसी भेटला । धांवोनि द्रौपदी वेल्हाळा । मिठी गळां घालीत ॥१॥ नयनोदकें करून । केलें श्रीकृष्णचरणक्षालन । म्हणे श्रीरंगा तुजवरून । ओंवाळून जाईन मी ॥२॥ तुझे काय आठवूं उपकार । आजि लाज रक्षिली थोर । पांडवकैवारी यादवेंद्र । त्रिभुवनीं थोर ब्रीद गाजे ॥३॥ श्रीपती म्हणे गे द्रौपदी माये । पांडव मज प्राणांहूनि प्रिय । संकट पडतां लवलाहें । ऐसाचि येईन क्षणोक्षणीं ॥४॥ ऐसे बोलोनि सद्गद । द्वारकेसी गेला ब्रह्मानंद । तो पाडुरंग पुंडलीक वरद । भीमातीरीं नांदतसे ॥५॥ ब्रह्मानंदा पाडुरंगा श्रीधरहृदय-कह्लारभृंगा । आदिपुरुषा अव्यंगा । दिगंबरा अविनाशा ॥२०६॥ ◇ ◇

अमृतराय

१. सुदामचरित्र

श्रीकृष्णें सुदामजीला सोन्याची नगरी दिधली । स्वानुभूतिहृदया मधिली ॥ धृवपद ॥

ब्राह्मण ब्रह्मनिष्ठ बहु मोठा, त्याचा प्रपंच हीन करंटा, मुलें भुकेनें करिती तंटा, घरांत वाजे नकारघंटा, स्त्री वरवंटा, धैर्याचा वरवंटा, मनांत परवंटानें, पोट बळें वेंटाळुनि, बाहू कंवटाळुनि, कधिं कंटाळेना, पुरुषवचन ते टाळुन चित्त विटाळूं नेणे; नसतां मूठपसाभर दाणे, पतिव्रता तीव्रता न जाणे, कांता ते एकांतीं नेउनि, म्लान वदन मउ बोल बोलली केविलवाणें, 'जी जी स्वामी!' द्वारकेंत श्रीकृष्ण विष्णु गोपाळ तुमचा बाळमित्र चिरकाळ नांदतो, ऐसें ऐकियलें हो! कानें, त्याचें तुमचें दर्शन होतां, अपार धन देइल सन्मानें, समर्थ श्रीहरि सखा सुखानें, तुम्हांसि अर्पिल सोनें नाणें, प्रेमें आलिंगिल जीवानें, तुम्ही कुटुंबी सदा हिनवाणे, कांपतसां दारिद्र्यहिंवानें, हरी भेटतो आर्जवानें, उचित दिसे जी तेथें जाणें.' यापरि ब्रह्मण दुबळा, त्याची अबळा, ते बुबुळातें फिरवुनि बळानुजप्रभुयदुपतीभेटीसाठीं मधुर मृदु बहु प्रकार प्रियकर वाक्यें वदली ॥ श्रीकृष्णें० ॥१॥

सुदाम बोले साधु स्वभावें 'कांते! द्वारकेसि जरि जावें, हरिच्या भेटीस काय न्यावें? लाजिरवाणे काय म्हणावें, निष्कामत्वें त्यासि पहावें, परम लाभ तो पुण्यश्लोका अवलोकावे,' ते ऐकुनियां क्षमाशील क्षुमा रामा, श्यामांगी चौढायी याचुनि, चारी मुठीं पोह्यांचें चूर्ण जीर्ण चैलखंड चिंध्या जोडुनियां, चौपट पदरीं लहानशी गांठुडि बांधुनिया, चारुमतीनें, चतुरगतीनें, चित्तहरण चैतन्यवृत्तीनें, अहंब्रह्मसिद्धांतरितीनें, पतीपुढें ठेवियलीं तिनें, गळतिल कण म्हणउनियां तेणें कक्षापुटीं रक्षियली ॥श्रीकृष्णें० ॥२॥

झाल्या प्रातःकाळी स्नानसंध्योपासन, दर्भासन तें गुंडाळुनियां, कृशांग

तो द्विज, कुशांगुळीये कुशस्थळीच्या शुभप्रयाणीं, पाणि पियासि पाणी, जोडुनि, अंजलिपात्रमात्र सहाय यात्रेकरू तो यथापथाने विराग माने मनोरथाचा साज. बांधिला माज, आज यदुराज हरीचा मुलाज मतिचा विलाज कैसा सलाज चित्तीं शंकित जातां, अवाज न होतां, गरिब नवाज माधवजीची दुरूनि द्वारवती देखियली ॥श्रीकृष्णे० ॥३॥

चरती कामधेनुखिल्लारें, सुवर्णरत्नखचित धवलारें, फुललीं कांचनमय कल्हारें, कौतुक रचिलें हरिमल्हारें, समुद्रवलयित मलयमेरुसम निलय हरीचें, प्रलय संपल्या कुवलय उगवे, करुणालयआलवाल, यादव प्रवालवल्ली, भली उगवली, कृष्ण घन कल्पद्रुम फळली, कोमलतासत्त्वें पल्लवली, मुक्ताफळें चहुदेशीं स्रवली, अमृतफळें नम्रत्वें लवलीं, सोमवंशतेजें टवटवलीं, स्थैर्यमंडपावरी सांठवलीं, संतवसंता भेटतां शांती लवली, धवळी भूतप्रभा उद्भवली ॥श्रीकृष्णें० ॥४॥

जाहले हात पाय त्या नळ्या नाडी दिसती वरी वेगळ्या, सुकलें मांस पडल्या वळ्या, नखीं वेष्टियल्या आंगोळ्या, उपोषणें चिरकालें झाली, सरकाळें अंगाचीं वाळुनि, देह तपे जाहलासे जर्जर, उभा अस्थिचा केवळ पंजर भूनिर्जर, निगमगर्भ कृश दुर्भर, बोटीं दर्भ पवित्र, सदा मुखीं स्तव, ब्रह्मसूत्र सित गळां, परि निब्बर दोडका, तेंवि रोडका, धर्म जोडका, अडका जवळी नाहिं तथापि, आडकाठी ही कोणि न करितां, तीन देवड्या ओलांडुनियां, चौथें मुक्तद्वार हरीचें, वेंधतांचि देखिलें हरीनें, लगबग, लगबग, अंकीं रुक्मिणी बसली ते पर्यंकीं लोटुनि, उडी घालुनी, धांवत धांवत स्वयें येउनी, ब्राह्मणचरणीं मस्तक ठेवुनी, दंडवतानें मिठी घालुनी, उठीं उठीं म्हणतांचि सुदामा, चहूं भुजीं कडकडुनि आलिंगुनि, प्रेमबाष्प वारि तें लोचनीं स्फुंदत स्फुंदत कडे घेउनी नाचत नाचत, पूर्ति नव्हे प्रियमूर्ति द्विजाची निजासनीं बैसविली ॥श्रीकृष्णें० ॥५॥

ब्राह्मण बैसविला पर्यंकीं, त्याचें चरण मळले पंकीं, ते ठेवुनिया आपले अंकीं शंकितमति नाहीं द्विजरंकीं, जिंकिन केवळ, अंकितसा अवलोकित पंकज, अंकुरहस्तें शंकरसमान शंकर सुदामभूदेवाचे पाय चूरिले, जानु जंघा गुल्फ पद कठोर भिंगुळीका, आर्ती अंगुळिका, नखमातीसहीत ते सांवरिले, हळू हळू पदतळ कुरवाळुनिया कटक हरिले, सुगंध शीतळ निर्मळ जळ रखुमाई ओती कांचनपात्रीं, प्रक्षाळुनियां अंचळवस्त्रें पुसोनि निर्मळ हृदयीं धरिले, नेत्रीं लावुनि, मुकुट काढुनी, मस्तकिं वरिले, चंदनचौकीवरि विस्तरिले क्षणक्षणां अवलोकुनि

प्रेमें बहु आदरिले, स्वागत सुखशब्दांहीं भरिले, धन्योऽहं कृतकृत्य मतीनें मस्तकिं धरिले, चरणोदक सहकुटुंब सेवुनि, दांडे वांसे स्तंभ शिंपिले, नवकेशरघन-सारमलयपाटीरधनरसें भाळ चर्चिलें, सुखकारकशशिकिरणकरें उद्वर्तुनियां सर्वांग अर्चिलें, ब्राह्मणचरणीं तनु मन धन सर्वस्व अर्पिलें, दशांग गुग्गुळ, धूप कूपभर तूप, यूपसम मूळवर्तिका सूपसविस्तर दीपमाळिका कूप लाविले अमूप, मध्ये भूप विप्रवर रूप भव्य भरपूर आणि कर्पूर दिवे बहु परिमळ वाहे घव घव घव घव, ते तूपसाखर अमूप, वक्र करंज्या, शुभ्र फेणिया, पंचखाद्य नैवेद्य हृद्य मृदु दुग्धदधि, वाद्यपुरःसर गद्य पद्य, अनवद्य सद्य सुख विद्यमान, शुभ नवजलाशय, मध्य मध्य पानियासहित श्री आद्य हरीनें नैवेद्य, समर्पुनि वेदवेद्य ब्राह्मणापुढें त्या भरुनि पराता त्वरा करुनि पृथुपात्रें निवेदिलीं ॥ श्रीकृष्णें० ॥६॥

सत्यभामा छत्र धरी, सत्या शैब्या चामर वारी, जांबुवंती व्यजन सांवरी, भद्रा मयूरपिच्छ उभारी, सूक्ष्म दृष्टिने पक्ष्म न लावुनि लक्षुनियां पै उभी लक्ष्मणा, मित्रविंदा छत्र आतपत्र, कालिंदी इंदीवरसमान हस्ता जोडुनि संदी, तो द्विज वंदीं, आनंदित बहु अष्ट नायका, द्व्यष्टसहस्रा शिष्ट बायका, कृष्ण जिष्णुपदनिष्ठ तिष्ठती, इष्ट हरीसी अभीष्ट जाणुनि, मिष्ट मिष्ट रस प्रविष्ट करिती, मीठ मोहऱ्या मुष्टि भरुनियां, दृष्टि उतरती, ऊर्जित अदृष्टें कष्टरहित तो, हृष्ट पुष्ट संतुष्ट, मिष्ट मृदु विष्टरवासी, वसिष्ठ तैसा हृष्ट हृष्ट, उत्कृष्ट त्रिविष्टपश्रेष्ठ, देव श्रीपुष्पवृष्टिनें स्पष्ट भाळ अवशिष्ट शिखा, अस्पष्ट अशी त्या ज्येष्ठ हरीने कनिष्ठ होउनी, एकनिष्ठ ते ब्राह्मणकाया, दैवी संपत्ति, बरवी पूजियली ॥ श्रीकृष्णें० ॥७॥

सुंदर हंसतुळिकास्वपिती, वरुता ब्राह्मण जैसा नृपती, सेवेलागुनी स्त्रिया जपती, संनिध बैसला निमया त्रिपती, नम्र हस्तकें विप्रहस्त हस्तानें घेउनि, प्रशस्त चित्तें, कुशल प्रश्नें, वर्तमान मागील पुसे जो सुदामजीतें, 'तुम्ही आम्ही बाळपणीं, उज्जयिनीमाजी, घरीं गुरुजिच्या पढत असों तें आठवतें की, सांदीपिनि सद्गुरुची भार्या, आर्या जननी, इंधनार्थ रानांत पाठवी, वनांत आपण सर्पण वेचूं, काष्ठें संचूं, फिरतां फिरतां अकस्मात अकाळीं, प्रपंच काम दुरासद वायु झडझडी, क्रोध बोधुरिपु वीज कडकडी, लोभक्षोभकर मेघ घडघडी, आत्ममोहजळ लाटे भडभडी, मद मीपण कटु झाड कडकडी, मत्सररूप येत हुडहुडी, परमार्थाचा मार्ग चुकलों, गुरुपद....ग्राम मूकलों, असत्प्रलापें बहुत कष्टलों, आत्मसुखांतुनि वृथा भ्रष्टलों, अंधकार अज्ञानरात्रीं, घन तो गुरुसेवन साधन योगें, भाग्योदया कृत प्रातःकाळीं, गुरुमाऊली, आत्मपावलीं, धांउनि

आली, त्वरित पावली, मधुर बोलणें करीत साउली, 'कृष्ण ! कृष्ण ! सुदामा ! सुदामा ! विवेकविपाक हाक मारितां, आपआपणां सांपडलों, पायां पडलों, गुरुमाउलिच्या पोटीं दडलों, गुरु देवत, गुरु मायबाप, गुरु दीनबंधु, गुरु कृपासिंधु, गुरु बंधहरण, गुरु आद्यदीप, गुरु दुःख देखतां प्रसन्न जाहला, गुरु भक्तीनें गुरु मानवला, आत्मलाभ कृतकृत्यपणाचीं उषनिषदांतील शिरोवाक्यें वरदानें ओपियलीं. ।।श्रीकृष्णें० ।।८।।

'तुमचे दैव तें आहे तमाम, आत्मसुखीं हो अंतर्याम, सफलित झाला प्राणायाम, प्राप्त होईल धनसुतधाम, या वरदानें मी बळराम, ग्रथुनि रथ पृथु मथुरे आलों, मथुनि दैत्यखळ, जथुनि यादवदळ, तेथुनि निघुनियां, आतां येथेंचि राहिलों, तुम्ही निरंतर गुरुकुळवासी, गुरुआज्ञेनें समावर्तनें विवाह शुभ केला कीं नाहीं, प्रापंचिक बोला जी ! कांहीं, चित्त अनुकुळ नवरी मिळाली कीं सांगा, काय ? किती घरीं मुलें लेंकरें ? योगक्षेम कसकसा चालला, पहिल्यापासुनि तुमची वृत्ति उदास सदा, सदसदास ब्रह्मविदास, जगत्सुहृदास, सदास ने रतली उपनिषदास, न पावुनि विषयमदास, त्रासली मानसप्रिय वैराग्यभाग्य, समभोग्य योग्य, आरोग्य तुम्ही छांदोग्य, मृग्य अवधूत पूत हरिदूत मान्य पुरुहूतवंद्य' हें स्तवन करुनियां, अवघा घरिंचा समाचार बहु पुसुनि आपुलें महत्त्व गाळुनि, विप्रवराची क्षिप्र प्रसन्न मनोवृत्ति आनंदा पावलेली. ।।श्रीकृष्णें० ।।९।।

'तुमची भार्या तूर्याग्रहणी, शांती दया तियेला विहिणी, रुक्मिण्या दिजियेला बहिणी, आमुची वडील मान्य वहीनी, काय तियेनें पाठविलें ? तें आठविलें, मज भक्तिभातुकें, कोडकौतुकें, थोडें ही बहु गोडमोडकें पान भाजिचें, मोड फुलाचा, दोड फळाचा, रोड बदरीची फोड, जोडतां वोढवितों मुख धोड, खाजवनें खोड आमुची पतितपावन, होड नावरे, सोड सख्या ! तूं सोड गांठुडी,' म्हणउनि लज्जित, सुदासकरींचे पोहे हसडुनि, आवडिनें हरि सांवडितां, बचके विचकुनि, मुख आ पसरुनि, पृथुमुष्टि सुखें सेवियली, दुसरी मुष्टि धरी रखुमाई, मायिक चिद्‍ग्रंथि विभेदुनि, पृथुक–तंदुळात्मककणवर्जित बीजविवर्जित, केवळ विचारदुकूल जीर्णश्लथ श्रीभगवंतीं अर्पिताची सुटली; चतुष्टय महावाक्यमय विरागभक्ति, ज्ञानानुभवें पटाश्रिताते, तद्‍गत तत्पद आपुलें आपैसें घे, त्वंपद तें तूं ब्रह्म अससि हें असिपद घेतां, श्रीरुक्मिणीनें धरिला कर, निकरें निर्विकार, तालित व्हावया संप्रज्ञात, समाधिजानित, स्मृतिवृत्ति जननीनें हरिली. ।।श्रीकृष्णें० ।।१०।।

पोहे सत्कृत पोहे, चिद्रहस्य पोहे, सेवित जो हे, तो भव पोहे, दरिद्र नोहे, सुवर्ण लाहे, लाहे कामधेनुची पोहे, घरिंचे दोहे, सदनी मोहे, तो साम्राज्यपदीं आरोहे, तो हेमांबर नेसुनि सोहे, निजसुखमाहेरांतचि राहे, आत्मा आहे, हें मी बाहे, उचलुनि साहे, तयास बाहे वाहे, नयनीं पाहे, तो मज आहे, तुच्छवत् तद्‌गत भेद न साहे, त्याचे चरणरजीं अवगाहे, निगमप्रवाहे बाहे, त्याप्रती खाही वाहे, आहे संसाराची न लाहे, असें म्हणुनि श्रुति श्रवण मनन आणि निदिध्यास साक्षात्कारादिक मुठी ती शेवटील प्रियतर देवें चावियली ॥ श्रीकृष्णें० ॥११॥

(श्लोक)

सुदामाचे पोहे वरुनि वदनीं देत मिटक्या
अशी गोडी कैची अमृतगुटक्यामाजि लटक्या ।
न सीमा भामाद्यादिक अधरपानांत मिटक्या
असें श्रीभिक्षेचा विटति कुटक्यांमाजि तुटक्या ॥१२॥

(कटाव)

कृष्णें वृत्ति करूनि पांगोळी, आपुली वागवूनि आंगोळी, घालुनि मोतियांचि रांगोळी, करवी ब्राह्मणासि आंघोळी, चौकन्हाण विहिणीचें, तैसें ब्रह्म श्री बहिणीचें हिरवे नवे केळीचे, खांब कोवळे लांब लांब सह इक्षुदंड, वरि मंडप साखरनिंबोळ्यांचे घोंस पोसले, लाल दुरंग्या नारंग्या सारंग्या लटकति, द्राक्षांचे घड पिकले, रसाळ मधुप झोंबती, मुक्त लोंबती, वारिजात नयन फुल पारिजात शुभ्र चांदणे तयात खुलले, कमळ फुलारे फुलले, विठाबाइनें ठाणें सोडुनि, ठाणवया लखलखीत ठेवल्या, रावे हंस ज्यांस लाविले, नवरत्नांच्या चौरंगावरि, श्रीरंगानें झुलत सुखप्रद विप्र बसविला, पीतांबर पडदणीस देऊन, खंबाइती भरजरी नेसवुनि, दीनबंधुनें सुगंधराय, चमेली वरचांपेल बुक्याचा लेप देउनी, बेल फुलेल बुक्याचें उटणें, कृष्णहस्तिचें उष्ण उष्ण जळ, घंमघंम कर्पूरवर्तिका, वाजंत्र्यांचे बाजे वाजति, त्या फुलबाज्या, नळे हवाया चंद्रज्योति बहूत सूटती, मखरीं लोंबती घागरमाळा, घंटा घणघण, भंवत्या भंवत्या फिरति बायका, अष्टनायका, द्वारावतिचे कृष्णरावजी, त्यांचे बंधू वडील भावुजी, महा साउजी, जडावाचिया खडावांत हळु पाय देउनी, क्षीरोदक परिधान करवुनी, उंच दुशाल खुशाल समोर मशाल अति विशाल त्यांतुनि सुदाममूर्ति भोजनार्थ माजघरीं चालविली ॥ श्रीकृष्णें० ॥१३॥

मांडुनि स्वस्तिक सुवर्णपाट अडणीवरि सोन्याचें ताट, भंवता कलशाखांचा थाट, कांठीं वरण पिंवळे दाट, मीठमिरें, वरि आलें लिंबु तूतिया खोबरें, किसून कोशिंबीर सुंदर, अम्लरायतें, रुचिर आयतें कोमल अंगीं, सगळीं वांगीं, शुभ्र कारलीं, मेथी पोथी, बोथी केळे, कोथिंबिर हाळदीसह, काथी नाथी साथी चरुसह चाकवत चुका, चवळी पिवळी, कवळ्या शेंगा, चिमकुरादळ चिरुनि, चांगली चमचमित फोडणी देउनि चरारीत, चारोळी सांभारें, मउ चिमणी बोंडें, चिंचपान चिंचोलीं तोंडें, कोहळा कांशीफळें, कांकडी कुहिरिया, कमळकंद कोंवळि काजरी, दूधभोपळे, दिव्य दोडके, दाळ दिंड शेवाळ वाळकें, शेंगा सुरण अरुवार परवरें, पडवळी तोंडलीं कोंडलीं कंद मूळ फळ फूल पत्र तरू वेलमात्र घृतपाचित शाखा, वडे नसति वावडे, सार आवडे, तिखट तिळवडे, सारबिजवडे, सहित पापडे कथिक वडे, आणिक कोरवडे, शिऱ्या सगट गट पुऱ्या, बऱ्या गुरवऱ्या, काचोऱ्या सांजोऱ्या, मालत्या बोटवे, शुभ्र देखे, साय सहित शेवाया, शर्करा पायस लुचया, मोडे पांडुस्वर्ण पूर्ण पोळिया, घृतें घोळिल्या द्विजें गीळिल्या, दुरडी भरुनी घिरडीं, भाजुक साजुक, नाजुक राजसवाणे कानवल्यासीं मानवले, साखरफेण्या घिवर घारगे, मोतीचूर जिलेबी दळिया, बारिक ओदन, दे अनुमोदन, घमघमाट तो आमोद न राहे, भात केशरी परम कूसरी, दहीं दूध घृत मधु साखर, निंबू घन राब जांबभर, पन्हें फुराचें, मट्ठा मिट्ठा मटमटाबहु, मधुर लापसी, लोणकडें थिजलें गाईचें तूप, मधुर सुवासिक महा चंगाळ, थोर गंगाळ, वाटीभर एक एक घरींचें, सोळा हजार पदार्थ आले निजभाग्यें भोजनीं अन्न ब्रह्मरसानुभवानें विप्र जेविला, उरलें भानें, सादर नम्र समारंभानें, करिती प्रीतिनें पंचारति, सहस्र नव गंगेरी पानें, विडा अर्पिला अतिसन्मानें, कात रुक्म रंगेरी पानें, चिकणी सुपारी सोनेरी कोने, लवंग सोनेरी सवंग केले वेळा जायफळ सावर्णिपर्ण चूर्णकृत मौक्तिक भाजुनि चुना अर्कनिभ वर्ख शर्करा संक्षाळित हस्तें सेवितांचि कर्कगुरु सम गर्क सुदामा, तर्करहित नृप अलर्क तैसा समाधि शयनीं शयन करुनि इंद्रभुवनपद सुवर्ण पट्टण आत्मलक्ष दक्षणा लक्षशान मूर्तिमंत अगोदर देवें त्यासी न कळतां हुंडी करोनि गांवाची गांवा पाठविली ॥ श्रीकृष्णें० ॥१४॥

कदापि धन हरिलागिं न याची, वृत्ति अयाचित सत्य तयाची, निःस्पृहता मोहरा रुपयांची, कळली हरीस मुल्य तयाची, एक रात्रि हरि संगें कंठुनि कल्पसमय विकल्परहित श्रीकृष्ण चतुर्भुज सगुण ब्रह्म विलोकुनि, चिंतुनि,

स्नानसंध्या सूत्रमात्र चिन्मात्रपणें करि नित्यतृप्त आश्रित हरीचा, महानिराश्रय श्रुत्यंतैक श्रवणपरायण तो विगत श्रम स्वाश्रमासि चालिला, सुदामा औदासिन्यें स्थिति उदामा देखुनि, मानवला हरिनामा बोळवीत आता द्विजसंगें, कांहीं हरीस कधीं न मागे, हरि धांवें त्या मागें मागें, रमागेह सेवित पद मागें सर्वांगेंशीं पुढें पुढें हरि वेडा होउनि विप्र गड्याला पायघड्या, उघड्या बहु घाली, चहूं भुजानें लुगडयानें वरि करिन साउली, निधड्या मतिनें विड्या देत, सुखदुःख आपुलें जाहिर करुनियां, बाहिर निघुनि मग आहेर सहित, निज माहेर घरींहुनि लेकी विहिणी बहिणी बोळवीत पुढील मजलेची करूनि निश्चिती, ब्रह्ममूर्ति गौरविली ।। श्रीकृष्णें० ।।१५।।

मार्गी ब्राह्मण तो अविकार, जाणे विवेक मुख्य प्रकार, जवळी नाहीं एक० प्रकार, आठवि श्रीहरिचे उपकार, अधन मित्र जरि सधन होईल तरि साधनं-रहित मदबंधन पावल, आडवाटेनें धांवल; द्विज विसरल, अध कसें हे सरल, भव कधीं हो तरल, निज हित अंतरल, अतितरल मानस, काम तरळ भरल, अहिगरळ करळ भर काही उतरल, मन विषयिं चरल, भेदमति संचरल, अनु-चित अचरल, ज्ञान कोठुनि जिरल, आयुष्य किति हो पुरल, देह तारुण्य झुरल, बळ समूळ सरल, तैं झुरळ तसा प्राणि जन्मानें फिरल, तेथें अज्ञान शिरल, पुण्य कांहीं न उरल, किमपि न अवरल, मन विषयीं स्थिरल, लोभ अति पसरल, स्थितीहुनि घसरल, उपरम निसरल, अशि हरिला बहु माझी आली करुणा नव नव करुणाघन मोह धरणा हरि आपुलें म्हणवी, त्यासि धन नाहीं देत कांहीं असेल हित रितें हि हिरोनि कदा न हरिलें, हरि स्वरूप....हरि जवळि फिरत जरि असो म्हणों तरि नाहीं दुसरा, आजि सण दसरा, जग हरिमय निखिल सकळ अवकळ हे उपकृति हरिची सादर आठविली ।।श्रीकृष्णें० ।।१६।।

चाले आत्मसावधानी, मानस हरिच्या अनुसंधानीं, येतां आश्रमसंनिधानीं, देखे सुवर्णराजधानी, गरुडटके नेटके पताका, सोनटके मोटके चित्रिले, चहुंकडे लखलखाट, कांचन घाट, नद्यांचे पाट वाट, तरि चिंतामणिचे थाट, दाटकला द्रुम, सोपानवापिका, वने उपवनें, स्वच्छ जीवनें, कल्पलता सफलिता घरोघर दांडे वांसे किलच्च्या सोनें, खांब उथाळीं मोहत्या सोनें, भिंती आंत बाहेरही सोनें, पार सज्जा चौकटीस सोनें, बृहत्कपाटामध्यें सोनें आंगण जोत्यालागुनि सोनें, दिवाणखाना पाहतां सोनें, गजरथ हय पडशाळा सोनें, भाणवसा सोन्याची

चूल, उतरंडी मडक्कीं पाहतां सोनें, हंडे गंगाळेंही सोनें, शौच कराया माती हातीं घेतां सोनें, थवे बटकींचे देवांगना, अंगणांत बाहिरही सोनें, चुंबळ घागर तेंही सोनें, सुवर्णमय दशदिशापूर्ण आपणासहित जी सिद्धिऋद्धियुत अतिस्वर हरि अलापित, अजि कार्तस्वररमणीय घरें रत्नांचीं देउनि, स्वस्ति श्रीद्वारकाधीश अमृतेश्वरसंतें श्रीभगवंते ब्राह्मणास ब्रह्मानंदमय संपत्ति संतति शाश्वत अर्पिली ॥ श्रीकृष्णें० ॥१७॥

◇ ◇

निरंजन माधव

१. ऐशा रमणीय रैवतकागिरीं

चूर्णिका

भक्त पक्षपाती रमापती श्रीकृष्ण । मृगयेनिमित्तें फिरतां नानावनें । मेध्यमृग समूह करित कदन । मदनकोटिसुंदरें अकल्पित देखिला वीर अर्जुन । प्राची सरस्वतीतीरी पावन । पांथ कार्पटिक कृषगात्र वर्णविहीन । काषायवल्कल परिधान । पंचमळदिग्धांग पूर्ण । जैसा झांकला दिवामणि दुर्दिनें । तैसा स्वतेजतिरोधान करोनि करी भूभ्रमण । सकळतीर्थस्नानें पवित्रपण संपादोनि निस्पृहत्वें फिरे लोकचर्याजिज्ञासू सूज्ञमणी ॥१॥

ऐसाही जरी फाल्गुन देखिला । जो परिवारसेवकजनारहित एकला । मार्गश्रमें जरी सूकला । केशकूर्चस्मश्रुनखवृद्धि दीक्षाबद्धकार्पटिकवेषें जरि झांकला । नानामळें जरी माखला । तरी देखतांचि धनंजय । जैसा रत्नपारखी निजरत्न वोळखे तैसा वोळखिला । इंद्रनीळमणिभासुर सुंदरांग इंद्रनंदन देवकीनंदनें ॥२॥

अस्मिन्नवसरीं माध्यान्हकाळीं । सरिद्वरासरस्वतीजळीं । कृतस्नान आर्द्र मौळी । अर्घ्यप्रदानें तोषवोनि अंशुमाली । प्रसारितबाहू उपस्थानवेळीं । सवितृमंडलमध्य-स्थितनारायणध्याननिष्ठ अंतराळीं । बद्धदृष्टि ध्यानोत्सवें परमानंदहृदयीं तत्समयीं । साक्षान्नारायण पार्थदर्शनोद्विग्नमन । सूर्यमंडलांतर्गत निर्गतध्यानमूर्तीसमान । अनंत-मध्यान्हार्कभासुर तेज:पुंज नीलमेघ:शामवर्ण । शैल्य सुग्रीव मेघपुष्प बलाहक संयुक्तस्यंदन घणघणायमानघंटाध्वनीसीं सुसंपन्न । चतुर दारुकसारथीप्रेरित-दिव्य रथीं । अतिरथीमाजि धुरीण यादवपती । कुंतीकुमारें निरखिला । आनंद मानिला निजांतरीं ॥३॥

श्लोक

आला हा पक्षपाती हरि निजमनिंचा अर्थ तो पूरवाया।
आतां भेटेल मातें पसरुनि बरव्या मोकळ्या चारि बाह्या।
केलों मीं धन्य येणें म्हणउनि विसरे पार्थ तो देहभाना।
नेत्रीं बाष्पांबु लोटे गदगदित घडे कंठ तै बोलवेना ॥४॥

चूर्णिका

समीप देखतां श्रीकृष्ण नयनीं। साष्टांग आंग लोटोनि धरणी। मस्तक अर्पोनी रमाराधितकमलमृदुलचरणीं। अष्टभाव वोसंडला ते क्षणीं। नीर पूर वाहे नीरजदळसदृश लोचनीं। अपरमितानंदसंदोह अंतःकरणीं। पंडुकुमरा महावीरा ॥५॥

अतसीपुष्पसंकाश नीलवर्ण। मंदहास किरणसंयुक्त वदनचंद्र पूर्ण। कृपाकटाक्ष शोभित अरुणारविंददळनयनी मस्तकीं सूर्यकोटिसंकाश मुगुट विराजमान। कटिदेशी पीतमट सुवर्णवर्ण। मकरकुंडलघटित उदार समकर्ण। आपादलंबिनी वैजयंती वनमाला पावन। शंखचक्रगदारविंदादि वरायुधसंपन्न। भक्तार्तिनिवारक दीक्षित नारायण। कुमारनारदादिसुभक्तवंदितचरण। सदाचरणसंपन्न नरावतारी अर्जुन निजसखा देखतां आपुण। धन्योहं धन्योहं वचनोच्चारें कृतकृत्यता मानिली ॥६॥

देखतां नवघनःशामला। अर्जुन मनीं विश्रामला। मनोरथतरु उद्दाम अमृतफळेंशी फळला। किंवा चिंतदावपावकार्दिता अकाळीं महामेघ वर्षला। दरिद्रासि चिंतामणी जोडला। आयुष्यावसानीं धन्वंतरी आतुडला। तद्वत चित्तसरिते आनंदपूर वाढला। विकसितमुखनयनसंभ्रमें ऊठला। भुजद्वय पसरोनि कडकडोनि भेटला। चतुर्भुजमूर्तीस सखामणी ॥७॥

सच्चिदानंद विग्रह परिरंभ। हृदय हृदया मिळतां उदित झाला संतोष स्वयंभ। तो अनिर्वाच्य सकळभुवनाधारस्तंभ। अंबुजसंभवाद्यखिल जगदारंभ। अमरोरगनरेंद्र मुनींद्रवंदितचरण निजजनभयहरण समारंभ। निज मित्र पार्था भेटला। सकळ सुखाचा दिवस वाटला। संताप सागर आटला। श्रीकृष्णें करुणाकटाक्षें विलोकितां ॥८॥

तैसाचि आनंद आनंदनिधी श्रीकृष्ण मानसा। देखोनि निजसखा अर्जुन प्राण तसा। वियोगविरहव्याकुळ बहुत दिवसा। भेटोनि अत्यंत सुखावला।

वत्स धेनूसम पान्हावला । कृपणगतधनप्राप्तिसम धनंजयलाभे संतोष मानिला । पाहे वेळोवेळा आस्यकमळा कमलायताक्ष अंतःप्रेमपुरःसरें नरहरी ॥९॥

प्राचीसरस्वती सरिद्वरातटीं । महावनीं वटविटपिनिबिडछाया तळवटी । पार्थसखासहित श्रीकृष्ण जगजेठी । अर्घ्यादिपूजा पावोनी संतुष्टीं परमानंदभरित पोटीं । पुसे स्वागतादि कुशल गोष्टी । सृष्टिस्थितिलीलानाटकसूत्रधार नारायण जगद्गुरु ॥१०॥

सर्वज्ञ सर्वेश्वर सर्वांतर्गत सर्वाधार । निजजनकामपूर मंदार । मंदरोद्धर गुणसागर । सुरमुनिजनकिंकर सेवितांघ्रिकल्हार । परात्पर परमहर्षे अर्जुनासी अनुवादला ॥११॥

कां रे सख्या अकाळींच झणीं । धर्मराज वृकोदर नकुळ सहदेव याज्ञसेनी । परम वृद्ध पवित्र पृथाजननी । व्यास धौम्यादि महामुनी । महावैभव इंद्रप्रस्थ राजधानी । त्यजोनि एकलाचि दंडपाणी । किन्निमित्त कार्पटिक वेष स्वीकारिला सद्गुणखाणी । अत्यंत श्रम पावलासि नाना देशाटणीं । तीर्थ स्नानें काया पावनी । करोनि आलास हेत धरोनि माझ्या दर्शनीं । सांगोनि शीतळ वचनीं निववी मज ॥१२॥

ऐशी सुधाकल्प मधुरवाणी । भगवन्मुखनिर्गत प्रेम सौरभ्यसहायिनी । ऐकोनि पुरली पार्थाची शिराणी । जैसा नीलकंठ परिसतां नवनीरदध्वनी । परमानंदें नाचे देहभान विसरोनी । तैसाचि पांथ परिभ्रमणश्रम कृषगात्र असतां गांडीव-पाणी । पीतामृतासमान पुष्टि मानोनि करी कथनी । सकळ वृत्तांत सर्वज्ञ-शिखामणि श्रीकृष्णचरणीं । भावबद्ध पांडुराज प्रियनंदन । सज्जनसंतापपरिहारक चंदन । वंदन करोनि अतिप्रेमें ॥१३॥

सर्वज्ञा तुजला नसे विदित तो वृत्तांत कोठें असे ।
तूं सर्वात्मक वासुदेव पुससी अज्ञानवंतें जसें ॥
आता वंदुनि सांगतों परिसिजे त्या इंद्रप्रस्थांतरीं ।
होतों धर्मसुतासमेत सुहृदीं त्वां ठेविलें त्यापरी ॥१४॥

विप्राचें धन दुष्ट दैत्य हरितां रात्रीं त्वरें पातला ।
आक्रोषें मज धांव धांव म्हणतां देखें द्विजा विव्हळा ॥
तेव्हां चापनिषंग खड्गकलना गेलों गृहाभीतरीं ।
तेथें धर्मनिरीक्षिला द्रुपदजासंगें विलासांतरीं ॥१५॥

रात्रीं दैत्य सुदुष्ट चोर वधिला धांवोनियां सत्वरें ।
दिल्हीं तें धनगोधनें मुनिवरा वंदोनि अत्यादरें ॥
प्रायश्चित्तनिमित्त नारदमतें तीर्थावगाहाप्रती ।
आलों स्नान करोनि दुष्कृत तरू संछेदिला श्रीपती ॥१६॥
आलों द्वारवतीसमीप तुझिया इच्छोनियां दर्शना ।
तूं आलासि जगत्रयादिजनका धांवोनि नारायणा ॥
झालें पादसरोजदर्शन मला जे कोटि जन्मांतरीं ।
केली पातकपंक्ति दग्ध घडली मी मुक्त झालों हरीं ॥१७॥
झालों धन्य पुनीत मी निजकुळाकोटीसमेतें हरीं ।
झालों मी कृतकृत्य आणिक मनीं इच्छा नसे दूसरी ॥
आता त्वां परमेश्वरा लघुतरा या किंकरा कारणें ।
दिल्हें दर्शन हेत पूर्ण घडला झालें दशा पारणें ॥१८॥
चित्तीं एक असे तुला पुसतसे दासांचिया वत्सला ।
आला नारद मत्पुरीस कथिला वृत्तांत तेणें मला ॥
तूझी जे भगिनी सरोजनयना देवी सुभद्रा हली ।
देताहे अपुल्या मतें सुविधिनें दुर्योधना ऐकिली ॥१९॥
नातें तें अमुचें समीप अथवा अंधात्मजाचें हरी ।
तूझी ते अनुजा वरील न कळे कोणा गुणें साजिरी ॥
आहे भाव तुझ्या पदीं नरहरी त्याचा कसा जाणसी ।
आम्ही दास तुझे अनन्य म्हणवों आहों तुझ्या मानसीं ॥२०॥
हेंही वृत्त तुला पुसोनि करिजे बीजें स्वदेशाप्रती ।
चिंता नित्य करी युधिष्ठिर मनीं ते वृद्ध माता सती ॥
झालों धन्य कृतार्थ आणि तुझिया संदर्शनें अच्युता ।
येतों लोभ धरी असोंचि पदरीं तूझ्या अम्हीं सर्वथां ॥२१॥
ऐशी ऐकुनि पार्थभाषितगिरा तोषें हरा त्या वदे ।
तूतें आणि निरीक्षिलें बहु दिसां संतुष्ट झालों मुदें ॥
आहे मात यथार्थ नारदमुनी सांगे तसी सुंदरी ।
अर्पावीच सुयोधना म्हणुनियां अत्याग्रहा आदरीं ॥२२॥
तूझ्या ठायीं सुभद्रा कृतमति विलसे ते न इच्छी परातें ।
मातापित्रामनींही दृढ नियत असे अर्पिजे हे नरातें ॥

एका रामाविना ते अणिक न मनिती धार्तराष्ट्रासि देणें ।
तालांकासी कदांही न वदति पितरें स्नेहविच्छेदभेणें ॥२३॥
आता साधीन कार्या तव नियत सख्या सांगतों मी उपाया ।
जेणें तूतें सुभद्रा वरिल न लगतां साहसातें कराया ॥
तेव्हां संपूर्ण माझे फळतिल मनिंचे अर्थ ते वीरराया ।
योग्यातें योग्य दीजे म्हणति सुजन, ते योग्य तुला वराया ॥२४॥
आले वार्षिकमास सान्निध पहा वीरा ययाकारणें ।
चातुर्मास निवास युक्तचि असे एका स्थळी राहणें ॥
यामध्येच सख्या मनोरथ तुझा म्यां पाहिजे साधिला ।
यासाठीच उपाय एक सुचला तो सांगतों मी तुला ॥२५॥

चूर्णिका

रैवतनामा गिरिराज वरिष्ठ । तो तंव बळिरामासि परम इष्ट । सदैव ललना–समूहसमेत यथेष्ट । क्रीडा विनोद व्याहाळीं उद्देशें प्रकृष्ट । महा भूधरीं रमतसे उत्कृष्ट । वारुणी मदिराप्रसक्त ॥२६॥

रसाधीश्वरवरुणप्रेषित । सुरादेवी तरुकोटरीं निवसत । तेथें हलायुध घेवोनि अंगना–शत । क्षीब विव्हळित एकांतरत । विजनवनकुसुम–किसलय–मंडित । सफळ शोभा–विलोकन–मुदित । विविध तांडवादि चेष्टा करी पूर्णकाम सप्रेमें ॥२७॥

तया पर्वतीं पाहोनि उत्तम दरी । तेथें सुरम्य आश्रम पर्णकुटिका मठिका करीं । होवोनि–त्रिदंड–संन्यास वेषधारी । कुटीचक–बव्होदक–प्रकारीं । सानंद तेथें वसती करी । क्रीडार्थ येईल श्रीराम सहपरिवारीं । देखोनि हंसस्वरूप अत्यादरीं । परमहंसगति परम–प्रीतिपुरस्सर नेयील निजमंदिरीं । यतिजनप्रिय परम दैवत आत्माराम आनंदनिधि भुवनधर्ता ॥२८॥

तदनंतर पुढील कार्याचा संदर्भ परोपरीं । मींच घडवीन तुझा कैवारी । प्रेरक मीं असे सर्वांतरीं । आतां विशेष चिंता न करीं । निजवृत्ति परम समाधानें धरी । धैर्यावलंबें पांडुतनया प्रतापनिधी ॥२९॥

ऐसें गुह्य कथोनि देवकीजठराकर–नीलरत्नें मुनिजन–हृदयभूषणें नारायणें । करितां निजपुरास प्रयाण । परम सुभट फाल्गुन । स्वकार्यतत्पर सकळकळाप्रवीण । त्रिदंडसंन्यासवेषांगिकारोन करी गमन । रैवतक महानगरीं प्रवेशला ॥३०॥

त्रैलोक्यव्यापक महागिरी। पाद प्रवेशले पाताळवरी। मस्तक अंतरिक्ष नक्षत्रमंडल धरी। महावन घोरांधारी। जेथें इभ-भग्न-द्रुमाच्या हारी। संघशा फिरती यूथप सहपरिवारीं। वासित निमित्तें मदमत्त करी। युद्धसमयीं विदारित-दंत-गंडस्थळ-गळित मुक्ताफळ-निकरीं। वसुंधरा मंडित दिसे बहुपरीं। सुर सिद्ध गंधर्व यक्ष किन्नर किंपुरुष सुंदरी। नाना विमळ सलिल सरोवरीं। विराजित कुमुदोत्पल-कल्हारीं। निजदयित-नायकसमेत क्रीडाभरीं। निजकुचकलश-रेखित-कुंकुम-मृगमदामोद-सुवासित-नीरीं मज्जन करोनि सालंकारीं। रमण करिती वनविहारीं। विलोकितां विस्मय मानोनि अंतरीं। पाहे गिरिराज परमशोभा ॥३१॥

जेथें महामृगांचीं गणें। फिरती निबिड नितांत निर्भय मनें। जातिवैर त्यागोनि हर्षायमानें। रामप्रभावशासनें। सिंह शार्दूल गवय गंडक हरिण। रोहित सामर वराह वृक जंबूक शाखामृगद्यानेकवर्णें। व्याल नकुल शशकांत सत्वजाति भिन्न भिन्न। पाहोनि कुतुकायमान अंतःकरणें। विस्मय मानी पार्थमणी ॥३२॥

जेथें मणिशिला अतिविचित्र। कृष्ण रक्त पीत धवळ हरितमिश्र चित्र-विचित्र। स्वदीप्तीनें नैशतमहरणीं स्वतंत्र। स्वप्रकाश करिती दिनकल्प पवित्र रत्नश्रेणी ॥३३॥

सौवर्णराजत ताम्र सीस गैरिक मनःशिलादि धातुखाणी। निजांगरंगें नानावर्णी। तेणें परम शोभायमान धरणी। धरणीधर धरणीधरदयित समर्थ सकळ गुणी। रमवी मना सुजनाचिया ॥३४॥

जेथें कल्पतरुसमान तरुवर। शीतळ छायेशीं मनोहर। सदैव पत्रकुसुम फळभार। आंगीं धरोनि सकळ शरीर। अर्पिती परोपकरणप्रचुर। श्रीराम संतोषकरणी अत्यादरपुरःसर। परमानंदें डोलती। मंद-पवन-संचीरें वेल्हावती। निजशाखा-कर पसरोनि खेंव देती। अत्यानंदें परस्परें ॥३५॥

रसाळ जंबु जंबीर ताळ। तमाळ हिंताळ नीप निचोळ। अशोक पारिजात प्रियंगु प्रियाळ। जपा दाडिम चंपक चंदन बकुळ। करंज बदर पुन्नाग पाटल। भल्लातक हरीतक बिभीतकामल। धव तगर करवीर कोल कंकोल। खर्जूर केतकी जातिफळ। लोध्र तिंदुक मातुलिंग मंदार वंजुळ। नारिंग नारिकेळ बेल। कदली पूग आम्र आम्रातक तिंत्रिणीं विशाल। वटाश्वत्थ पलाश पुष्कळ। अगणित तरुवर अखिल। सपल्लव सपुष्प सफळ रूपें विराजमान। अनेक नगराज शिखरिराज या विराजविती ॥३६॥

जैसे श्रीमंत जन निजमंदिरीं। श्रीमद्पुष्ट निजदयितासमालिंगनें मुदित मनांतरीं। तैसेचि तरुवर निजवनितालतालिंगनें तोषायमान नानापरीं। माधवी कुंद जायी जूयी। मल्लिकादि वल्लीका परिवेष्टित सानंदांतरीं। मदमत्तसमान डोलती। पुष्पविकासें हांसती। कोरकमिसें दंतद्युति प्रकाशिती। अरुण–पल्लव मिसें शोणाधर विकासविती। किंशुक-मिसें पितांशुक परिधान करिती। पिकरव मिसें पंचमराग आलापिती। शुकभाषण मिसें बोलती। केकामिसें निजप्रिय वारि वाहासि बाहती। ऐशा विलासें विलसती। वनकुळ भूषण तरुण–भूरुह-राज निजवैभवें ॥३७॥

ऐसा रमणीय रैवतगिरी। देखतां अर्जुन परमानंदयुक्त मनांतरीं। निजवासार्थं सकळ काळ सुखावह पाहोनि दरी। मणिमय गुहांगिकारी। जल–वात–शीत–सहनक्षम क्षेमकारी। मनरंजनें निजानंद उद्बोध करी निरंजन श्रीकृष्ण ध्यानधाराप्रवाहाविच्छिन्न घटणानुकूल बरी। कंदमूळ–फळपुष्पजळसमृद्धि समीप तरीं। समस्त लक्षण लक्षित धरी श्रीहरी–आज्ञानुसारें हरिताश्वनंदन हरिमित्र हरिध्वज हर्षमानी ॥ ३८ ॥

तेथें काषायवास वल्कल मृगाजिन पीठ पादुका। बृषी त्रिवेणु सूत्र शिखा। समेत त्रिदंडधारी संन्यासी नेटका। एकाकी सस्पृहांतर परि निस्पृहासारिखा। वसोनिं जन मोहनार्थ मात्र वेष धरोनि निका। निजनेमाचरणें क्रियायोगें श्रीकृष्णकोमलकमलसदृशचरणारविंदाराधनध्यानैकनिरत पांडुराजतनय परम-हंसचर्या आचरे ॥ ३९ ॥

नवतुळसीदळमंजिरीहरितें। आम्रकिसलियें सुशोभितें। करवीर केतकी परिजातें। पाटल चंपक बकुळ बिल्व प्रवाळ समेतें। मल्लिका जाती कुंद-मंदारयुक्तें। शतपत्राद्यनेकसुमें प्रशस्तें। शामल कोमल दूर्वांकुरें एकचित्तें। श्रींकृष्णसहस्र नामादि स्तोत्रपाठनिरत प्रेमांतरें गद्‌गदितें। पार्थ श्रीकृष्णचरणार्चन करी त्रिकाळीं ॥ ४० ॥

ग्रीष्मऋतुपर्यवसानीं। जलदाकुलगगन निरीक्षितां नयनीं। घनगर्जन विद्यु-त्पातादि भयप्रदानीं। निर्भयमनें प्रारब्धैकदृष्टि परमसुखानुभूति मनें सुखासनीं। पांडव – रत्नहार – मध्यमणी। श्रीकृष्णसखा सकुमारमूर्ति सर्वांगसुंदर नवयौवन-मंडित मदनसदृश मनोहर। पुरवनिता – मनांतरीं कामदेवमहोत्सव – निर्माण-कारी। यतिवेषधारी तपश्चर्या करी अति तोषें ॥ ४१ ॥

◇ ◇

१. एकनाथ चरित्र

श्रीगणेशाय नमः ।। श्रीधेनुकासुरमर्दनाय नमः ।। आजि अमृतसिंधूसी भरतें आलें ।। की ब्रह्मविद्येचें भांडार उघडलें।। कीं वासरमणीचें तेज भलें ।। हृदयीं प्रगटलें श्रोतयांचें ।। १ ।। नातरी शुद्ध ज्ञानाचें गुज ।। कानीं अवचट पडिलें सहज ।। कीं मोक्षयुक्तीचेंही बीज ।। लाधलें आज निजभाग्यें ।। २ ।। कीं हा मंत्रराज मंगळनिधी ।। दैवदशेनें प्रगटला आधीं ।। कीं वैराग्यविवेकाची बुद्धी ।। भक्तकथेसंबंधीं पातली ।। ३ ।। नातरी शांतीचें निजसुख ।। कीं विवेकवल्लीचें उगवलें रोंप ।। कीं आनंदसुखाचा हरिख ।। प्रगटला देख भूमंडळीं ।। ४ ।। कीं वैराग्याची निरपेक्षता।। कीं भूतदयेची ही ममता।। कीं प्रेम आवडी तत्त्वतां ।। ते हे भक्तकथा रसाळ ।। ५ ।। कीं सायुज्यतेचें निजधाम ।। कीं कीर्तनसुखाचें हें प्रेम ।। कीं निर्विकल्प प्रगटला कल्पद्रुम ।। कीं साधन निष्काम म्हणावें ।। ६ ।। मागिले अध्यायीं एकनाथ ।। परीक्षा करूनि वाळिला गृहस्थ ।। जेवीं पितळ तावितां अग्नींत ।। काळे दिसत दृष्टीसी ।।७।। कीं कसवटी लावितां सुवर्णासी ।। डांकलग दिसे हीनकसी ।। मग परीक्षक सोडून देती त्यासी ।। न ये मानसीं म्हणोनियां ।। ८ ।। नातरी वेश्येचें सुंदर गायन ।। परी विरक्त तेथे न घालिती मन ।। कीं राजमंदिरींचें वर्षासन ।। पवित्र सज्जन न घेती ।। ९ ।। कीं एकचि शीत चांचपटोनी ।। भात पाहती सुगरिणी ।। तेवीं एकनाथें त्यास मागोनि पाणी ।। कुचर निजमनीं ओळखिला ।। १० ।। षोडशोपचारें नित्य पूजा ।। सद्भावें अर्पीत अधोक्षजा ।। साहित्य द्यावयासी नाहीं दुजा ।। हें गरुडध्वजा जाणवलें ।। ११ ।। म्हणे माझे पूजनीं अति आवडी ।। एकनाथासी प्रीति लागली गाढी ।। तरी निजांगें जाऊनि तांतडी ।। कार्य लवडसवडी साधावें ।। १२ ।। ऐसें बोलूनि द्वारकानाथ ।। ब्राह्मणरूप धरूनि त्वरित ।। प्रतिष्ठानीं येऊनि अनंत ।। पुसे वृत्तांत लोकांसी ।। १३ ।। जो अंतरसाक्ष चैतन्यघन ।।

ब्रह्मांडनिवासी जगज्जीवन ॥ तो एकनाथाचें पुसे सदन ॥ ठावें असोन अंतरीं ॥ १४ ॥ म्हणे या ग्रामांत वैष्णववीर ॥ श्रीकृष्णपूजनीं अति सादर ॥ ब्राह्मण-भोजन करीं निरंतर ॥ तयाचें मंदिर कोणतें ॥ १५ ॥ ऐसें बोलोनि घनसांवळा ॥ त्याचे मंदिरांत प्रवेशला ॥ नरनारी दाविती ते वेळां ॥ मग नमस्कार केला तयासी ॥ १६ ॥ एकनाथासी म्हणे जगज्जीवन ॥ मी अनाथ परदेशी ब्राह्मण ॥ तुम्ही नित्य करितां ब्राह्मणसंतर्पण ॥ ती कीर्ति ऐकून मी आलो ॥ १७ ॥ तरी मज वस्त्र अन्न घालावें पोटभरी ॥ मग मी येथेंच राहीन निरंतरीं ॥ सांगाल कार्य तें करीन सत्वरीं ॥ आळस अंतरीं न आणितां ॥ १८ ॥ एकनाथ पुसती त्याकारण ॥ तुम्ही कोठें असतां कोण ॥ काय परिवार असे जाण ॥ नामाभिधान कोणतें ॥ १९ ॥ ऐकोनि म्हणे रुक्मिणीपती ॥ मी एकला एकटा असें निश्चितीं ॥ पुत्र दारा आणि संपत्ती ॥ कांहींच नसती मजलागीं ॥ २० ॥ तुमचा प्रसाद सेवून येथ ॥ सेवा करावी अनन्यचित्त ॥ ऐसा निजमनीं धरूनि हेत ॥ आलों त्वरित या ठायीं ॥ २१ ॥ आणिक स्थळें पाहिलीं बहुत ॥ परी सांप्रत कोठें न रमे चित्त ॥ वचन ऐकोनि एकनाथ ॥ आश्चर्य करीत मानसीं ॥ २२ ॥ म्हणे तुमची इच्छा असेल जरी ॥ तरी राहावे आमुचें मंदिरीं ॥ ऐसे ऐकतांचि श्रीहरी ॥ संतोष अंतरीं मानीतसे ॥ २३ ॥ जो ब्रह्मादिकां पूज्यमान ॥ शिवादि करिती ज्याचें ध्यान ॥ तो लीलानाटकी जग-ज्जीवन ॥ ब्राह्मणजन जाहला कीं ॥ २४ ॥ ज्याची कीर्ति वर्णितां चोखडी ॥ श्रुति पुराणें झालीं वेडीं ॥ तो गंगोदकें भरूनि कावडी ॥ लवडसवडी धांवतसे ॥ २५ ॥ क्षीरसागरीं प्रभाकर बेट ॥ तेथें शेषशायी वैकुंठ पीठ ॥ तों प्रातःकाळ होतांचि उठे ॥ देहासी कष्ट न मानितां ॥२६॥ अष्टांगयोगसाधनीं जाण ॥ योगी शिणती जयाकारण ॥ तो देवपूजेसी उपकरण ॥ सोज्ज्वळ उटोन देतसे ॥२७॥ सुकुमार सांवळा रुक्मिणी-कांत ॥ सायुज्यदानी जगविख्यात ॥ तो सडासंमार्जन करूनि त्वरित ॥ देवघर सारवीत निजांगें ॥२८॥ जयाच्या चरणापासूनि निश्चितीं ॥ प्रगट जाहली भागीरथी ॥ तो देवपूजेसी अग्रोदक प्रीतीं ॥ भरूनी श्रीपती ठेवितसे ॥२९॥ अठ्यायशीं सहस्र ऋषी जाण ॥ सद्भावें ज्याचें करिती अर्चन ॥ तो ब्राह्मण होऊनि जगज्जीवन ॥ उगाळी चंदन निजप्रीतीं ॥३०॥ अष्टसिद्धि सकळ दासी ॥ जयासी ओळंगती अहर्निशीं ॥ तो हार गुंफोनि हृषीकेशी ॥ देवपूजेसी ठेवीतसे ॥३१॥ चंद्र सूर्य नक्षत्रराज ॥ ज्याचें योगें दिसती सतेज ॥ तो दिपक सरसावी अधोक्षज ॥ परी मनीं न लाजे सर्वथा

॥३२॥ सकळ सुरगण इंद्रादिक ॥ जयाचे म्हणविति आज्ञाधारक ॥ तो देवपूजेचे उपचार अनेक ॥ एकनाथासी देतसे ॥३३॥ कृष्णा म्हणोनि हांक मारितां ॥ तंव पुढें सादर होय अवचिता ॥ कोठें अंतर न पडे सर्वथा ॥ सावधानता सर्वकाळ ॥३४॥ चंदन देतसे उगाळून ॥ कोणी म्हणती श्रीखंड्या ब्राह्मण ॥ नगरवासी सकळ जन ॥ आश्चर्य मनीं करिताती ॥३५॥ म्हणती एकनाथाचें घरीं ॥ एक ब्राह्मण करितो चाकरी ॥ कांहीं वेतन न घेता पदरीं ॥ अवघी भरोवरी करीतसे ॥३६॥ एकनाथासी न कळत ॥ मंदिरांत जाती द्वारकानाथ ॥ कांतेशीं धंदा करूं लागत ॥ उल्हासयुक्त निजप्रीतीं ॥३७॥ सडासंमार्जन पात्रें धुवून ॥ उशीर होताचि करी घुसळण ॥ म्हणे कार्य सांगाया मजकारण ॥ संकोच मनीं न धरावा ॥३८॥ विलंब होतांचि घनसांवळा ॥ निजांगें झाडीत पाकशाळा ॥ साहित्य घेऊनी एकवेळां ॥ स्वयंपाकासी निघतसे ॥३९॥ होतां कार्याची आडाआडी ॥ आपण निजांगें द्विजांसी वाढी ॥ त्या अन्नासी अधिक लागे गोडी ॥ नवल परवडी अभिनव ॥४०॥ उदक वाढीत जगज्जीवन ॥ तें प्राशन करिती जंव ब्राह्मण ॥ तंव अभिनव गोडी त्याकारण ॥ विस्मितमन होताती ॥४१॥ उच्छिष्टें काढावया लवडसवडी ॥ त्या देवास अत्यंत आवडी ॥ ओंचे खोंवूनियां तांतडी ॥ अन्न सावडी निजहस्तें ॥४२॥ प्रीतीनें धरूनि पत्रावळी ॥ बाहेर टाकीत वनमाळी ॥ हस्त प्रक्षाळून ते वेळीं ॥ भूमिका जळें धूतसे ॥४३॥ एकनाथाचीं मातापिता ॥ क्रमोनी गेलीं आयुष्य सरतां ॥ तों एक वर्तली अभिनव कथा ॥ ते परिसा आतां भाविक हो ॥४४॥ एकदां पितृतिथि येतां जाण ॥ ब्राह्मणांसी दिधले आमंत्रण ॥ म्हणे उदयिक तुम्हां पितृक्षण ॥ भोजनासी येणें निश्चित ॥४५॥ प्रातःकाळीं उठोनि सत्वरगती ॥ गृहांत करविली पाकनिष्पत्ती ॥ दीड प्रहर येतांचि निश्चितीं ॥ स्नानें सांगितलीं विप्रांसी ॥४६॥ जेथें श्रीकृष्ण ब्राह्मणजन। तेथें साहित्यासी काय उणें॥ धोतरजोडे दक्षिणा सुवर्ण ॥ द्विजांकारणें सिद्ध केलीं ॥४७॥ मग स्नान करूनि सत्वरगती ॥ एकनाथ आले मंदिराप्रती ॥ उपरीवरी जाऊनि निश्चितीं॥ धोत्रे वाळविती तेधवां ॥४८॥ तों अनामिक आणि त्याची कांता ॥ बिदीस झाडिती उभयतां ॥ पक्वान्नांचा सुवास तत्त्वतां ॥ आला अवचिता तयासी ॥४९॥ मग अंत्यजासी कांता बोले उत्तर ॥ अन्नाचा सुवास येतसे सुंदर ॥ हें आपुल्यासी प्राप्त नव्हे साचार ॥ खातील द्विजवर भाग्याचे ॥५०॥ तेव्हां अनामिक म्हणे स्त्रियेसी ॥ तूं व्यर्थचि कासया लाळ घोंटिसी ॥ हें उष्ण उष्ण पक्वान्न आपणासी । आपल्या जन्मासी

लाधेना ॥५१॥ आजि याचे घरीं श्राद्ध जाण ॥ उच्छिष्टही टाकिती पुरोन ॥ तुवां नेणोनियां मूर्खपणें ॥ वासना मनीं धरियेली ॥५२॥ वृषभ गेला लग्नाप्रती ॥ तरी समर्थ कडबा त्यासी देती ॥ तेवी पक्कान्नभोजन आपुले संचितीं ॥ कोठोनि असेल निजकांते ॥५३॥ ऐसी परस्परें बोलतां वाणी ॥ एकनाथाच्या पडिली श्रवणीं ॥ मग खाली उतरूनि तये क्षणीं ॥ कांतेलागोनि पुसतसे ॥५४॥ म्हणे अनामिक दोघें झाडिती ॥ त्यांनीं पक्कान्नभोजन इच्छिलें चित्तीं ॥ तरी घरांत जाहली पाक निष्पत्ती ॥ तें भोजन त्यांप्रती घालावें ॥५५॥ यावरी कांता बोलत ॥ अन्न तों निपजलें असे बहुत ॥ तरी मुलांलेंकरांसमवेत ॥ अतिशूद्र समस्त बोलावा ॥५६॥ दोघांसीच जरी घातलें भोजन ॥ तरी इतर अतृप्त राहतील जाण ॥ ते जाऊन सांगतील त्यांकारण ॥ मग येतील धांवून सकळिक ॥५७॥ तरी आधीं बोलावून सकळांप्रती । भोजन घालावें सत्वरगती ॥ जनार्दन आहे सर्वां भूतीं ॥ तरी करावी तप्ति अनामिकां ॥५८॥ मग बाहेर येऊन तत्काळ ॥ अंत्यज बोलाविले सकळ ॥ बिदीस बैसवून ते वेळ ॥ अति कळकळ निजमनीं ॥५९॥ करावया ब्राह्मणपूजन ॥ गंधाक्षता पुष्पें सुमन ॥ साहित्य ठेविलें होतें करून ॥ तें केलें अर्पण अनामिकां ॥६०॥ शूद्रांहातीं पात्रें मांडवून ॥ तयांसी वाढविले पक्कान्न ॥ घृत शर्करा शाका लवण ॥ बाहेर आणोनि ठेविलीं ॥६१॥ जनीं जनार्दन आहे निश्चित ॥ हा भाव जाणोनि चित्तांत ॥ संकल्प सोडी एकनाथ ॥ भोक्ता कृष्णनाथ म्हणूनियां ॥६२॥ ग्रास घ्या म्हणतां त्यांकारणें ॥ अनामिक सेविती पक्कान्नें ॥ मुलें लेंकुरें थोर लहानें ॥ करिती भोजनें यथारुचि ॥५३॥ देखिला ऐकिला नव्हता कर्णीं ॥ तो रस लाधला त्यांलागूनी ॥ म्हणती धन्य एकनाथा तुझी करणी ॥ आम्हां लागोनि तृप्त केलें ॥६४॥ आम्ही अंत्यज यातिहीन ॥ देखिलें नव्हतें कधी अन्न ॥ तूं दयावंत वैष्णव जाण ॥ केली आठवण जन्मवरी ॥६५॥ जें जें अपेक्षित ज्यांसी ॥ मागतां तैसेंच वाढी त्यांसी ॥ तृप्त केलें सकळिकांसी ॥ विडे समस्तांसी दीधले ॥६६॥ उरलें अन्न होतें घरीं ॥ तेंही घातलें त्यांचे पदरीं ॥ मग सडासंमार्जन करूनि मंदिरीं ॥ पात्रें झडकरी भूतलीं ॥६७॥ आणिक सामग्री उदक देऊनी ॥ पाकासी घातल्या स्वयंपाकिणी ॥ पहिल्याहूनि दशगुणी ॥ निपजलीं गृहीं पक्कान्नें ॥६८॥ ब्राह्मणांसी सांगितलीं होतीं स्नानें ॥ तयांसी कळलें हें वर्तमान ॥ कीं तुम्हांआधीं एकनाथानें ॥ अंत्यजां भोजन दीधलें ॥६९॥ एकमेकांसी बोलत वचन ॥ हें तंव अघटित केलें तेणें ॥ आम्हां देऊन पितृक्षण ॥ घातलें भोजन अनामिकां ॥७०॥ विप्र

होऊनि क्रोधायमान ॥ विचार करिती अवघेजण ॥ आजपासोनि या भ्रष्टाचें अन्न ॥ कोणी न घेणें सर्वथा ॥७१॥ मग सकळ शास्त्रज्ञ झडकरी ॥ पातले एकनाथाचे घरीं ॥ सक्रोध होऊनि त्या अवसरीं ॥ कठोर शब्दें ताडिती ॥७२॥ म्हणती ऐक रे कर्मभ्रष्टा ॥ तुवां अघटित केल्या चेष्टा ॥ ब्राह्मण न जेवतांचि दुष्टा ॥ अंत्यजां आधीं पूजिलें ॥७३॥ आजि तुझे वडिलांची पितृतिथि देख ॥ ते काय होते अनामिक ॥ म्हणोनि अतिशूद्र पूजिले अनेक ॥ जे कां निंदिले वेदशास्त्रीं ॥७४॥ तुझेनि योगें वर्णसंकर ॥ आतांच होऊं पाहे सत्वर ॥ निजांगें मांडिला भ्रष्टाचार ॥ ब्राह्मणआचार बुडवूनी ॥७५॥ ऐसी ऐकोनि विप्रवाणी ॥ एकनाथ विनवी कर जोडोनी ॥ दुसरा स्वयंपाक तुम्हां लागोनी ॥ मंदिरीं करूनी ठेविला ॥७६॥ पहिला स्वयंपाक होता सदनीं ॥ त्याचा सुवास घेतला अंत्यजांनीं ॥ तें उच्छिष्ट अन्न तुम्हांलागोनीं ॥ कैशा रीतीं घालावें ॥ ७७ ॥ म्हणोनि तें त्यांस अर्पोनि निश्चितीं ॥ दुसरा स्वयंपाक करविला प्रीतीं ॥ तरी क्षमा करून कृपामूर्ती ॥ करावी पितृतिथि पुनीत ॥ ७८ ॥ यावरी द्विज बोलती काय ॥ आजि तू आमुचा अपमान केला आहे ॥ महायज्ञाचा पुरोडाश पाहे ॥ वायसापुढें टाकिला ॥ ७९ ॥ कीं भागीरथीची कुपी जाण ॥ बहिर्भूमीसी दिधली लवंडोन ॥ किंवा राजकांतेचें जडित भूषण ॥ दासीस नेऊन दीधलें ॥ ८० ॥ नातरी मैलागिरी शुद्ध चंदन ॥ त्याचें खरासी केलें लेपन ॥ कीं विष्णुपूजेच्या तुलसी जाण ॥ मसिदीस नेऊन वाहिल्या ॥ ८१ ॥ कीं अग्निहोत्रींचा कृशान झडकरी ॥ नेऊनि ठेविला गुडगुडीवरी ॥ सुधारस ओतिला राखेवरी ॥ तरी वायांच निर्धारीं गेला कीं ॥ ८२ ॥ तेवीं आम्हां न देतां भोजन ॥ अंत्यज पूजिले त्वां प्रीतीन ॥ हें अनुचित केलें जाण ॥ लाविले दूषण आपणासी ॥ ८३ ॥ ऐसें बोलोनियां त्वरित ॥ ब्राह्मण घालोनि गेले वाळित ॥ एकनाथ होऊनि चिंताक्रांत ॥ बैसले निवांत ते समयीं ॥ ८४ ॥ तों घरीं कृष्णा ब्राह्मणजन ॥ श्रीखंड्या दुसरें नामाभिधान ॥ तो म्हणे एकनाथाकारण ॥ उद्विग्न मन कासया ॥ ८५ ॥ आजि पितृतिथी आहे घरीं ॥ म्हणून चिंता सर्वथा न करीं ॥ तुमचे पितर साक्षात झडकरी ॥ येतील सत्वरीं जेवावया ॥ ८६ ॥ पाकसिद्धि झालिया घरांत ॥ पात्रें घालावीं तुम्हीं त्वरित ॥ एकनाथ जाहले हर्षयुक्त ॥ आश्चर्य करीत मानसीं । ८७ ॥ नानापरीचें पक्वान्न ॥ घृत शर्करा वाढिलीं जाण ॥ आगतं म्हणतां निजमुखेंकरून ॥ तो पितर येऊन बैसले ॥ ८८ ॥ अर्घ्यपाद्यपूजा करून ॥ पूगीफल गोपीचंदन ॥ यज्ञोपवितें सकलांसी देऊन ॥

हिरण्यदक्षिणा दीधली ॥ ८९ ॥ ब्रह्मार्पण सोडितांचि एकनाथ ॥ साक्षात पितर बैसले जेवीत ॥ जें जें अन्न जयासी रुचत ॥ तें तें भक्षिती निजप्रीतीं ॥ ९० ॥ जनार्दनपायीं भाव धरिला ॥ तो पितृस्वरूपीं प्रकटला ॥ एकनाथासी आनंद वाटला ॥ कीं दृष्टीसी देखिका पितृलोक ॥ ९१ ॥ तृप्त जाहलिया पितृपंक्ती ॥ करशुद्धि दिधली तयांप्रति ॥ विडे दक्षिणा देऊनी प्रीती ॥ एकनाथ पुसती तयांसी ॥९२॥ शेष उरलें आहे अन्न ॥ काय करावें यालागून ॥ इष्टांसमवेत करावें भोजन ॥ उत्तर दिधलें तयांनीं ॥९३॥ तव ब्राह्मण द्वारीं उभे राहूनी ॥ हे शब्द ऐकिले त्यांनीं श्रवणीं ॥ कवाडें उघडोनि तये क्षणीं ॥ आंत येऊनि पाहती ॥९४॥ तंव साक्षात पितर येऊन जेविले ॥ यांस देखतांचि अदृश्य जाहले ॥ सकल द्विजांसी आश्चर्य वाटलें ॥ नवल देखिलें म्हणोनियां ॥९५॥ मग ब्राह्मण बाहेर जाऊनि त्वरित ॥ एकमेकांसी उत्तरें बोलत ॥ मानवी नव्हे हा एकनाथ ॥ अवतार साक्षात विष्णूचा ॥९६॥ आपण धरूनि कर्माभिमान ॥ वायांच करितों याचें छळण ॥ परी तयासी साह्य श्रीकृष्ण ॥ जाहला प्रसन्न निजनिष्ठें ॥९७॥ तयासी संकट पडतां सहज । तत्काळ पावे गरुडध्वज ॥ पितर साक्षात जेवविले आज ॥ आणिली लाज आपणांसी ॥९८॥ एक म्हणती पक्वान्नें नाना ॥ आणि हातींची गेली दक्षिणा ॥ पुढें होणार तें कळेना ॥ बोल प्राक्तना ठेवावा ॥९९॥ आतां उदयिक जाऊनि अवघे त्वरित ॥ एकनाथासी सांगावी नीत ॥ की आतां घेऊनि प्रायश्चित्त ॥ स्वयातींत असावें ॥१००॥ येरवींच तयासी पवित्र म्हणतां ॥ तरी आपुली गेली व्यर्थ अहंता ॥ तरी दंड करूनि एकनाथा ॥ लावावा मागुता सत्कर्मीं ॥१॥ दुसरे दिवशीं द्विजवर सकळ ॥ वाळुवंटीं गोळा जाहले तत्काळ ॥ मग एकनाथासी ते वेळ ॥ पाचारिलें तेधवां ॥२॥ ब्राह्मणांसी देखोनि नयनीं ॥ नमस्कार केला ते क्षणीं ॥ म्हणे कोणता हेतू धरून मनीं ॥ मज स्वामींनीं बोलाविलें ॥ यावरी द्विज बोलती वचन ॥ तुज न कळतां घडलें दूषण ॥ आतां विधियुक्त प्रायश्चित घेऊन ॥ द्यावा मान वेदवचना ॥४॥ ऐकोनि म्हणे एकनाथ ॥ मी सर्वथा न घें प्रायश्चित्त ॥ मायबाप असतां श्रीकृष्णनाथ ॥ कैसें विपरीत करावें ॥५॥ ब्राह्मण म्हणती यथार्थ पाहीं ॥ परी आमुच्या वचनासी मान देईं ॥ प्रायश्चित्त घेतल्याविण नाहीं ॥ शुद्धता देहीं सर्वथा ॥६॥ मग गंगेत स्नान घालूनि त्वरित ॥ एकनाथासी देती प्रायश्चित्त ॥ भस्म गोमय लावूनि त्वरित ॥ मंत्र वेदोक्त म्हणताती ॥७॥ तों त्र्यंबकेश्वराहूनि तेथ ॥ एक ब्राह्मण आला अकस्मात ॥ लोकांप्रती काय बोलत ॥ कोणता एकनाथ मज सांगा ॥८॥ त्याच्या सर्वांगासी

जाहले कुष्ठ ॥ तिळप्राय अंग नसे नीट ॥ ऐसें रूप देखोनि दुष्ट ॥ सांगती स्पष्ट तयासी ॥९॥ पैल तो उदकांत प्रायश्चित्त घेत ॥ त्यासीच म्हणती एकनाथ ॥ कैसियास्तव पुससी त्यातें ॥ सांग त्वरित आम्हांसी ॥१०॥ यावरी बोले कुष्ठी ब्राह्मण ॥ म्यां त्र्यंबकीं केलें अनुष्ठान ॥ मग शंकरें दृष्टांत दाखवून ॥ येथ पाठवून दीधलें ॥११॥ मज सांगत उमाकांत ॥ कीं पैठणीं एकनाथ विष्णुभक्त ॥ तेणें अनामिक जेवविले बहुत ॥ होती पितृतिथ ते दिवशीं ॥१२॥ ते पुण्य आहे त्याचे पदरीं ॥ तरी तूं जाऊन तेथ सत्वरीं ॥ तो किंचित पुण्य देईल जरी ॥ कुष्ठ सत्वरीं जाईल ॥१३॥ हें स्वप्न होतांचि त्वरित ॥ मी तत्काळ धांवत आलों येथ ॥ वचन ऐकोनि द्विज समस्त ॥ आश्चर्य करिती मानसीं ॥१४॥ ब्राह्मण टाकोनि अंत्यज जेवविले ॥ हें पुण्य कोण्या शास्त्रीं बोलिलें ॥ एक म्हणती असत्य भलें ॥ धरणें उठविलें शंकरें ॥१५॥ एक म्हणती उगेच बैसा ॥ हातींच्या कंकणासी काय आरसा ॥ एकनाथाचा भाव कैसा ॥ निवडेल आपैसा ये समयीं ॥१६॥ मग कोडी जाऊन गंगेआंत ॥ एकनाथासी काय बोलत ॥ एका अनामिकाचें सुकृत ॥ शंकरें देवविलें मजलागीं ॥१७॥ अवश्य म्हणोनि तये क्षणीं ॥ त्याचे हस्तावरी घातलें पाणी ॥ सकळ ब्राह्मण तटस्थ होउनी ॥ कौतुक नयनीं पाहती ॥१८॥ तों नेत्रांसी न लागतां पाती ॥ सुंदर झाली कोडियाची कांती ॥ हें कौतुक देखोनि समस्तीं ॥ आश्चर्य केलें मनांत ॥१९॥ म्हणती कर्माचा धरिला अभिमान ॥ तेणेंचि नाडलों आम्ही जाण ॥ विष्णुभक्तासी प्रायश्चित्त देणें ॥ हेंचि दूषण आपुल्यासी ॥२०॥ एकनाथासी म्हणती द्विजवर ॥ तूं केवळ विष्णूचा अवतार ॥ सर्वथा नव्हसी मानववीर ॥ कळले साचार आम्हांसी ॥२१॥ हिमालयासी न लगे विंझणवारा ॥ प्रावरण न लगेचि अंबरा ॥ स्नान न लगेचि वैश्वानरा ॥ तेवीं वैष्णववीरा निर्मळ तूं ॥२२॥ अमृता न लगे पाककरण ॥ उदधीस कासया तीर्थाटन ॥ तेवीं तुजला प्रायश्चित्त न लगेचि जाण ॥ आम्हांकारणें समजलें ॥२३॥ तुवां अघटित दाविली करणी ॥ साक्षात पितर जेवविले आणोनी ॥ हें देखिलें ऐकिलें नव्हतें कोणी ॥ तें प्रत्यक्ष नयनीं दाविले ॥२४॥ मग एकनाथासी धरूनि हातीं ॥ गृहास आले सत्वरगति ॥ म्हणती तुज साह्य रुक्मिणीपती ॥ निश्चयें चित्तीं कळों आलें ॥२५॥ द्विजांसी अर्पोनि दक्षिणा ॥ तीर्थ मस्तकीं वंदिलें जाणा ॥ ते जाऊनि आपुल्या सदना ॥ आश्चर्य मना करिताती ॥२६॥ म्हणती धन्य हा विष्णुभक्त ॥ ब्राह्मणसेवेसी अति निरत ॥ देवतार्चन विधियुक्त ॥ प्रेमभावें करीतसे ॥२७॥ यापरी पैठणींचे लोक

समस्त ॥ कोणी निंदीत कोणी स्तवीत ॥ परी एकनाथ सदा संतोषयुक्त ॥ हर्षशोकांत पडेना ॥२८॥ तों एक ब्राह्मण जाऊनि द्वारावती ॥ तप करी अनुतापयुक्ती ॥ म्हणे मज भेटावा रुक्मिणीपती ॥ धरिला चितीं हेत पूर्ण ॥२९॥ मग स्वप्नांत येऊनि राधा रुक्मिणी ॥ काय सांगती त्यालागोनी ॥ द्वारकेंत नाहींत चक्रपाणी ॥ तूं जाई येथोनि सत्वर ॥१३०॥ गंगातीरीं प्रतिष्ठानांत ॥ वैष्णवभक्त एकनाथ ॥ ब्राह्मणसंतर्पण नित्य करीत ॥ तुवां जावें निश्चित ते ठायीं ॥३१॥ कृष्णा श्रीखंडया ब्राह्मणजन ॥ द्वादश वर्षें राहिला जाण ॥ तो साक्षात् परब्रह्म नारायण ॥ तरी घ्यावें दर्शन तयाचें ॥३२॥ निजभक्ताची सेवा करीत ॥ तेथेंच बैसला वैकुंठनाथ ॥ आमुची कदा न करी मात ॥ तरी आणावे त्वरित जाऊनि ॥३३॥ ऐसा दृष्टांत ऐकोनि कानीं ॥ ब्राह्मण हर्षला स्वमनीं ॥ मग प्रतिष्ठानासी येऊनी ॥ लोकांप्रती पुसतसे ॥३४॥ येथे एकनाथ वैष्णवभक्त ॥ ब्राह्मणसेवनीं अति निरत ॥ त्याचें मंदिर दावा त्वरित ॥ ऐसें बोलत चालिला ॥३५॥ पुसतपुसत ते अवसरीं ॥ ब्राह्मण पातला त्याचे मंदिरीं ॥ तापसी देखतांचि सत्वरीं नमस्कार करी एकनाथ ॥३६॥ बैसावया दिधलें आसन ॥ म्हणे कोठोनि झालें जी आगमन ॥ कवण कवण तीर्थाटन ॥ आलेति हिंडोन या ठाया ॥३७॥ यावरी तापसी बोले वचन ॥ कृष्णा श्रीखंड्या ब्राह्मणजन ॥ त्याचें घ्यावया दर्शन ॥ आलों धांवोन या ठाया ॥३८॥ एकनाथ म्हणती ते अवसरीं ॥ उदकासी गेला गंगातीरीं ॥ तुम्ही स्वस्थ बसावें निमिषभरी ॥ येईल सत्वरीं या ठाया ॥३९॥ तों खांदीं कावड घेऊनी ॥ वाडयांत आले चक्रपाणी ॥ तापसियासी देखतां नयनीं ॥ संकोच मनीं वाटला ॥१४०॥ म्हणे द्वादश वर्षेंपर्यंत ॥ मी आनंदयुक्त होतों येथ ॥ हा कोठोनि पातला ऋणायित ॥ देखिला अवचित या ठाया ॥४१॥ ऐसें म्हणोनि वैकुंठनाथ ॥ मनीं जाहले चिंताक्रांत ॥ तों नवल वर्तलें अद्भुत ॥ तें परिसा निजभक्त भाविक हो ॥४२॥ एकनाथ म्हणे तापसियासी ॥ कृष्णा ब्राह्मण पहा दृष्टीसी ॥ तेणें सत्वर उठोनि वेगेंसी ॥ मिठी चरणांसी घातली ॥४३॥ मग कावड घेऊनी जगन्नाथ ॥ सत्वर गेला देवघरांत ॥ घागरी खालीं ठेवूनि त्वरित ॥ अदृश्य जाहला ते ठायीं ॥४४॥ तापसी बाहेर वाट पाहत ॥ तंव परतोनि न येचि रुक्मिणीकांत ॥ देवगृहांत जंव विलोकित ॥ तंव कोणीच तेथ दिसेना ॥ ४५ ॥ तेव्हां शोक करीत तये क्षणीं ॥ अंग टाकूनि दिधलें धरणीं ॥ म्हणे मज देखोनि चक्रपाणी ॥ गेला पळोनि त्वलाहें ॥४६॥ हें दृष्टीस देखतां एकनाथ ॥ तापसियासी पुसे वृत्तांत ॥ म्हणे कां झालासी

शोकाकुलित ॥ सांग त्वरित मजपासीं ॥४७॥ त्याने सकळ वृत्तांत सांगोनी ॥ एकनाथाचे लागला चरणीं ॥ दोघेही सद्गदित होऊनी ॥ एकमेकांसी भेटती ॥४८॥ एकनाथ म्हणे तापसियास ॥ धन्य तुमचें भाग्यविशेष ॥ दृष्टीं ओळखूनि जगन्निवास ॥ चरण सावकाश वंदिले ॥४९॥ आम्ही न ओळखोनि देवा ॥ त्यापासूनि बहुत घेतली सेवा ॥ ऐसा अनुताप धरुनि जीवा ॥ एकनाथ केशवा आळवीतसे ॥१५०॥ म्हणे भक्तवत्सला दीननाथ ॥ तुवां बहुत कष्ट केलें येथ ॥ मज न कळतां वृत्तांत ॥ घडला अनर्थ थोर हा ॥५१॥ तूं परम सुकुमार चक्रपाणी ॥ कावडी वाहिल्या अनवाणी ॥ खडे रुतले असतील चरणीं ॥ अघटित करणी हे केली ॥५२॥ द्वादश वर्षे जवळ असतां ॥ परी कांहींच नेणवे माझिया चित्ता ॥ ब्राह्मणवेष धरून अनंता ॥ कार्य नेणतां सांगितलें ॥५३॥ तूं ब्रह्मादिकांसी पूज्यमान ॥ सदाशिव चिंती तव चरण ॥ तो तूं स्वकरें उगाळूनि चंदन ॥ देत होतासी पूजेसी ॥५४॥ तापसी तप करूनि अवघड ॥ तुज लक्षिती वाडकोड ॥ एक तीर्थाटनें करिती गाढ ॥ परी दृष्टीपुढें न दिससी ॥५५॥ ऐसा दुर्लभ तूं हृषीकेशी ॥ तुझें लाघव न कळे कोणासी ॥ येऊनि यशोदेचे उदरासी ॥ ते पुत्रपणे तुजसी लेखीतसे ॥५६॥ मग गोकुळ टाकूनि मथुरेसी जातां ॥ तेव्हां उमजलें तियेचे चित्ता ॥ तेवीं द्वादश वर्षे जवळी असतां ॥ मी नेणेंचि अनंता तुजलागीं ॥५७॥ ऐसा अनुताप धरूनि अंतरीं ॥ खेद करीत नानापरी ॥ तो प्रेमा वर्णितां सविस्तरीं ॥ तरी ग्रंथ विस्तारीं वाढेल पैं ॥५८॥ एकनाथाची निजकांता ॥ परम भाविक पतिव्रता ॥ म्हणे देवाधिदेवा रुक्मिणीकांता ॥ तुज आम्ही वृथा कष्टविलें ॥५९॥ तूं परम सुकुमार गोविंदा ॥ प्रातःकाळीं उठोनि करिसी धंदा ॥ आम्ही केली अमर्यादा ॥ नेणतां मुकुंदा तुजलागीं ॥६०॥ तूं सकळ देवांसी पूज्यमान ॥ आम्हां मागूनि करिसी भोजन ॥ नाहीं जाणिली भूक ताहान ॥ अशी मी अधम श्रीकृष्णा ॥६१॥ द्वादश वर्षेपर्यंत निश्चितीं ॥ श्रीकृष्ण होता त्यांचे संगतीं ॥ तितुके गुण नित्य आठविती ॥ विस्तारें किती सांगावें ॥६२॥ यावरी एके दिवसीं एकनाथ ॥ निद्रित होते यामिनींत ॥ तों ज्ञानदेव येऊनि स्वप्नांत ॥ काय सांगत तयासी ॥६३॥ तुवां अलकावतीस येऊन ॥ समाधि उघडोनि घ्यावें दर्शन ॥ तेथें अजानवृक्षाची मुळी जाण ॥ सन्निध येऊन लागली ॥६४॥ ते एकीकडे लावून हातें ॥ मागुती समाधि बुजवीं त्वरित ॥ ऐसें देखोनि एकनाथ ॥ जाहला जागृत तत्काळ ॥६५॥ मग अलकावतीस येऊन ॥ इंद्रायणीचें केलें स्नान ॥ सिद्धेश्वराचें घेऊनि दर्शन ॥ समाधि उघडोन

पाहिली ॥६६॥ तों वज्रासन घालोनि सहज ॥ तेथें बैसले ज्ञानराज ॥ दिव्य स्वरुप दिसे तेजःपुंज ॥ उपमा न साजे तयासी ॥६७॥ नमस्कार करूनि ते वेळीं ॥ एकनाथ समाधींत न्याहाळी ॥ तो अजानवृक्षाची मुळी ॥ ज्ञानदेवाजवळी पातली ॥६८॥ ते निजकरें लावूनि एकीकडे ॥ मागुती समाधीचें लाविलें कवाड ॥ चुनेगच्चीनें बुजवोनी दृढ ॥ पूर्ववत दगड रचियेले ॥६९॥ तेव्हां अलकावतीं उजाड बहुत ॥ सिधासामग्री न मिळे तेथ ॥ शिष्यसंप्रदायी जाहले क्षुधित ॥ तों पंढरीनाथ पावले ॥१७०॥ निजभक्तांची भूक ताहान ॥ निजांगे पुरवी जगज्जीवन ॥ तेथें वाणियाचें रूप धरून ॥ पाल देऊन बैसले ॥७१॥ हें दृष्टीस देखोनि त्वरित ॥ चित्तीं हर्षले एकनाथ ॥ म्हणे व्यवसायी आले बाजारांत ॥ सामग्री विकत आणावी ॥७२॥ मग दोघे ब्राह्मण पाठवून झडकरी ॥ सर्व साहित्य घेतलें पदरीं ॥ म्हणती द्रव्य आणून देतों सत्वरी ॥ तुम्हीं स्वस्थ अंतरीं असावें ॥७३॥ यावरी बोलती पंढरीनाथ ॥ आम्ही आजचा दिवस आहों येथ ॥ तुम्हीं स्वयंपाक करूनि त्वरित ॥ जेवा समस्त बिऱ्हाडीं ॥७४॥ एकनाथासी जाणतों आम्ही ॥ परी ते नोळखती मजलागोनी ॥ ते यात्रेयी आले ऐकोनी ॥ सामग्री घेऊनि मी आलों ॥७५॥ पाठमोरे होतां ब्राह्मणासी ॥ तों अदृश्य जाहले हृषीकेशी ॥ आश्चर्य वाटलें सकळांसी ॥ एकनाथासी सांगितलें ॥७६॥ म्हणती आम्हांसी सामग्री देऊनि ॥ तत्काळ अदृश्य जाहला वाणी ॥ द्रव्यही न देतां त्यालागूनी ॥ जाहली करणी अद्‌भुत ॥७७॥ ऐसी ऐकोनियां मात ॥ एकनाथ झाले सद्गदित ॥ म्हणती आम्हांसाठीं पंढरीनाथ ॥ शिणले बहुत वाटतें ॥७८॥ मग पाकसिद्धी होतां जाण ॥ ब्राह्मणांसहित केलें भोजन ॥ ते दिवसीं रात्रीस राहून ॥ मांडिले कीर्तन निजप्रेमें ॥७९॥ समाधीस करूनि नमस्कार ॥ दुसरे दिवसीं निघाले सत्वर ॥ प्रतिष्ठानी येऊन साचार ॥ सप्रेम भजन करीतसे ॥१८०॥ एकनाथाची एसी स्थिती ॥ जनार्दन स्वरूप त्रिजगतीं ॥ तोचि व्यापक सर्वां भूतीं ॥ संशय चित्तीं न वाटे ॥८१॥ जनार्दनाचें लागतां ध्यान ॥ स्वयेंच झाले जनार्दन ॥ तेथें कांहीच न दिसे भिन्न ॥ जेंवी सरिताजीवन सागरीं ॥८२॥ कीं दीप प्रकाश दोघे जण ॥ नामें वेगळीं परी एकचि जाण ॥ तेवीं एकनाथ आणि जनार्दन ॥ नव्हती भिन्न सर्वथा ॥८३॥ कीं कर्पूर सुगंध एक पाहीं ॥ कीं द्रवत्व नीरासी द्वैत नाहीं ॥ नातरी पुष्प मकरंद एके ठायीं ॥ निजप्रीतीनें नांदती ॥८४॥ तेवीं एकनाथ आणि जनार्दन ॥ समरस असती एकपण ॥ महीपति तयांसी अनन्य शरण ॥ वंदी चरण सद्‌भावें ॥८५॥

◇ ◇

मो रो पं त

१. सीतागीत

सीता म्हणे, ‘ऐका वन-वास-कथा । परी मनीं व्यथा न धरावी ॥१॥
चित्रकूटाहूनी पादुका घेऊनी । वि-योग देऊनी तुम्ही आलां ॥२॥
आम्हीही तेथूनी तशीच निघालों । वनांत रिघालों तिघें जणें ॥३॥
लक्ष्मण भावोजी मागें, पुढे स्वामी । मज आहें धामीं ऐसें वाटे ॥४॥
न बाधेची मज उष्ण क्षुधा तृषा । तुम्हांपाशीं मृषा न बोलावें ॥५॥
जेव्हां कांहीं वाटे चालतां मी मागें । मुरडोनी मागें विलोकीती ॥६॥
बाई काय सांगों स्वामीची ती दृष्टी । अमृताची वृष्टी मज होय ॥७॥
अत्रीच्या आश्रमीं नेलें मज वाटे । माहेरची वाटे खरेखुरें ॥८॥
अनुसूया सती करी वेणीफणी । आनंदाची धणी दिली मज ॥९॥
आजवरी ओली चंदनाची ऊटी । आली नाहीं तुटी माळा-गुणीं ॥१०॥
ऋषीतें वंदीत गेलों गोदा-तटीं । जेथें पंचवटी पुण्य-स्थान ॥११॥
भावोजींनीं केली माझी बहु सेवा । ती त्या महा-देवा ठावी असे ॥१२॥
तेथें शूर्पणखी भार्या व्हाया आली । तिला माझी भ्याली चित्त-वृत्तीं ॥१३॥
भावोजींनीं तिचा कर्ण-नासा-छेद । केला, कीं ते वेद-शास्त्रार्थ-ज्ञ ॥१४॥
तिचा भाऊ खर होउनीयां क्रुद्ध । करावया युद्ध आला बाई ॥१५॥
चवदा सहस्र राक्षस पापिष्ट । रणीं केलें पिष्ट स्वामींनीं ते ॥१६॥
तिणे घ्राण-रक्तें मुख मळवीलें । वृत्त कळविलें रावणासी ॥१७॥
छळाचा उपाय मनी आठवीला । दुष्टें पाठवीला माया-मृग ॥१८॥
स्वर्ण-रत्न-मय मृग म्यां देखीला । तो सत्य लेखिला मनामध्यें ॥१९॥
गृहा आणावया मागे हरीणा मी । दुःख परिणामीं नेणोनीयां ॥२०॥
मज रक्षावया लक्ष्मणा ठेवूनी । निघाले घेऊनी धनुर्बाण ॥२१॥
माया-मृगामागें जगदेक-शूर । गेले बहु दूर अरण्यांत ॥२२॥

कपटी राक्षस जाणोनीया प्राण-। घ्यावयासी बाण मोकलीला ॥२३॥
तो बाण लागतां हृदय विदारी । दुष्ट हाक मारी स्वामी-वाणी ॥२४॥
'हा सीते हा बंधो लक्ष्मणा ये धांवें । अंत-काळीं पावें, भेटावया' ॥२५॥
मज वाटे माझ्या स्वामींचीच हाक । शिरे कंप धाक हृदयांत ॥२६॥
मी म्हणे, 'भावोजी धांवा रक्षा प्राण । हे घ्या चाप-बाण उठा वेगीं' ॥२७॥
भावोजी म्हणती, 'राक्षसाची माया । कोण राम-राया पाहों शके' ॥२८॥
वाटले तें वाक्य सत्य परी खोटें । झालें दुःख मोठें माझ्या मनीं ॥२९॥
न वदावें तेंची बोलील्यें मी कोपें । चित शब्द-रोपें विदारिलें ॥३०॥
'वांछितोसी दुष्टा अग्रजाचा घात । माझ्या आंगा हात लावावया ॥३१॥
हात लावीतांची सोडीन मी प्राण । शिरीं पाद-त्राण कोण वाहे ॥३२॥
माझ्या दृष्टीपुढें नको राहों साच । नरकीचा जाच मूर्त तूंची' ॥३३॥
ऐशी बाई माझीं ऐकतांची वाणी । डोळां आलें पाणी भावोजींच्या ॥३४॥
मातेनें दापीतां वत्स पित्याकडे । जाय तैसें घडे लक्ष्मणासी ॥३५॥
साधूसी गांजीतां झालें सध्या फळ । सज्जनाचा छळ करूं नये ॥३६॥
वाटेंत धनुष्यें ओढोनियां रेघ । गेले दया-मेघ स्वामीकडे ॥३७॥
तों आला रावण होवोनी संन्यासी । न कळे अन्यासी छद्म त्याचें ॥३८॥
भिक्षा द्याया गेल्यें रेघेच्या बाहेर । सासूर माहेर बुडवाया ॥३९॥
न लंघीतें जरी धनुष्याची रेखा । तरी त्याचा लेखा काय होता ॥४०॥
रेघेच्या बाहेरी जसा दिला पाय । झाला महा-काय दश-मुख ॥४१॥
जसा हरीणीतें हरीतो लांडगा । तसा तों दांडगा हरी मातें ॥४२॥
त्या पाप्याच्या स्पर्शें देह हा कोमेला । आकाशीं तो मेला रथीं चढे ॥४३॥
'हा राम लक्ष्मण,' ऐशी हाक माजी । जटायु-मामाजी आयकती ॥४४॥
सखे दशरथ-मामाजींचे आप्त । सोडवाया प्राप्त झाले दैवें ॥४५॥
जातीचे ते गृध्र वृद्ध मोठे शूर । रथ केला चूर रावणाचा ॥४६॥
चंचू-नखायुध गृध्र युद्ध-दक्ष । रावणाचें वक्ष विदारीती ॥४७॥
अन्यायें रावण छेदी त्यांचे पक्ष । मज वाटे लक्ष-बंधु-घात ॥४८॥
मूर्छीत मामाजी पडले भू-त्वरी । स्कंधीं वाहे अरी मला बाई ॥४९॥
रडतां काढिले पांच सात नग । वस्त्र-खंडी मग बांधीले म्यां ॥५०॥
पर्वतीं वानर देखिले म्यां मग । त्यांमध्यें ते नग सोडियेले ॥५१॥

शत–गावें सिंधू त्यांत एक लंका । तेथें ने कलंका लावावया ॥५२॥
नेऊनीयां ठेवी अशोक-वनांत । न शोक मनांत माये माझ्या' ॥५३॥

२. हंसकाकीय आख्यान

मग मद्राधीश म्हणे, "कर्णा ! जे धर्मनीतिचें वतन ।
गोब्राह्मणशरणागत ज्यांहीं केलें चि सर्वथा जतन ॥१॥
संग्रामीं न पळाले, यज्वे मूर्धाभिषिक्त जे राजे ।
ज्यांच्या शुद्ध यशासी तुळितां क्षणही न चंद्रमा साजे ॥२॥
त्या राजर्षिवरांच्या वंशीं झालों, स्वधर्मपथगामी ।
सूत नव्हे, वर देऊनि चालवितां हा त्वदीय रथ गा ! मी ॥३॥
त्या मजही हित कथितां म्हणसी, 'हितशत्रु' मत्तसा वदसी ।
तुज मति मलिनाचि रुचे, चोरा जशि कृष्णपक्षि चावदसी ॥४॥
काककथा कथितों, ती ऐकावी, मग यथेष्ट ! वर्तावें;
पडतां गिरिशिखरच्युतबृहदुपळें कीं खळें न पर्तावें ॥५॥
दृष्टान्त सांगतों तुज याविषयीं, श्रवण नीट दे कर्णा ।
मन आटोपूनि धरीं, जन्हि सुहृदुपदेश वीट दे कर्णा ॥६॥
पूर्वीं सागरतीरीं साधुनृपाच्या पुरांत एक धनी ।
सन्मान्य वैश्य होता, नांदे ज्याच्या स्वधर्मनीति मनीं ॥७॥
त्या धनिका वैश्याचे होते बहु पुत्र-पौत्र गुणवंत ।
त्यांतें आशीर्वादें गौरविती सर्वदा सदय संत ॥८॥
त्या वैश्यकुमारांचें भक्षी उच्छिष्ट एक काक सदा ।
बाळक उदारमति ते न वदति वाणी कदापि साध्वसदा ॥९॥
देती वैश्यकुमारक मांसौदन सेवया वडे मांडे ।
मधु घृत पायस वायस खाय सदा, पक्षिपांसवें भांडे ॥१०॥
सागरतीरीं तेथें आलें दैवें कदाचित मराळ, ।
जे मुक्ताफळभोजन करिती, बिसतंतु भक्षुनि फराळ ॥११॥
पाहुनि हंसातें तें बाळ स्वोच्छिष्टपिंडपुष्टातें ।
म्हणती, 'तूं चि विहंगा ! सर्वखगश्रेष्ठ' या सुदुष्टातें ॥१२॥

गर्वें मूर्खपणें तो मानी बाळोक्त सर्व साचार ।
अधिकचि माजे स्तवनें, न विचार करी मलीमसाचार ॥१३॥
गेला उडोनि गगनीं मग नीच सगर्व काक तो त्यांत ।
साधूंत खळ जसा कीं काचमणी परमशुद्ध मोत्यांत ॥१४॥
जाणे त्या हंसांत श्रेष्ठ जयालागि त्यासि तो काक ।
'दोघे उडों, तुझें बळ पाहों दे, मत्समीप ये ठाक' ॥१५॥
म्हणती हंस तयातें 'गर्वभरें करिसि वायसा ! चार ।
आम्ही मानसवासी सर्व खगांचेहि राय साचार ॥१६॥
करिसी बरोबरी तूं हंसाची काय ! वायसापसदा ! ।
करितो घात तुझा मद; मारीलचि जो गृहांत साप सदा ॥१७॥
रे बळिपुष्टा ! दुष्टा ! कैसें हंसांसमेत उडशील ? ।
साहस करितां सहसा स्पष्ट व्यसनार्णवांत बुडशील' ॥१८॥
वायस बहु हंसांच्या हितवचनाची करूनि कुत्सा, हें ।
वदता झाला त्यांसीं पुनरपि तो गर्वराशि उत्साहें ॥१९॥
शतपात जाणतों मी, उडेन एकैकपात शतगावें ।
मजसीं उडतां अन्यां खगमांचें पक्षवीर्य न तगावें ॥२०॥
गगनीं तुम्हांत एका भलत्यासीं मी उडेन हो ! खग ! ती ।
सांगावी जी मानें; किंवा म्यां दाविजे शत स्वगती ?' ॥२१॥
ऐसें पुष्कळ बोले, दावी बहु गर्व मूढ तो करट ।
स्तनभान काय पावे, जरिहि उरीं वृद्धि पावलें करट ॥२२॥
हांसोनि एक हंस ध्वांक्षासि म्हणे, 'तुझ्या गती शतशा; ।
आम्ही हंस समस्तहि एकचि गति जाणतों दुज्या न तशा ॥२३॥
जाणें एका गतिला, त्याचि गतीनें उडेन आकाशीं; ।
मानें तीनें उड तूं !' बोले ऐसें मराळ काकासी ॥२४॥
तों बहु हांसति जे कीं आले होते मिळोनि तज्ज्ञाती ।
शतविधगतिहूनि अधिका, परि तुच्छा भासली अतज्ञां ती ॥२५॥
'एका पातांतचि या हंसाला हा स्वबंधु हारवितो' ।
ऐसें हांसति वायसखद्योत, परी करि क्षमा रवि तो ॥२६॥
हंस उडे तों त्यासीं स्पर्धेनें कावळा उडे व्योमीं ।
शतपात पातकालय दावी, सांगो प्रकार किति तो मी ॥२७॥

स्वज्ञातिश्रेष्ठाचें गतितांडव पाहतां चि, काकांनीं ।
हर्षभरें नभ भरिलें, 'का का का का' अशा स्वहाकांनीं ॥२८॥
मृदुपातें हंस उडे, काकाहुनि हीनशक्तिसा भासे ।
ऐसें मुहूर्तभरि तो दावी, तों काकमंडळी हासे ॥२९॥
हंसांसि काक म्हणती, 'हां ! हारविला चि कीं भवज्ज्ञाती' ।
आयकिली दूरुनि त्या सर्वमराळोत्तमें अवज्ञा ती ॥३०॥
मग पश्चिमदिग्देशीं शीघ्र शिरे हंस काकही मळधी ।
जिकडे होता कर्णा ! गंभीर अपार, खालता जलधी ॥३१॥
मागें धांवे वायस, हंस पुढें सोडिला जसा तीर ।
स्पर्धेंत काक नेणे की केवळ दूर राहिलें तीर ॥३२॥
पक्षांचें बळ सरलें, गर्व मनींचा मनांत चि जिराला !
घे धाक काक, सागर सर्वत्र दिसे, निराश्रय, विराला ॥३३॥
न दिसे अग नग, मग तग गगनीं खग नीच काय काढील ? ।
चित्तीं म्हणे, 'समय हा मज काळाच्या मुखांत वाढील' ॥३४॥
जावूनि दूर आला किंवा नाहीं असें, फिरे, पाहे ।
राहे न करि उपेक्षा, हंस खळाची हि काळजी वाहे ॥३५॥
आला हंसापाशीं प्रतिक्षणक्षीणशक्ति करटपती ।
आतां पडेल ऐसें जाणुनि त्या खावया मकर टपती ॥३६॥
अवलोकिला मराळें अत्यंतासन्नपतन पामर तो ।
मग आणिलें मनीं कीं, 'यावरि म्यां न करितां कृपा मरतो ॥३७॥
रक्षावा चि, उपेक्षा व्यसनीं अरिची हि न करिती संत ।
पाहों नये चि आंगीं बळ असतां दीनजंतुचा अंत' ॥३८॥
ऐसें सत्पुरुषव्रत आठविलें, मग म्हणे मराळ, 'अगा ।
बहुगतिचतुरा ! पतितें शत कथिलीं, त्वां स्वयें चि काकखगा ! ॥३९॥
परि जें निजगुह्यपतित आम्हांसि न सांगसीच कां गा ! तें ? ।
झालें सख्य परस्पर, दूर उडालों नभांत सांगातें ॥४०॥
तुंडाग्रें पक्षयुगें शिवसी काका ! क्षणक्षण जळाला ।
या गतिचें नाम कथीं, दे टाकुनि सर्व संशय जळाला ॥४१॥
वद काय नाम काका ! या पाताचें ? शतीं असे हा कीं ।
त्याहूनि वेगळाचि ? स्पष्ट कथीं, मौन एकदां टाकीं ॥४२॥

ये ये झडकरि, हा मी हंस तुझी वाट पाहतों करटा !
या लक्षयोजनांबुधिपरतीरीं आमुचा असे घरटा ' ॥४३॥
नेत्रीं नाकीं कानीं क्षारोदक, पक्ष जाहले ओले ।
केवळ विव्हळ दुर्बळ तो खळ आर्तस्वरें असें बोले ॥४४॥
काक म्हणे, 'मी भक्षुनि उच्छिष्टें फार मातलों बा ! गा ! ।
कीं आपणांसि मानीं गरुड चि हंसोत्तमा ! महाभागा ! ॥४५॥
म्यां काक अन्य खग ही पुष्कळ अवमानिले अदभ्र मदें ।
ऐकविलीं बा ! तुज ही दुर्वाक्यें सज्जन-श्रुति-श्रमदें ॥४६॥
केली तुजसीं स्पर्धा, तत्फळ हें व्यसन पावलों सद्य ।
शरणागतासि रक्षीं, हो कीर्ति तुझी जनांत अनवद्य ॥४७॥
सदया ! निजदेशाप्रति जरि मज नेसील तरि विभो ! मग मीं ।
शलभीं हि नम्र होइन, बा ! सांगो काय मदधिकीं खगमीं ?' ॥४८॥
ऐसें वदे, रडे बहु, खाय गटकळ्या जळांत, करि का का ।
धावे मराळ, चरणीं कवळुनि काढी क्षणांत वरि काका ॥४९॥
वाहे त्या दीनातें पृष्ठीं तो ब्रह्मवाहन हि हंस ।
घेउनि गेला सागरतीरातें सर्वसज्जनवतंस ॥५०॥
जैसे ते वैश्यात्मज उच्छिष्टें करिति पुष्ट बलिपुष्टा ।
तैसे चि धार्तराष्ट्र स्वोच्छिष्टें पोषिताति तुज दुष्टा ! ॥५१॥
स्वसमांतें अधिकांतें अवमानी दुष्ट काक, तूं हि तसा ।
तो बहुमत वैश्यसुतां, धृतराष्ट्राच्या सुतांसि तूं हितसा ॥५२॥
व्यसनीं वायस वांचे जैसा जातां मराळपा शरण ।
जा तूं ही; न तव गळां घालु यमाचा कराल पाश रण ॥५३॥
तव दर्प, सर्पसम शर हाणोनि उरीं, हरील जिष्णु रणीं ।
तैं उमजशील, न उरे व्याघ्रवें वीर्य लेश ही उरणीं ॥५४॥
लोकप्रसिद्ध सन्मत तेजस्वी कृष्ण चंद्रसूर्य तसे ।
खद्योत प्राकृत तूं, ते त्वत्तेजांत लोपतील कसे ? ॥५५॥
नरसिंह केशवार्जुन, जरि मिळतिल तुजसमान कोटि ससे ।
त्यांचा नसे पराभव, गरुडासि सदर्प सर्प काय डसे ? ॥५६॥
ऐसें जाणोनि वृषा ! आटोपीं परम चंचला जिभली ।
कर्णा ! सावध सावध सावध ! रे ! गति नसे चि आजि भली. ॥५७॥

३. केकावली

तुझ्या बहुत शोधिले अघ-निधी पदांच्या रजें ॥
न तें अनृत वर्णिती बुध जनीं सदाचार जें ॥
असें सतत ऐकते, सतत बोलते, मीच ते–॥
प्रमाण न म्हणों जरी उचित माझिया नीचते ॥१॥

तसाचि उरलों कसा पतित मी नसें काय, कीं –॥
कृपाचि सरली, असेंहि न घडे जगन्नायकीं ॥
नसेन दिसलों कसा, नयन सर्व–साक्षी रवी, ॥
विषाद धरिला म्हणों, न सुरभी विष क्षीर वी ॥२॥

मला निरखितां भवच्चरण-कन्यका आपगा ॥
म्हणे 'अगइ ऐंकिलेंहि न कधीं असें पाप' गा ॥
कर श्रवणिं ठेविते, नुघडि नेत्र, घे भीतिला ॥
न घालिन भिडेस मी जरिहि कार्य-लोभी तिला ॥३॥

सदैव नमितां जरी पद ललाट केलें किणें ॥
नसे इतर तारिता मज भवत्पदाब्जाविणें ॥
नता करुनि मुक्तही म्हणसि 'मी बुडालों रिणें' ॥
अशा तुज न जो भजे मनुज, धिक् तयाचें जिणें ॥४॥

सदैव अपराध हे रचितसे असे कोटि गा ॥
स्वयेंहि कथितों नसे तिळहि लाज मी कोटिगा ॥
अजांड-शत-कोटि ज्या उदरिं सर्वदा नांदवा ॥
न त्यांत अवकाश या, स्थळ दिलें तदा कां दवा ॥५॥

दयाब्द वळसील तूं तरि न चातकां सेवकां ॥
उणें किमपि, भाविकां उबगशील तूं देव कां ॥
अनन्य-गतिका जना निरखितांचि सोपद्रवा ॥
तुझेंचि करुणार्णवा मन धरी उमोप द्रवा ॥६॥

कळी करि सु-निर्मळीं परम उग्र दावा नळीं ॥
तयांत अ-विशुद्ध मी शलभ जेविं दावानळीं ॥

व्रणार्त (र्थ) पशुच्या शिरावरि वनीं उभे काकसे ॥
स्मरादिरिपु मन्मनीं, अहि न काळ भेका कसे ॥७॥

धना परिजना घरीं तुमचिया उणें कायसें ॥
न लाभ मणि-हेम-भूपतिस जोडिला आयसें ॥
परि प्रभुहि संग्रहीं सकल वस्तुला ठेविती ॥
गुणा न म्हणतां उणा, अधिक आदरें सेविती ॥८॥

अ-तर्क्य माहिमा तुझा, गुणहि फार, बा हे विधी ॥
श्रुति–ज्ञहि म्हणे सदा, स्तविल आमुची केविं धी ॥
तरी जन यथामति स्तवुनि जाहले सन्मती ॥
स्तवार्थ तुझिया तुझ्या सम कवी कधीं जन्मती ॥९॥

निज–स्तुति तुम्हां रुचे स्तविति त्यां वरें तर्पितां ॥
नमस्कृति-परां बरें स्व-धन सर्वही अर्पितां ॥
स्वभाव तुमचा असा विदित जाहला याचकां ॥
करूं स्तव जसातसा फळ नव्हे जना याच कां ॥१०॥

'तुम्ही परम चांगले बहु-समर्थ दाते असे ॥
सु-दीन जन मी तुम्हां शरण आजि आलों' असें ॥
पुन्हांहि कथितों बरें श्रवण हें करा यास्तव ॥
समक्ष किति आपुला सकळ-लोक-राया स्तव ॥११॥

किती श्रवण झांकिती प्रभुहि, काय ते पोळती ॥
पुसाल जरि कोण ते, पद-रजीं तुझ्या लोळती ॥
बरें तुजचि सोसवे स्तवन, कृत्ति-वासा गरा– ॥
न पी, तरि कसें घडे, हित-करा दया-सागरा ॥१२॥

गमो मधुर हें विष स्तवन, सेवितां माजवी ॥
करी मलिन सद्यशो-मुख, हलाहला लाजवी ॥
हरापरिस तूं बरा प्रभु-वरा सदा जो पिशी ॥
असा रस समर्पि त्या अमृत आपुलें ओपिशी ॥१३॥

प्रभो शरण आलियावरि न व्हां कधीं वांकडे ॥
म्हणोनि इतुकेंचि हे स्व-हित-कृत्य जीवांकडे ॥

प्रसाद करितां नसे पळ विलंब बापा खरें ॥
घनांबु न पडे मुखीं उघडिल्याविना पांखरें ॥१४॥

शिवे न तुझिया पदा अदयताख्य दोष क्षण ॥
प्रभो चुकतसों तरी करिशि तूंचि संरक्षण ॥
नसेचि शरणागती घडलि सत्य अद्यापि ती ॥
रुचे विषय, ज्यां मिळे अमृत ते न मद्या पिती ॥१५॥

म्हणा मज उताविळा गुणचि घेतला, घाबरें- ॥
असो मन असेंचि बा भजक-बर्हि-मेघा बरें ॥
दिसे क्षणिक सर्व हें, भरंवसा घडीचा कसें- ॥
धरील मन, आधिनें बहु परिश्रमे चाकसें ॥१६॥

कृतांत-कटकामल-ध्वज जरा दिसों लागली ॥
पुरःसर-गदांसवें झगडतां तनू भागली ॥
सहाय दुसरा नसे तुजविणें बळें आगळा ॥
न हों जरि उताविळा, स्व-रिपु कापितो हा गळा ॥१७॥

कथा-सुरभि या भल्या स्व-जननीहुनी वाटती ॥
शिशूंसि जरठांसही निरखितां रसें दाटती ॥
दुहोत भलते सदा तरि न लेशही आटती ॥
स्व-वत्स-मल भक्षिती परि न सर्वथा बाटती ॥१८॥

असो वरि कसा तरी विमल भाव ज्याचा करा- ॥
तयावरि दया, पचे वर असाचि द्या चाकरा ॥
वृथाचि गमतें दिलें बहुहि जें न दासा जिरे ॥
पुसोनि अधिकार द्या, सु-कर तें सदा साजिरें ॥१९॥

तुझ्या समचि हें गुणे, अणु उणें नसे नाम, हा-॥
दिसे अधिकही तसा गुण तुला असेना महा ॥
सदैव भलत्यासही सुलभ, आणखी गायका-॥
छळी न, न अधो-गति क्षणहि दे जगन्नायका ॥२०॥

छळाल कृपणासि कां अजि दया-निधे, कापिती ॥
भटासि भट संगरीं, परि न कातरा दापिती ॥

कराल तितुकी कृपा बहु, अहो शरण्या, तमीं-
बुडोनि शरणागत श्रमतसें अरण्यांत मी ॥२१॥

तयीं प्रभुवरा तसे सदय, कां असे आज हो ॥
विचारुनि पहा बरें निज–मनीं महा–राज हो ॥
वनोवनिं फिरां पिशापरि, म्हणा अहो–रात्र 'हा ॥
नसे कुशल भाषणीं परि असे कृपा-पात्र हा ॥२२॥

न जें प्रिय स-दोष तें, प्रिय स-दोषही चांगलें ॥
स्व-तोक पितरां रुचे जरिहि कर्दमीं रांगलें ॥
तुलाचि धरि पोटिशीं कशि तदा यशोदा बरें ॥
जरी मळविशीं रजो-मलिन-काय तूं अंबरें ॥२३॥

प्रसिद्ध तुमचे महा-सदय पाय, जीवांकडे– ॥
चुकी म्हणुनि होतिल क्षणहि काय जी वांकडे ॥
न निष्ठुर पिता म्हणे मनिं न हो प्रजा टोणपी ॥
अपथ्य-रुचि रुग्ण तो कटुक ओखदें कोण पी ॥२४॥

असंख्य खळ संगरीं निज-करीं तुवां मारिले ॥
न निष्ठुरपणें, कृपा करुनि ते भवीं तारिले ॥
जगज्जनक तूं मुलें सकळ जीव, यां भातुकें ॥
दटावुनिहि देशि बा अमृत नेदिजे घातुकें ॥२५॥

सदाहि हित नायकों बहु, अपाय केले, करूं ॥
तरी स-कृप बाप तूं म्हणसि, 'नायके लेकरूं'
कधीं न करिसी प्रभो भजक-बालकोपेक्षण ॥
न तूजवरि ज्यापरी पशु-प-पाळ कोपे क्षण ॥२६॥

पिता जरि विटे विटो न जननी कु-पुत्रीं विटे ॥
दयामृत-रसार्द्र-धी न कुल-कज्जलें त्या किटे ॥
प्रसाद-पट झांकिती परि परा गुरूचे थिटे ॥
म्हणूनि म्हणती भले, 'न ऋण जन्म-देचें फिटे' ॥२७॥

अशी तरि कृतज्ञता हरि, तुझ्याच ठायीं अगा ॥
सख्या, अणुचि मानिसी करुनि सु-प्रसादा अ-गा ॥

भुले सु-कवि-वाग्वधू तव गुणा अनर्घ्या-नगा ॥
म्हणेल जन कोण कीं यश पुनःपुन्हा तें न गा ॥२८॥

करा श्रवण एवढें अ-पटु लोक हांसो मला ॥
अहो, जरि गिळावया प्रिय कुमार घे सोमला ॥
तयासि ठकवूनि दे बहुत शर्करा माय जी ॥
तिला स्व-शिशु-वंचनें अदयता शिवे काय जी ॥२९॥

सुसंगति सदा घडो, सुजन-वाक्य कानीं पडो ॥
कलंक मतिचा झडो विषय सर्वथा नावडो ॥
सदंघ्रि—कमळीं दडो मुरडितां हटानें अडो ॥
वियोग घडतां रडो, मन भवच्चरित्रीं जडो ॥३०॥

न निश्चय कधीं ढळो कुजन-विघ्न बाधा टळो ॥
न चित्त भजनीं चळो मति सदुक्त-मार्गी वळो ।
स्व-तत्त्व हृदया कळो दुरभिमान सारा गळो ॥
पुन्हा न मन हें मळो दुरित आत्म-बोधें जळो ॥३१॥

मुखीं हरि, वसो तुझी कुशल-धाम नामावली ॥
क्षणांत पुरवील जी सकळ कामना मावली ॥
कृपा करिशि तूं जगत्रय-निवास दासांवरी ॥
तशी प्रकट हे निजाश्रितजना सदा सांवरी ॥३२॥

दयामृत-घना अहो हरि, वळा मयूराकडे ॥
रडे शिशु तयासि घे कळवळोनि माता कडे ॥
असा अतिथि धार्मिक-स्तुत-पदा कदा सांपडे ॥
तुम्हां जड भवार्णवीं उतरितां न दासां पडे ॥३३॥

४ *रसने न राघवाच्या*

रसने न राघवाच्या थोडी यशांत गोडी ॥ ध्रु० ॥
निंदास्तुती जनांच्या, वार्ता वधूजनांच्या,
खोट्या व्यथा मनाच्या, कांहीं न यांत जोडी ॥

साधूंचिया सदातें, सुख देतसे सदा तें,
श्रवणीं सुधा, मदातें सोडूनि हात जोडी ॥
विनवी मयूर भावें, सखि हेंचि नित्य गावें।
मजला द्रवोनि पावें, दुसरें न बंध तोडी ॥

५ *दाम रामायण : एक वानगी*

श्रीपति झाला दशरथसुत राम दशाननासि माराया, ।
मा राया जनकाची होय सुता त्रिजगदाधि साराया ॥१॥
सारा या प्रभुची हे लीला गाती सदैवही सुकवी ।
सुकवी भवजलनिधितें निरुपम सुख रसिकजनमनीं पिकवी ॥२॥

६ *निरोष्ठ रामायण : एक वानगी*

श्रीहरि दशरथनंदन झाला दशकंठसंक्षय कराया, ।
दर शेष चक्र ही जनि घेती जगदखिल संकट हराया ॥ १ ॥
अंगज च्यार निधींचे संस्कृत साक्षर नरेंद्र कीर्तिकर ।
निरखी, नितांत हर्षे हा चि न तैसा चि नागरिकनिकर ॥ २ ॥
गाधिज यज्ञत्राणा याची, ने ज्येष्ठ सह कनिष्ठ तया ।
दे ताटकाक्षयकरा अस्त्रें, करि तातसा ऋषींद्र दया ॥ ३ ॥
रक्षी तद्याग, करी रक्षः-क्षय राजतनय हा ज्येष्ठ ।
सत्कृति करिते झाले सकळ धरात्रिदश जे अति श्रेष्ठ ॥ ४ ॥

◇

१९. रामजोशी

१. लावणी

(अ) *कोण्या ग सुभगाची*

कोण्या ग सुभगाची मदनमंजरी ।
सांग सखे सुंदरी ॥ धृ ॥

इच्या सौंदर्याची सीमा । झाली गडे रतिहुनी अति उत्तमा ।
पाहुनिया मुखचंद्रमा । सखे गडे अमा गमति पौर्णिमा ।
काय अधराची रक्तिमा । लाजवी नवकुंकुम विद्रुमा ।
अंगि वसन जिच्या भर्जरी । कोण्या ग सुभगाची० ॥१॥

मज वाटली विद्युन्नटी । भलिग रुपाची उतरली भटी ।
उरिं कंचुकी घट तटतटी । टिळक ल्लाटीं सुधारस घटी ।
पाहुनि कृशा तव कटी । हरीचा कृश कटिमद लटपटी ।
अशि अनंत गुणगुर्जरी । कोण्याग सुभ० ॥२॥

शिरिं सुंदर नवमल्लिका । झटति वर मधुकर रसकौतुका ।
नयनाननखंजन रंजिका । मधुर कंठांत लाजवी पिका ।
अशी वर्णिल कोण सदल्लिका । इतर कवि कविरायाहुनि फिका ।
मज वाटतसे निर्जरी । कोण्या ग सुभगाची मदनमंजरी ।
सांग सखे सुंदरी ॥३॥

(आ) *सुंदरा मनामध्यें भरली*

सुंदरा मनामधें भरली जरा नाहीं ठरली हवेलिंत शिरली मोत्याचा भांग ।
अरे गडया हौस नाहीं पुरली म्हणोनि विरली पुन्हा नाहीं फिरलि
कुणाची सांग ॥ धृ० ॥

जशी कळीं सोनचांफ्याची न पडुं पाण्याची दृष्टि सोण्याची ती नार ।
अति नाजुक तनु देखणी गुणाची खणी उभी नवखणी चढुन सुकुमार ।
जशि मन्मथरति धाकटी सिंहसम कटी उभी एकटी गळ्यामध्यें हार ।
अंगि तारुण्याचा बहर ज्वानिचा कहर मारिते लहर मंदनतलवार ।
पायीं पैंजण झुमकेदार कोणाची दार ?
कोण सरदार हिचा भरतार ?
कुलविद्याजडाव टिकली मनामध्यें टिकली नाहीं हटकिली तेज अनिवार ।
नाकामध्यें बुलाख सुरती चांदणी वरती चमकती परति हिच्यापुढें फार ।
चालते गड्या गजाची चाल लड सुटली कुरळे बाल ।
किनकाप अंगीचा लाल हिजपुढें नको धन माल ।
शोभवी दिठोणा गाल हिला जरि गाल विषय भोगाल फिटल तरि पांग ।
ही शुद्ध इंदुची मतिस नाकळा इतर वा कळा न हिजहुन चांग
सुंदरा मनामधें भरली जरा नाहीं ठरली ॥१॥

सुंदरी मूर्ति मदनाची अमृतवदनाची मदनकदनाची विखारी धार ।
बाहुली कामसूत्रांत मदन नेत्रांत कोक-शास्त्रांत निपुण ही फार ।
शुक पिक यांणिं धरिली लाज जहाले बाज कंठीं आवाज विण्याची तार ।
ही मन्मथनवरस हवा काय पहावा बूट व्हावया सफल संसार ।
कचघनांत सौदामिनी दिवसयामिनी जपावी मनीं कीं नकळे पार ।
वेणींत मूदराखडी कोर चोखडी माडीवर खडी विडा रंगदार ।
मणिकुसुम कर्ण शोभवी मतिस लोभवी मला तरी भवीं वाटली सार ।
नव्हे सुगंधा प्रौढ बाल दाविते तनूद्योताल, जित कंबुक तीचें नाल
अप्सरा उणी गुज वाल ।
वाटली मदनकरवाल काय करवाल ? कसें ठरवाल? हिचें कनक आंग ।
धाकुटी म्हणून कैकांची तुम्ही ऐकाची हिणें कैकांची उतरली भांग ।
सुंदरा मनामधें भरली जरा नाहीं ठरली ॥२॥

भुजबंद छंद नग नवा बसविला जवा तंत ताजवा न बहु नगभार ।
त्रिवळीं तळीं कांचीदाम मौक्तिकोद्दाम हिचा दरदाम जाणतो मार ।
नखिं नखिं मेंदि रंग लाल अंगठी वर लाल बहुत गुलजार चमक हिल्लाल !
सोन्याचे पाय जिवंत-ढुंबत ढुंबत कीं मदनपुतळी टाकि भूतळीं मंजु झुमकार ।

सुंदरि म्हणसि बाहेर हिचें माहेर कुठें घरदार ।
ती उभी जवळ तिची बटकी चढून जा हटकी बोल
चाल ठीक माडीवर वार ।
दैवानें घ्यावी लाधली नार बाधली बहुत साधली विरल कुणिवार ।
यापरि होउनि बेताल तो तरुणहि कुनकाबाल पुरविला मनाचा
ख्याल हा दर्द कठीण बेताल ।
म्हणुनि टाकाल नाहक बहकाल सुरस रोखाल कुठुन मग सांग ।
कविराय चमकला हीर लोकजाहीर इतर शाहीर काजवे वांग ।
सुंदरा मनामध्यें भरली जरा नाहीं ठरली हवेलिंत शिरली
मोत्याचा भांग ॥३॥

२. पेशव्यांचा शुक्रवारवाडा

कृष्णजन्म आनंद वाटतो गोकुळ आज हे पुणें ।
श्रीमंतांचें मंदिर कांहिं न वसुदेवाहुनि उणे ॥ ध्रु० ॥
अद्‌भुत कविचा वार पहा हो कृत मंदिर चातुरी ।
काय कल्पना अचाट शोभा बाहेर तसि भीतरीं ॥१॥
जिकडे तिकडे रंग कटारी खिडक्या जाळ्यावरी ।
ज्याणें जेथें बसुनि पहावें तेथें सुख अंतरीं ॥२॥
ठांई ठांई हवुद जळाचे अमृतसराचे परी ।
स्नानें करिती संध्या जप तप किति विप्रांच्या हरी ॥३॥
जेथें नरनारायण पूजा सांबासह आदरीं ।
प्रभुच्या हस्तें विप्रभोजनें भोजन ऐका तरी ॥४॥
साग्र कर्दळी दलें तयावरि षड्रस साखरपुरी ।
भात केशरी भक्षुनि खावें सवें वरपिती खिरी ॥५॥
पक्वदलाचे विडे सुवसनें ज्या त्या वरि भर्जरी ।
हार गळ्यामधें तुरे लटकती ज्याच्या त्याच्या शिरीं ॥६॥
गीत कला नर्तनें दिवा निशि सदैव रसमाधुरी ।
राजसु झाला एक वेळ हा नित्योत्सव मंदिरीं ॥७॥
ज्या ज्या ऋतुचे जसे यथोचित विलास नाना परी ।
भागवतांचे थवे नवे किति कीर्तनरस या घरीं ॥८॥

तळीं धरुनियां शिरींमंदिरा पर्यंकहि एकसरी ।
पडदे कुल रेशमी बिछोने जरबाबी झालरी ॥९॥
कविनें मंदिर कमळ म्हणावें जर ही सरसी पुरी ।
पंकज मंदिर खरे न कमला राती कमलोदरी ॥१०॥
या सदनामधें निरंतर श्री दिवाराति साजिरी ।
संध्येपासुनि निशांत शोभा दीप तिमिर संहरी ॥११॥
फाणस कंदिल पोत दुशाखा हिलाल समया तरी ।
समया अगणित मेणबत्तिचा प्रकाश अंतःपुरीं ॥१२॥
सायंकाळीं सुवास लक्ष्मीसमा फिरति सुंदरी ।
दांत मंचकी किती कितिक त्या डोले वरि नागरी ॥१३॥
ज्याच्या दामल मुक्ता सत्कुच कंदुक शोभति उरीं ।
आनंदें क्रीडती नारि किति न कळत या किन्नरी ॥१४॥
सुभोंवत्या अप्सरा पहा हो चिन्ह भासतें कसें ।
सूक्ष्म दृष्टिनें पाहिल त्याला सत्यचि सर्वहि दिसे ॥१५॥
यास्तव या घरिं कृष्णजन्म हे सत्यचि लटिकें नसे ।
टाळ, विणे, किति रुबाब भेरी वाद्यें वाजति रसें ॥१६॥
दानधर्म आनंद पहा हो किति निशिदिनिं होतसे
जेथें नरनारायण वसले स्वयें भक्तिच्या गुणें ।
तें मंदिर कविराय वर्णितो नको म्हणावें कुणें ॥१७॥

३. फटका

भला जन्म हा तुला लाभला

भला जन्म हा तुला लाभला खुलास हृदयीं बुधा ।
धरिशि तरि हरिचा सेवक सुधा ॥ध्रु०॥
चराचरीं गुरु तरावयाला नरा शिरावरि हरी ।
जरा तरि समज धरी अंतरीं ।
हटातटानें पटा रंगवुनि जटा धरिशि कां शिरी ।
मठाची उठाठेव कां तरी ।
वनांत अथवा जनांत हो कां मनांत व्हावें परी ।

हरीचें नांव भवांबुधितरी ॥ चाल ॥
काय गळ्यांत घालुनि तुळशीचीं लांकडें ।
ही काय भवाला दुर करितिल माकडें ।
बाहेर मिरविशी आंत हरिशिं वांकडें ।
अशा भक्तिच्या रसारहित तूं कसा म्हणविशी बुधा
हरिरस सांडुनि घेसी दुधा ॥१॥

जाळ गळ्यामधिं माळ कशाला व्याळ काम कोपला
आंतुनि, बाहेर म्हणविशी भला
वित्त पहातां पित्त येतसे चित्त पाहिजे मला ।
असें हरि म्हणतो नुमजे तुला ।
दांभिक वर संभावित अभ्यंतरिं नाहिंस बिंबला ।
बहिर्मुख नर नरका लाधला ॥ चाल ॥
तूं पोटासाठीं करि खटपट भलतिशी ।
परि भक्तिरसाविण हरि भेटेल काय तुशीं ।
काय मौन धरुनियां गोमुखिला जाळिशी ।
स्वार्थसुखें परमार्थ बुडविला अनर्थ केला मुधा ।
न जाणसि कांजी म्हणसी सुधा ॥भला० ॥२॥

टिळाटोपिवर शिळा पडो या बिळांत करिसी जपा ।
तथापि न होय हरीची कृपा ।
दर्भ मुष्टिच्या गर्भि धरुनियां निर्भर पशुच्या वपा ।
जाळिशी तिळा तांदुळा तुपा ।
दंडकमंडलु बंड माजविशि मुंड मुंडिशी तपा ।
न सार्थक लटक्या साऱ्या गपा ॥चाल॥
ही बार बार तलवार येईल काय पुन्हा ।
ह्या दुर्लभ नरदेहांत ठेविशी कुण्हा ।
भगवंत भुकेला भक्तीचा पाहुणा ।
वर्म कळेना धर्म घडेना कर्म चित्त न द्विधा ।
सदा हरि कविरायावर फिदा ॥
भला जन्म हा तुला० ॥३॥

४ नंदात्मज मंदं मंदं मा याहि

नंदात्मज मंदं मंदं मा याहिं
तुज अबरुच नाहीं ॥ ध्रु० ॥

गेहादपसर त्वमितः कंसारे
जन जागति सारे
कान्तादेकान्तः किमु संसारे
हें नेणसि का रे?
कामादिह भयं न लज्जा जारे
येथुनिया जा रे
लोके निजजनकयशस्त्वं पाहि
स्वकुळातें पाही ॥ १ ॥

दैवादिह जीवस्यहमतिगूढा
कां नेणसि मूढा
श्वश्रूः संप्रति मयि कोपारूढा
कां मरसी हूडा
केषामपि करगा भवति नवोढा
किति होसिल वेडा
भामा रुक्मिणी कुतस्ते राही
पर अबला कां ही? ॥ २ ॥

सिंहादप्युग्रतरो मे भर्ता
सावध हो पुर्ता
मन्ये त्वज्जीवनविमथनकर्ता
बोलावूं आर्ता
मा भूत्तवजीवितसंशयवार्ता
वांचुनि जा पर्ता
जाने त्वं मदनादन्तर्दाही
कविराय तसाही ॥ ३ ॥

सं की र्ण

जैसी हरळामाजी रत्नकिळा । कीं रत्नामाजी हिरा निळा ।।
तैसी भाषांमाजी चोखाळा । भाषा मराठी ।।१।।

जैसी पुष्पांमाजी पुष्प मोगरी । कीं परिमळांमाजी कस्तुरी ।।
तैसी भाषांमाजी साजिरी । मराठिआ ।।२।।

पखीआमधें मयोरु । वृखीआमधें कल्पतरु ।।
भाषामधें मानु थोरु । मराठियेंसीं ।।३।।

तारांमधें बारा राशी । सप्तवारांमाजी रवि शशी ।।
या दीपांचिआं भाषांमधे तैसी । बोली मराठिया ।।४।।

फादर स्टीफन्स

१. निवृत्तिनाथ

चंदनाचें झाड परिमळें वाड । त्याहूनि कथा गोड विठ्ठलाची ॥१॥
परिमळुसुमनीं जाईजुई मोगरे । त्याहूनि साजिरे हरि आम्हां ॥ध्रु०॥
आम्हां धर्म हरि आम्हां कर्म हरि । मुक्तिमार्ग चाऱ्ही हरि आम्हां ॥२॥
कां कल्पतरू इच्छिसि सागरु । त्याहूनि आगरु हरि माझा ॥३॥
निवृत्तिसुवासु ब्रह्मींचा प्रकाशु । विठ्ठल रहिवासु आम्हां पुरे ॥४॥

कमळाच्या स्कंधीं गुणीं सुढारलें । वरी आकारलें फूल तया ॥१॥
सुमनाचेनि वासें भ्रमर भुलले । मार्ग पैं विसरले इंद्रियांचा ॥ध्रु०॥
तैसे हे संत विठ्ठलीं तृप्त । नित्य पैं निवांत हरिचरणीं ॥२॥
नाठवे न दिन नाठवे निशी । अखंड आम्हांसि हरिराजा ॥३॥
तल्लीन प्रेमाचे कल्लोळ अमृताचे । डिंगर हरीचे राजहंसा ॥४॥
टाहो करूं थोर विठ्ठलकीर्तनें । नामाच्या सुमनें हरि पूजूं ॥५॥
निवृत्ति निवांत तल्लीन पैं जाला । प्रपंच अबोला हरिसंगें ॥६॥

आम्ही चकोर हरि चंद्रमा । आम्ही कला तो पूर्णिमा ॥१॥
कैसा वाहिजु भीतरीं हरि । बिंबें बिंबला एकसूत्रीं ॥ध्रु०॥
आम्ही देहि तो आत्मा । आम्ही विदेही तो परमात्मा ॥२॥
ऐक्यपणें सकळ वसे । द्वैतबुद्धि कांहीं न दिसे ॥३॥
निवृत्ति चातक इच्छि पां हे । हरिलागीं वरतें पाहे ॥४॥

२. चोखामेळा

धांव घाली विठू आतां चालूं नको मंद ।
बडवे मज मारिती ऐसा कांहीं नाहिं अपराध ।।
विठोबाचा हार तुझे कंठी कैसा आला ।
शिव्या देती, 'महारा' म्हणती 'देव बाटवीला' ।।
अहो जी ! महाराज ! तुमचे द्वारींचा कुतरा ।
नका जी मोकलूं चक्रपाणी जिमेदारा ।।
जोडूनीया कर चोखा विनवितो देवा ।
बोलिलों उत्तरीं परी राग नसावा ।।

३. मुक्ताबाई

मजवरी कृपा करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।
योगी पावन मनाचा । साही अपराध जनाचा ।।
विश्व रागें जालें वन्ही । संतमुखें व्हावें पाणी ।।
शब्दशस्त्रें जाले क्लेश । संती मानावा उपदेश ।।
विश्वपट ब्रह्म दोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।१।।

संत जेणें व्हावें । जग बोलणें सहावें ।।
तरिच अगा थोरपण । जया नाहीं अभिमान ।।
थोरपण जेथ वसे । तेथें भूतदया असे ।।
रागें भरावें कवणासी । आपण ब्रह्म सर्वदेशीं ।।
ऐसी समदृष्टी करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।२।

४. जनाबाई

१

डोईचा पदर आला खांद्यावरी । भरल्या बाजारीं जाईन मी ।।१।।
हातीं घेईन टाळ खांद्यावरी वीणा । आतां मज मना कोण करी ।।२।
पंढरीच्या पेठे मांडियले पाळ । मनगटावर तेल घाला तुम्ही ।।३।।
जनी म्हणे देवा मी झालें येसवा । रिघालें केशवा घर तुझें ।।४।।

२

येग येग विठाबाई । माझे पंढरीचे आई ॥
भीमा आणि चंद्रभागा । तुझे चरणींच्या गंगा ॥
इतक्यासहित त्वां बा यावें । माझे रंगणीं नाचावें ॥
माझा रंग तुझे गुणीं । म्हणे नामयाची जनी ॥

३

विठो माझा लेकुरवाळा । संगें लेकुरांचा मेळा ॥
निवृत्ति हा खांद्यावरी । सोपानाचा हात करीं ॥
पुढें चाले ज्ञानेश्वर । मागें मुक्ताई सुंदर ॥
गोरा कुंभार मांडिवरी । चोखा जीवा बरोबरी ॥
बंका कडियेवरी । नामा करांगुली धरी ॥
जनी म्हणे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा ॥

५. सांवता माळी

कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ॥
लसूण मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी ॥
मोट नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ॥
सांवता म्हणे केला मळा । विठ्ठलपायीं गोंविला गळा ॥

६. नारायण व्यास बहाळिये

'तैसा भरला वोरसू : करिता मठप्रवेसू'

वेडलीं त्रसीलें वछ : कीं पासमूक्त कडुस
पक्षीं झडपीले यां बाळहंस : गीवसी जननीयेतें ॥
तैसा भरला वोरसू : करितां मठप्रवेसू
तेथ प्रमये बोलावेया सौरसू : वाचेसि नाहीं ॥
व्याधापासौनि सूटलें : आर्त पक्षीणीचें पीलें
जेवि नीडें गीवसूं आलें : जननीयतें ॥

असंभवीयाचें लेंकरूं : घे पयोपान हावरू
तें दैवंदत क्षीरसागरू : जेवि लाहे ॥
जळाबाहीरा आवचीता : मीन पडे चडफडीता।
तो दैवंवसें मागौता । जळचि लाहे ॥
तेवि तीये राजभुवनीं : जो आनंदु भरला मनीं
तो काइ एकी वाचा वाणी : प्राकृती मीं ॥
संभ्रमाचेनि पूरें : झांपलीं बूधीचीं तीरें
तो उछावो न सवरे : इंद्रीयेंवोघां ॥
मना चांचल्य न स्फूरे : बूधि बोधत्व वीसरे
अहंकार अहंतत्त्वेंसीं मूरे : आपणपेंची ॥
इंद्रीय चीत्रस्तीतें : जालीं गात्रें स्तीतमंतें
हालिचालि कूंठली तेथें : बाहेम्यांतरीं ॥
कीं आत्मजाचेनि सळें : स्तंभचि आवतरला बळें
कीं (नी) जप्रसादा राउळें : प्रतीष्टीला ॥
सर्वांगीं उदैला स्वेदु : ढळमळीत श्रमबींदु
कीं तो सोमकांत पूर्णचंद्रु : द्रवत जैसा ॥
कीं वनमाळीयें लावणी : पेलीलें भवतरूसि पाणी
तें वाहात रोमांचसारणी : मज पांतां ॥
तें प्रेम परावृखीं : शरीरक्षेत्र मीं लेखीं
भणौनि कोंभैली पुळकीं : रोमबीजें ॥
कीं भवसत्रूभेण : लेइला रोमांचभुषण
कीं पुनर्भवदर्शना : कांटाळैला ॥
तें आज्ञान आनाथ बापूडें : कृपा देखौनि उघडें
रोमांचकंच कोडें : लेववीलें ॥
हृदइं भावाची दाटी : चेतना सांडीली दृष्टी
बास्पसद्‌गदीत कंठीं : तेणें बोलवेना ॥
वाताहत कदळीपत्रें : तैसीं वेपथें सर्व गात्रें
कीं गुणीया देवाचेनि मंत्रें : थरारीलीं ॥
कीं जीवदेहाचें धरणें : मज पांतां सूटे झणें
भणौनि भेण वीवर्णें : सर्व गात्रें ॥

कीं हृदइं श्रीचरणतळें : परीपुर्ण प्रेमजळें
बोसंडतां तुंब डोळे : वाहातु जैसे ॥
मनाबूधितें क्रमूनी : आवडि जीवीं राहे भरौनि
ते आयुष्याची बूडे डोणी : वीयोगार्णवीं ॥
असो हे आठै : भाव राउळें दीधले दळवैइ
वृत्तीक जालईं हृदइं : आनुरागाचा ॥
तें परसूख सूखोपचारीं : जेथ सेविले कींकरीं
त्या देवाचां सेजारीं : बोली हे ॥
आवरूनि भावाची उर्मी : म्हणे नांदीतले स्वामी
ते रचना पाहों आम्हीं : नेदुं सूखा चीत ॥

७. रवळो व्यास

तें सुंदर्य नाहीं जगीं : श्रीदत्ताचेनि पाडें

जो परब्रह्म-चंपकाचा कळा : किं दीव्य प्रभेचा पुतळा
ना तो सर्व सूखाचा एकवळा : जीव–देवतांसीं ॥१॥
किं चैतन्य–कनकाचा लांबणदीवा : अत्रीवंश–आनंद–कुळैवा
किं स्वयंप्रकाश अखंड लाखैवा : जीवोद्धरणाचा ॥२॥
किं सर्व शक्तींचां मेळीं : परज्ञानचक्र गोंदळीं
आनंद प्रकटला भुतळीं : जीवां उदो करीतु ॥३॥
किं अनुसया गर्भगगनीं तापनाशकु : उदैला आनंदमृगांकु
त्रिभुवन धवळीता एकु : तृप्त जीवचकोरां ॥४॥
ते श्रीमूर्ति चांपेगौर : कवणा वर्णवे सूंदर
जिएचें नावंचि उदार : ते सगुण बोलों कैसी ॥५॥
जेथ सीहाणी भली : भारती चकीत जाली
तें रूप प्राकृतां बोलिं : वर्णु कैसें ॥६॥
जऱ्हीं संध्यारागाचे सदा : काले दिजेति जांबूनदा
तऱ्ही ते आंगकांतिसीं कदा : उपमूं न ए ॥७॥
कनकगीरीचा गाभा सोलुनि : वीर सूर्यप्रभा संचरौनि
वोप सरिजैल घोंटाळुनि : तऱ्हीं उपमा नव्हे ॥८॥

घेउनि पद्मरागाचें तत्त्व : काढुनि सोनेचांपेयाचें सत्त्व
कनककेतकीचीया दतीं एकत्व : किजैल जऱ्हीं ॥९॥
परि हे उपमा पाबळी : करणीएची नुतरे पारवाळीं
श्रीदत्ताची आंगकांति आगळी : सहज म्हणौनि ॥१०॥
पाणि करूनि वीजुची खोटी : परतौनि संध्याराग एकवटी
पूर्णचंद्र वळधैल उटी : तऱ्हीं सरि न पवे ॥११॥
तया आति कळातुटी : असा जाए सेवटीं
चकोरां उपवासू पाठीं : होए अंधकारू ॥१२॥
म्हणौनि दत्ताचिए चद्रांगकांती : उपमा नाहीं त्रीजगतीं
जीव–चकोरां नित्यतृप्ती : मोहांधकारा ठावो नाहीं ॥१३॥
जें विश्वाचें सार : चैतन्य कामवलें अरूवार
तै कैवल्य-मूर्ति सकुमार : कैसी सांगों ॥१४॥
पांतां दृष्टि खूपे आंगीं : मन रूपौनि न नीगे वेगीं
तें सुंदर्य नाहीं जगीं : श्रीदत्ताचेनि पाडें ॥१५॥

८. विष्णुदास नामा

आम्ही न बोलो लटिकें । अवघें वर्तमान खोटें ।
मुंगी व्याली शिंगी झाली तिचें दूध किती ।
अठरा रांजण भरुनि ठेविले प्याले बारा हत्ती ॥
तळ्यांत कासव गीत गाय, तडिवर कोल्हा नाचे ।
घेऊनि कागद दौत लेखणी खेंकडा पुस्तक वाचे ॥
विष्णुदास नामा म्हणे ऐका याची ख्याती ।
जो लटिके म्हणेल त्याचे पूर्वज नरकीं जाती ॥

९. दासोपंत

१

सुंदरु आणि सावळा भाळीं टीळकु पीवळा;
पांगुरला सोनेसळा; कंठीं माळा सुमनाची ॥१॥ ध्रु०॥

ऐसा कैं येसी ? सांग, पा ! कमळनयना ! बापा ! ॥छ॥
किरीटकुंडलांची झळाळ, लोपे दिनकराचें मंडळ.
बोलतां शब्द मृदु मंजुळ दशनी कीळ फांकती ॥२॥
स्वभक्तजनीं प्रपुजीला; पुडती तेहीं चि परिवारला ।
परब्रह्म गुणपुतळा; अतिकृपाळा ! दिगंबरा ! ॥३॥

२

दोन्ही डोळुले सजल जलधर जाणवले.
मायेबापें सखिये ! हृदय वोळखीलें. ॥१॥ ध्रु०॥
दिधलें वो आलिंगन; जीवें जीवा येकपण
भेटी भेटणें न दीसे स्वरूप स्थिर पूर्ण ॥छ॥
भेदु सारूनी, सखिये ! श्रीदत्तु भेटी आला.
दिगंबरें भवश्रमु माझा वो ! दूरि केला. ॥२॥

३ पुराणिक आणि त्यांचे श्रोते :

पीतगंध ललाटीं । वरि कस्तुरिची द्विबोटी । आरक्ताक्षता निहटीं । रेखिलिया जाणों ॥१॥ श्वेतचंदनें डंवरिले । सर्वांग उदें धूपिलें । मस्तक भरूनि फुलें । चंपकाचीं ॥२॥ केतकीदळें ठाईं ठाईं ॥ आरोपित कपोलीं दोहीं । पुष्पघोस तें जें हीं । श्रीमुख शोभे ॥३॥ नाना वर्णा पुष्पमाळा ॥ तियां घाल्लनियां गळां । बुका सर्वांगीं उधळिला । श्रोत्रीं गंधराजु ॥४॥ कडेलु पीतांबरू सोनेसळा । कडेलु श्वेतु वरि पांघुरला । मध्यें मुक्ताफळें अक्षमाळा । शोभती कंठीं ॥५॥ शुद्धा कोंदणाचे खिळे । प्रतिदंती वेगळाले । बोलु बोलतां आगळे । झळकती वीजुइनी ॥६॥ कर्णमात्रा झळकती । मुखावरी पडे ते दीप्ती । तेणें शोभे गौरकांती । तया मुखाची ॥७॥ श्रोत्रांचे तेज आगळें । दशनांचिया तेजा मिनलें । उभय तेज फाकलें । मुखावरी ॥८॥ तेणें मुखाचा गौरवर्णु । दिसो लागे शोभायमानु । वीर सुंदरतेचा गुणु । तारुण्य आगळें ॥९॥ पासीं झारी सुर्वणवर्णा । वरी चोख घडी उपरणा । नाना वर्णांचिया वेष्टना । उपमा नाथी ॥१०॥ वामदक्षिणभागीं ग्रंथ । वेष्टणीं दिसती सुशोभित । मध्यें पुस्तक धवधवित । विचित्रें पानें ॥११॥ पुढें सभा श्रोतयांची । मागें तयां विद्यार्थियांची । मग

प्रारंभणा कथेची । तेची कैसी? ॥१२॥ मृदांगु येकु वांचूनि । आणि टाळु वीणा तये स्थानीं । उपांग आणि श्रुति दोन्ही । लाविलिया तत्काळें ॥१३॥ मग ते पाहोनि सुवेळा । क्रमेंचि आलापु केला । तदंगन्यास केला । संपादी कुशलत्वें ॥१४॥ भ्रुद्वयीं आणी ठेव । दावीं स्वरानुसार करपल्लव । तेणेंचि अंगें बरव । दिसों लागे ॥१५॥ कर्णभूषणें झळकती । दंत तेजकीळ फांकती । हस्त मात्रांचिया पंक्ती । दावीं प्रेत्नें ॥१६॥ कंठाचें माधुर्यपण । तेथें लोधले येकजण । जयां नाहीं ज्ञान । रागमालेचें ॥१७॥ आलापाचे जाणते । ते लोधले जन तेथें । विश्रांति पावले चित्तें । तितुलेनिचि ॥१८॥ दोन्हीं विषयीं अज्ञान । ते मुखचि पाहती जन । रुपले नुपडती नयन । कांहीं करितां ॥१९॥ अधरोष्ट येक लक्षिती । कर्णभूषणें येक पाहती । करपल्लव वेलीं जाती । तेचि येक ॥२०॥ मग आलापाचा अवसानीं । प्रवर्ते मंगलाचरणीं । आलापरूपेंचि मांडणी । तयाची करी ॥२१॥ मंगलाचरण संपादिलें । क्षणेकु नयन लाविलें । जैसें गुरुध्यानीं गुंतले । सुभक्तजन ॥२२॥ तैसेचि भाव आणून । सजल करी नयन । मग क्षणा येका सांवरून । श्लोकु आरंभी ॥२३॥ आलापाचि वरी घोळितु । श्लोकु बोले समस्तु । मग पदमोडी करितु । ते वैयाकरण शुद्ध ॥२४॥ पदान्वयें बोले अर्थु । परि आलापाची वरी समस्तु । आला शब्दु प्राकृतु । तानेचि संपादी ॥२५॥ अर्थी घालुनि अंतःकरण । शरीर करी दोलायमान । लावी, उघडी नयन, । प्रेम आणी ॥२६॥ अर्थानुसार देहभाव । अर्थानुसार न्यासमुद्रा अंगपल्लव । अर्थानुसार गौरव । आणी शरीरीं ॥२७॥ अर्थानुसार हास्यरंजन । अर्थानुसार लावी नयन । अर्थानुसार मान । मस्तक हालवी ॥२८॥ 'बापु, बापु, कैसा कैसा?' । क्षणाक्षणा शब्दु ऐसा । अनुवादे माणुसा । लावी वेधु ॥२९॥ प्रसंगु निघे युद्धाचा । तरि आवेशु आणी वीराचा । रोषावेशु तेथिंचा । संपादुनि दावी ॥३०॥ भुजा दंड पीटितु । मागें पुढें अवलोकितु । घ्याघ्याकारें गर्जुतु । मुद्रा दाखवी ॥३१॥ विरावें आणूनि दावी । तें श्रोतयां आंगीं खेळवीं । धडातें वेड लावी । आवेशाचें ॥३२॥ येथेंचि जाणों वैरी । होईल जाणों मारामारी । ऐसा आवेशु शरीरीं । संचरे श्रोतयां । ॥३३॥ वैराग्याचा निघे प्रसंगु । तैं न्यासे दावी वीतरागु । विसरवी संसारमार्गु । श्रोतयांतें ॥३४॥ श्रोतयां अर्थाची अचाड । वाचांचि लागे ग्याची गोड । देहचार उदंड । तेचि आवडती ॥३५॥

□ □

१०. शेख महंमद

ऐसें केलें या गोपाळें । नाहीं सोंवळें ओवळें ॥
कांटे केतकीच्या झाडा । आंत जन्मला केवडा ॥
फणसा अंगीं कांटे । आंत अमृताचे सांठे ॥
नारळ वरुता कठिण । परी अंतरीं जीवन ॥
शेख महंमद अविंध । त्याचे हृदयीं गोविंद ॥१॥

११. रमावल्लभदास

कान्हो इंद्र कोपला

कान्हो इंद्र कोपला, पर्जन्य व्यापला, करि करि आपला विचार रे
कान्हो म्हणे चला चला, गोवर्धन उचला, सकळांसि होईल थारा रे ॥
हो हो मस्तक लाविती, हस्तक दाविती, एक डांग्याचा आधार देती रे
हो हो गुडघ्या हातुलें, पाठीनें उचलें, एक मोठयानें आरोळ्या देती रे ॥
एकमेकां बाहाती, एकमेकां पाहाती, सांवळ्या, म्हणती, अंग राख रे
कान्हो परता तरी होय, रुधविली कां भोंय, लटिकेचि करिसि वरि नखरे रे ॥
ऐसी ऐकोनि मान पैं, कान्हा काढी हात पैं, बाहती गडी मेलों मेलों रे
कान्होबा तूं बळी बळी, नको करूं रांगोळी, तुजविण वाया गेलों रे ॥
अरे ह्या कृष्णाजीवीण, वरी काडीहि नुचले कोण, मा डोंगर उचलेल कायी रे
आम्हांमध्यें आहे म्हणुल वेळिल वाटताहे आतां सकळ चरणिं लागो भाइ रे॥
सकळांसीं उठवी, प्रीतीनें लाघवी, म्हणे देव तुमचें बरें आहे रे
भावार्थ पुरता तरीच वरुता उचलिला गिरिवर पाहे रे ॥
येणें गोवर्धन धरिला बोटें, नवल हें नव्हे मोठें, अनंत ब्रह्मांडें पोटीं याचि रे
म्हणे रमावल्लभदास उतराई न हों यास, नाम म्हणा निरंतर वाचे रे ॥

१२. विठ्ठल

कूट श्लोक

कोणे एक वनीं विचित्र पुतळा जेवावया बैसला ॥
पात्रीं जेवण जेवितां, अति बळें पात्रेंचि तो भक्षिला ॥
त्याची जे वनिता वनांत फिरतां सूर्यास प्रार्थी सदा ।
बोले विठ्ठल हा पदार्थ उमगा षण्मासिचा वायदा ॥१॥

१३. देवीदास

जयजयाजी व्यंकटरमणा

जयजयाजी व्यंकटरमणा । दयासागरा परिपूर्णा ।
परंज्योति प्रकाशगहना । करितों प्रार्थना श्रवण कीजे ॥१॥
जननीपरी त्वां पाळिलें । पितयापरी त्वां सांभाळिलें ।
सकळ संकटांपासूनि रक्षिलें । पूर्ण दिधलें प्रेमसुख ॥२॥
हें अलोलिक जरी मानावें । तरी जग हें सृजिलें आघवें ।
जनकजननीपण स्वभावें । सहज आलें अंगासी ॥३॥
दीननाथा प्रेमासाठीं । भक्त रक्षिले संकटीं ।
प्रेम दिधलें अपूर्व गोष्टी । भजनासाठीं भक्तांच्या ॥४॥
तुज न जाणतां झालों कष्टी । आतां दृढ तुझे पायीं घातली मिठी ।
कृपाळुवा जगजेठी । अपराध पोटीं घालीं माझे ॥५॥
माझिया अपराधांच्या राशी । भेदोनि गेल्या गगनासी ।
दयावंता हृषीकेशी । आपुल्या ब्रीदासी सत्य करीं ॥६॥
पुत्राचे सहस्र अपराध । माता काय मानी तयांचा खेद ।
तेवीं तूं कृपाळू गोविंद । माय-बाप मजलागीं ॥७॥
उडदांमाजी काळेंगोरें । काय निवडावें निवडणारें ।
कुचलिया वृक्षाचीं फळें । मधुर कोठोनि असतील ॥८॥
अराटीलागीं मृदुता । कोठोनि असेल कृपावंता
पाषाणासी गुल्मलता । कैशियापरी फुटतील ॥९॥
आपाद मस्तकावरी अन्यायी । परी तुझे पदरीं पडलों पाहीं ।
आतां रक्षण नाना उपायीं । करणें तुज उचित ॥१०॥
समर्थांचिये घरींचें श्वान । त्यासी सर्वहि देती मान ।
तैसा तुझा म्हणवितों दीन । हा अपमान कवणाचा ॥११॥
लक्ष्मी तुझे पायांतळीं । आम्हीं भिक्षेसी घालोनि झोळी ।
येणें तुझी ब्रीदावळी । कैशी राहील गोविंदा ॥१२॥
कुबेर तुझा भांडारी । आम्हां फिरविसी दारोदारीं ।
यांत पुरुषार्थ मुरारी । काय तुजला पैं आला ॥१३॥

द्रौपदीसी वस्त्र अनंता । देत होतासी भाग्यवंता ।
आम्हांलागीं कृपणता । कोठोनि आणिली गोविंदा ॥१४॥
मावेची करूनि द्रौपदी सती । अन्नें पुरविलीं मध्यरातीं ।
ऋषीवरांच्या बैसल्या पंक्ती । तृप्त केल्या क्षणमात्रें ॥१५॥
समुद्रें अंगीकारिला वडवानळ । तेणें अंतरीं होतसे विव्हळ ।
ऐसें असोनि सर्वकाळ । अंतरीं सांठविला तयानें ॥१६॥
कूर्में पृथ्वीचा घेतला भार । तेणें सोडिला नाहीं बडिवार ।
एवढा ब्रह्मांडगोळ थोर । त्याचा अंगीकार पैं केला ॥१७॥
शंकरें धरिलें हाळाहळा । तेणें नीळवर्ण झाला गळा ।
परी त्यागिलें नाहीं गोपाळा । भक्तवत्सला गोविंदा ॥१८॥
माझ्या अपराधांच्या परी । वर्णितां शिणली वैखरी ।
दुष्ट पतित दुराचारी । अधमाहूनि अधम ॥१९॥
अठरा भार वनस्पतींची लेखणी । समुद्र भरला मषीकरुनी ।
माझे अवगुण लिहितां धरणी । तरी लिहिले न जाती ॥२०॥
ऐसा पतित मी खरा । परी तूं पतितपावन शार्ङ्गधरा ।
तुवां अंगिकार केलिया गदाधरा । कोण दोषगुण गणील ॥२१॥
तुझें नाम पतितपावन । तुझें नाम कलिमलदहन ।
तुझें नाम भवतारण । संकटनाशन नाम तुझें ॥२२॥
आतां प्रार्थना ऐक कमळापती । तुझे नामीं राहो माझी मती ।
हेंचि मागतों पुढत-पुढतीं । परंज्योति व्यंकटेशा ॥२३॥

१४. मध्वमुनीश्वर

१

माझं अचडं बचडं छकडं ग । माझं० ॥ध्रु०॥
विकसित पंकजलोचन ज्याचे ।
जननि म्हणे हें चिपडं ग ॥ माझं० ॥१॥
त्रिभुवनपालक बालक त्याला ।
पांघरविते घोंगडं ग ॥ माझं० ॥२॥

अंगणिं रांगत मंजुळ बोलत ।
माझं सोन्याचं ठिगडं ग ॥ माझं० ॥३॥
मध्वमुनीश्वर खेळवि अंकीं ।
ब्रह्मसनातन उघडं ग ॥ माझं० ॥४॥

२ *उद्धवा शांतवन कर जा*

उद्धवा शांतवन कर जा—त्या गोकुळवासि जनांचें ॥ध्रु०॥

बा नंद यशोदामाता—मजसाठीं त्यजितिल प्राण ।
त्यागुनी प्रपंचा फिरती,—मनिं उदास रानोरान
अन्नपाणि त्यजिलें रडती,—अति दुःखित झाले दीन ।
जन्मलों तैंहुनी झटले ।
मजलागीं तिळतिळ तुटले ।
कटिखांदे वाहतां घटले ।
आटलें रक्त देहाचें ॥ उद्धवा० ॥१॥

आईबाप त्यजुनी बाळें,—मजसंगें खेळत होतीं ।
गोडशा शिदोऱ्या आणुनी,—आवडिनें मजला देती ।
रात्रंदिस फिरले मागें,—दधि गोरस चोरूं येती ।
मी तोडुनि आलों तटका ।
जो जिवा लागला चटका ।
मजविण त्या युगसम घटका ।
आठवतें प्रेम जयांचें ॥ उद्धवा० ॥२॥

पतिसुतादि गृहधन त्यजिलें,—मजवरती धरुनी ममता ।
मानिलें तुच्छ अपवर्गा,—मजसंगें निश्चळ रमतां ।
मद्दत्तचित्त त्या गोपी,—नेत्रांतरिं लावुनि समता ।
तिळतुल्य नाहिं मनिं डगल्या ।
दृढ निश्चय धरुनी तगल्या ।
बहुधा त्या नसतिल जगल्या ।
भंगले मनोरथ ज्यांचे ॥ उद्धवा० ॥३॥

हरि आहे सुखरुप म्हणुनी,–भेटतांचि त्यां सांगावें ।
सांग कीं समस्तां पुशिलें,–प्रत्युत्तर त्यां मागावें ।
करुनियां ज्ञान तयांतें,–सांग कीं शोक त्यजावे ।
हें कार्य नव्हे तुजजोगें ।
मजसाठीं जावें वेगें ।
हें मध्वमुनीश्वर सांगे ।
त्या न पवे ज्ञान जयाचें ॥उद्धवा०॥४॥

□ □

१५. कृष्णकेशव

भूपाळी श्रीकृष्णाची

ऊठि गोपाळजी ! जाई धेनूंकडे । पाहती सौंगडे वाट तूझी ॥ध्रु०॥
लोपली हे निशी, मंद झाला शशी । मुनिजन मानसीं ध्याति तुजला ॥१॥
भानु-उदयाचळीं तेज पुंजाळलें । विकसती कमळें जळामाजीं ॥२॥
धेनुवत्सें तुला बाहती माधवा । ऊठ गा यादवा ! उशिर झाला ॥३॥
ऊठ पुरुषोत्तमा ! वाट पाहे रमा । दावि मुखचंद्रमा सकळिकांसी ॥४॥
कनकपात्रांतरीं दीपरत्नें बरीं । ओंवाळिती सुंदरी तूजलागीं ॥५॥
जन्मजन्मांतरीं दास होऊं हरी । बोलली वैखरी भक्त तूझे ॥६॥
कृष्णकेशव करीं चरणांबुज धरी । ऊठ गा श्रीहरि मायबापा ॥७॥

१६. रामानंद

भूपाळी गणपतीची

उठा उठा सकळिक । वाचे स्मरावा गजमुख ।
ऋद्धि-सिद्धींचा नायक । सुखदायक भक्तांसी ॥ध्रु०॥
अंगीं शेंदुराची उटी । माथां शोभतसे कीरिटी ।
केशरकस्तूरी ल्ल्हाटीं । हार कंठीं साजिरा ॥१॥
कानीं कुंडलीची प्रभा । चंद्र-सूर्य जैसे नभा ।
माजीं नागबंदी शोभा । स्मरतां उभा जवळी तो ॥२॥
कांसे पीतांबराची धटी । हातीं मोदकांची वाटी ।
रामानंद स्मरतां कंठीं । तो संकटीं पावतो ॥३॥

१७. श्रीरंगात्मज

प्रदक्षिणा

धन्य धन्य हे प्रदक्षिणा सद्‌गुरुरायाची ।
झाली त्वरा सुरवरां विमान उतरायाची ॥ध्रु०॥

पदोपदीं अपार झाल्या पुण्याच्या राशी ।
सर्वहि तीर्थे घडलीं आम्हां आदिकरुनि काशी ॥१॥

मृदंग टाळ घोळ भक्त भावार्थे गाती ।
नामसंकीर्तनें ब्रह्मानंदें नाचती ॥२॥

कोटि ब्रह्महत्या हरती करितां दंडवत ।
लोटांगण घालितां मोक्ष लोळे पायांत ॥३॥

गुरुभजनाचा महिमा न कळे आगमा-निगमांसी ।
अनुभव ते जाणती जे गुरुपदिंचे रहिवासी ॥४॥

प्रदक्षिणा करूनि देह भावें वाहिला ।
श्रीरंगात्मज विठ्ठल पुढें उभा राहिला ॥५॥

१८. शिवराम

विडा श्रीकृष्णाचा

विडा घ्या हो नारायणा । कृष्णा जगत्रजीवना ।
विनविते रखुमाबाई । दासी होईन मी कान्हा ॥विडा०॥ध्रु०॥

शांती हे नागवेली । पान घेऊनिया करीं ।
मीपण जाळुनीया । चुना लावियेला वरी ॥विडा०॥१॥

वासना फोडुनीयां । चूर्ण केली सुपारी ।
भावार्थ-कापुरानें । घोळियेली निर्धारीं ॥विडा०॥२॥

विवेक-कातरंग । रंगीं रंगला सुरंग ।
वैराग्य-जायफळ । मेळविलें अभंग ॥विडा०॥३॥

दया हे जायपत्री । क्षमा-लवंगा आणिल्या ।
सुबुद्धि वेलदोडे । शिवरामें अर्पियेले ॥विडा०॥

१९. गोविंदबुवा

असा धरिं छंद

असा धरिं छंद । जाय तुटोनियां भवबंध ।।ध्रु०।।
छंद लागला टिटवीला । तिनें समुद्रही शोषिला ।।
मैनावतिनें कृतार्थ केला । गोपीचंद ।।जाय०।।१।।
दुधाचा सागर उपमन्यूला । अढळ पदावरि तो ध्रुव बसला ।
मार्कंडेयें यम हटवीला । झाला मंद ।।२।।
झाले तीन देह भरताला । रावण रामरूप तो झाला ।
गोपी चढल्या गोलोकाला । यशोदानंद ।।३।।
आळीस भ्रमराचा अध्यास । होतां भ्रमरपणा ये तीस ।
तैसा सांडुनि जीवपणास । भोगिं आनंद ।।४।।
छंदे असाध्यही साधिती । नर ते नारायणही होती ।
दीनजन हरि आपुला करिती । जो सुखकंद ।।५।।

२०. रामा जनार्दन

आरती ज्ञानेश्वराची

आरती ज्ञानराजा । महाकैवल्यतेजा ।।
सेविती साधुसंत । मनु वेधला माझा ।। ध्रु० ।।१।।
लोपलें ज्ञान जगीं । हित नेणती कोणी ।।
अवतार पांडुरंग । नाम ठेविलें 'ज्ञानी' ।।२।।
प्रगट गुह्य बोले । विश्व ब्रह्मचि केलें ।
रामा जनार्दनीं । पायीं टकचि ठेलें ।।३।।

२१. श्रीसोहिरोबानाथ

काय म्यां सांगों गे माये ! नवल जाहलें ।।ध्रु०।।
चैतन्य-सिंधुमाजीं, सैंधवकाया ही डोले ।।१।।
निर्वात कर्पुरदीपीं, प्रणवपतंग बोले ।।२।।
आकाशावरि जळ त्यावरि कमळिणी खोले ।।३।।

हात नाहीं पाय ऐसे भ्रमर गुंतले ॥४॥
नामचि नुरतें केलें, लया आमोदें नेलें ॥५॥
सोहिरा म्हणे हें आंगाथिलें, तें रूपाविण देखिलें ॥६॥

२

हंसाचा चारा । न इच्छिती वायस ।
आणि मेल्या मांस । भक्षितील त्यांचें ॥१॥
नागसरीचे सूख । दिवडा केविं कळावें ।
उंदीरचि गिळावे । त्याणें पैं गा ॥२॥
अग्निमाजी सती । एकलीच जळे ।
आणि पाहावया मिळे । सकळ जन ॥३॥
तैसा कोणी न झोंबे । साधूच्या आनंदा ।
आणिक करावया निंदा । कित्येक मिळती ॥४॥
सोहिरा म्हणे यांत । आमुचें काय गेलें ।
तुमचेचि केलें । पावाल तुम्हीं ॥५॥

३

नक्षत्रेश सुधीं चकोर संवकें कें दूसरें खाइल,
निर्गूणीं मन वेधलें तनुचिया कीं पोषणा जाइल.
देवा ! तूं नच देसि काय जन तें देऊनियां देइल,
स्वप्नींचें धन सोहिरा म्हणतसे की जागृती येइल !

२२. होनाजी

घनःश्याम सुंदरा

घनःश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला ।
उठिं लवकरि वनमाळी उदयाचळीं मित्र आला ।
सायंकाळी एकें मेळीं द्विजगण अवघे वृक्षीं ।
अरुणोदय होतांचि उडाले चरावया पक्षी ॥
अघमर्षणादि करुनि तापसी तपाचरण दक्षी ।
प्रभातकाळीं उठुनी कापडी तीर्थपंथ लक्षी ॥

करुनि सडासंमार्जन गोपी कुंभ घेउनीं कुक्षीं ॥
यमुनाजळासी जाति मुकुंदा, दध्योदन भक्षी ।
मुक्तता होउं पाहे कमळिणिपासुनि भ्रमरा ।
पूर्व दिशे मुख धुतलें, होतसे नाश तिमिरा ।
उठिं लवकरि गोविंदा सांवळ्या नंदकुमरा ।
मुख प्रक्षालन करी अंगिकारी भाकरकाला ॥उठि०॥१॥

घरोघरीं दीप अखंड त्यांच्या सरसावुनि वाती ।
गीत गाति सप्रेमें गोपी सदना येति जाती ॥
प्रवर्तोनि गृहकामीं रंगावली घालुं पाहाती ।
आनंदकंदा प्रभात झाली, उठ सरली राती ॥
काढी धार क्षीरपात्र घेऊनि धेनू हंबरती ।
दारिं उभे गोपाळ तुजला हाक मारुनि बाहती ॥
हे सुमनहार कंठीं घालि या गुंजमाळा ।
हातीं वेत्रकाष्ठ बरवें कांबळा घेई काळा ।
ममात्मजा मधुसूदना हृषिकेशि जगत्पाळा ।
हंबरताति वासरें धेनुस्तन पान्हा आला ॥उठिं०॥२॥

प्रातःस्नानें करुनि गोपिका अलंकार नटती ।
कुंकुमादि चर्चुनी मंथनालागिं आरंभिती ॥
प्रेमभरित अंतरांत वदनीं नामावलि गाती ।
अर्घ्यदान देउनियां द्विजजन देवार्चन करिती ॥
नेमनिष्ठ वैष्णव ते विष्णुपूजा समर्पिती ।
स्मार्त शिवार्चनसक्त शक्तितें शाक्त आराधिती ॥
ऋषिगण आश्रमवासी जे कां निरंजनीं धाले ।
अरुणोदय होतांचि आपुले ध्यानिं मग्न झाले ।
पंचपंच उषःकालीं रविचक्र निघों आलें ।
येवढा वेळ निजलासि म्हणुनि हरि समजेल नंदाला ॥ उठिं०॥३॥

विद्यार्थी विद्याभ्यासास्तव सादर गुरुपायीं ।
अध्यापन गुरु करिती, शिष्यही अध्ययना उदयीं ॥

याज्ञिकजन कुंडांत आहुती टाकितातिे पाहीं ।
रविप्रभा पडुनिया उजळल्या शुद्ध दिशा दाही ॥
हे माझे सांवळे पाडसे उठीं कृष्णाबाई ।
सिद्ध सवे बळिराम घेउनी गोधनें वना जाई ॥
मुनिजनमानसहंसा गोपीमनःकमलभृंगा ।
मुरारपंकज पाणी पद्मनाभ श्रीरंगा ।
शकटांतक सर्वेशा हें हरि प्रतापतुंगा ।
कोटि रवीहुनि तेज आगळे तुझिया वदनाला ।
होनाजी बाळा नित्य ध्यातसे हृदयिं नाममाला ॥ उठि०॥४॥

२३. प्रभाकर

लक्ष्मी–पार्वती संवाद

लक्ष्मी गर्वे निंदा बोलुन झिडकारिती पार्वती ।
आहे ठाऊक पुरुषार्थ तुझा तुज प्रिय असो पशुपती ॥ध्रु०॥

स्मशानवासी भूषण भयंकर पिंगट मुकुटीं जटा ।
भाळी चंद्र ज्या तीन नेत्र भस्माचा कपाळीं पटा ।
व्याघ्रांबर गजचर्मावर परिधान शुद्ध कानफटा ।
रुंडमाळ ती कंठीं कुंडलें भुजंग रुळती कटा ।
त्रिशुळ पाणी त्रिपुंड भाळीं लोहोकंकण मनगटा
नंदी वहन सर्पाचा सदोदित करिं कमरे लंगुटा ।
कसा आवडतो शंकर गिरिजे सांग तुला मजप्रती ।
लक्ष जन्मिचें पातक म्हणउन पडलिस ऐशा हातीं ॥१॥

भोळा माझा सांब लक्षुमी उगाच निंदूं नका ।
आदी अंत नसे अगम्य सुख तें अप्राप्त ब्रह्मादिकां ।
सोळा सहस्र शत एक मुख्य तुम्ही अष्टजणी नायिका
कार्यवादु तो कृष्ण कसा करी पूर्ण मनोरथ सखा ।
वक्रदंतशिशुपालकीटकां कपटें मर्दुन बका ।
प्रताप मुखें वर्णितां कशा भाळल्यात गोरक्षका ।

जरासंध रिपु भयें वसविली जळांत द्वारावती ।
तस्करास कसा श्वशुर जडला पहा भीमक भूपती ।।
मच्छ कूर्म हा सूकर झाला सिंह वामन श्रीपती ।
जन्म गेला पहा अशा खालिं म्हणे लक्ष्मीस पार्वती ।।२।।

भूतें पिशाचें यक्ष ब्रह्मराक्षस हें ज्याचे दुत ।
श्वानें सभोंवतीं मिळवुन संगें फिरे भिक्षा मागत ।
भुंभुं वाजवि शंख मुखानें चिताभस्म लावी नित ।
शूर्पकर्ण षणमुख ज्याचे नवल परीचे सुत
मना गमे तिथें निद्रा करितो जिवंत पहाता भुत
हिमालयाचे थोर असें प्रारब्ध पाहुन विस्मित ।
धन्य तुझी पार्वती अशाची राखितेस चितवृती ।
दैवदशा भ्रतार तामसी कठीण होतां गती ।।३।।

अनंत घेतो जन्म तुझा पति क्षीरसमुद्रामधीं ।
शेषावर निद्रिस्त नाभिवर चार मुखांचा विधी ।
वहन विहंगम दिलें सुदर्शन कळून शंकरे अधी ।
सुरासुरी तुजसाठी मंथिला पराक्रमें जळनिधी ।
इच्छा करती प्राणिमात्र तूं चंचळ नाहिंस सुधी ।
शंख सहोदर तुझा लक्षुमी श्रीमंत झालिस कधीं ।
कृपानिधी हा सांब वसे अर्धांगी मी त्याची सती ।
लिळा तयाचीं विचित्र भासे विदीत सर्वांप्रती ।।४।।

तपसामर्थ्ये करुन शिवाला भस्मासुरे जिंकिलें ।
हरुन तुला पार्वती त्वरेने स्कंधावर वाहिलें ।
लपूं लागला सांब तेव्हां मम पतीस पाचारिलें ।
मोहनीरूप प्रत्यक्ष धरुन त्या राक्षसास जाळिलें ।
गजेंद्र करितां धांवा नक्रासहित त्या उद्धारिलें ।
सुधन्व्यास तैलामधीं तळितां तैल थंड जाहलें ।
अशी घालितो उडी संकटी पहा माझा श्रीपती ।
कोमलांग राजीवनेत्र नव्हे शिवासारखा जती ।।५।।

नको सांगुं बडिवारविनोदें लक्ष्मी नानापरी ।
नंदाची गोधनें चारितो कुंजवनाभीतरी ।
मुखांत घालुनी वेणु वाजवुनी मोहित करी सुंदरी ।
गोपव्रजांचें उच्छिष्ट खातो नव्हे निर्मळ श्रीहरी ।
मेघवर्ण सर्वांग खोंवितो मयूरपिच्छें शिरीं ।
नवनीत चोरी वाटे दैत्य कसे मर्दन केले तरी ।
लग्न लाविलें बसुन रिसाशीं कुब्जा होती दुती ।
किती एकेक गुण सांगु ऐकता दुःखित होशिल चितीं ॥६॥

अनंत कोट ब्रह्मांडें निर्मिता जगांत जगवेगळा ।
चार वेद सहा शास्त्रे धुंडिता कुंठित झाल्या कळा
निराकार निर्गुण सगुण मीं पाहुन पडलें गळां ।
जन्मोजन्मि हा असो पति मज घनःश्याम सावळा ।
परम सुशील निष्कलंक वनी उद्धरली अहिल्याशिळा ।
नामस्मरणें शीतळ झाला सांब देह सगळा ।
मुकुटमणी वैकुंठपीठ जो अमर सदा वंदिती ।
प्राप्त व्हावे हे चरण म्हणुन किती समाधिस्त बैसती ॥७॥

ताडपत्र श्रृंगार म्हणुन म्यां छळिलें नित शंकरा ।
प्रसन्न झाला महेश मज समजावी घेउनि करा ।
शृंगाराचे पर्वत पडले अमोल एकेक हिरा ।
कुबेराची संपदा पुरे ना आहारे विश्वेश्वरा ।
एक स्वरुप शिव-विष्णु लक्ष्मी-गौरी एक स्मरा ।
लय लावुन एकाग्र भजावें मृत्युंजयश्रीधरा ।
लक्ष्मिचा आणि पार्वतिचा संवाद गोड हा खरा ।
भक्तिपुरस्कर पुजुन करावें प्रसन्न नित हरिहरा ।
महादेव गुणि सांब-हरीच्या चरणांबुजिं लोळती ।
प्रभाकराच्या कवना गुणि जन हेत धरुन धांवती ॥८॥

◇ ◇

२४. परशराम

१. दुर्घट माया ब्रह्मादिकांही

दुर्घट माया ब्रह्मादिकांही ऐक कवीच्या मुला ।
शेषाला नाहीं अंत लागला काय समजलें तुला ॥ध्रु०॥
ब्रह्मीं माया कोणी पाहिली कोण गुरूचा पुरा ।
श्वानापरी अवघेच भुंकती दृष्टि गार ना हिरा ।
निराकार जे निर्गुण ज्योति अभंग अक्षई धुरा ।
इच्छा रचना त्यामध्यें मिश्रित मूळबीज हें अंकुरा ।
नरनारी जेथे नांवच नाहीं म्हणशील कलगीतुरा ।
ज्योतीची काजळी गोठली विराट् स्वयंभु चिरा ।
विश्व वाहाली त्यावर लेली कोणी प्रमाण बोला ।
आऊट वज्र हेंच अखंडित श्रीगुरुमुखें दाखला ।
दुर्घट माया ब्रह्मादिकांही ऐक कवीच्या मुला ।
शेषाला नाहीं अंत लागला काय समजलें तुला ॥ध्रु०॥

२. सोनार शिक्का नवा निघाला

सोनार शिक्का नवा निघाला पंधरा आणे जरी बट्टा ॥ ध्रु० ॥ वडाची साल पिंपळाला लावितां कशी लागेल पहा शोधून । हेल्यावर जरी दिली अंबारी मटकन बसेल भारानं । पखाल आपण वाहूं विसरला घरोघरच असेल गाणं । हिजडे जर तरवार मारते शिपायाशीं पुसतें कोण । उदंड झाला ताजा गधडा याला शोभल काय वर जीण । कोल्हे कुत्रे भुंकुं लागले हत्ती पळेल काय भिऊन । भीक मागून पित्र घालशी तर स्वर्गी कैसा वाजेल घंटा । सोनार शिक्का नवा निघाला० ॥१॥ कसे मुंगीला पर फुटले घेऊं म्हणती गगन । गरुडाची सर याला टिटवी गेली गर्वानं । हनुमंतापुढें उडी माराया पण केला कोल्ह्यानं । उडी मारितां धरणीशीं पडला झालं बावन गेलें अवसान । श्रावणमासा शिदड मातले शेषाघरी नेऊं लग्न । चैत्र वैशाखांत या म्हणून म्हटलें तिकडेच गेले मरून । ताड म्हणतो मी मेरूहून उंच कैलासाशीं लावीन फाटा । सोनार ० ॥२॥

राजहंसाच्या पंक्ती बसाया गर्वे गेला कावळा । जातां खेपे टोचून पाहे जड लागे माणिक गोळा । बेडुक म्हणे मी वेद पढतों डबकामधीं खरडी गाळा । मैना सारख्या रडूं लागल्या नित्य रडती वटवाघुळा । कोणी कोणाचा गुरु ना चेला घरोघरचे झाले गोळा । शिलंगणाचें सोनें आणूं आठ रुपयांचा म्हणे तोळा । जसे शिमग्याचे वीर घुमती फौजाचा करिती सपाटा । सोनार० ॥३॥ तळ हातानें चंद्र झांकेना उजेड त्याचा बहु जागा । मोत्याच्या लडींत सरजा दमडीचा तो माल फुगा । गुरु गुरकावी चेला टरकावी मात्रागमनी असेल बगा ॥ परस्परें जग देत ग्वाही अपकीर्ति माहित जगा । कथा भागवत शास्त्र पुराण हरीचे गुण कोणी गागा । नामें विठ्ठलचे असे धडके ऐकून मूर्खा होय जागा । येसू परशराम म्हणे अशिलाचा पोकळ साठा । साऱ्या गांवाचे ओहोळ मिळून गंगेची करिती थट्टा ॥ सोनार० ॥४॥

◇ ◇

२५. गंगू हैबती

रडतांना हृषिकेशी

रडतांना हृषिकेशी बाई माझा राहिना
कडे उचलुन सये देतां स्तन तोंडीं घेइना ॥ध्रु०॥

खरि झाली दृष्ट माझ्या श्रीहरिला वाटते
डचडचकुन लेकरुं ग तिनतिनदां ऊठतें
भय भारी जिरेल कैसा रडे म्हणुनी दाटतें
धीर देतां जिवाला ग मन शांत होइना ॥ ध्रु० ॥

नको नेऊं हरि राधे दुधभात भरवुं दे
गाइ-तुळशी-देवापाशीं आण तान्हा फिरवुं दे
कानफाटयाहाति सांजे अंगारे करवुं दे
नवसाचा अजुन बाई मज ठोका येइना ॥ध्रु०॥

न राहे पाळण्यांत येई उतरुन खालता
जाइ सोडी वासुरांशीं धरि पुच्छें चालतां
हसुं येतें सांवळ्याचें बोबडें बोलतां
धट मोठा बागुलाशीं तिळमात्र भीइना ॥ध्रु०॥

आज रडतो राहुं राहुं फार टाहो घेतला
उखळासी अंगणांत बांधुनियां घातला
नित कळतो समाचार कंसासी येथला
कशी याला बरी बुद्ध देव अजुनी देईना ॥ध्रु०॥

धन्य दैव यशोदेचें असें उदरीं बालक
भक्तांचा सहकारी वैकुंठपालक
म्हणे गंगु हैबती हा त्रिभुवनींचा पालक
महादेव गुणिं गातां मनिं हर्ष माइना ॥ध्रु०॥

२६. आबाकुमर

श्रीचक्रधरांची शेजारती.

भवर मंचकीं शेज फुलांची केली तुज सुंदरा ॥१॥
निज बा निज माझ्या चक्रधरा । म्हालनी निजकुमरा ॥ध्रु०॥
भक्त ज्ञानाये अवसरा भिन्नले । विनवीत तुज गुर्जरा ॥२॥
परवराचे करुनी निरूपण श्रम आला तुज खरा ॥३॥
अहोरात्र तुज सकल जिवांची चिंता परमेश्वरा ॥४॥
तनमनधन कर्पूर लावुनी आरती करिती सुंदरा ॥५॥
आबाकुमर म्हणे कृपा करोनी प्रेम द्यावे किंकरा ॥६॥

पसायदान

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥ १ ॥
जें खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ॥ २ ॥
दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥ ३ ॥
वर्षत सकळमंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळीं । भेटतु भूतां ॥ ४ ॥
चलां कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचें गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥ ५ ॥
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥ ६ ॥
किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ॥ ७ ॥
आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ॥ ८ ॥
येथ म्हणे विश्वेशरावो । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाला ॥ ९ ॥

कविपरिचय व टीपा

मुकुंदराज

'विवेकसिंधु' कर्ते मुकुंदराज हे आद्य मराठी कवी म्हणून समजले जातात. या कवींचा काळ व स्थळ या दोनही बाबतीत विद्वानांमध्ये एकवाक्यता नाही. त्याचप्रमाणे 'विवेकसिंधू'त वर्णन केलेली अंबानगरी म्हणजे विदर्भातील भंडाऱ्याजवळील अंभोर हे गाव की मराठवाड्यातील अंबेजोगाई हे गाव हा प्रश्नही वादग्रस्तच आहे. प्रा. कृ. पां. कुळकर्णी यांच्या मते मुकुंदराजांचा काल इ. स. ११२० ते १२१० हा असावा. म्हणजे मुकुंदराज ज्ञानेश्वरांच्या पूर्वी एक शतक होऊन गेले. ओवी छन्दाचा उगम मुकुंदराजांपासून झाला आहे, हीही माहिती कुळकर्णी यांच्या पुस्तकावरून मिळते. मुकुंदराजांच्या नावावर 'परमामृत', 'पवनविजय' वगैरे ग्रंथ व अनेक अभंग व पदे आढळतात. 'रसवंतीच्या पहिल्या बाळा मुकुंदराजाला' असा महाराष्ट्रगीतात उल्लेख करून कै. गोविंदाग्रजांनी मुकुंदराजाला पहिला मानाचा मुजरा केला आहे.

मुकुंदराज हे भाष्यपर वाङ्मय लिहिणारे मराठीतील पहिले कवी होत. 'अध्यात्ममाला' काव्याचा विषय करण्याचे धैर्य असामान्यच होय. त्याची गरजही त्या काळात तशीच जबरदस्त असावी. विशेषतः मातलेले शृंगारात्मक संस्कृत प्राकृत काव्य, कर्मकांड आणि व्रतवैकल्यांच्या भ्रष्ट रूपात आलेला धर्माचार, आणि यादवकालीन सुबत्ता यामुळे खऱ्या धर्माचा आणि साधुत्वाचा लोपच झालेला असावा ! मराठी संतांनी यासाठीच लोकभाषेतून सद्धर्मदीपिका प्रज्वलित करण्याचे महनीय कार्य अंगिकारिले. मुकुंदराजांच्या विवेकसिंधूने ह्याची मुहूर्तमेढ रोविली.

मुकुंदराजांना पहिला विरोध झाला तो मराठी भाषा माध्यम म्हणून स्वीकारली यामुळे. या विरोधामागे धर्मश्रद्धा होती. त्यामुळे संस्कृत भाषेप्रमाणे मराठी भाषेच्या ठिकाणी वेदशास्त्रातील ज्ञान व्यक्त करण्याचे सामर्थ्य कसे आहे, हे मुकुंदरावांना आपल्या 'विवेकसिंधू' या ग्रंथाच्या प्रारंभी पटवून द्यावे लागले आहे. एवढेच नाही तर संस्कृतऐवजी मराठीमधून ब्रह्मज्ञान सांगितल्याने ते श्रोत्यांना सहज समजते आणि त्यांना त्या ज्ञानाची प्रत्यक्ष प्रतीतीही येऊ शकते, हे महत्त्वाचे विचारही त्यांनी येथे स्पष्ट केले आहेत. ज्ञानदानाचे माध्यम म्हणून मातृभाषा कशी हितकारक आणि प्रभावी असते, हे मराठीतील आद्य कवीनेच बोलून दाखविले आहे. (मराठीचा कैपक्ष महानुभाव कवी, भागवत संत, पंडित कवी–पुराणिक आदी सर्वांनी मराठी वाङ्मयाच्या प्रारंभकालापासून सतत मांडलेला आहे.)

मुकुंदराजांचे साहित्याचें प्रयोजन अथवा फलश्रुती यासंबंधीचा अभिप्रायही या वेच्यामध्ये आढळतो. नवरसात्मक लौकिक विषयावरील काव्य म्हणजे मुकुंदराजांच्या दृष्टीने 'उघड वाचेसीं नागवणें' होय! जेथे ब्रह्मरसाची रोकडी गोडी अखंडपणे अनुभवता येते, ते बोलणे 'खरे' होय; बाकीचे सारे 'मायिक' होय! प्राचीन मराठी साहित्य हे 'ब्रह्मरसात्मक' साहित्य होय, याची स्पष्ट जाणीव या आद्य कवीनेच करून दिलेली आहे.

शांकरोक्तीवर आधारलेला 'विवेकसिंधू' हा ग्रंथ अठरा प्रकरणात विभागला आहे. अध्यात्मातील एकेक विचार घेऊन त्यावर केलेले हे भाष्य आहे. भाष्यपर पद्य-लेखनाचा प्रारंभ अशा रीतीने बाराव्या शतकात मुकुंदराजांच्या 'विवेकसिंधू'ने केला. समर्पक आणि बहुविध दृष्टांतांनी प्रमेय सुस्पष्ट करून दाखविणे व ते श्रोत्यांच्या चित्तावर ठसविणे, हा भाष्यवाङ्मयाच्या शैलीचा एक प्रधान विशेष येथे दिसून येतो. मुकुंदराजांच्या 'विवेकसिंधू' या भाष्यग्रंथाला भाष्यकाव्याचे स्वरूप मात्र आलेले नाही. अर्थविवरण आणि तात्त्विक कल्पना यांच्या बौद्धिक स्पष्टीकरणावरच मुकुंदराजांचे सारे लक्ष केंद्रित झाले आहे. (एकनाथांची 'यथार्थदीपिका' किंवा दासोपंतांचा 'गीतार्णव' या ग्रंथांना भाष्यस्वरूपाचेच ग्रंथ म्हणणे उचित ठरेल. दासोपंतांची 'पासोडी' किंवा रामदासांचे 'पंचीकरण' यांसारखे ग्रंथ तर शुद्ध तत्त्वज्ञानात्मकच ग्रंथ होत.)

महदंबा

महदंबा, ही महानुभाव पंथाचे पहिले आचार्य जे नागदेवाचार्य त्यांची चुलतबहीण. गोदातीरावरील पुरी म्हणजे हल्लीची बीड जिल्ह्यातील पांढरी हे तिचे गाव. ती चक्रधर स्वामींची शिष्या झाली आणि गोविंद प्रभू व नागदेवाचार्य यांच्या सहवासाचा तिला लाभ झाला. 'धवळे' व 'मातृकी रुक्मिणी स्वयंवर' ही तिची दोन प्रकाशित काव्ये. तिने 'गर्भकांड' ओव्याही रचलेल्या आहेत. तिचा चक्रधरस्तुतिपर अभंग लीळाचरित्रात आहे.

धवळे हे महदंबेचे प्रमुख व महत्त्वाचे काव्य. धवळे म्हणजे धवलयशोगानाच्या कविता. धवळा हा शब्द धव + ल असाही व्युत्पादिला जातो; आणि मग त्याचा अर्थ 'लग्नात गावयाचे वरविषयक गीत' असा होतो. कृष्णरुक्मिणी – विवाह हा महदंबेच्या धवळ्यांचा विषय. गोविंद प्रभूंच्या एका काल्पनिक लुटूपुटीच्या विवाहप्रसंगी या काव्याचे गायन झाले. 'महदाइसी गोविंदरावो धवळीं आइकवीले' असा उल्लेख या धवळ्यांच्या शेवटी आढळतो. या काव्याचे पूर्वार्ध व उत्तरार्ध हे दोन्ही भाग अगदी स्वतंत्र आहेत. उत्तरार्धाला म्हाइंभट व लक्ष्मींद्रभट यांचाही हातभार लागलेला असावा.

महदंबेचे धवळे हे एक सुंदर कथा-गीत आहे. महदंबेने ते उस्फूर्तपणे गायिले आहे. गेयता हे त्यांचे वैशिष्ट्यच आहे. (अजूनही महानुभावांच्या मठातून हे धवळे गोड चालीत, गोड गळ्यावर सामूहिक पद्धतीने म्हटले जातात.) कथाविस्तारापेक्षा येथे प्रसंग, घटना आणि व्यक्तिमनोभाव यांच्या जलद चित्रणाकडे सारे लक्ष लागलेले

असते.[1] प्रसंगानुसार भावनांचे चढउतार येथे आढळतात. मोजक्याच रेखांनी पण ठस-ठशीतपणे मूर्तिरेखा काढल्या जातात. धावत्या प्रसंगवर्णनातील ताजेपणा आणि जिवंतपणा या शीघ्र कवित्वामध्ये प्रत्ययास येतो. अतिशय जिव्हाळ्याने आणि नेमकेपणाने महदंबा प्रसंगचित्र आणि मनोभावचित्र रंगविताना दिसते. त्यात एक प्रकारचा स्त्रीसुलभ गोडवा आहे; स्त्रीदृष्टीचे विशेष आहेत.

प्रस्तुत संग्रहातील दोन्हीही वेचे म्हणजे दोन नेत्रवेधक प्रसंगचित्रेच होत. हे प्रसंग टिपताना महत्त्वाचा कोणताही तपशील कवयित्रीच्या नजरेतून सुटलेला नाही. सारे दृश्य कसे डोळ्यांनी—कानांनी पाहिले—ऐकिले, असे वाटते!—'रात्रि प्रकाळली'...पासून ते 'रथावरि वाइली वेगीं भीमकाची कुमरी' पर्यंत! हाच प्रत्यय पुन्हा 'कृष्ण-रुक्मिणी'च्या वरातीच्या वर्णनाचे बाबतीतही! वरातीची सारी प्रेक्षणीयता या शब्दचित्रात उमटली आहे. वरातीतील समूहमनाचा हर्षही त्यातून ओसंडत असल्याचे भासते. महदंबेची जीवनोत्सुकता आणि तिची वर्णनाची अनावर हौस तिच्या संवेदनात्मक प्रतिमारूपांतून जाणवते.

धवळ्यांची अकृत्रिम, उत्स्फूर्त, मनोहर चित्रणशैली आणि तीमधील स्त्रीमनाची उत्कट समरसता खरोखरी अपवादात्मक होय! महदंबेचे धवळे म्हणजे आख्यान काव्याचा एक प्रकार होय. ते एक Long Narrative Song, दीर्घ कथागीत, होय.

ज्ञानेश्वर (१२७५ – १२९६)

आळंदी येथे जन्म. आपेगाव हेच यांचे जन्मस्थान असेही पुष्कळांचे मत आहे. तेथील विठ्ठलपंत यांना निवृत्तिनाथ, ज्ञानदेव (ज्ञानेश्वर) सोपानदेव व मुक्ताबाई अशी चार मुले होती. ही सर्व भावंडे बाळपणापासून विरक्त, विठ्ठलभक्त व ज्ञानी अशी होती. ज्ञानेश्वरांचे मुख्यत्वे 'ज्ञानेश्वरी' व 'अमृतानुभव' हे ग्रंथ. हे ओवीबद्ध आहेत. याखेरीज स्वात्मानुभव, चांगदेवपासष्ठी, भक्तराज, योगवाशिष्ठ—वगैरे काही प्रकरणे ज्ञानेश्वरांची मानली जातात. भक्तिपर, वैराग्यपर व ज्ञानपर अभंगही त्यांनी लिहिले आहेत. ज्ञानेश्वरी ही श्रीमद्भगवद्गीतेवरील टीका आहे. किंबहुना भगवद्गीतेच्या आधाराने केलेली ती एक स्वतंत्र काव्यनिर्मिती आहे. वारकरी पंथाचे लोकात ज्ञानेश्वरीस फार मान आहे. अध्यात्म विषयाची ज्यांस गोडी आहे अशा लोकांत ह्या ग्रंथाची योग्यता मोठी आहे.

'ज्ञानदेवें रचिला पाया' असे बहिणाबाईने म्हटले आहे, ते भागवत धर्म-मंदिराच्या उभारणीच्या संदर्भात. हे तर खरेच आहे; पण त्या अनुषंगाने ज्ञानेश्वरांनी प्राचीन मराठी साहित्याची पायाभरणीही केली, हेही आज ध्यानी घ्यावयास हवे. एवढेच नव्हे तर ह्या आपल्या साहित्याच्या आकलनासाठी, आस्वादासाठी आणि मूल्यमापनासाठी

---

१ कवि विनायकांची 'कृष्णाकुमारी', 'संयोगिता' इत्यादी कथा-कवितांची येथे आठवण व्हावी!

आवश्यक असणाऱ्या साहित्यविचारांचाही, तितक्याच निकडीने त्यांनी पाया घातला आहे, हे आवर्जून मनात बाळगले पाहिजे.

ज्ञानेश्वरी हे एक गीताभाष्य आहे; पण या भाष्याला काव्यकान्ती लाभलेली आहे. कान्ती ही देहा–मनाच्या रसरशीतपणातून फुलत असते. ज्ञानेश्वर हे अध्यात्मविषयाकडे कोरड्या ज्ञानात्मक पातळीवरून पाहात नाहीत; तो त्यांचा अनुभूतिविषय आहे आणि ही अंतरंग-अनुभूतीच ते विविध अशा जिवंत प्रतिमांतून प्रकट करतात.

वाचें बरवें कवित्व । कवित्वीं रसिकत्व
रसिकत्वीं परतत्त्व–। स्पर्शु जाणे ।।

हा ज्ञानेश्वराच्या काव्यविचाराचा गाभा होय. ज्ञानेश्वरांनी कवित्वाला (अलंकारिकतेला) डावलले नाही; त्यांनी रसात्मकतेला दूर केले नाही; उलट रस आणि अलंकारांच्या गाली परतत्त्वस्पर्शाची गोड आरक्त कांती ते खुलवीत आहेत. ज्ञानेश्वरांचे काव्याचे लक्षण 'परतत्त्वस्पृष्टरसात्मकं वाक्यं काव्यम्' असे होऊ शकेल! 'यथार्था' पेक्षा ते 'भावार्था'ची दीपिका प्रज्वलित करतात. त्यामुळे अध्यात्माचा भावरूपाने झटितिप्रत्यय येतो–अगदी समग्रतेने! काव्यानुभूती ही अशा स्वरूपाचीच असते. ज्ञानेश्वरी हे भाष्यकाव्य आहे, ते यामुळेच! भाष्यकाव्य हा संस्कृत साहित्यशास्त्राला अविदित असा नवा साहित्यप्रकार ज्ञानेश्वरांनी निर्माण केला. ज्ञानेश्वरी ही एक शांतिकथा आहे; परतत्त्व डोळ्यांना दिसावे असे येथे अरूपाला रूप लाभले आहे! ज्ञानेश्वर हे मूर्तग्राही शैलीचे (concrete style) भोक्ते होते.[1]

ज्ञानेश्वरांच्या साहित्यातील वेचे निवडताना त्यांच्या तीन ठळक वाङ्मयीन वैशिष्ट्यांचे दर्शन घडावे ह्या दृष्टीने ते निवडले आहेत. ज्ञानेश्वरांचा साहित्यविषयक दृष्टिकोण पहिल्या तीन वेच्यांमध्ये आढळून येईल; 'भाष्यकवी ज्ञानेश्वर' यांची वैशिष्ट्ये वेचे क्र० ४, ५, ६ मध्ये पाहाता येतील; आणि ज्ञानेश्वरांच्या अंतःस्फूर्त भावकाव्यातील आत्मपरतेची प्रचीती सातव्या वेच्यामध्ये लाभेल.

व्यासांचा मागोवा

प्रस्तुत वेच्यामध्ये महाकवी श्रीव्यास यांच्या प्रतिभेचे माहात्म्य ज्ञानेश्वरांनी गायिले आहे. त्या निमित्ताने महाकवीच्या प्रतिभेचे गुणविशेषच त्यांनी सहजपणे कथन केले आहेत. महाकवी अफाट आणि अधृष्य अशी अनुभूती श्रोत्यांना आस्वादिता येईल अशा आहार्य रूपात व्यक्त करतो; तो ती अनुभूती सुंदर स्वरूपात प्रकट करतो आणि अमूर्ताला मूर्त रूप देऊन त्याला आस्वाद्यक्षमता मिळवून देतो. श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्यामधील 'गोठी'ला व्यासप्रतिभेने असेच 'करतळी घेवो ये ऐसे' केले आहे.

---

१ श्रीज्ञानेश्वरदर्शन, (भाग पहिला); सं. न. बा. देशमुख; या ग्रंथातील श्री. ग. श्री. हुपरीकर यांचा 'तत्त्वज्ञ-कवि श्रीज्ञानेश्वर' हा लेख पाहावा. पृ० २१५ ते ३०६.

याच वेच्यामध्ये श्रीज्ञानेश्वर आपली कवित्वविषयीची रंकवृत्ती प्रकट करतात, पण त्याचबरोबर गीताभाष्य करण्याचा आपला अधिकारही ते गोडपणे पटवून देतात. यात पूर्वसूरींसंबंधीची त्यांची परमादराची भावना व्यक्त होते, पण त्याहूनही प्रत्येक जाणत्या मनाला आत्माविष्कार करण्याचे मूलभूत स्वातंत्र्य असते, हे तत्त्वच भावपूर्ण रीतीने, त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे. या आत्मविश्वासाला ज्ञानेश्वरांच्या विनीत वृत्तीमुळे अनुपम गोडवा लाभला आहे.

'वाग्विलास विस्तारुं। गीतार्थें विश्व भरुं

शृंगाररसप्रधान संस्कृत विदग्ध महाकाव्यरचना सोडून किंवा भावनांचा प्रबळ आविष्कार करणाऱ्या प्राकृतातील जोमदार मुक्तकाव्याचा प्रकार वर्ज्य करून, ज्ञानेश्वरांनी गीताभाष्य-रचना करण्याचे ठरविले, तेव्हा त्यांना आपण साहित्य–परंपरा पार सोडून निघालो आहोत याची सुस्पष्ट जाणीव होती. पण शृंगाररसाऐवजी शांतरस आणि संस्कृत भाषेऐवजी देशी भाषा योजल्याने रसिकांना आपण गमावून बसू, अशी त्यांना लवमात्रही शंका आली नाही; उलट प्रतिभावंताच्या गोड अहंकाराने आणि आत्मविश्वासाने ते सांगतात की, 'मी शांत रसाला शृंगाराच्या माथ्यावर चढवीन आणि गोडीमध्ये अमृतालाही चुकी ठेवील असे नवे देशी शब्द योजीन. पण याहूनही कठीण म्हणजे अनिर्वचनीय अशा ब्रह्मविद्येची खाणी मी उघडी करीन; खेचरालाही सात्त्विकाचा पान्हा आणणारी वाणी माझ्या मुखातून प्रकटेल!' नव्या युगाच्या प्रवर्तकाचे हे स्वाभाविक उद्‌गार आहेत; यालाच पुढे प्रतिज्ञेचे रूप आले. या उद्‌गारात उद्दाम आवेश नाही, की बंडाची–क्रांतीची ललकारी नाही. सर्व विश्व गीतार्थाने भरून टाकणाऱ्या आणि जगाला आनंदाचे आवार घालू पाहणाऱ्या विश्वात्मक विभूतीचा हा सात्त्विक संकल्प आहे! त्यातून प्रतिभेच्या सामर्थ्यावरील विश्वास झळाळताना दिसतो.

येथे ज्ञानेश्वर आपल्या काव्याचे विषय आणि प्रयोजन, आपल्या काव्यातील शब्दांची शक्ती व त्यांचा रसिकांवर होणारा परिणाम, आपली भाष्यपद्धती यासंबंधी मोठ्या आत्मविश्वासाने श्रोत्यांशी संवाद करीत आहेत.

हे शब्देविण संवादिजे

जेथे मनासह वाणीही परत फिरते अशा ब्रह्मानुभूतीचे चित्रण ज्ञानेश्वरांना शब्दांकरवी करायचे आहे. ह्या शब्दांतून जे अनुपम, अनिर्वचनीय ध्वनित होत आहे ते भोगण्यासाठी शब्दांची टरफले काढून टाकणे आवश्यक आहे आणि मनासह सहा ज्ञानेंद्रियांच्याही अतीत जाणाऱ्या प्रतिभाशक्तीलाच शरण जाणे जरूरीचे आहे! रसिकाची चित्तवृत्ती कशी असावी व त्याचा काव्यवस्तूशी किती हळुवारपणे हृदयसंबंध घडावा ते ज्ञानेश्वरांनी कमालीच्या सूक्ष्मपणे येथे प्रगट केले आहे.

ते कुंडलिनी जगदंबा

'अतींद्रिय परी भोगवीन इंद्रियांकरवीं' ही कवी ज्ञानेश्वरांची प्रतिज्ञा! त्यांनी कुंडलिनी

कशी डोळ्यापुढे मूर्तिमंत उभी केली आहे! तिचे रूप, तिचा आकार, तिचा वर्ण, तिची हालचाल, तिची क्षुधा, तिची आरोगणा, यांचे चित्रण कसे गोचर झाले आहे. प्रतिमांची विलक्षण मार्मिक योजना येथे ज्ञानेश्वरांनी केलेली आहे. जागृत कुंडलिनीच्या व्यापारा-बरोबर शरीरातील पंचमहाभूतांदी द्रव्यांचा निचरा होत असता, शरीराला येत जाणारी दिव्यमयता वर्णन करताना ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेला उधाण आले आहे! कुंडलिनीचे एक संवेदना-चित्रच जणू त्यांनी काढले आहे. ज्ञानेश्वरांच्या मूर्तग्राही वर्णनशैलीचा हा एक उत्कृष्ट नमुना आहे.

दैवी संपत्ती

अक्रोधत्व, त्याग, शांती, दया या दैवी गुणांचे रूप ज्ञानेश्वर येथे रेखाटीत आहेत. विविध दृष्टांतांच्या साहाय्याने या गुणांना त्यांनी मूर्त केले आहे. ज्ञानेश्वरांचे नीति-शास्त्रच जणू येथे या गुणांच्या सूक्ष्म भेददर्शनाने आणि स्वतः लाविलेल्या त्यांच्या वेगळ्या अर्थांमुळे (Interpretation) आपणास पाहावयास मिळते.

ज्ञानेश्वरांचे नीतिशास्त्र उत्तम भक्त, ज्ञानी भक्त, स्थितप्रज्ञ, दैवीसंपत्ती इत्यादींवरील त्यांच्या भाष्यांतून आढळते.

अविद्याखंडन

अध्यात्मशास्त्रातील तत्त्व ज्ञानेश्वर कसे विशद करून दाखवितात, याचा प्रस्तुत उतारा हा सुंदर नमुना ठरेल. 'अविद्या रचिली अभावे' हा विचार दृष्टान्तावर दृष्टान्त देऊन ज्ञाने-श्वरांनी स्पष्ट केला आहे. रूढ–सांकेतिक दृष्टान्त ज्ञानेश्वरांनी वर्ज्य मानलेले नाहीत; पण त्यांचा उपयोग करताना त्यांनी विषयानुरूप आणि संदर्भानुसार त्यांना नवीनता दिली आहे. त्यामुळे ते दृष्टान्त जिवंत आणि परिणामकारक ठरतात. दुसरी गोष्ट अशी की ज्ञानेश्वर केवळ हौसेखातर दृष्टांतांची रेलचेल करीत नाहीत. दृष्टांतादृष्टांतांतून एकेक अर्थच्छटा अभिव्यक्त करीत करीत मूळ, वर्ण्य वस्तूच्या अंतर्बाह्य रूपाचे ते एक पूर्णदर्शन घडवितात.

ज्ञानेश्वरांच्या भाष्यपद्धतीचे आणखी एक प्रधान वैशिष्ट्य प्रस्तुत वेच्यात आढळून येईल. मध्यवर्ती विचार किंवा विधानसूत्र ते प्रारंभी करतात, आणि नंतर एखाद्या ध्रुवपदा-सारखे ते सूत्र पुढे उपयोजितात. यामुळे प्रधान विचार सतत श्रोत्यांच्या मनश्चक्षूंपुढे राहतो. या प्रधान सूत्राचा विकास एकेका खंडातून ते एकेक अंगाने करीत जातात. ह्यालाच कोणी कोणी art of paragraphing असे संबोधिताना दिसून येते.

'अविद्याखंडन' तर ज्ञानेश्वरांचे स्वतंत्र अध्यात्मतत्त्वांवरील लेखन आहे; पण तेही किती ऐंद्रिय संवेदनारूपांतून त्यांनी व्यक्त केले आहे, ते अभ्यासिण्यासारखे आहे.

ज्ञानेश्वरांचे अभंग

आत्मोद्गारी अंतःस्फूर्त भावकाव्याचा हा मराठीतला प्रभावी नमुना आहे. विविध भाववृत्तींचे अनावरतेने केलेले हे शब्दचित्रण त्यातील प्रतिमांच्यामुळे साक्षात झाले

आहे; किंबहुना प्रतिमांच्याच भाषेत येथे ज्ञानेश्वरांची भाववृत्ती बोलकी झाली आहे. विरहिणी असो, सगुण रूपात ब्रह्म भेटताक्षणी होणारे आनंदगीत असो, अथवा विराट साक्षात्काराचे भव्य दर्शन असो, ज्ञानेश्वरांतील कवी प्रतिमारूपातच अवतरतो.

नामदेव (इ. स. १२७० – १३५०)

महाराष्ट्रातील संतकवींचे अग्रणी नामदेव पंढरपूर येथील शिंपी कुळातले. सहज बोलावे त्याप्रमाणे ते अभंगांची रचना करीत. 'जयांचे ग्रंथ पाहता। ज्ञान होय प्राकृता' असे एकनाथांनी नामदेवांना उद्देशून लिहिले आहे.

शिखांच्या ग्रंथसाहेबात नामदेवांची ६१ पदे आहेत. पंजाबात घोमान येथे नामदेव-मंदिर असून नामदेवपंथाचे लोकही पंजाबात आहेत. नामदेव काही काळ पंजाबात राहिले असावेत.

नामदेवांचे अभंग

नामदेवाचे अभंग म्हणजे त्याच्या विठ्ठल भक्तीचा सहजोद्‌गार! भावकविता म्हणजे कवीच्या उत्कट भावनांचा उत्स्फूर्त उद्‌गार असे मानले तर नामदेवाची अभंगवाणी भावकवितेचे उत्तम उदाहरण ठरेल. वा. ब. पटवर्धन यांनी नामदेवाची कविता म्हणजे मराठीमधील रोमँटिक कवितेचा पहिला आविष्कार असे म्हटले आहे. इतकेच नव्हे तर पाश्चात्य वाङ्मयातील प्रेमविषयक रोमँटिक कवितेपेक्षा ही भक्तिमूलक रोमँटिक कविता परिणामतः श्रेष्ठ दर्जाचीही त्यांना वाटली आहे. 'The devotional poetry of Maharashtra is the lyric poetry of highest and purest type. असाही त्यांनी आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. वस्तुतः ज्ञानदेवांची अभंगवाणी प्रकट झाली तेव्हाच lyrical poetry चा उगम झाला, असे म्हणणे सयुक्तिक ठरेल. ज्ञानेश्वरांची विदग्धता नामदेवाच्या ठायी नाही–यामुळे कदाचित नामदेवाच्या अभंगातील भावनेचा उमाळा अधिक जोरदार वाटत असावा. अकृत्रिम, सरळ, प्रामाणिक, परमोत्कट, भावाविष्कारी काव्याचे जिवंत झरे अभंगरूपाने मराठीत प्रकटले, हे खरे!

श्रीज्ञानदेवांच्या समाधीचे अभंग

नामदेवाने ज्ञानेश्वरांच्या चरित्रपर लिहिलेल्या अभंगातील हा शेवटचा भाग आहे. वस्तुतः यात नामदेवांचीही उपस्थिती असल्याने हे काव्य म्हणजे नामदेवांचे चरित्र-आत्मचरित्रात्मक लेखनाचा प्रकार ठरेल. प्रस्तुत वेचा म्हणजे एका भावपूर्ण प्रसंगाचे शब्दचित्रण होय. श्रीज्ञानेश्वरांच्या समाधीचा उदात्त-रमणीय, करुण–दिव्य, लौकिक-अलौकिक अशा संमिश्र गुणरूपांचा हा आलेख! त्यात वावरणाऱ्या व्यक्ती अतिमानवी, सत्त्वगुणाच्या चालत्याबोलत्या मूर्ती! प्रत्यक्ष परब्रह्म सगुणरूपाने सपत्निक अवतरलेले! हा सोहळा आदराच्या, भक्तीच्या, प्रीतीच्या, सख्यत्वाच्या, अनंत नात्यांनी नामदेवांनी पाहिला; अनुभविला! त्याचे धावते, जिवंत चित्रण त्याने बारीक सारीक तपशिलांसह

काढलेले आहे. धावत्या शब्दचित्रवाणीचा हा उत्तम नमुना ठरावा! परतत्त्वात विलीन झालेल्या विभूतींना येथे होणारा इहजीवितस्पर्श पाहून प्रा. श्री. म. ऊर्फ बापूसाहेब माटे यांना आनंदाचा गहिवर आला.

नरेन्द्र

हा रामदेवराव यादवाच्या दरबारातील एक कवी होता. त्याने पुढे राजाश्रय सोडला व नागदेवाचार्यांकडे जाऊन महानुभाव पंथाची दीक्षा घेतली. 'रुक्मिणीस्वयंवर' या काव्यात निसर्गवर्णन, अलंकारवैभव, रसोत्कटता, भक्ती, कल्पनाचातुर्य, वगैरे गुण आढळतात. या काव्याच्या १८०० व २९३४ ओव्यांच्या हस्तलिखित पोथ्या सापडतात; परंतु पहिल्या ८७९ ओव्याच महानुभाव लोकांना मान्य आहेत. या काव्याचा रचनाकाल शके १२१३–१४ हा आहे.

ऐसे आदि-कवीचे बोल...

कवी नरेंद्राच्या काव्याभिरुचीत पांडित्य आणि वैदग्ध्य होते. संस्कृतमधील विदग्ध महाकाव्ये त्याच्यापुढे आदर्श म्हणून असावीत. त्याचे साहित्यविचार प्रस्तुत वेच्यामध्ये सुस्पष्ट होतात. 'वाक्यं रसात्मकं काव्यम्' हे त्यास अभिप्रेत असलेले काव्यलक्षण. काव्यात येणाऱ्या शब्दांचे सौंदर्य, त्यांच्या रचनेची डौलदार रीती या संबंधीच्या विचारात त्याची विदग्धवृत्ती प्रकटते. रसिकांना तो 'रस-डोळस' असे संबोधितो; कलाविदांच्याचसाठी आपले हे भाव-लिखित आहे, हेही याने स्पष्ट केले आहे. कवी नरेंद्र हा एक विदग्ध रसवृत्तीचा महाकवी आहे.

संध्यारजनी...

नरेंद्राच्या 'रुक्मिणी-हरण' काव्यातील प्रस्तुत वेचा हा त्याच्या उत्प्रेक्षापूर्ण निसर्गवर्णनाचा नमुना ठरेल. '**कीं गगन-मंडपीं चंद्रिका-वेली...**' हेही असेच तारकांकित नभोवितानाचे उत्प्रेक्षापूर्ण वर्णन आहे. नरेंद्राच्या विदग्ध प्रतिभेची साक्ष या दोन्ही वेच्यांत पुरेपूर पटण्यासारखी आहे.

भीमकीची विरहावस्था

चांदण्यात विरहानलाने व्यथित झालेल्या रुक्मिणीचे हे वर्णन विदग्ध काव्यात शोभण्यासारखे आहे. नरेंद्राचे 'रुक्मिणी-हरण' हे मराठीतील 'विदग्ध महाकाव्य' म्हणून कोणी मानतात, तर कोणी त्याचा समावेश आख्यान-काव्यामध्ये करतात. वस्तुतः संस्कृतमधील विदग्ध महाकाव्य मराठीमध्ये येताना ते भाषांतर–रूपाने आलेले नाही– त्याचे देशीकरण होऊनच ते आलेले आहे. नरेंद्राच्या रुक्मिणी–हरणामध्ये विदग्ध महाकाव्य आणि आख्यान–काव्य या दोन्हींचे मिश्रण झालेले आढळते; म्हणून त्याच्या ह्या काव्यास 'विदग्ध कथा–काव्य' असे संबोधावेसे वाटते. भास्करभट्टाचे शिशुपालवध काव्य त्याच प्रकारचे आहे. पण दामोदर पंडिताचे 'वच्छहरण' मात्र आख्यानकाव्यच ठरेल.

भीमकीच्या विरहव्यथेच्या वर्णनात संस्कृत विदग्ध काव्यातील सांकेतिक वर्णनाचा आढळ होतो. ज्ञानेश्वरांच्या भाष्यकाव्य आणि भावकाव्य या स्वतंत्र मार्गाने मराठी कविता आपला प्रवास सुरू करीत असतानाच नरेंद्र मात्र आपली अभिजातता टिकवून होता.

एकनाथ (१५३३ – १५९९)

ज्ञानदेव, नामदेव ह्यांच्या पाठीमागून सुमारे तीनशे वर्षांनी एकनाथ येतात. स्वतः संस्कृत भाषेत मोठे पंडित असूनही, त्यांनी मराठीतून ओवीबद्ध ग्रंथ लिहिले आहेत. शिवाय काही अभंग व पदेही केली आहेत. ह्यांनी हिंदुस्थानी भाषेतही काही कविता केली आहे. एकनाथांचे गुरू जनार्दनपंत. आपल्या कवितेत त्यांनी आपले नाव 'एका-जनार्दन' असे गुंफिले आहे. ज्ञानेश्वरीच्या भिन्न भिन्न प्रती जमवून व त्यातील पाठांतरांचा विचार करून एकनाथांनी इ. स. १५८४ मध्ये ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत तयार केली. एकनाथाची भाषा सरळ व सुगम आहे. एकनाथी भागवत, (भागवताच्या एकादश स्कंधावरील टीका) भावार्थ-रामायण, रुक्मिणीस्वयंवर, स्वात्मसुख, चतुःश्लोकी भागवत-टीका, अभंग, भारुडे, गौळणी, वगैरे विपुल काव्यरचना त्यांनी केलेली आहे.

ती भीमकी वर्णावी कैसी...

एकनाथांचे 'रुक्मिणी-स्वयंवर' हे आख्यान-काव्य होय. प्राचीन मराठीमध्ये शुद्ध कथा-काव्य मिळत नाही. अध्यात्मविवरण आणि नीति–बोध ही प्रयोजने त्यात प्रसंग सापडेल त्याप्रमाणे मिसळली जातात. एकनाथांची साहित्य–दृष्टी तर अध्यात्मक प्रचारकाची होती. त्यांनी कथा–काव्याची आध्यात्मिक दीर्घ रूपक-कथाच बनविली. प्रस्तुत वेच्यामध्ये भीमकीच्या देहसौन्दर्याचे वर्णन असेच आध्यात्मिक अर्थाने संपृक्त झालेले आहे.

एकनाथांचे भावार्थ रामायणही असेच एक आध्यात्मिक कथा–काव्य बनले आहे. एकनाथांच्या नंतर मुक्तेश्वर, श्रीधर आदी कवींनी आध्यात्मिक रूपके मार्मिकतेने वापरल्याचे दिसून येते.

गौळण

कृष्ण–गोपी यांच्यातील भावबंधावर आधारलेले भक्तिगीत. वरवर यात शृंगार रस जाणवत असला तरी अंतर्यामी भक्त आणि परमेश्वर यांतील अद्वैताचीच येथे प्रतीती येते. गौळणीमध्ये काही पदे बालकृष्ण आणि गोपी यांच्यांतील वत्सल भावनेवर आधारलेली दिसतात. विनोद आणि चमत्कृतिपूर्ण रचनेचाही एकनाथ कधी कधी आश्रय करतात.

गौळण हे भावगीत आहे. यात भावाइतकेच गेयतेलाही महत्त्व आहे. यातील शब्दयोजनेत एक अंतर्गत संगीत सारखे जाणवत राहते.

भारुडे

एकनाथांची भारुडे म्हणजे आध्यात्मिक रूपके. पुष्कळदा भारुडांना कूटरचनेचेही स्वरूप येते. भारुडाचे विषय दैनंदिन, सामान्य, प्रापंचिक जीवनातील असतात. पण एकनाथ त्यावर अगदी चपखलपणे आध्यात्मिक रूपक बेततात आणि त्याला समस्त-वस्तु-विषय सांग रूपकाचे स्वरूप येते. भारुडातील उपमान-सृष्टी विविध आणि वैचित्र्यपूर्ण आहे. सामान्यांच्या अनुभूतींतून सामान्यांच्यासाठी अध्यात्म–प्रतिपादन करण्याचा हा परिणामकारक मार्ग एकनाथांनी लोकप्रिय केला. ज्ञानदेवांच्या अभंगातही भारुडरचना नमुन्यापुरती आढळते.

अर्जदस्त आणि कौलपत्र ही दोन्ही मिळून एक रचना आहे. जीव आणि शिव अगर जिवाजीपंत आणि आत्मारामपंत यांच्यातील सनातन संबंधावर येथे प्रकाश टाकला आहे. या जोड-भारुडात षड्रिपू आणि त्यांचे नियमन व अखेर मोक्ष याची कल्पना थोडक्यात पण अतिशय ठसठशीतपणे व्यक्त झाली आहे.

सयमक तालबद्ध मुक्त शैलीतील ही रचना आहे.

ते मन निष्ठुर का केले

एकनाथांचे अनेक अभंग आणि त्यांची पदे लोकप्रिय आहेत. प्रस्तुत पदात परमेश्वराचा धावा कळकळीने केलेला दिसतो. मोरोपंतांच्या केकावलीची येथे आठवण होते.

मुक्तेश्वर

एकनाथांस गोदावरी नावाची मुलगी होती. तिचा मुक्तेश्वर हा मुलगा. मुक्तेश्वराचे मूळ नाव मुद्गल; पण पुढे महाभारत लिहिण्यास सुरवात करतेवेळी त्यांनी आपल्या आराध्यदेवतेच्या आदेशावरून 'मुक्तेश्वर' हे नवे नाव धारण केले असे दिसते. त्याचा जन्मकाल इ. स. १६०९ सालचा मानला जातो.

"महाराष्ट्रकवींत कवी ही संज्ञा एका मुक्तेश्वरांना मात्र बरोबर रीतीने लागेल," असे कृष्णशास्त्री चिपळूणकर म्हणत. मुक्तेश्वरी ओव्या सहज ओळखता येतात इतकी त्यांची शैली पृथगात्म आहे. त्यांचे प्रमुख काव्य महाभारत. याशिवाय मुक्तेश्वराची हरिश्चंद्राख्यान, शुकरंभा-संवाद, श्लोकबद्ध 'संक्षेप रामायण' इत्यादी स्फुट काव्येही आहेत.

पवित्र शीतल...

प्रस्तुत संग्रहातील 'पवित्र शीतळ...' हे शिवस्तुतिपर अभंगरूप पद आहे. मुक्तेश्वराला कल्पनाचमत्कृती कशी प्रिय आणि सहजसाध्य आहे हे येथे स्पष्ट होते.

वर्षाकाळ

'वर्षाकाळ' हा एक सृष्टिवर्णनात्मक कवितेचा नमुना आहे. ध्वन्यनुसारी शब्दांची योजना करून वर्षाकालीन वातावरण निर्माण करण्याचा येथे प्रयत्न झालेला आहे. पण

मुक्तेश्वराची वाणी सहजपणे रूपकातूनच बोलते त्याचा प्रत्यय येथे अधिकांशाने येतो. 'कि पृथ्वीखंड त्या शाळुंखा' ही भव्य कल्पना पुढे अनेकांनी उचलल्याची दिसते. प्राचीन मराठी कवितेत, 'निसर्गा'ला स्वतःचे स्वतंत्र असे व्यक्तिमत्त्व दिलेले आढळत नाही. मुक्तेश्वराचे हे वर्णन त्यातल्या त्यात सांकेतिकतेहून पुष्कळच मोकळे झालेले आहे.

तेवी श्रीकृष्ण पांडवभेटी

'...तेवी श्रीकृष्ण...' हे एक प्रसंगचित्रण आहे. त्यातील कृति-गतींची चित्ररूपता मनोवेधक आहे. श्रीकृष्णाच्या रथावरील मुक्तेश्वरांनी केलेले दीर्घ सांगरूपक वैशिष्ट्यपूर्ण आहे. अशी दीर्घ आध्यात्मिक रूपके मुक्तेश्वर लीलया रचून जातात. हा वारसा एकनाथांचा आहे. पुढेही मराठी कवितेत आध्यात्मिक रूपके आढळतात–त्यांचे बरेचसे श्रेय मुक्तेश्वरांनाच देणे उचित ठरेल.

मयसभा

'मयसभा' हा वेचा म्हणजे मुक्तेश्वराच्या कथाकाव्यात आलेल्या एका वास्तुनिर्मितीचे आणि प्रत्यक्ष त्या वास्तूचे (मयसभेचे) परिणामकारक वर्णन आहे. या वर्णनात उपमा, उत्प्रेक्षा, रूपकादी अलंकारांची दाटी झालेली असली तरी त्या दाटीतूनही कितीतरी सरस रमणीय प्रतिमा रसिकांच्या मनात भरतात. बाणभट्टाच्या किंवा राम गणेशांच्या कल्पनाविलासातील भव्यता आणि सूक्ष्मता, विविधता आणि विपुलता, यांची येथे आठवण होते. मयसभा मनःचक्षूंपुढे उभी करण्याचे सामर्थ्य या शैलीत आहे. प्रस्तुत वेचा हा उदात्त अलंकाराचे एक उत्तम उदाहरण ठरेल! मयसभावर्णन हे वास्तवचित्रण नव्हे–ती कवीच्या कल्पनाशक्तीची मुक्त क्रीडा आहे.

कीचकवध

'कीचकवध' ही एक प्रसंगकथा आहे. मुक्तेश्वर हा मराठीतला पहिला कवी की ज्याने आर्ष महाकाव्याला मराठी रूप दिले. आणि हे करताना पारमार्थिकता आणि आध्यात्मिकता यापेक्षा त्याच्या काव्यरूपाकडे अधिक लक्ष दिले. मुक्तेश्वराने आर्ष कथाकाव्याला खऱ्या अर्थाने प्रारंभ केला व त्याला प्रतिष्ठाही मिळवून दिली. मुक्तेश्वर केवळ कल्पनाविलासाचे खेळ करू शकतो हे 'मयसभा' वर्णनात दिसून येते–पण त्याचबरोबर कथाकथनामध्ये तो अतिशय प्रवाही, वेगवती शैली धारण करतो आणि रसप्रवाह अखंडित ठेऊ शकतो. 'कीचकवधा'मध्ये मुक्तेश्वराचे कलाकवित्व दृष्टोत्पत्तीस येते. मुक्तेश्वराला कलाकवी असे संबोधण्यात येते, ते योग्यच होय!

तुकाराम (१६०८–१६४९)

'अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची' हे ज्याला ठाऊक नाही असा मराठी माणूस विरळा. पुण्यापासून नऊ कोसांवर देहू येथे तुकारामाचे वास्तव्य होते व तेथेच त्याची समाधी आहे. तुकाराम विठ्ठलाचा निःसीम भक्त.

तुकारामाच्या अभंगवाणीत त्याचे थोडेसे लौकिक आणि बहुतांशी सर्व आध्यात्मिक जीवनचरित्र उमटलेले आहे. प्रस्तुत संग्रहातील अभंगांतून ह्याचा प्रत्यय येईलच! त्याची साधकावस्था, त्याला झालेला साक्षात्कार, साक्षात्कारानंतरची उपकारापुरती उरलेली जीवनावस्था तुकारामाने आपल्या अभंगवाणीतून उत्कटतेने व्यक्त केली आहेत. 'खरी कविता केली जात नाही; तर ती होत असते' हे जर खरे असेल तर तुकारामाच्या अभंगवाणीला ते तंतोतंत लागू पडते. तुकोबाच्या अभंगातील प्रत्येक शब्दाला एक वजन असते, तो अशा जागी पडत असतो की त्यातून भावनेचा एक विशिष्ट ताण जाणवतो— मग ती भावानुभूती आशा-निराशेची, हर्ष-खेदाची असो किंवा सुख-समाधानाची, साक्षात्काराची असो, की दंभपरिस्फोटाची आक्रमक असो! तुकोबांच्या वाणीत भक्तिरस याच्या विविध भावच्छटांतून चित्रित झालेला आहे; आणि त्यांतून तुकारामाचे व्यक्तिमत्व सगुण रूपाने प्रकटले आहे. 'याति शूद्रवंश...' या एका अभंगात तुकारामांनी आपली आध्यात्मिक साधना कमालीच्या मोजक्या शब्दांत पण यथार्थपणे मांडली आहे. मराठी भाषेत तुकारामाच्या अभंगातून जितकी सुभाषिते, म्हणी आणि वाक्संप्रदाय घेतले गेले आणि रूढ झाले आहेत तितके दुसऱ्या कोणत्याही कवीच्या काव्यातून घेतले गेलेले नाहीत.

तुकारामाच्या आरत्यांमध्ये देवतेच्या सगुण रूपाचे चित्रण केलेले असते आणि भक्ताच्या हृदयाची आर्तता प्रकट झालेली आढळते.

तुकारामांनी बालक्रीडेचे जे अभंग लिहिले आहेत, त्यांतून त्यांची प्रसंग–घटना–चित्रणाची हातोटी पाहावयास मिळते. तुकारामाची रांगडी वाणी आपल्या प्रामाणिकपणामुळे, जिव्हाळ्यामुळे आणि भावोद्रेकी रोखठोक आविष्कारामुळे मराठी काव्यमंदिराचा कळस ठरते!

बहिणाबाई (१६२८–१७००)

संतकवी तुकाराम यांची शिष्या. वेरूळजवळील देवगाव हे तिचे माहेर; सासर सिऊर. तेथील पाठक उपनामाच्या शुचिर्भूत ब्राह्मणाशी विवाह. बहिणाबाईंना वयाच्या अठराव्या वर्षी तुकारामाचा साक्षात बोध झाला. गुरुबोधापर्यंतचे आपले चरित्र तिने अभंगरूपाने गाइले आहे. याखेरीज बहिणाबाईच्या ब्रह्मकर्मपर अभंगांमध्ये वज्रसूचिकोपनिषदाचा अनुवादही आढळतो. 'तुकारामाच्या प्रभावळीत राहूनही ही कवयित्री स्वयंतेजाने चमकली आणि भागवतधर्म मंदिरावर ध्वजा होऊन फडकली,' असा रा. चिं. ढेरे यांनी तिचा जो गौरव केला आहे, तो उचितच होय.

प्रस्तुत उतारा बहिणाबाईच्या आत्मचरित्रपर अभंगातून घेतला आहे. यातील कथेचे आकलन होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती पूर्वकथा येथे देणे इष्ट आहे.

बहिणाबाईचे लग्न वयाच्या तिसऱ्या वर्षी तीस वर्षे वयाच्या पाठक नावाच्या बिजवराशी झाले. हिच्या लग्नानंतर हिच्या आईवडिलांना भाऊबंदकीचा त्रास होऊ लागला. अखेर बहिणाबाईच्या पतीनेच त्यांना घराबाहेर पडण्याचा व तीर्थक्षेत्री जाण्याचा सल्ला दिला

व आपणही सोबत केली. प्रवरासंगम, शिखर-शिंगणापूर, नीरा-नरसिंगपूर, पंढरपूर, रहिमतपूर अशी भ्रमंती करीत चार वर्षांनंतर ही मंडळी कोल्हापुरी येऊन, हिरंभट नावाच्या एका वेदान्ती सालस ब्राह्मणाच्या घरी स्थिर झाली. पुढे हिरंभटांना कोणी तरी सवत्स गोदान केले. त्या वत्साला बहिणाबाईचा इतका लळा लागला की ते तिच्याविना खात–पीत–झोपत नसे. ते तिच्याबरोबर कथा-कीर्तनास जाई; हरदासांना नमस्कार करी. जयरामस्वामींनी बहिणाबाई आणि वत्स यांना पूर्ण दृष्टीने पाहिले व त्यांच्या मस्तकी हात ठेविला. पतीला ही घटना कळताच तो रागाने संतप्त झाला व त्याने बहिणाबाईला यथेष्ट झोडपले आणि तिच्या मुसक्या बांधून तिला अन्न-पाण्याविना तडफडत ठेविले. त्या वत्सानेही सर्व शरीरव्यापार बंद ठेविले. जयराम-स्वामींनी बहिणाबाईच्या पतीला समजावण्याचा प्रयत्न केला. तेवढ्यात त्या वत्साचा देहांतसमय आला. हिरंभटाच्या तोंडी सहजपणे 'मूकं करोति–' हा श्लोक बाहेर पडत होता, त्याचा 'यत्कृपा तमहं वंदे–' हा उत्तरार्ध त्या वत्साने पुरा केला. पुढे लगेच वत्साचा अंत झाला; त्याने बहिणाबाई मूर्च्छित पडली. चार दिवस लोटले तरी ती सावध होईना. तिच्या स्वप्नात ब्राह्मण आला; बहिणाबाईला तुकारामाचा छंद लागला. तुकारामाने तिला सातव्या दिवशी स्वप्नदृष्टांत दिला. ती सावध झाली; तिने गाईला कुरवाळिले, तिचे दूध थोडेसे प्राशन केले. पण बहिणाबाईचे रूप आता पार पालटले होते—तुकोबाचा तिला अंतरी छंद लागला होता. 'भ्रतार हा तिचा वेडावला राहे। उगाचि तो पाहे तियेकडे', अशी त्याचीही स्थिती झाली होती. हे सर्व पाहून जयराम स्वामींनी कृपा केली.

प्रस्तुत वेच्यामध्ये यापुढील भाग आलेला आहे.

बहिणाबाईच्या आत्मकथनात वृत्तीचा मोकळेपणा आहे; सरळपणा आहे. आपल्या सुखदुःखाचे उमाळे आणि आनंदाचे गहिवर प्रांजळपणे पण सहज रम्योत्कटतेने तिच्या या जीवन–कथेत व्यक्त झाले आहेत. अनुभवांचे भावरूप तिला जणू जाणवत असावे. परमार्थाच्या क्षेत्रातील स्त्रीची होणारी कुचंबणा तिने अगदी उघडपणे मांडली आहे; पण त्याचबरोबर तिची पतिनिष्ठा अणूभरही कमी झालेली नाही. गुरुनिष्ठा व गुरुपूजा याबाबत तिच्या स्वातंत्र्यावर येणाऱ्या मर्यादाही तिने मर्यादशील शब्दांत व्यक्त केल्या आहेत. तुकारामांच्या दर्शनाने तिच्या हृदयात जो भक्तिप्रेमाचा सागर उसळला त्याचे किती अकृत्रिम, जणू वेभान चित्रण तिच्या वाणीवाटे घडले आहे; ह्याला तोड तिच्या गुरुच्याच–तुकोबाच्याच–वाणीची! इतके स्पष्ट, प्रांजळ, सहजशैलीतील रसरशीत आत्मचरित्र विरळाच!

[या आत्मचरित्राला सामाजिकतेची व धार्मिकतेची फार महत्त्वपूर्ण परिमाणे लाभली आहेत. अशी छोटी छोटी वास्तवपूर्ण अनेक आत्मचरित्रे लाभली असती तर महाराष्ट्राचा खरा धार्मिक व सामाजिक इतिहास परिपूर्णतेने सिद्ध करता आला असता.]

प्रस्तुत आत्मचरित्र हा आख्यान–काव्याचाच एक भाग होतो, असे मानता येण्यासारखे आहे.

रामदास (१६०५–१६७७)

ह्यांचे मूळ नाव नारायण, वडिलांचे नाव सूर्योपंत, उपनाव कुळकर्णी. पुढे रामाची भक्ती करू लागल्यावर रामदास असे नाव पडले. ह्यांनाच समर्थ असे म्हणतात. ज्ञानेश्वर–नामदेव–एकनाथ–तुकाराम–रामदास या संत कविपंचकातले रामदास हे शेवटचे संतकवी. 'दासबोध' हा त्यांचा महत्त्वाचा ग्रंथ. रामायण, (सुंदरकांड, युद्धकांड) आरत्या, 'स्फुट अभंग' 'मनाचे श्लोक' इत्यादी त्यांची विपुल आणि विविध पद्यरचना प्रसिद्ध आहे.

रामदासांच्या साहित्यात वैचारिक दीर्घ आणि स्फुट कविता आढळते; तसेच भावपूर्ण उपासना–पदे आणि भक्तिगीतेही आढळतात. प्रस्तुत संग्रहात त्यांच्या या वैशिष्ट्यांचे द्योतक असे वेचे निवडण्यात आले आहेत.

दासबोध : काही उतारे

मराठी काव्यसृष्टीत रामदासांच्या कवितेचे रूप अगदी वेगळे आहे. पहिली गोष्ट जी मनात भरते ती ही की रामदासांची कविता स्वतंत्र आहे; तिच्या मागच्या प्रेरणा, तीमध्ये व्यक्त झालेल्या प्रवृत्ती, तिची आविष्कारपद्धती सारे काही स्वतःचे, स्वतंत्र असे आहे. सांकेतिकतेचा अभाव आणि वास्तवतेचे अखंड भान ह्या दोन महत्त्वपूर्ण अपवादात्मक गुणांनी रामदास हे कवी म्हणून जुन्यातील नवकवी ठरतील. अध्यात्माचे केवळ तात्त्विक पातळीवरील अर्थविवरण करून ते थांबत नाहीत. 'माणूस' हा मुळात कसा आहे, व्यक्ती म्हणून आणि समाज म्हणून, हे जाणून घेण्यात, आणि ते जाणवून देण्यात रामदासांना खरी गोडी वाटते. करंटा पुरुष आणि समर्थ पुरुष ह्या दोन्हींनाही त्यांनी ओळखले आहे. सामान्य माणसाच्या दृष्टीने ऐहिकता आणि पारमार्थिकता यांच्या श्रेणी त्यांनी जाणल्या आहेत. माणसाच्या विविध जाती आणि उपजाती ओळखून ज्याला जसा लागू पडेल त्याला तसा बोध त्यांनी केला आहे. मराठीतील अत्यंत वास्तवपूर्ण, अनुभवनिष्ठ, प्रत्ययकारक व नित्य आणि शाश्वत उपयुक्त होणारे खरे जिव्हाळ्याचे बोधवाङ्मय कोणी लिहिले असेल तर ते रामदासांनी ! त्यांच्या ह्या बोधवाणीला त्यांच्या तळमळीमुळे, कळकळीमुळे, त्यांच्या जोरदार व्यक्तित्वामुळे काव्यरूपता लाभली आहे.

रामदासांना, जे जे पाहिले, अनुभविले, त्याचे जे जे अर्थ लागले ते ते सांगण्याची उदंड हौस आहे. त्यामध्ये स्वाभाविकपणेच शीघ्ररचननेचे लाघव दिसते. उत्स्फूर्तता जाणवते. खूप तपशील त्यात येत राहतो; हा तपशील आणि तो सांगण्याचा रामदासांचा झपाटा केवळ एकमेवाद्वितीय आहे. त्यांच्या लेखणीचा गुण वक्तृत्व हा होय; रामदासांनी काही लिहिलेच नाही, ते अखंडपणे जणू बोलतच राहिले, सांगतच राहिले ! क्रियाशील तत्त्ववेत्त्याला आपल्या तत्त्वज्ञानाला अनुरूप आचारधर्मांची जोड द्यावी लागते; त्याचे तपशील द्यावे लागतात; आणि तपशील म्हटले की तात्कालीन समाजस्थिती, तिचे वास्तविक रूप ध्यानी घेणे आले. रामदास हे क्रियाशील तत्त्ववेत्ते सत्पुरुष, महंत,

होते. ते संघटक होते; आणि ही भूमिका मराठीतील इतर कोणत्याही कवीहून अगदी वेगळी आहे. त्यामुळे या भूमिकेतून निर्माण झालेले रामदासांचे कवित्वही वेगळेच आहे. दासबोध, मनोबोध या ग्रंथांचा या दृष्टिकोणातून विचार व्हावा!

'साधू दिसती वेगळाले । परी ते स्वरूपीं मिळाले' ह्यात शंका नाही. रामदासांनी अध्यात्मविवरण केले आणि 'मना सज्जना' अशी हाक घालून त्याला 'भक्तिपंथेचि जावे' असा बोध केला आहे, हेही खरे! पण सामान्यांच्या प्रपंचाचा, म्हणजे त्याच्या ऐहिक कर्तृत्वाचा, सामर्थ्याचा अधिक्षेप आणि धिक्कार करण्यापेक्षा त्याला 'भगवंताचे अधिष्ठान' मिळवून देण्याचे कार्य केले. एकनाथांच्या प्रपंच–परमार्थ–समन्वयात अंती परमार्थावरच दृष्टी खिळलेली आहे. रामदासांच्या नेटक्या प्रपंच–विज्ञानात आणि पारमार्थिक–विवेकात माणसाच्या सामान्यत्वाचे, त्याच्या दुर्बलतेचे, त्याच्या विकारशीलतेचे अखंड भान असल्याने समन्वयाची दृष्टी वास्तवाच्या पातळीवर फिरत असलेली दिसते. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम यांच्यापेक्षा एकनाथांच्या पार्श्वभूमीवर रामदासांचा अभ्यास केल्यास तो कितीतरी समस्पंदने दर्शवितो. प्रस्तुत पुस्तकातील 'आधी प्रपंच करावा नेटका' आणि 'करंट लक्षण' हे वेचे या संदर्भात पाहावेत. हे वेचे म्हणजे जीवनभाष्ये, जीवनचिंतने होत. प्राचीन मराठीत अशी वास्तवाधिष्ठित जीवनभाष्ये अशा जाणिवेने प्रेरित होऊन केलेली, अन्यत्र आढळत नाहीत.

स्फुट वैचारिक कविता

लौकिक जीवनाच्या ऐश्वर्याचे आणि भव्य सौंदर्याचे खरे रूप रामदास, साधू असूनही, जाणतात. हे ऐश्वर्य आणि सौंदर्य 'राजधर्मा'त प्रकट होते. त्यांनी शिवप्रभूंच्या केलेल्या गौरवात ते पूर्णपणे व्यक्त झाले आहे. **संभाजीस** लिहिलेल्या **पत्रात** या राजधर्माच्या रक्षणासाठी आवश्यक अशा कृतींचा त्यांनी विचार मांडला आहे.

याचबरोबर लौकिक जीवनात आधिभौतिक, तसेच मानवी कोप झाले म्हणजे सामान्यजनांचा संसार किती दीनवाणा होतो, ह्याचे नेमके शब्दचित्र त्यांनी '**सर्व संसार बुडाला**' या स्फुट अभंगात काढले आहे.

लौकिकात जेव्हा काही ओळीने एकाहून एक असे बरे घडत जाते तेव्हा तो 'सुकृताचा योग' होय, हेही रामदास स्पष्टपणे सांगतात. मानवी प्रयत्नाने वाटेल ते घडविता येते, अशी अवास्तव कल्पना त्यांनी कधीच करून दिलेली नाही. '**योग हा सुकृताचा**'मध्ये त्यांनी मनासारखे कुटुंबीय, आप्त-मित्र यांच्याबरोबर मनासारखे ग्रामाधिकारी आणि साधुजन यांचाही समावेश केला आहे, मनुष्याचे सुख त्याच्या कुटुंबियांबरोबर देशकालपरिस्थितीवरही अवलंबून असते, याचे हे निदर्शक आहे.

रघुनाथाचे राज्य लाभणे हा एका व्यक्तीच्या सुकृताचा योग नसून अखिल राष्ट्राच्या सुकृताचा तो योग आहे. 'राज्य या रघुनाथाचे' हे आदर्श राज्याचे एका भावमग्न अवस्थेत रेखाटलेले सुंदर कल्पनाचित्र आहे. ऐहिक ऐश्वर्याचे डोळे भरून चित्र काढून

ते पुरे करताना त्यात रामदासांनी अंतिम हेतू म्हणून सद्धर्माचा रंग मिसळला आहे. रामदासांनी संगीत कलेचा आवर्जून केलेला उल्लेख ध्यानी घेण्यासारखा आहे.

रामदासांची भावकविता

आपली मनाची चंचलता आणि विकारवशता ओळखून, आपण आपली मुक्ती करून घेऊ शकत नाही, ह्या जाणिवेने अगतिक झालेल्या एका आर्त भक्ताचा भावनोत्कट धावा म्हणजे '**अनुदिनी...**' हे **करुणाष्टक** !

'**आठवले रामचंद्र ध्यानीं**'—ह्या वेचा म्हणजे श्रीरामचंद्राच्या स्मरणभक्तीचे उत्तम उदाहरण होय. श्रीरामचंद्राच्या सगुण सालंकृत मूर्तीचे गोचरवर्णन रामदासांनी केले आहे.

'**चाफळीं श्रीरामाचे शुभागमन**' होत आहे, या कल्पनेने रामदासांच्या अंगी अष्ट सात्त्विक भाव जे दाटून आले, त्याचे रूप या भावकवितेत प्रत्ययास येते.

भवसागरी मूढ पाषाण तारणाऱ्या या श्रीरामाच्या दासाला जगात कोणाचे मिंधे राहण्याचे काहीच कारण नाही. '**आम्ही काय कुणाचे खातो रे** । तो राम आम्हांला देतो रे,' ह्या भावबळावर तो निःस्पृह, समर्थ होत असतो. रामदासांनी अनेक दृष्टान्त देऊन, श्रीरामाचे सर्वशक्तिमत्व पटवून दिले आहे. प्रश्नालंकाराचा वक्तृत्वपूर्ण वापर या गीतात झालेला आढळतो.

राम आणि विठ्ठल यांतील अद्वैताची अनुभूती रामदासांनी '**येथें उभा का श्रीरामा**' या गीतात अगदी सहजतेने व्यक्त केली आहे. विठ्ठलमूर्तीकडे पाहताना येथे राम तर दिसतो आहे, पण राममूर्तीच्या खुणा तर दिसत नाहीत; उलट खुणा दिसतात त्या विठ्ठलमूर्तीच्याच ! काही अपूर्व 'हरवले–सापडल्या'ची अद्भुत चमत्कृतिपूर्ण अनुभूती रामदासांनी अगदी मोजक्या शब्दांत प्रकट केली आहे. सर्व गीतभर विस्मयावस्था स्तिमितता भरून उरली आहे !

स्फुट रचना : उपासना–गीत-संगीत

रामदासांनी उपासना–वाङ्मयही उदंड लिहिले आहे. त्यातील त्यांच्या आरत्या, पाळणा, स्तोत्रे, करुणाष्टके इत्यादी काही कविता येथे घेतली आहे. वस्तुतः ही सर्व कविता भावकविताच होय. आरतीमध्ये देवतेचा गौरव असतो, जयजयकार असतो. देवतेचे मूर्तिवर्णन, तिचे अवतारकार्य आणि तिला केलेली प्रसादयाचना आरतीमध्ये सामान्यतः येतात. आरतीचे गायन समुदायाने करायचे असल्याने त्यामध्ये प्रसादपूर्णता, गायनाच्या दृष्टीने सोपेपणा, नादमाधुर्य आणि ध्वनिसौंदर्य असावे लागते. रामदासांच्या-**श्रीशंकराच्या आरतीमध्ये**, आरती या गीतप्रकाराचे सर्व गुणविशेष प्रकर्षाने जाणवतात.

'**श्रीरामाचा पाळणा**' या गीतात अंगाईरचनेची वैशिष्ट्ये सुस्पष्ट झाली आहेत. श्रीरामाचे ब्रह्मरूप येथेही गौरविले आहे.

'**भीमरूपी स्तोत्रा**'मध्ये मारुतीचे प्रभंजनरूप विद्युत्वेगाने आपल्यापुढे साकार केले आहे. मारुतीच्या कृतीचे, गतीचे चापल्य रामदासांच्या रचनेतही इतके अवतरले आहे

की या स्तोत्राला एखाद्या चलच्चित्राचे स्वरूप लाभले आहे. सर्व संवेदनांच्या रूपातून उभारलेला भीमरूपी–महाबळी–वज्र हनुमान आपल्या दर्शने दोष नाशील, असा विश्वास मनात निर्माण करणारा आहे. ऐहिक फलश्रुती या स्तोत्राच्या अखेरीस आली आहे, हे लक्षणीय आहे.

'श्रीगणेशस्तवन' हे वास्तविक गणेशस्तोत्र म्हणून सुटेपणाने रचलेले नाही. दासबोध ग्रंथारंभी, सर्वसिद्धिफळदायक श्रीगणेशाचे केलेले ते स्तवन होय. प्राचीन मराठीमध्ये गणेशस्तवने अनेक आढळतात; पण रामदासांच्या इतके प्रत्यक्ष, वस्तुनिष्ठ आणि जिवंत, रसरशीत वर्णन कोठेच आढळणार नाही. ह्या वर्णनात सूक्ष्मता आणि भव्यता दोन्हींचाही आढळ होतो, येथे सांकेतिकतेस थारा नाही. जे गजवदन पाहिले आणि त्या गजवदन-मूर्तीत जो गणनायक प्रस्थापिला त्याचे सर्व ज्ञानेंद्रियांचे तर्पण करील असे अपूर्व वर्णन रामदासांनी केले आहे. येथेही 'नट नाट्य कळांकुसरी। नाना छंदे नृत्य करी' हे विशेषत्व उल्लेखिलेले आहेत.

'गिरीचे मस्तकीं गंगा' हे एक निसर्गवर्णनपर गीत आहे. कड्यावरून कोसळणारा धबधबा पंच ज्ञानेंद्रियांनी भोगावा इतके हे वर्णन जिवंत झालेले आहे. कोणत्याही अनुभूतीतला प्राण रामदासांच्या रचनेत जसाच्या तसा भरलेला असतो. मग ती शंकराची आरती असो, भीमरूपी स्तोत्र असो, राममूर्तीचे स्मरण असो, की अरण्याचे वर्णन असो. प्राचीन मराठीत इतकी वास्तव, स्वानुभवनिष्ठ, अकृत्रिम, जिवंत अशी वर्णने अपवादात्मकच !

'कवेश्वरस्तवन'

प्राचीन मराठी साहित्यात रामदासांनी काही साहित्यविचार मांडला, असा डॉ. श्री. व्यं. केतकर यांनी अभिप्राय व्यक्त केला व त्या दृष्टीने आपला काही अभ्यास लेखरूपाने प्रसिद्ध केला. मराठी साहित्यविचार ज्ञानेश्वर-मुकुंदराज यांच्यापासूनच सुरू झाल्याचे आपण पाहिले आहे. 'कवेश्वरस्तवन' हा ग्रंथराज दासबोधातील एक अध्याय आहे. व्यास-वाल्मीकीसारख्या महाकवींच्या ह्या स्तवनात कवी हे देवाचे रूपकर्ते, ऋषीचे महत्त्ववर्णिते हे वर्णन यथायोग्यच होय. महाकाव्यात नवरसांचे ओघ लोटतात, विवेकनिधीची भांडारे खुलतात, हेही उचित आहे. कवीमुळे सांस्कृतिक परंपरा आणि प्रेरणा युगायुगातून टिकून राहाते. कवी नसते तर जगाचा उद्धार झाला नसता–असा कवींचा रास्त बडिवार रामदासांनी गाइला आहे.

या अध्यायाच्या पूर्वार्धांत तर कवी हे वेदावतारी परमेश्वर असेच रामदासांनी म्हटले आहे. रामदासांना अभिप्रेत असलेले कवी, त्यांची प्रतिभा, त्यांचे कार्य आणि प्रभाव हा व्यास-वाल्मीकीदींच्याच बाबत पाहणे इष्ट ठरेल.

वामन पंडित (१६०८–१६९५)

सातारा जिल्ह्यातील कोरेगाव कुमटे येथील जोशी. यांचे उपनाव शेषे. वामन पंडितांचे अध्ययन काशीक्षेत्री झाले आणि पांडित्याबद्दल त्यांनी विजयपत्रेही मिळविली. आत्मज्ञानाच्या

तळमळीने त्यांनी मलयपर्वतावर तपश्चर्या केली. सच्चिदानंदांचे तेथे त्यांना यतिवेषात दर्शन झाले. ब्रह्मप्राप्तीनंतर लोकोद्धारासाठी वामनपंडितांनी ग्रंथलेखनास प्रारंभ केला.

रामदास, तुकाराम आणि वामन पंडित हे समकालीन कवी – तिघेही शिवकालातलेच; पण तिघांच्या वृत्ती वेगळ्या म्हणून त्यांचे साहित्यस्वरूपही वेगळे झाले. वामन पंडितांची आवडती कथा म्हणजे कृष्णाची. नामसुधा, वनसुधा इत्यादी पंचसुधा, किंवा भामाविलास, राधाविलास, राधाभुजंग इत्यादी भागवती प्रकरणे. यात वामनपंडितांचे पांडित्य, कलाभक्ती आणि रसिकवृत्ती चांगलीच प्रकट होते. सीतास्वयंवर, रामजन्म, भरतभाव, अहल्योद्धार इत्यादी रामायणी प्रकरणेही त्यांनी लिहिली. 'या खंडकाव्यात्मक नूतन काव्यप्रकाराने व विविधाक्षरगणवृत्तात्मक सगुण सालंकार रचनेने वामन पंडितांनी कलाकवीच्या एका नवीन संप्रदायास जन्म दिला,' असा प्रा. द. सी. पंगू यांचा अभिप्राय आहे. 'सुश्लोक वामनाचा' हे तर सर्वश्रुत आहेच.[1]

भरतभाव

प्रस्तुत संग्रहातील वेचा वामन पंडितांच्या 'भरतभाव' या स्फुट प्रकरणातील आहे. कालिदासाच्या 'मेघदूता'ला ज्या अर्थाने खंडकाव्य म्हणतात त्या अर्थाने 'भरतभाव' या स्फुट प्रकरणाला खंडकाव्य संबोधिता येणार नाही. ते एक मनोभावदर्शक असे कथाकाव्य आहे. रामावरील भरताची अनन्यसाधारण भक्ती हा तो एकमेव मनोभाव होय. विविध प्रसंगांतून, सुसंवादी आणि विरोधी व्यक्तिमनश्चित्रणातून, नाट्यपूर्ण संवादातून ही कथा फुलत गेली आहे. पण या कथाकाव्यात घटना आणि प्रसंग यांच्यापेक्षा मनोभावदर्शनालाच अधिक महत्त्व दिले गेले आहे. वृत्तवैचित्र्य हेही या काव्यरचनेने जाणीवपूर्वक स्वीकारलेले अंग होय.

प्राचीन मराठी कवितेत ज्याला 'स्फुट प्रकरणे' म्हणतात ती खरोखरीच एका सुदीर्घ महाकाव्यातील स्वतंत्र, सुटे, स्वयंपूर्ण, रसभरित असे कथा–खंडच (units) होत. मराठी कवितेत अशी पंडिती वळणाची कथारूप खंडकाव्यरचना वामन पंडितांनी प्रवर्तित केली.

सामराज

हे शिवकालीन कवी. भोसल्यांच्या कुलपुरोहिताच्या वंशात यांचा जन्म झाला. त्यांची 'रुक्मिणीहरण' आणि 'मुद्‌गलाख्यान' ही दोन काव्ये प्रसिद्ध आहेत.

---

१ वामन पंडित हे 'यथार्थदीपिका'कार म्हणून सर्वप्रथम ओळखले जातात. 'यथार्थदीपिका' ही बावीस हजार ओव्यांची गीताटीका आहे. ज्ञानोत्तर भक्ती हाच गीतेचा यथार्थ आहे, हे सिद्ध करून दाखविण्याच्या हेतूने त्यांनी ही टीका लिहिली. या टीकेला काव्याची अल्पमात्र कांती आहे; वामनपंडितांची तर्कशुद्ध दृष्टी, बिनतोड युक्तिवादाचे सामर्थ्य, सडेतोड आणि निर्भय प्रतिपादन, स्मृति-पुराणे-शास्त्रे यांचा गाढ व्यासंग आणि त्यातून आलेली तार्किक मांडणी यांमुळे या ग्रंथाचे स्वरूप शास्त्रीय झालेले आहे.

संस्कृत विदग्ध महाकाव्याच्या धर्तीवर सामराजांनी 'रुक्मिणीहरण' या आपल्या काव्याची रचना जाणीवपूर्वक केली, असे दिसून येते. नरेंद्राच्या रुक्मिणीहरणाची रचना, एकनाथांच्या रुक्मिणी–स्वयंवराची रचना या सामराजाच्या रुक्मिणी–हरण काव्याच्या रचनेहून भिन्न आहेत—काव्याच्या समजूतीच्या, हेतूच्या आणि फलश्रुतीच्याही दृष्टीने. भिन्न आहेत. पंडिती स्फुट प्रकरणात्मक रचना वामन पंडितांनी केली तर त्याच काळात पंडिती विदग्ध महाकाव्यरचनेचा प्रयत्न सामराजांनी केला. अर्थात येथेही भक्तिसूत्र कोठे तरी चिकटविलेले आढळतेच—तपशीलाचा नीरस पसाराही दृष्टोत्पत्तीस येतो, पण मूळ बैठक विदग्ध महाकाव्याची असल्याचे स्पष्टपणे जाणवते, यात शंका नाही.

प्रस्तुत संग्रहातील वेच्यामध्ये रुक्मिणी–हरणाचा क्षण टिपणारा कथाभाग येतो. रुक्मिणीच्या लावण्याचे अत्यंत चित्तवेधक वर्णन येथे येते. कवीच्या विदग्ध रस-वृत्तीचा प्रत्यय या वर्णनातून सतत घडतो. स्त्रीदेहसौंदर्याच्या वर्णनात सांकेतिकतेला येथे विशेष कुरघोडी करता आलेली नाही. उलट या सौंदर्याच्या प्रभावाने विपक्षीय कसे निष्प्रभ आणि हतवीर्य झाले आणि भीमकी कृष्णासमीप कशी सहजतेने आली हे दर्शविण्यासाठीच, हे सारे वर्णनकौशल्य उपयोजिल्याने त्यात एक नाजूक भावप्रवाह स्रवत असलेला जाणवतो. सामराजाच्या काव्यसौंदर्याचा उत्कर्ष या भक्तिरसात्मक प्रणयाच्या प्रसंगचित्रणात झालेला दिसतो.

तुळशीदास

'शूर मर्दाचा पोवाडा' हा ५९ चौकांचा पोवाडा या शाहीराने रचला. हा शाहीर पुण्यास मंडईत राहात असावा. पण प्रा. दत्तो वामन पोतदारांच्या मते तो पेशवेकालीन शाहीर असावा.

पोवाडा हे वस्तुतः एक आख्यानक काव्यच होय. मात्र या काव्याचा विषय पौराणिकाऐवजी ऐतिहासिक असतो. समकालीन संतचरित्रे किंवा काहींनी आपली आत्मचरित्रे लिहिल्याचे प्राचीन मराठीत दिसून येते. पण त्यामागील दृष्टी पारमार्थिक आणि आध्यात्मिक अशीच असते. ऐहिक जीवनातील पराक्रमाची गाथा गाण्याचा प्रारंभ शाहिरांनीच केला.

आख्यानकाव्याची सर्व ठळक वैशिष्ट्ये पोवाड्यात आढळणे हे स्वाभाविकच आहे. ठसठशीत व्यक्तिवर्णने, प्रसंगचित्रणे, मनोविकारदर्शने, वातावरण–निर्मिती आणि कथानकातील प्रभावी संघर्षनाट्य पोवाड्यामध्ये जोरदार रीतीने व्यक्त झाल्याचे आढळते. कथा–कथनाचा वेग पोवाड्यामध्ये इतका प्रचंड असतो, की कथानक एका क्षणात एक ठिकाणचे दुसऱ्या ठिकाणी, एक रसातून दुसऱ्या रसात सारखे धावते–फिरते राहते. वर्णनाच्या चित्ररूपतेलाही येथे प्राधान्य येते. पोवाड्यात व्यंजनेला स्थान नाही, अभिधेला आहे. जोरदार भाषेत, खास देशी शब्दात, तो लिहिला जातो; कारण शाहीर हे शिक्षित काव्यज्ञ नव्हत. जीवनाचे नाट्य रोखठोकपणे उभे करण्याकडे शाहिरांचे लक्ष असते. यमक, अनुप्रास आणि ध्वन्यनुसारी शब्दयोजना यावर कटाव–रचनाकारांप्रमाणेच

शाहिरांचीही भिस्त असते. कटाव किंवा पोवाडा ही श्रव्य काव्ये आहेत. यांमुळे त्यांच्या रचनेत खूपच गायनानुकूल लवचिकता असते. कटाव आणि पोवाडा ऐकण्यानेच त्यांची खरी सौंदर्यशक्ती आपण जाणू शकतो.

कटावाप्रमाणेच पोवाड्यातही विविध प्रसंगानुसार कडवी म्हणजे चौक असतात. प्रत्येक चौकातील चरणसंख्या प्रसंगानुसार कमी-अधिक असते. त्या त्या रसास अनुसरून, चौकाच्या चाली पण बदलण्यात येतात. भारूड, कटाव, कीर्तनाश्रयी आख्याने किंवा पोवाडे ही समुदायाने एकत्र ऐकण्यासारखी आणि आस्वादिण्यासारखी काव्य-रचना आहे. चंपूचे हे सामर्थ्य नव्हे. चंपू बव्हंशी विदग्ध रसिकांच्या लहान मंडळात वाचनीय ठरणारा काव्यप्रकार होय.

प्रस्तुत संग्रहातील तुळशीदासाच्या सिंहगडच्या पोवाड्यात आख्यानकवितेचे स्वतःचे असे वेगळे मराठी वळण दिसून येते. त्यातील प्रतिमासृष्टी, जीवननिष्ठा, व्यक्तिविषयक भावना, आचारातील संकेत हे खास मराठी मातीचे गुण घेऊन आलेले आहेत. यातील ताजेपणा, उत्कटता, जिव्हाळा अवीट आहे. रसपरत्वे रचनेमध्ये लवचिकता येते. घडणाऱ्या प्रसंगांचा हा पोवाडा म्हणजे एक धावता शब्दचित्रपट होय. पुराणकथेतील अद्‌भुतता आणि अतिशयोक्ती यांचे आकर्षण शाहीर आणि त्याचे रसिक यांना आहे, हे स्पष्ट जाणवते. किंबहुना पोवाड्याची ही वैशिष्ट्येच आहेत. पोवाड्यांचे प्रयोजन हे पराक्रमाचे स्तवन करून लोकांमध्ये वीरवृत्ती जागृत करणे हे आहे. ‘शूर मर्दांचा पोवाडा शूर मर्दांने ऐकावा’ यात हे प्रयोजन सुस्पष्ट होते. संतांच्या आणि पंडितांच्या काव्यातील पारमार्थिक आवाहन पोवाड्यात नसते. विषय, विषयाकडे पाहाण्याचा दृष्टिकोन, रचनेचा हेतू आणि फलश्रुती तसेच आविष्कार–पद्धती या बाबतीत पोवाडा आपले स्वतंत्रपण व वेगळेपण प्रकट करतो. शाहिरी काव्याला ‘मराठी काव्याची प्रभात’ असे जे अच्युत बळवंत कोल्हटकरांनी म्हटले आहे, ते या संदर्भात लक्षणीय ठरावे.

श्रीधर (१६५८–१७२९)

पंढरपुराजवळ नाझरे गावचे राहाणारे. ह्यांनी उत्तर वयात संन्यास घेतला. हे बहुधा तीर्थयात्रा करीत हिंडत असत. श्रीधराचे ग्रंथ ओवीबद्ध आहेत. व ते संस्कृतातील पौराणिक ग्रंथांच्या आधाराने रचिले असल्यामुळे, सामान्य लोकांस ते फार प्रिय होऊन, त्यांमध्ये त्यांचा फार प्रसार झालेला आहे. श्रीधरांची कविता रसभरित आहे. भाषा सुगम आहे. हरिविजय, रामविजय, वेदांतसूर्य, पांडवप्रताप, जैमिनी अश्वमेध, शिवलीलामृत, पांडुरंगमाहात्म्य इ० त्यांचे ग्रंथ आहेत. ‘ध्रुवचरित्र’ हे त्यांचे एक श्लोकमय आख्यान आहे.

कलावैदग्ध्य आणि पांडित्य यांपेक्षा भाविकतेला महत्त्व देऊन कथा-काव्याची रचना श्रीधराने केली. साधे शब्द, सुबोध मांडणी, आणि भाविक मनास आकृष्ट करील अशी ग्रंथाची फलश्रुती, यामुळे श्रीधराचे ग्रंथ अतिशय लोकप्रिय झाले. लौकिक जीवनाशी

पुष्कळसा जुळणारा भरपूर कथाभागही श्रीधराच्या कथाकाव्यात येतो; त्याने श्रोत्यांना खूप आत्मीयता वाटते. विविध रसांचा प्रकर्ष झालेला त्याच्या काव्यात आढळतो. विशेषतः वीर आणि करुण...'श्रीधरापूर्वी आणि नंतर महाभारताचे जे अवतार झाले त्या सर्वांत श्रीधराच्या (पांडवप्रताप) ग्रंथाइतकी लोकप्रियता कोणास लाभली नाही', असा निर्वाळा एकमुखाने देता येईल.

प्रस्तुत संग्रहातील 'द्रौपदीवस्त्रहरण' ह्या वेच्यामध्ये मराठी आख्यानकाव्याचे सर्व गुणविशेष आढळतील. भाविकपणे कथन केलेले, सरळ, सुबोध असे रसाळ कथाकाव्य म्हणून श्रीधराच्या या आख्यानकाव्याकडे पाहता येईल. मोरोपंत आणि मुक्तेश्वर यांच्या भारतकथाकाव्यात येणारा हाच कथाभाग या संदर्भात ताडून पहिल्यास श्रीधराचे हे वेगळेपण झटकन जाणवेल.

अमृतराय (१६९८–१७५३)

हे कवी औरंगाबादला राहत. मूळचे बुलढाणा जिल्ह्यातील फत्तरखेडा गावचे. मध्वमुनीश्वरांना त्यांनी गुरु केले व आपले लक्ष परमार्थसाधनेकडे लाविले. यांनी पदे व कटिबंध पुष्कळ केले आहेत. शीघ्रकवित्व हा त्यांचा एक गुण. पद्यरचना ते इतक्या जलद करीत, की ती लिहिण्यास अवकाश सापडत नसे. त्यांची काही कविता पुराणांतील कितीएक प्रकरणावर आहे व काही बोधपर आहे. त्यांची कविता मनोरंजक असून तीत प्रास, यमके फार आहेत. हिंदुस्थानी भाषेतही यांनी काव्यरचना केली आहे. ते कथा करीत. दामाजीपंताची रसद, द्रौपदीवस्त्र-हरण, शुक-चरित्र, सुदामचरित्र, जीव-दशा, इ० यांचे ग्रंथ आहेत.

प्रस्तुत संग्रहातील 'सुदामचरित्र' हा एक कटाव आहे.

कटाव अथवा कटिबंध ही एक विशिष्ट पद्यरचना आहे. कटावात एक ध्रुवपद असते, व पुढे कडवी असतात. प्रस्तुत कटावात 'श्रीकृष्णें सुदामजीला सोन्याची नगरी दिधली। स्वानुभूति हृदयामधली' हे ध्रुवपद आहे. या ध्रुवपदाशी जुळेल अशा यमकाचे चरण प्रत्येक कडव्याच्या शेवटी आले आहे. कटावाच्या कडव्यात पादाकुलकाचे अनेक चरण येतात. कटावात निरनिराळी यमके व अनुप्रास साधलेली असतात. यात संस्कृत शब्दांचे दीर्घ समासही आढळतात आणि अगदी देशी बोली भाषेतील ठोक शब्दही आढळतात. एकेका कडव्यातील चरणांची संख्या निश्चित नसते. एकेक प्रसंग अथवा कथनाचा मुद्दा संपला की तेथे कडवे संपते. एवढ्यापुरती ही जुन्या काळची सयमक मुक्तच्छंद रचनाच म्हणायची!

कटाव-गायनात ताल आणि ठेका याला महत्त्व असते. कटावाची चाल अश्वधाटी यमकाची असते. एका दमात एकेक यमक-खंड वेगाने पुरे करून, वेगळ्या आवाजात व वेगळ्या लयीत दुसरे खंड पुरे करायचे—असाच सारखा धावता पण बदलता क्रम स्वीकारीत एकूण कटाव पुरा करायचा. असे कटाव-गायनाचे तंत्र असते. जुन्या

कीर्तनकारांच्या तोंडी असे कितीतरी कटाव असत. एखादे धावते गतिचित्र काढण्यास कटावांचा समर्पक उपयोग होतो. द्रौपदीवस्त्रहरणाच्या प्रसंगीचा कटाव चलचित्रपटाहूनही अधिक चलच्चित्ररूप बनल्याचे अनुभवास येते. याद्या द्यायच्या झाल्या—स्वयंवरास जमलेले राजे, विवाहासाठी खरेदिलेल्या वस्तू, भोजनासाठी केलेले पदार्थ, वनातील किंवा उपवनातील वनस्पतिसृष्टी इत्यादींच्या याद्या देताना—कटावरचना फार उपयुक्त ठरते. धावत्या चालीमुळे कंटाळवाणेपणा जाणवत नाही.

याचा अर्थ सरस कथनाला कटाव अनुपयुक्त असतो असे नाही. प्रस्तुत संग्रहातील अमृतरायांचा कटाव म्हणजे गतिमान, जिवंत कथनशैलीचे नमुनेदार उदाहरण ठरेल. त्यातील व्यक्तिवर्णने रेखीव आहेत, त्यांच्या शारीरिक कृतींची बारीक-सारीक वर्णनेही नेत्रगोचर होणारी आहेत. सुदाम पति-पत्नीतील घरगुती संवाद जितका वास्तव आणि नाट्यपूर्ण तितकाच किंबहुना त्याहून अधिक वास्तव आणि अधिक नाट्यपूर्ण संवाद सुदाम आणि श्रीकृष्ण यांच्यामधील होय! आजचे सारे विसरून जाऊन, एकदम जुन्या आठवणीमध्ये रंगणारा कृष्ण, सुदामाच्या प्रपंचाची प्रेमळपणाने विचारपूस करणारा कृष्ण, वहिनीची आठवण ठेवून 'काय तियेने पाठविले?' म्हणून प्रश्न करणारा कृष्ण, अशा कृष्णाच्या एक की दोन—कितीतरी भावच्छटा या कटावात झरझर टिपल्या आहेत; दाखविल्या आहेत. सुदाम आणि कृष्ण यांच्या दर्शनातील वरवरचा विरोध त्यांच्या सख्यत्वाने पार विरून जातो—सख्यभक्ति तर या कटावाख्यानाचे प्राणतत्त्वच आहे, पण सूक्ष्म सूचक विनोदाने ती चटकदार बनली आहे. कृष्णाचे सर्वसाक्षित्व व सर्वज्ञत्व आणि त्याचे 'करूनिया अकर्तेपण' मार्मिकतेने अमृतरायाने दर्शविले आहे. सुदामाचे निष्कामत्व कृष्णकर्तृत्वाहूनही दोन अंगुळे अधिकच आहे.

या कवनात साधी बोली मराठी व संस्कृतप्रचुर मराठी अशी दुहेरी शब्दकळा प्रसंगपरत्वे वापरलेली आढळेल. तसेच या कटावाख्यानाचे प्रयोजन कृष्णमाहात्म्यकथन आणि अध्यात्मज्ञानप्रसार हेच असल्याने, यात आध्यात्मिक रूपकांचा वापर सढळ हाताने झालेला दिसतो—कीर्तनाश्रयी वाङ्मयातील कटाव हा एक महत्त्वपूर्ण काव्यप्रकार होय!

निरंजन माधव (१७०५ – १७९०)

बहुश्रुत पंडित, साधू व राजकार्यनिपुण चौरस दृष्टीचा मराठी कवी. गोदावरीच्या दक्षिणेस वरखेडाच्या शिवेवर रामडोह नामक प्रसिद्ध गाव आहे, ती कवीची मातृभूमी. संस्कृत शिक्षण सातारा येथे झाले. त्यानंतर त्यांनी तंजावर प्रांती काही वर्षे काढली. साऱ्या भरतखंडभर यांनी तीर्थयात्रा केली. बाजीराव व नानासाहेब पेशवे यांच्या आश्रयात यांचा बराच काळ गेला. यांना संस्कृत व मराठीशिवाय कानडी, हिन्दुस्थानी, गुजराती वगैरे बऱ्याच भाषा येत होत्या. मोरोपंती रामायणापूर्वी निरोष्ठ रामायण, मंत्र रामायण, यांनी मराठीत केली होती. वृत्तशास्त्रावर यांनी तीन ग्रंथ लिहिलेले असून, यांची स्तोत्रे तर अतिशय गोड आहेत. स्तोत्रसंग्रह, सांप्रदायपरिमळ, श्रीज्ञानेश्वर-विजय,

बालबोध, सुभद्राचंपू हे यांचे ग्रंथ होत. निरंजनमाधवांची कविता प्रसादपूर्ण आहे. त्यांच्या भाषेत, विचारात आणि पद्धतीत बराच नवीनपणा आहे.

ऐशा रमणीय रैवतकगिरीं

प्रस्तुत वेचा हा निरंजनमाधवाच्या 'सुभद्राचम्पू' काव्यातून घेतला आहे. चम्पूरचना ही कीर्तनाख्यानरचनेला फार जुळतीमिळती रचना आहे, कारण चम्पू ही 'गद्यपद्यमयी वाणी' आहे; ती 'गद्यानुबन्धरसमिश्रित हृद्य पद्यसूक्ती' आहे. चम्पूमध्ये सामान्यतः कथानिर्वाहासाठी गद्य आणि वस्तुवर्णनार्थ पद्य उपयोजिले जाते. गद्यकाव्याचा अर्थगौरव आणि पद्यकाव्याची अर्थगौरवोपबृंहित रागमयता या दोन्हींच्या सहजसुंदर मिलाफाने चम्पूकाव्यरचना ही सिद्ध होते. आख्यानरचनेसाठी चम्पू हे अगदी योग्य आणि लवचिक असे माध्यम ठरते. पण मराठी आख्यान-कवींना चम्पूरचनाबंधाने आकृष्ट केलेले दिसत नाही. मराठीत निरंजनमाधवाच्या सुभद्राचम्पूशिवाय दुसरा चम्पू नाही.

प्रस्तुत वेच्यामध्ये निरंजनमाधवाच्या चंपू-रचनेची सर्व ठळक वैशिष्ट्ये पाहावयास मिळतात. मूर्तिवर्णन, पूर्ववृत्तान्तकथन, निसर्ग-वर्णन, मनोभावना-चित्रण आणि या सर्वांतून कथानक गतिमान ठेवण्याचे कौशल्य, यामुळे या चंपूकाव्यास अभिजात विदग्ध कथा-काव्याचेच रूप आले आहे. खरे तर संस्कृत महाकाव्याचाच आदर्श निरंजन माधवांच्यापुढे आहे, हे स्पष्ट आहे. संस्कृत-चंपूकाव्यातील पांडित्य आणि विदग्धता यांचे प्रस्तुत काव्यात सुरेख मिश्रण झालेले आहे.

श्रीधर, महिपती, अमृतराय यांच्या काव्यरचनेइतकी ही चंपू-रचना लोकप्रिय झाली नाही, कारण त्यातील भाषेचे काठिण्य हे असावे. विशेषतः चूर्णिका-बंधातील लांबलचक संस्कृत समास आणि अपरिचित संस्कृत शब्द यांनी या काव्याच्या प्रसाद-गुणावर फार मोठा आघात केला असावा. याउलट यातील श्लोकरचना सुबोध आणि प्रसादपूर्ण आहे.

निरंजनमाधवांची कल्पनाशक्ती आणि वर्णनशैली श्लोकापेक्षा चूर्णिकेमध्येच अधिक प्रत्ययास येते. पण तेथेही निसर्गानुभूतीच्या जिवंत वर्णनापेक्षा सांकेतिकता अधिक जाणवल्यावाचून राहत नाही. यमक, अनुप्रास, ध्वन्यनुसारी शब्दांचाच वापर करण्याकडे कवीची प्रवृत्ती झुकलेली दिसते. चूर्णिका म्हणजे सम्यक तालबद्ध गद्याचा म्हणजेच कटावाचा एक प्रकार होय. चंपूपेक्षा कटावाची भाषा आणि रचना अधिक सोपी आणि सुटसुटीत असते. कटावांमध्ये देशी भाषेचा वापर केला जातो आणि वास्तव जीवनाचे दर्शन अधिक प्रमाणात घडविले जाते. यामुळे कटाव हा खास मराठी काव्याचा नमुना ठरेल. चंपू मात्र संस्कृत विदग्ध अभिरुची स्वीकारून केलेली अनुकरणात्मक मराठी रचना ठरेल.

महीपती (१७१५–१७९०)

अहमदनगरापासून अठरा कोसांवर राहुरी तालुक्यातील ताहराबाद हे महीपतींचे गाव. कवी व चरित्रकार या दोन्ही नात्यांनी त्यांनी विशेष कामगिरी बजावली. पुष्कळ

संतांची व कवींची त्यांनी दिलेलीच माहिती तेवढी आपल्याला उपलब्ध आहे. तुकोबांनी स्वप्नात येऊन 'नामदेवांचा शतकोटी अभंगांचा संकल्प माझे मुखे परिपूर्ण झाला, आता संतचरित्राचे वर्णन तुझे मुखे व्हावे' असे महीपतींना सांगितले. तेव्हापासून महिपतीस कविता करण्याची शक्ती आली, असे म्हणतात. महीपती समाधिस्थ झाला तेव्हा त्यांचे वय ७९ वर्षांचे होते.

महीपतींची कविता सुबोध आहे. ज्ञानेश्वरांसारखे दृष्टांत त्याच्या कवितेत आढळतात. सर्व कविता ओवीबद्ध आहे. भक्तविजय, संतलीलामृत, संतविजय, भक्तलीलामृत, कथासारामृत, तुळशी–माहात्म्य, पंढरीमाहात्म्य, गणेश–पुराण इ० त्याचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

संतचरित्रकार म्हणूनच महीपतीची ख्याती आहे. "पांडुरंग आणि त्याचे थोर भक्त, साधुसंत, देव आणि देवमाणसे ही त्यास सारखीच वंदनीय वाटतात. भक्तिमार्गावर, सगुणोपासनेवर महीपतीचा विशेष भर आहे. चरित्रकथनाचा ओघ मध्येच थांबवून भागवतधर्माचा, नामभक्तीचा महिमा तो वारंवार वर्णन करतो," हा प्रा० निरंतरांचा अभिप्राय यथायोग्य आहे.

नाभाजी आणि उद्धव चिद्घन यांनी लिहिलेले चरित्रग्रंथ पाहून महीपतीने चरित्रलेखन केले. चरित्रलेखनाच्या साधनांची काळजीपूर्वक त्याने जुळवाजुळव केल्याचेही दिसते; पण साधनचिकित्सेचा तो काळ नसल्याने महीपतीच्या चरित्रलेखनात आख्यायिका, दंतकथा, अद्भुतचमत्कार यांना महत्त्वपूर्ण स्थान लाभले आहे. वंशावळी, जन्ममृत्युशक देण्याकडेही त्याचे लक्ष आहे. आपल्या काळातील धार्मिक आणि वाङ्मयीन अभिरुचीला धरून होईल, तितका यथातथ्य चरित्रलेखनाचा महींपतीचा हा प्रयत्न आहे. वस्तुतः ही चरित्रे म्हणजे आख्यानकविताच होय. त्यांची मांडणी, हेतू, फलश्रुती, इत्यादी दृष्टीने त्यास आख्यानकवितेचेच रूप येते; फरक इतकाच कीं आख्यानकवितेत एकाच कथाभागावर रसाळ काव्यरचना केलेली असते. येथे एका संताच्या जीवनातील विविध प्रसंगघटना या सर्वांचा समावेश केलेला असतो.

महीपतीच्या या चरित्राख्यानाचे सौंदर्य त्याच्या उत्कट भाविकतेत आहे. व्यक्तिचित्रण, प्रसंगचित्रण, वातावरणनिर्मिती इत्यादी कथाकाव्याची लक्षणे येथे प्रत्ययास येतीलच!

मोरोपंत (१७२९–१७९४)

'आर्या मयूरपंताची' असे ज्यांच्या आर्येबद्दल म्हटले जाते ते हे मोरोपंत. पन्हाळगडावर (जन्मग्रामी) मोरोपंतांच्या वयाची पहिली चोवीस वर्षे गेली. त्या अवधीत केशव पाध्ये आणि तात्या पाध्ये यांच्याकडे संस्कृत विद्येचे अध्ययन. लहानपणापासून कविता करण्याचा छंद. पुढे बारामतीस बाबूजी नाईक यांच्या घरी पुराणिक म्हणून राहिले. आयुष्याच्या अखेरीस त्यांची काशीयात्रा झाली.

मोरोपंत हे नीटनेटके, मोठे टापटिपीचे, साक्षेपी कवी आहेत. त्यांची काव्यनिर्मितीची शक्ती दासोपंतांच्यासारखी उदंड आहे. संपूर्ण महाभारताचे त्यांनी मराठीमध्ये आर्या-

वृत्तात रूपांतर केले. मंत्र-रामायण, मंत्र-भागवत यांसारखी विविध चमत्कृतिपूर्ण आणि विस्तृत रचना त्यांनी केली. कृष्णविजय, हरिवंश, हरिश्चंद्राख्यान, प्रल्हादविजय इ० स्फुट आख्याने; संतस्तवन, काशीयात्रा इ० कितीतरी प्रकरणे पंतांनी लिहिली आहेत. सीतागीत, सावित्रीगीत, रुक्मिणीगीत यांसारखी सुबोध आणि प्रासादिक, गानसुलभ, सुंदर गीतकथाही पंतांनी गुंफल्या. आर्याकेकावली, श्लोककेकावली, संशयरत्नमाला यांतून पंतांचे परमेश्वरभेटीस आसावलेले मन स्पष्ट दिसून येते. 'काही तरावया गावे !' हाच पंतांच्या काव्यनिर्मितीचा हेतू होता. पंत हे अखेरपर्यंत मुमुक्षूच राहिले. 'काव्यनिर्मिती ही त्यांनी मनोभावे आणि एकनिष्ठपणे व षोडशोपचारे केली,' हा प्रा. रा. श्री. जोग यांचा अभिप्राय मान्य होण्याजोगा आहे.

'आर्याभारत' हे पंतांचे खरे भूषण; मोठे मोलाचे आणि तोलाचे. पंतांच्या परिणत प्रज्ञेचे हे फल. यातील कथानुकूल असे संक्षेपविस्ताराचे धोरण; शृंगार-वीर-करुण; अद्‌भुत आणि हास्य हे रस; तदंतर्गत हंसकाकीय कथा, कचदेवयानी-कथा यामधील सरसरमणीयता; प्रौढ, शुद्ध, रसाळ वाणी ही पाहता 'आर्याभारता'ची काव्यदृष्ट्या गुणवत्ता मनावर चांगलीच ठसते. पंतांचा यमकाचा हव्यास आणि दीर्घसमासयोजना यांनी होणारी औचित्यहानी, श्रुतिकटुता आणि क्वचित् ग्राम्यता इत्यादी दोषमाला असमर्थनीय असली, तरी त्यामुळे पंतांच्या काव्यगुणाचा पूर्ण लोप होतो, असे नाही. मयूरपंतांची आर्या ही मराठी काव्याचे भूषणच ठरेल.

'केकावली' म्हणजे आर्त भक्ताने परमेश्वराला उद्देशून फोडलेला टाहो होय. याचे अंतरंग 'धाव्या'चे आहे. नामदेवादी संतांच्या धाव्यांमध्ये जी भक्तीची उत्कटता, जीव झोकून दिल्याची अनुभूती प्रकटते, तशी 'केकावली'त ती आढळत नाही. येथे मोरोपंतामधील पंडित कवी परमेश्वराशी, लडिवाळ युक्तिवाद करीत बसला असल्याचे जाणवते; आपले पातक कसे मोठे आहे आणि पतिताचा उद्धार करण्याचे परमेश्वराचे सामर्थ्यही कसे अमर्याद आहे, हे सिद्ध करण्यात व ते पटवून देण्यातच, कवी अधिकाधिक रंगत चालल्याचे, 'केकावली' वाचताना प्रत्ययास येते. आत्मोद्धरणासाठी फोडलेला हा टाहो कलापूर्ण असला तरी तो यामुळेच जणू काही भावोत्कटतेत डावा ठरला आहे. तथापि या काव्याच्या आस्वादात मराठी काव्यरसिकांना खूपच धन्यता लाभली आहे, लाभण्यासारखी आहे.

'रसने न रावचाच्या' हे साधे, प्रासादिक असे पद आहे. गजल-रचनेचा हा मूळ देशी आरंभ. या पदातील यमक-अनुप्रास-योजनाही लक्षणीय आहे.

प्रस्तुत संग्रहातील **'सीतागीत'** हे एक धावते गीतकाव्य आहे—झोपाळ्यावरील या ओव्यांतून स्त्रीसुलभ भावना आणि भाषावैशिष्ट्ये दिसून येतात. मोरोपंत किती सोपी आणि रसपूर्ण रचना करू शकतात, याचे हे नमुनेदार उदाहरण ठरू शकेल.

'हंसकाकीय आख्यान' हे एक नीटस-नेटके कथा-काव्य आहे. कथाकाव्याची सर्व लक्षणे या आख्यानात तर आढळतीलच, पण पंतरचनेतील संवाद व भाषणे यांचे खास

वैशिष्ट्य येथे दिसून येईल. वातावरणनिर्मिती, चित्रमयता, आणि उपरोध–उपहास-चातुर्यही येथे नजरेत भरणारे आहे. गर्वोद्धताचे मनश्चित्र आणि गर्वहरण झाल्यावर होणारी त्याची दीन मनःस्थिती अतिशय मार्मिकपणे या काव्यात चित्रित झालेली आहे. हे संपूर्ण कथा-काव्य म्हणजे एक विस्तृत अन्योक्ती असून, तिच्या आविष्कारातील नाट्यमयतेमध्ये तिचे काव्यसौंदर्य आहे. मोरोपंतांच्या यमकांनीही येथे यास हातभार लावला आहे, असेच म्हणावेसे वाटते.

'दाम-रामायण', **'निरोष्ठ-रामायण'** इत्यादी रचना म्हणजे आपल्याच रचना-कौशल्याचे आपण स्वतःच मनसोक्त दर्शन घ्यावे या इच्छेने पंतानी केलेली काव्यरचना होय; किंवा भगवन्नामस्मरणाचा एक अभिनव मार्ग म्हणून केलेली ही काव्यरचना—असे काहीही जरी आपण म्हटले, अथवा मान्य केले, तरी अधम म्हणून जो काव्यप्रकार आहे, त्यातच ह्या रचनांचा समावेश करावा लागेल. मोरोपंतांचे शब्दप्रभुत्व व रचनेवरील हुकूमत यात दिसून येते, पण काव्य मात्र येथे आढळून येत नाही, ही वस्तुस्थिती आहे. मराठी पंडिती काव्याचे एक अंग म्हणून ही वानगी प्रस्तुत संग्रहातून सादर केली आहे.

रामजोशी (१७६२–१८१२)

सोलापूरचा राहणारा. एका व्युत्पन्न ब्राह्मण घराण्यात जन्म. बालपणापासून लावण्या रचण्याचा याला छंद होता. पुढे त्याने स्वतःचा तमाशाचा फड चालविला. याने शृंगारिक लावण्या लिहिल्या, तशाच परमार्थपरही लावण्या रचल्या. मोरोपंतांचा व त्याचा परिचय झाल्यावर त्याने कथा–कीर्तनाकडे आपले लक्ष वळविले, असे म्हटले जाते. मोरोपंतांच्या आर्या तो आपल्या कीर्तनात म्हणत असे. शीघ्रकवित्व हा त्याचा एक उल्लेखनीय गुण होय. सर्व शाहिरांत तो स्वतःला कविराज म्हणून संबोधीत असे.

पंडित कवींच्या काळाच्या शेवटी मराठीत जी खास मराठी काव्याची पहाट फुटली व पुढे तिचा प्रकाश फाकला त्यात रामजोशांना मोठे मानाचे स्थान द्यावे लागेल. पंडित कवी आणि शाहीर कवी यांना जोडणारा तो एक दुवा आहे. विद्वत्ता आणि वर्णश्रेष्ठता यांच्या जोरावर रामजोशींनी लावणीला शिष्टमान्यता मिळवून दिली, असे मानण्यात येते. इतर शाहिरांच्यापेक्षा रामजोशांच्या लावणीतील शृंगारास संस्कृत काव्यातील शृंगारांचे वळण लागल्याचे जाणवते; अनुभूती आणि अभिव्यक्ती यांचे मराठी वळण इतर शाहिरांच्या काव्यातल्या मानाने कमीच. रामजोशांच्या लावणीत संभोगशृंगारापेक्षा विप्रलंभावरच अधिक भर आहे. त्याने काही संस्कृत, तर काही संस्कृत–मराठी मिश्र रचनाही केली आहे. त्याची 'छेकापन्हुती' ही त्याचे पांडित्य व संस्कृत काव्याभिरुची या विशेषांची निदर्शक रचना आहे.

'कोण्या ग सुभगाची' आणि **'सुंदरा मनामध्ये भरली'** या लावण्यांतील शब्द-कळा संस्कृत वळणाची आहे; त्यातील स्त्रीसौंदर्याच्या कल्पनाही संस्कृत काव्यातील सांकेतिक आहेत. मात्र त्यातील अलंकारादींचे तपशील स्वकालीनदेशी आहेत. या रचनेतील

ठसठशीतपणा, ठसकेदारपणा, हा त्यातील भावनेच्या भागड्या उघड्या रूपाला धरूनच आहे. व्यंजनेपेक्षा वाच्यार्थाला, उत्तानतेच्या खास देशी आविष्काराला लावणीमध्ये गुणरूप देण्यात येते. ते येथेही आहे. लावणी हे गेय पद आहे—रचनेत ताल आणि ठेका याला स्वभाविकपणेच महत्त्व लाभलेले आहे. अंतर्गत यमक–अनुप्रासांची योजनाही काव्यचरणांमध्ये करण्याचे रामजोशी विसरलेला नाही.

'**पेशव्यांचा शुक्रवारवाडा**' हे एक वरवर वास्तुवर्णन आहे असे वाटते; पण वस्तुतः ते त्या वाड्यातील जीवनाचे एक चित्र आहे. त्या जीवनातील सर्वरससंपन्नता आणि वैभव रामजोशींनी या पोवाड्यात उभे केले आहे.

'**फटका**' हे एक उपदेशपर गीत आहे. खरे धार्मिक अंतर्मुख जीवन आणि खोटे दांभिक बहिर्मुख जीवन यांतील विरोध रोखठोक शब्दात या फटक्यात अवतरला आहे. या रचनेत अनुप्रासरचनेचे कौशल्य प्रेक्षणीय व श्रवणीय आहे. स्पष्टोक्ती हेच अशा गीताचे सामर्थ्य असते. रामजोशींनी सद्धर्माचे वर्म मोठ्या ठेक्यात या गीतातून मांडले आहे.

'**नंदात्मज मंदं मंदं...**' हे पद म्हणजे संस्कृत-मराठी संमिश्र भाषायोजनेचे एक कविक्रीडित आहे. गोपीचा कृष्णावरील लटका राग, सूचक शृंगार इत्यादी भावना या चमत्कृतिपूर्ण रचनेतून व्यक्त झाल्या आहेत. ही एक गौळणच होय.

संकीर्ण

फादर स्टीफन्स (१५४९–१६१९)

हा इंग्लिश धर्मोपदेशक इ. स. १५७९ मध्ये गोवा येथे आला. गोमंतकातील सासष्ट येथील क्रिस्ती गुरुकुलाचा तो कुलपती होता. त्याचे मुख्य वाङ्मयकार्य म्हणजे 'क्रिस्त पुराण' हा मराठी ओवीबद्ध ग्रंथ होय. आपल्या पुराणाच्या शेवटी 'क्रिस्तदासु' असे आपले मुद्रानाम हा कवी नमूद करतो. ते विष्णुदासनामा किंवा कृष्णदासनामा या नावावरून त्यास सुचले असावे. त्याने मराठी भाषा चांगलीच आत्मसात केली होती, हे खिस्तपुराणावरून स्पष्ट दिसून येते.

प्रस्तुत संग्रहातील 'मराठी भाषेची प्रशस्ती' हा उतारा खिस्तपुराण पु. अ. १ मधून घेतला आहे.

निवृत्तिनाथ (१२७३–१२९८)

ज्ञानेश्वरांचे ज्येष्ठ बंधू व गुरू. निवृत्ती, ज्ञानदेव व सोपानदेव या तीन बंधूंचे वर्णन 'तीन्ही देव जैसे परब्रम्हीचे ठसे। जगीं सूर्य तैसे प्रकाशले' या आपल्या एका अभंगात नामदेवांनी केले आहे. निवृत्तिनाथांची समाधी त्र्यंबकेश्वर येथे आहे. 'निवृत्तेश्वरी' व 'निवृत्तिसार' हे यांचे ग्रंथ. हे नाथसंप्रदायी योगी होते.

प्रस्तुत संग्रहातील त्यांच्या अभंगांतून अद्वैताचा आनंद ओसंडत असलेला दिसून येतो. परमेश्वर आणि भक्त यांचे नाते चकोर–चंद्रम्यासारखे आहे. संत हे हरिचरणी नित्य निवांत असतात आणि त्यांना मुक्तीहून भक्ती अधिक गोड असते, ही भागवत-धर्मातील मूळ कल्पना येथे व्यक्त झाली आहे. ज्ञानेश्वरांच्या इतकीच निवृत्तिनाथांचीही प्रतिमासृष्टी हृद्य आहे.

चोखामेळा

जन्मकाल अनिश्चित. मूळगाव पंढरपूरनजीक मंगळवेढे. तेथे वेठीने कामावर असताना गावकुसू कोसळून त्यांना अपघाती मृत्यू आला. (१३३८). जन्माने महार. प्रसिद्ध संत. नामदेवकालीन पांडुरंगभक्त. मोरोपंतांनी चोखोबाचे वर्णन असे केले आहे :–गावा नच मानावा चोखा मेळा महार सामान्य। ज्याच्या करिं साधूंचा

चोखामेळा महारसा मान्य ॥' पंढरपुरास त्याची समाधी महाद्वारात असून, ती नामदेवांनी बांधली आहे.

प्रस्तुत संग्रहातील त्याचा अभंग म्हणजे एक धावा आहे. वर्णाधिष्ठित विषमतेच्या जाचांमुळे चोखोबांच्या मुखी हा आर्त टाहो फुटला आहे.

मुक्ताबाई (१२७९–१२९८)

निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव व मुक्ताबाई ही चार भावंडे. अत्यंत अल्प वयात या भावंडांनी प्रगट केलेली बुद्धिमत्ता व कर्तृत्व यांना जगाच्या इतिहासात तोड सांपडणे कठीण आहे. महदंबा, मुक्ताबाई व जनाबाई, या समकालीन असून मराठी भाषेतील या आद्य ज्ञात कवयित्री होत. मुक्ताबाईचे उपलब्ध अभंग थोडे आहेत. ज्ञानेश्वरांना रस्त्यात कुणीतरी संन्याशाची मुले म्हणून हिणविल्यावर ते खिन्न होऊन दार बंद करून खोलीत बसले, त्या प्रसंगावर लिहिलेल्या ताटीच्या अभंगांत मुक्ताबाई लडिवाळपणाने व धीटपणाने ज्ञानेश्वरांनाच चार शब्द सांगते. ती तिघाही भावांची लाडकी असणार. म्हणूनच 'त्रिवेणीचा ओघ जैसा एक ठायी । तैशी मुक्ताबाई आम्हांमध्ये' असे तिच्याविषयीचे उद्‌गार नामदेवांनी ज्ञानेश्वरादी बंधूंच्या तोंडी घातले आहेत. ती विनोदी, चतुर व परखड बोलणारी होती, हे तिच्या अभंगांवरून दिसून येते.

जनाबाई

गंगाखेड येथील देना नावाच्या शूद्राची ही मुलगी. हिचे आयुष्य नामदेवाच्या घरी गेले. तिने थोडेच अभंग रचिले आहेत. तिच्या अभंगांची भाषा मात्र जुनी वाटत नाही. तिचे अभंग सोपे व साधे असल्यामुळे, सर्व कवयित्रींपेक्षा हीच जास्त लोकप्रिय झाली. म्हणूनच गोविंदाग्रजांनी 'जिथे रंगली साधीभोळी जनाइची गाणी' असे तिच्याबद्दल आपल्या 'महाराष्ट्र-गीतात' म्हटले आहे.

जनाबाईच्या अभंगांमध्ये भावनेचा अत्यंत उत्कट आविष्कार आढळतो. प्रस्तुत संग्रहातील अभंगांत भक्तीपोटीं तिने केलेल्या सर्वस्वत्यागाचे व दानाचे उघडेवागडे नी बेछूट स्वरूप खास देशी बोलीत व्यक्त झाले आहे. त्याचबरोबर तिच्या अभंगात वत्सलभक्तीचा आर्तकोमल भाव प्रकट होतो. 'विठो माझा लेकुरवाळा' हा अभंग म्हणजे या वत्सलभक्तीचे मूर्तिमंत सगुण रूपच होय. मुक्ताबाईच्या अभंगांतील आविष्कारात एक प्रकारची बेभानता सतत जाणवते.

सांवतामाळी

जन्मकाल अनिश्चित. मृत्यू इ. स. १२९६. ज्ञानेश्वरनामदेवादी संतमंडळांतील संत. प्रस्तुत संग्रहातील 'कांदा, मुळा भाजी,' हा अभंग म्हणजे भक्ताला सर्व विश्व हे परमेश्वरमय कसे दिसते, याची अनुभूती व्यक्त करणारा आहे. सांवत्याच्या भक्तीच्या मळ्यात

सर्वत्र विठ्ठल पिकला आहे. त्याच्या अभंगातील प्रतिमा, उपमा त्याच्या व्यवसायक्षेत्रांतीलच असल्यामुळे, त्याचा आविष्कार प्रत्ययकारी झाला आहे.

पंडित नारायण व्यास बहाळिये

हे खानदेशातील बहाळिये गावचे. महानुभावीय 'सातीग्रंथापैकी' ऋद्धिपूरवर्णन हे यांचे काव्य. या काव्याची रचना इ. स. १३६३ मध्ये झाली असावी. या काव्यात महानुभावांची पंढरी म्हणून ओळखली जाणारी जी ऋद्धिपूरनगरी तिचे वर्णन आहे. यातील गोविन्दप्रभूंच्या राजमठाचे व स्वतः गोविन्दप्रभूंच्या मूर्तीचे वर्णन अभिजात वर्णनशैलीने केलेले आहे. राजमठ पाहून लेखकाचे भान हरपते. प्रस्तुत वेच्यामध्ये मठप्रवेश करताच लेखकाच्या अंगी जे अष्टसात्त्विक भाव प्रकटले त्याचे उत्कट चित्रण आहे. हे वर्णन भावकवितेच्या जवळ जाणारे आहे. यातील दृष्टांतांची समर्पकता रसिक मनाला वेध लावणारी आहे. उदा० व्याधापासौनि सूटले...'

रवळो व्यास

हा महानुभाव कवी वऱ्हाडातील पाथरी गावचा. याने महानुभावांची 'सकळी' ही सांकेतिक लिपी कल्पिली. 'सह्याद्रिवर्णन' हा काव्यग्रंथ याने लिहिला. महानुभावांच्या 'साती ग्रंथां'तील हा एक ग्रंथ होय. हा ग्रंथ केवळ भक्तिभावाने लिहिलेला असून त्यात त्या स्थळाचे धार्मिक माहात्म्य वर्णन केलेले आहे.

प्रस्तुत उताऱ्यात श्रीदत्तप्रभूचे मूर्तिसौंदर्य कवीने वर्णिलेले आहे. त्यातील श्रीदत्ताच्या अंगकांतीच्या वर्णनातील कल्पना-वैभव मनोवेधक आहे.

विष्णुदास नामा

या कवीने आपल्या 'बुधबावणी' या ओवीबद्ध ग्रंथात नामदेवाचा वेगळा उल्लेख केलेला असल्यामुळे, नामदेव व विष्णुदासनामा हे निरनिराळे कवी आहेत, हे स्पष्ट होते. हा कवी ब्राह्मण होता, हे 'विप्र विष्णुदास लागे अंबेच्या चरणा' या आरतीत दिसून येते. शुकाख्यान, तुलसी आख्यान, एकादशी माहात्म्य, वगैरे कृती याच विष्णुदास नाम्याच्या आहेत असे दिसते. ज्ञानेश्वर व एकनाथ यांच्यामधील काळात तो होऊन गेला असावा. याची कविता साधी व सुबोध आहे.

प्रस्तुत संग्रहातील या कवीचा अभंग म्हणजे एक आध्यात्मिक कूट—रचना होय. अशा कूटरचनेतून येणाऱ्या संख्यावाचक शब्दांची सांकेतिकता ध्यानी यावी.

दासोपंत (१५५१ – १६१५)

जन्मगाव मराठवाड्यातील नारायणपेठ व वास्तव्य आंबेजोगाई येथे. एकनाथ-पंचक म्हणून वर्णिलेल्या पाच संतकवींतील एक प्रमुख कवी व 'गीतार्णव' 'पदार्णव'

'पासोडी' वगैरे ग्रंथांचे लेखक. ते दत्तभक्त होते. 'दिगंबर' या नाम–मुद्रेने त्यांनी पद्यरचना केली आहे. यांच्या 'ग्रंथराज' या छोट्या ग्रंथाची छाप रामदासांच्या दासबोधावर पडलेली दिसते. यांनी स्फुट पदेही पुष्कळ लिहिली आहेत. यांच्या अफाट वाङ्मयापैकी फारच थोडे प्रकाशित झालेले आहे.

दासोपंतांची पद–रचना ही रागात गाता येण्यासारखी आहे. त्यांना संगीताचे ज्ञान होते. यांची श्रीदत्तभक्ती ही नामदेवतुकारामाच्या विठ्ठलभक्तीइतकी उत्कट आहे. दासोपंतांची पदे वाचताना ज्ञानेश्वर - नामदेवांच्या अभंगातील शब्दकळेची आठवण येते.

'पुराणिक आणि त्यांचे श्रोते' हे एक जिवंत व्यक्तिदर्शन व प्रसंगचित्रण आहे. या उताऱ्यातील पुराणिकाचे वर्णन किती वास्तव व हुबेहुब आहे! या वर्णनातून पुराणिका संबंधीची कवीची आदराची भावना व्यक्त होते. तसेच वेगवेगळ्या पातळीवरील श्रोत्यांच्या प्रतिक्रिया मार्मिकपणाने टिपण्यातील त्याचे कौशल्यही मनात भरते. पुराणिकाची पुराणकथनातील समरसता आणि नाट्यमयता दासोपंतही तितकेच रंगून वर्णन करताना दिसतात. दासोपंताच्या या वर्णनातील वास्तवता ही आधुनिक वाङ्मयाला जवळची वाटते.

शेख महंमद

अहमदनगर येथील रुईब्राहिरे या नावाचे खेडे हे शेखमहंमदाचे मूळ ठिकाण. महिपतीने भक्तिविजयात याची कथा वर्णन केली आहे. त्याचा जन्म–मृत्युकाल निश्चित नाही. पण एकनाथाचा तो समकालीन असावा. 'योगसंग्राम' हा त्याचा ग्रंथ. शिवाय 'पवनविजय' 'निष्कलंक प्रबोध' व 'ज्ञानसागर' हे त्याचेच ग्रंथ होत असे मानले जाते. त्याने काही अभंगही लिहिले आहेत. शेखमहंमदाला कबीराचा अवतार मानतात. भक्तिसाधनेत शेखमहंमदाने नामस्मरणाचे माहात्म्य सर्वश्रेष्ठ मानले आहे.

प्रस्तुत संग्रहातील अभंगात आपण अविंध असूनही आपल्या हृदयात गोविंदच कसा आहे, हे अनेक दृष्टांतांच्या द्वारा त्याने पटवून दिले आहे. भक्तीला सोवळे-ओवळे नसते, हा भाव येथे मूर्त झाल्याचे जाणवते.

रमावल्लभदास (१५८८–१६४८)

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटक विभागात या स्वामीचे मठ आहेत. यांची 'प्रबोध. चंद्रिका', 'संतनामावली', 'पदपदांतरे' इ. ग्रंथरचना आहे.

प्रस्तुत संग्रहातील गीत हे खेळीया पद्धतीचे कृष्णलीलापर गीत आहे. द्रुतगतीने फटक्याच्या चालीवर हे म्हटले असता या गीतातील प्रसंगनाट्य विशेष जाणवते. यात गोपाळांचे कृष्णासंबंधीचे मनोभाव आणि कृष्णाचा विनोदी मिस्किल स्वभाव सूक्ष्मपणाने ध्वनित झालेला आहे. यातूनच कवीने कृष्णमाहात्म्य श्रोत्यांच्या मनावर प्रभावीपणाने ठसविले आहे.

विठ्ठल बीडकर

जन्ममृत्युकाल अनिर्णीत. वामनपंडितांचा समकालीन कवी असावा. साधारणपणे इ. स. १६३० ते १६९० हा त्याचा काळ असावा. अनेक वृत्तबद्ध आख्यानांचा कर्ता. त्याचे 'सीतास्वयंवर' हे काव्य सुप्रसिद्ध आहे. बिल्हणकवीच्या मूळ संस्कृतचरित्राचे त्याचे रूपांतरही प्रसिद्ध असून, ते सरस उतरले आहे. निरनिराळी वृत्ते, निरनिराळे बंध, चमत्कृतिजनक यमके व अनुप्रासादी अलंकार योजण्याकडे या कवीचे लक्ष फार होते. याने चित्रकाव्यरचनाही केली आहे.

प्रस्तुत संग्रहातील श्लोक म्हणजे एक कूट आहे. कूट म्हणजे कोडे अगर उखाणा सूर्यास्तसमयी कमलपुष्पात मधुसेवन करताना अडकलेल्या भुंग्यावरील हे कूट आहे.

देवीदास (देवदास) व्यंकटेशस्तोत्राचे कर्ते. या स्तोत्राखेरीज 'भामावर्णन' 'गजेंद्रमोक्ष', 'करुणामृतस्तोत्र' ही त्यांची ग्रंथरचना आहे. इ. स. १६८६ मध्ये त्यांनी 'संतमालिका' लिहिली.

प्रस्तुत संग्रहातील वेचा स्तोत्र रूपाचा आहे. यामध्ये व्यंकटेशाचे माहात्म्य गाइले असून, भक्ताने आपल्या पतित्वाची कबुली दिली आहे आणि आपला उद्धार करण्याची प्रार्थना व्यंकटरमणाला केली आहे. यातील कितीतरी काव्यपंक्ती, सुभाषिते म्हणून नित्य वापरात आहेत. हे स्तोत्र वाचीत असताना मोरोपंतांच्या 'केकावली'ची आठवण येते

मध्वमुनीश्वर

प्रसिद्ध गीतकार व संत; अमृतरायांचे गुरु. वास्तव्य नाशिककडील. त्यांची अनेक पदे प्रसिद्ध आहेत. उदा० मनमोहन वाजवि वेणू, कधि भेटेल मजला देव हरि". त्यांचा समाधिकाल इ. स १७३१ असावा.

'माझं अचडं बचडं...' हे आईच्या तोंडी घातलेले एक शिशुगीत आहे. बालकरूपातील सनातन ब्रह्माचे मोठ्या कौतुकाने नि वात्सल्याने दोन पातळ्यांवरून केलेले हे वर्णन चमत्कृतिपूर्ण व हृद्य आहे. यातील स्त्रीसुलभ भाषेने या गीताला एक वेगळाच गोडवा आलेला आहे.

'उद्धवा शांतवन कर जा' या गीताचा प्रसंग काव्यमय आहे. या गीताची चाल बरीच लोकप्रिय झाली. विशेषतः केशवसुतांच्या परंपरेतील कवींना या चालीने कविता-लेखनाला बरीच प्रेरणा दिलेली आहे. या जातीला या गीतावरूनच 'उद्धव' हे नाव पडले आहे.

कृष्णकेशव

या कवीबद्दल माहिती उपलब्ध नाही.

प्रस्तुत संग्रहातील भूपाळी ही अतिशय लोकप्रिय आहे. यातील पहाटेचे आणि सूर्योदयाचे वर्णन दृक्प्रत्यय घडविणारे आहे. कृष्णावरील भक्तिभावाच्या विविध छटा या गीतातून ध्वनित झालेल्या आहेत.

रामानन्द

या कवीची माहिती उपलब्ध नाही.

प्रस्तुत संग्रहातील त्याची गणपतीची भूपाळी मात्र सर्वतोमुखी असलेली आढळते. यातील गणेशमूर्ति-वर्णन मोठे रेखीव आणि चित्ररूप वाटते.

श्रीरंगात्मज विठ्ठल

या कवीची माहिती उपलब्ध नाही.

हे प्रदक्षिणा गीत श्रीगुरुदेवदत्ताच्या उपासनेत नित्य गायिले जाणारे आहे.

शिवराम

या कवीची माहिती उपलब्ध नाही.

विडा ह्या पदाचे अंतरंग अध्यात्माचे आहे. भक्तीतील अद्वैतानुभवाची साधना रूपकाच्या साहाय्याने येथे व्यक्त केली आहे. भारुडासारखेच पण भावपूर्ण असे हे आध्यात्मिक गीत आहे.

गोविंदबुवा

या कवीची माहिती उपलब्ध नाही.

मात्र या कवीचे '**असा धरि छंद**' हे गीत भक्तिमार्गीयांना अत्यंत प्रिय आहे. या गीताचे ध्रुवपद श्रवणमधुर आहे. अनन्यसाधारण निष्ठा या अर्थी छंद हा शब्द योजिला गेल्याने, या गीतातील मूळ कल्पना अधिक मोकळी आणि जिव्हाळ्याची झाली आहे. परमेश्वराच्या छंदाने नराचा नारायण कसा होतो, हे अनेक पौराणिक व लौकिक दृष्टांतांनी येथे पटवून दिले आहे.

रामाजनार्दन

एकनाथ पंचकांतील या कवीची माहिती उपलब्ध नाही. प्रस्तुत संग्रहात समाविष्ट केलेल्या त्यांच्या ज्ञानेश्वरांच्या आरतीमुळे त्यांचे नाव सर्वतोमुखी झालेले आहेत. या आरतीत ज्ञानेश्वरांचे महाकैवल्य तेजोरूपाचे आणि त्यांच्या आध्यात्मिक कार्यांचे स्तवन केले आहे.

सोहिरोबानाथ आंबिये (१७१४ – १७९९)

हे कवी सावंतवाडीजवळील बांदे या गावचे. यांनी अनेक कविता व पदे लिलिलेली असून 'सिद्धांतसंहिता', 'महदनुभवेश्वरी' वगैरे संग्रह प्रसिद्ध आहेत.

यांच्या पदांमध्ये विविध रचनाबंध आढळतात. प्रस्तुत संग्रहातील '**काय म्या सांगू गे माये**' या चमत्कृतिपूर्ण रचनेत निर्गुण ब्रह्म व सगुण मायेचे विलक्षण भावबंध गुंफिलेले आहेत.

'हंसाचा चारा' या अभंगामध्ये सामान्य आणि असामान्य व्यक्तीतील भेद विविध दृष्टांतांच्या साह्याने स्पष्ट केला आहे.

'नक्षत्रेश सुधी' या श्लोकामध्ये ज्याला ब्रह्मरसाची गोडी लागलेली आहे, त्याला लौकिकात रस वाटत नाही, हा भाव व्यक्त केला आहे. येथे अर्थान्तरन्यास अलंकार साधला आहे.

होनाजी

याचा जन्ममृत्यूकाल अनिश्चित आहे. सवाई माधवराव व दुसरा बाजीराव यांच्या कारकीर्दीत हा होता. होनाजी शिलारखाने हे त्याचे स्वतःचे नांव व बाळा करंजकर हें त्याच्या साथीदाराचे नाव. होनाजी तमासगीर होते व ते बहुश्रुत असावेत.

प्रस्तुत संग्रहातील **'घनश्याम सुंदरा'** ही भूपाळी म्हणजे केवळ उषःकालीन निसर्ग-चित्र नसून, पहाटे जाग आलेल्या जीवनाचे एक पूर्ण चित्र होय. जाग आलेल्या जीवनाच्या पार्श्वभूमीवर 'उठि लौकर वनमाळी' हे ध्रुपद उत्तरोत्तर अधिक अर्थपूर्ण होत जाते. या भूपाळीचे गीतदृष्ट्या सौन्दर्य मनोवेधक आहे.

प्रभाकर (१७६९–१८४३)

याचे संपूर्ण नांव प्रभाकर जनार्दन दातार. हा कोकणातील हर्णै-मुरुडचा राहाणारा गंगू हैबती हा त्याचा गुरु. याने लावण्या, पवाडे वगैरे रचिले आहेत. पेशवाईचा उत्कर्ष व अस्त त्याने पाहिलेले असल्यामुळे, त्यांचे प्रत्ययकारी वर्णन त्याच्या पोवाड्यांत आढळते. खर्ड्याच्या लढाईचे त्याचे वर्णन लढाईचे चित्र डोळ्यांसमोर उभे करते. सवाई माधवरावांचा मृत्यू व रावबाजीची शरणागती यात पेशवाईचे करुणाजनक दृश्य त्याने रेखाटले आहे. त्याने रचलेल्या लावण्यात नुसता शृंगारच आहे, असे नसून, प्रियकराला युद्धप्रवृत्त करणाऱ्या नायिकाही त्याने रंगविलेल्या आहेत.

प्राचीन मराठी कवितेत 'झगडा' नावाचा प्रकार आढळतो. हा प्रकार म्हणजे एक बौद्धिक क्रीडा किंवा कल्पनेचा एक खेळ आहे. प्रस्तुत संग्रहातील **'लक्ष्मीपार्वती–संवाद'** हे काव्य या प्रकारचे आहे. यात झगडा खेळणाऱ्या व्यक्तींच्या ठिकाणी कवीने दाखविलेले कल्पनाचापल्य मनोहर आहे. कोटिक्रम, हजरजबाबीपणा, विनोदबुद्धी यांनी ह्या झगड्यातील नाट्य मोठे रंगतदार झाले आहे.

अर्थात हा झगडा लटका असून, कवीने त्यातून हरिहरैक्यच मनोरंजक रीतीने ध्वनित केले आहे. हे एक नाट्यगीत होय. अण्णासाहेब किर्लोस्करांनी अशी अनेक झगडा-पद्धतीची नाट्यगीते लिहिलेली आहेत.

परशराम (१७५४–१८४४)

हे नाशिककडील वावींचे शिंपी. लहानपणीच त्याने विठ्ठलाची उपासना केली व त्याला विठ्ठलाचा साक्षात्कार झाला होता असे सांगतात. देवपुरकर बाबांचा अनुग्रह झाल्यावर

अभंग, पदे यांची रचना त्याने केली. विठोबा खेत्रीकडून लावण्या व पोवाडे करण्याचा त्याला आदेश झाला. लावणीच्या व पोवाड्याच्या शेवटी 'नामी विठ्ठल' 'वरदी विठ्ठल' असा आपल्या गुरूच्या नावाचा उल्लेख त्याने अनेक ठिकाणी केलेला आढळतो. इ. स. १८०८ साली दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत त्याचा तमाशा पुण्यात झाला असावा. पेशवाईनंतर त्याने मुलुखगिरी करून पोवाडे, लावण्या यांचे कार्यक्रम केले. इ. स. १८४४ साली वयाच्या नव्वदाव्या वर्षी परशरामाने देह ठेवला. त्याचे अवलोकन सूक्ष्म व दृष्टी विनोदी होती. लोकांच्या समजुती, चालीरीती यांचे चित्रण त्याने अत्यंत परिणामकारक रीतीने केले आहे. शेंदाड शिपायाची फजिती हा त्याच्या एका लावणीचा विषय आहे.

परशरामाची '**दुर्घट माया ब्रह्मादिकांही**' ही अध्यात्मपर लावणी आहे. अध्यात्मातील केवळ परिभाषाच शाहिरांना अवगत असते असे नाही, तर त्यांना अध्यात्माचे ज्ञानही पुरेसे असते, याचा प्रत्यय या लावणीतील प्रभावी आविष्कारावरून येतो. अशा भेदिक लावण्या त्या काळात लोकप्रिय होत्या. भेदिक लावणी म्हणजे एकनाथी भारुडे आणि गौळणी यांचाच नवा अवतार होय.

'**सोनार शिक्का...**' ही रचना फटक्याच्या स्वरूपाची आहे. अस्सल आणि नक्कल यांतील भेद मोठ्या ठसकेदार रीतीने येथे दाखविला आहे. जे दांभिक, पोकळ आणि नकली आहे ते आपल्या वरवरच्या झळाळीने रिकामीच ऐट कशी मिरवते, हे परशरामाने वेगवेगळ्या दृष्टान्तांनी मनावर ठसविले आहे. पौराणिक आणि सांकेतिक दृष्टान्ताबरोबर तात्कालीन दैनंदिन लोकजीवनातील दृष्टान्तही त्याने मार्मिकपणे वापरले आहेत. एकाहून एक वरचढ प्रश्नांची (प्रश्नालंकारांची) त्याने सरबत्तीच लावली आहे. पारमार्थिकतेत आणि भक्तिपरतेत या फटक्याचा शेवट होत असला तरी त्यातील उपमानसृष्टीमुळे त्याला एक तात्कालीन सामाजिक जीवनावरील टीकेचेही अंग लाभले आहे.

गंगू हैबती

याचा जन्ममृत्यूकाल अनिश्चित आहे. पण प्रभाकर शाहिराचा हा गुरु व साथीदार होता.

रडतांना हृषिकेशी

स्त्रीगीत म्हणून रूढ असलेल्या ह्या प्रस्तुत गीतात आईच्या मनाची हुरहूर व्यक्त होते. या गीतातील स्त्री-सुलभ भाषेचे वेगळेपण व माधुर्य सहज ध्यानी येण्यासारखे आहे. लोकगीताच्या जवळ येणाऱ्या ह्या वत्सल—भक्तिरसात्मक गीताला लौकिक व्यथेची एक खोल नाजूक बोच आहे.

आबा कुमर

हा महानुभावीय कवी आहे. अधिक माहिती उपलब्ध नाही.

श्रीचक्रधरांची शेजारती

आबाकुमर यांची प्रस्तुत संग्रहातील ही आरती भावोत्कटतेने गाइलेली आहे. जीवोद्धरणाचे अविश्रांत कार्य करणाऱ्या श्रीचक्रधरस्वामींविषयींच्या पराभक्तीने या आरतीतील अक्षर नी अक्षर तुडुंबले आहे. भक्ताच्या आत्मसमर्पणाची ज्योत येथे प्रज्वलित झालेली आहे.

या गीतातील प्रसाद आणि अंतर्गत लय केवळ अकृत्रिम आहेत. 'भवर मंचकी शेज फुलांची', ही आणि ह्यासारख्याच अन्य प्रतिमा या गीताची दृक्सौंदर्यशक्ती वाढवितात.

अवचितसुत काशी

याचे उपनांव सोळंखी व गोत्र अत्रि. नाशिक जिल्ह्यातील भारम हा याचा मूळ गाव.

काशी कवीने द्रौपदीस्वयंवरावर दोन ग्रंथ लिहिलेले, प्रसिद्ध आहेत. यांपैकी एक ओवीबद्ध व दुसरा श्लोकबद्ध आहे. काशी कवी हा मानभावपंथाचा असल्यामुळे, त्याचे हे ग्रंथ त्याच पंथाच्या लोकांत फार वाचले जातात. पण ओवीबद्ध ग्रंथ श्लोकबद्ध ग्रंथापेक्षा अधिक चांगला आहे. मुक्तेश्वराच्या लेखनशैलीचा या ग्रंथावर बराच परिणाम झालेला आहे. हा ग्रंथ कवीने शके १६१८ मध्ये पुरा केला.

काव्यसूचिकार काशी कवीचा काळ शके १५८४ असा देतात.

याच ग्रंथात (पृ० २२४) प्रस्तुत कवीची चक्रबंधात्मक रचना दिलेली आहे. कविता-रचनेच्या ह्या बौद्धिक कसरती या काळात अनेकांनी केल्या. विठ्ठलाची कूटरचना, मोरोपंती दाम-निरोष्ठादी रामायण-रचना, पंडितकवींचा यमक-श्लेष-अनुप्रासमय रचनेचा अतिरेकी हव्यास, हे सारे बौद्धिक कसरतीच्याच प्रकारात मोडणारे प्रयत्न होत. काव्यदृष्ट्या ही अगदी खालची पातळी होय. काव्याचा आत्मा जो रस त्याचा ह्या अशा शब्दबंधात्मक रचनेशी काही संबंध नसतो. एकनाथकालात दासोपंतांनी असे चित्रबंध रचले, तर अगदी अलीकडच्या काळात केशवसुतांच्या आधीच्या पिढीतले भास्कर दामोदर पाळंदे यांच्यासारख्या प्रसादपूर्ण गीतरचना करणाऱ्या कवीलाही चित्रबंधाचा मोह टाळता आलेला नाही.

◇ ◇

परिशिष्ट १

प्रस्तुत संग्रहातील वेच्यांचे काव्यप्रकारदृष्ट्या वर्गीकरण

(अ) भाष्यकाव्य

१. ते कुंडलिनी जगदंबा : ज्ञानेश्वर, पृ. १०
२. दैवी संपत्ती : ज्ञानेश्वर, पृ. १४
३. अविद्या-खंडन : ज्ञानेश्वर, पृ. १६

जीवनभाष्यात्मक

१. परंतु येथे भगवंताचे... : रामदास, पृ. ६८
२. आधी प्रपंच करावा... : रामदास, पृ. ७०
३. करंट लक्षण... : रामदास, पृ. ७०
४. सोनार शिक्का... : परशराम, पृ. १७७

स्फुट विचारदर्शनात्मक

१. योग हा सुकृताचा : रामदास, पृ. ७८
२. सर्व संसार बुडाला : रामदास, पृ. ७९

उपदेशात्मक

१. संभाजीस पत्र : रामदास, पृ. ७९
२. भला जन्म हा : रामजोशी, पृ. १५२

आध्यात्मिक रूपके, कूट इ०

१. भारुडे : एकनाथ पृ. ३७
२. आम्ही न बोलो लटिकें : विष्णुदासनामा पृ. १६२
३. विडा श्रीकृष्णाचा : शिवराम पृ. १७०
४. दुर्घट माया ब्रह्मादिकांही : परशराम पृ. १७७

(आ) कथाकाव्य

- (१) विदग्ध महाकाव्यसदृश (नरेन्द्र, सामराज यांची रचना)
- (२) आर्ष महाकाव्यसदृश
  - रूपांतरित, भाषांतरित (मुक्तेश्वराचे ओवीभारत, मोरोपंतांचे आर्याभारत इ०)
  - स्वतंत्रपणे पुनर्निर्मिती (श्रीधराचा पांडवप्रताप, रामदासांची रामायणरचना इ०)
- (३) स्फुट प्रकरणे (वामनांचा भरतभाव, मोरोपंतांचे अंबरीषाख्यान इ०)
  - आख्यान (हंसकाकीय) मोरोपंत
  - चम्पू सुभद्राचंपू (निरंजन माधव)
  - कटाव सुदामचरित्र (अमृतराय)
- (४) दीर्घ कथागीत (महदंबेचे धवळे, मोरोपंतांचे सीतागीत इ०)

[प्रस्तुत संग्रहामध्ये विदग्ध आणि आर्ष महाकाव्यातील जे वेचे घेण्यात आले आहेत त्यांमध्ये प्रसंगवर्णन, वास्तुवर्णन, भाववृत्तिचित्रण, व्यक्तिदर्शन, वातावरण–निर्मिती इ० प्रकार समाविष्ट झाले आहेत. ह्या दृष्टीने वेच्यांचे वर्गीकरण सोयीसाठी तदनुसार केलेले आहे. प्रत्येक वेच्यामध्ये प्रसंग, व्यक्ति, वास्तु, वातावरण इत्यादी सारे असतेच, पण त्यातील प्राधान्याने जे जेथे जाणवते त्यावरून त्याचा समावेश त्या त्या ठिकाणी होतो, इतकेच !]

प्रसंगचित्रण

१. रथावरि वाईली : महदंबा, पृ. ३
२. कृष्ण-रुक्मिणीची वरात : महदंबा पृ ५
३. कीचकवध : मुक्तेश्वर पृ. ४७
४. द्रौपदीवस्त्रहरण : श्रीधर पृ. १०२

व्यक्तिदर्शन

१. ते भीमकी हळुच : सामराज पृ. ८८
२. ती भीमकी वर्णावी : एकनाथ पृ ३४ (आध्यात्मिक रूपक)
३. ते सुंदर्य नाही जगीं : रवळो व्यास पृ. १६१
४. पुराणिक : दासोपंत, पृ. १६३

मनोभावदर्शन आणि भाववृत्तिचित्रण

१. भरतभाव : वामन पंडित, पृ. ८१
२. भीमकीची विरहावस्था : नरेंद्र पृ. ३२
३. तेवी श्रीकृष्ण : मुक्तेश्वर पृ. ४१
४. तैसा भरला वोरसू : नारायण व्यास पृ. १५९

वातावरण, निसर्ग, वास्तु, स्थळ इत्यादींचे चित्रण

१. संध्यारजनी : नरेंद्र पृ. २९
२. की गगनमंडपीं : ,, पृ. ३०
३. ऐशा रमणीय रैवतकगिरी... निरंजनमाधव, पृ. १२०
४. मयसभा... मुक्तेश्वर, पृ. ४२

संवादरूप संघर्ष : नाट्य

१. लक्ष्मी-पार्वती–संवाद... प्रभाकर, पृ. १७४ (झगडा)

पूर्णाख्यान

१. हंसकाकीय... मोरोपंत, पृ. १३९
(हे आख्यान म्हणजे एक दृष्टान्त–कथाच होय.)

कथागीत

१. सीतागीत... मोरोपंत, पृ. १३७ (पात्रमुखी आत्मकथन)

चरित्र-कथा[1]

१. सुदामचरित्र : अमृतराय, पृ. ११२ (कटाव)
२. एकनाथचरित्र : महीपती, पृ. १२७.

आत्मचरित्र-कथा

१. ते सुख सांगता : बहिणाबाई, पृ. ६०.
२. तुकारामाची अभंगवाणी : अभंग २०, पृ. ५३.

चरित्र—आत्मचरित्र-कथा

१. श्रीज्ञानदेवांच्या समाधीचे अभंग : नामदेव, पृ. २२

ऐतिहासिक कथा-काव्य

१. सिंहगडचा पोवाडा : तुळशीदास पृ. ९१

(इ) भावकाव्य

आत्मोद्‌गारी काव्य

१. ज्ञानेश्वरांचे अभंग : ज्ञानेश्वर पृ. १९
२. नामदेवांचे अभंग : नामदेव पृ. २१
३. तुकारामांचे अभंग : तुकाराम पृ. ५०
४. निवृत्तिनाथ, चोखामेळा, मुक्ताबाई, जनाबाई, सांवतामाळी, शेखमहंमद } पृ. १५७ ते १५९
५. रामदास (स्फुटरचना, क्र. २, ३, ४, ६,) पृ. ७३, ७४, ७६

उपासना काव्य

१. आरत्या—तुकाराम, रामदास, रामा जनार्दन, आबाकुमर : पृ. ५९, १७१,
२. करुणाष्टके : रामदास पृ. ७२
३. स्तोत्रे, स्तवन : रामदास, देवीदास पृ. ६६, ७६, १६६
४. धावा : मोरोपंती (केका) पृ. १४३
५. प्रदक्षिणा : श्रीरंगात्मज पृ. १७०
६. भूपाळी : कृष्णकेशव, रामानंद, होनाजी, पृ. १६९, १७२
७. विडा : शिवराम पृ. १७०
८. पाळणा : रामदास पृ. ७७

---

१ चरित्र, आत्मचरित्र, ऐतिहासिक कथाख्यानांचा समावेश प्राचीन मराठी कवितेच्या 'स्फुट प्रकरणा'तच व्हावा.

गौळणी : एकनाथ : पृ. ३६

लावणी : रामजोशी : पृ. १४९

पदे : तें मन निष्ठुर... : एकनाथ, पृ. ३९

पवित्र शीतळ... : मुक्तेश्वर, पृ. ४०

रसने न राघवाच्या...मोरोपंत : पृ. १४७

नंदात्मज मंद...रामजोशी : पृ. १५४

दासोपंतांची पदे...दासोपंत : पृ. १६२

कान्हो इंद्र कोपला...रमावल्लभदास : पृ. १६५

माझं अचर्ड... }
उद्धवा शांतवन... } मध्वमुनीश्वर : पृ. १६७–६८

असा धरी छंद... : गोविंदबुवा, पृ. १७१

श्रीसोहिरोबांची पदें :—पृ. १७१, १७२

रडताना हृषिकेशी... : गंगू हैबती, पृ. १७८

निसर्गवर्णन : वर्षाकाळ : मुक्तेश्वर, पृ. ४०

गिरीचे मस्तकीं गंगा : रामदास, पृ. ७८

(उ) कूट, शब्दबंध इ०

१. राम–रामायण...मोरोपंत...पृ. १४८

२. निरोष्ठ रामायण...मोरोपंत...पृ. १४८

३. आम्ही न बोलों लटकें...विष्णुदास नामा...पृ. १६२

४. कोणे एक वनीं...विठ्ठल...पृ. १६५

५. चक्रबंध...अवचितसुत काशी पृ. १८१

* * *

(१) मराठी भाषेचा गौरव

१. वेदशास्त्रांचा मथितार्थु : मुकुंदराज, पृ. १, ओ० १ ते ७, १६–१७

२. जैसी हरळामाजी : फादर स्टीफन्स, पृ. १५६

(२) साहित्यविचार

१. वेदशास्त्रांचा मथितार्थु : मुकुंदराज, पृ. १, ओ० ८ ते १५, १८ ते २०

२. व्यासांचा मागोवा : ज्ञानेश्वर, पृ. ७

३. वाग्विलास विस्तारूं : ज्ञानेश्वर, पृ. ९

४. हे शब्देविण संवादिजे : ज्ञानेश्वर, पृ. १०

५. ऐसे आदि-कवीचे बोल : नरेंद्र, पृ. २८

६. कवेश्वर-स्तवन : रामदास, पृ. ६७

७. पसायदान : ज्ञानेश्वर, पृ. १८०

परिशिष्ट २

चक्रबंध



भासली केशवी भूतळीं लीळभा
भाळली इंदिरा जालि कांता विभा ।
भाविता कांतिभा-ज्योति जाते नभा
भानुतेजा तुवां भान केली सभा ॥

‘ द्रौपदी–स्वयंवर ’ श्लो. ४९३
अवचितसुत काशी

टीप : श्लोकाच्या पहिल्या चरणातील नववे अक्षर आणि चौथ्या चरणातील दुसरे अक्षर मूळ चक्रबंध–रचनेतच कवीस अचूकपणे बसविता आले नाही, हे बंध वाचताना लक्षात येईलच. वरील चक्रबंधाकृतीत ‘ ई ’च्या ऐवजी ‘ ईं ’ आणि ‘ भा नि ’च्या ऐवजी ‘ भा ति ’ असे वाचावे.
—संपादक

परिशिष्ट ३

प्रस्तुत ग्रंथातील वेच्यांचे मूळ संदर्भ

१. मुकुन्दराज

१. वेदशास्त्रांचा मथितार्थु...‘विवेकसिंधु’ संपादक : कृ. पां. कुळकर्णी
प्र० १ ओ. १०–२९

२. महदंबा

१. रथावरि वाईली...‘आद्य मराठी कवयित्री : सं. वा. ना. देशपांडे
धवळे, पूर्वार्ध ५७ ते ८२

२. कृष्ण–रुक्मिणीची वरात ,, धवळे उत्तरार्ध ४८ ते ५७; ५९

३. ज्ञानेश्वर

१. व्यासांचा मागोवा...–ज्ञानेश्वरी सं. सोनोपंत दांडेकर
अध्याय १८ ओ. १६९६–१७२२

२. वाग्विलास विस्तारूं...–,, अ. १३ ओ. ११५३–११६६

३. हे शब्देविण... ,, अ. १ ओ. ५६ ते ६१

४. ते कुंडलिनी... ,, अ. ६ ओ. २२१–२७३

५. दैवी संपत्ती : अ. १६ ओ. ११५–१४०; १५४–१६२

६. अविद्या-खंडन : अमृतानुभव प्र. ६ ओ. २४–३८ साखरेबुवाप्रत.

७. ज्ञानेश्वरांचे अभंग : सकलसंतगाथा–आवटेप्रत. १९२४ अभंग क्र. ६६४, ६७७, १, २८२, ७६, ५६०, २५०, ४७.

४. नामदेव

१. अभंग क्र. १५०८, १५२९, १७३०, १७३१, २५१

२. श्रीज्ञानदेवांच्या समाधीचे अभंग. अभंग क्र. १०६९, १०७०, १०७१, १०७४, १०८३, १०८७, १०८९–९०, १०९३, १०९४, १०९७, १०९९, ११००–११०२ (सकलसंतगाथा)

५. नरेन्द्र

१. ऐसे आदि–कवीचे...रुक्मिणीस्वयंवर सं. वि. भि. कोलते, ओ. २१–२८, ३३–४३

२. संध्यारजनी : रुक्मिणीस्वयंवर–कोलते ओ. ४६५–४७५, ४८१–४८७
२. (अ) की गगनमंडपीं : ,, ओ. ४९३–५०८, ५१३–५१६, ५२१–५२३
(आ) भीमकीची विरहावस्था : ,, ओ. ५२४–५३५

६. एकनाथ

१. ती भीमकी वर्णावी : रुक्मिणीस्वयंवर सप्तम प्रसंग ओ. ५–३६
२. : गौळणी : सकलसंतगाथा–आवटे प्रत क्र. १०८, १५५
प्राचीन गीतभांडार सं. ना. ग. जोशी गीत क्र. ११२
३. भारूडे : सकलसंतगाथा–आवटे प्रत क्र. ३७७९, ३७९८, ३९२०, ३८५२, ३८५८
४. पद : भक्तिमार्गप्रदीप–सं. ल. रा. पांगारकर पृ. १७९ आवृत्ती २२ वी.

७. मुक्तेश्वर

१. पवित्र शीतळ जळ... : भक्तिमार्गप्रदीप ,, पृ. १४५
२. वर्षाकाळ : वनपर्व सं. द. सी. पंगू अ. १० ओ. १९५–२०२
३. तेवी श्रीकृष्ण... : सभापर्व सं. द. सी. पंगू. अ. ५ ओ. ९९–११५
४. मयसभा : ,, अ. २ ओ. २ ते ८०
५. कीचकवध : विराटपर्व : काव्यसंग्रह प्रत अ. ३, ओ. ११२–१५८

८. तुकाराम

१. अभंगवाणी : सकलसंतगाथा क्र. १, ३१८३, १२७३, ८२४, १२७८–७९, १२७१, २०६८, १०९०, ३७४१, २४३४, २४७०, २३९८, २४६३, २३७५, २४४०, १०२९, ७७७, ३७५३, ३५११, ४७३, १०११, ३५२२, ३८३३, २०३४, ५४७, ३७१३
३३३७, ३५०४, २८४७, ३३९८, २५३५, ३१०६, ४६४, ३१०२, ३७८३, २२७१, २७२३, ३१६६, ३९२१, ३९२९, ४२०५

२. आरती :
(अ) कांकड आरती–भक्तिमार्गप्रदीप सं. ल. रा. पांगारकर २२ वी आवृत्ती पृ. ३७.
(आ) अद्वैतपूजा : सकलसंतगाथा अभंग क्र. ४०३३.
(इ) विठोबाची शेजारती–भक्तिमार्गप्रदीप पृ. १२५.

९. बहिणाबाई

१. तें सुख सांगता : संतांच्या आत्मकथा सं. रा. चिं. ढेरे पृ. ७६ अभंग २८, ३१, ३२, ३९, ४८, ४९, ५०, ५२, ५३, ५४, ५५, ६७–७४.
२. अभंग : सकलसंतगाथा सं. का. अ. जोशी, खंड २ अभंग ३२.

१०. रामदास

१. दासबोध : काही उतारे–दासबोध.

अ) गणेशस्तवन दशक १, समास–१.

आ) कवेश्वरस्तवन : दासबोध दशक १ समास ७

इ) परंतु तेथे... : ,, ,, २० ,, ४
ओ. १ ते २६

ई) आधी प्रपंच... : ,, दशक १२ समास १
ओ. १ ते २०

उ) करंट लक्षण : ,, दशक १८ समास ५

२. स्फुटरचना : भक्तिमार्गप्रदीप सं. ल. रा. पांगारकर

१. करुणाष्टके : ,, २२ वी आवृत्ती पृ. १३५

२. आठवलें रामचंद्र... : श्रीरामदासस्वामींचे अभंग, सं. का. अ. जोशी, पृ. १०२–१०३

३. चाफळी श्रीरामाचे : समर्थसंजीवनी सं. ल. रा. पांगारकर, पृ. २६५

४. आम्ही काय कुणाचे : ,, पृ. २८३

५. राज्य या... : ,, पृ. १४८

६. येथे उभा... : रामदासवचनामृत, सं. रा. द. रानडे, पृ. १०

७. भीमरूपी... : समर्थसंजीवनी, पृ. २७२

८. पाळणा... : भक्तिमार्गप्रदीप, पृ. १२१

९. आरती शंकराची : भक्तिमार्गप्रदीप पृ. ९६

१०. गिरीचे मस्तकी : श्रीरामदासांची कविता, प्रथमखंड पृ. ३९० ओ. १–६

११. योग हा सुकृताचा : समर्थसंजीवनी पृ. १२५

१२. सर्व संसार : श्रीरामदासस्वामींचे अभंग, सं. का. अ. जोशी पृ. ६१

१३. संभाजीस पत्र : समर्थसंजीवनी पृ. १७५

११. वामन पंडित

१. भरतभाव : नवनीत सं. गोडबोले–शतसांवत्सरिक आवृत्ती. अ. का. प्रियोळकर–पृ. १५२ ते १६० (संपादन करून)

१२. सामराज

१ ते भीमकी : रुक्मिणीहरण सं. गो. वि. तुळपुळे सर्ग ८ श्लोक १२०–१४७

१३. तुळशीदास

सिंहगडचा पोवाडा : ऐतिहासिक पोवाडे सं. शाळिग्राम १८९१ पृ. २० ते ५० (संपादन करून)

१४. श्रीधर

१. द्रौपदीवस्त्रहरण : पांडवप्रताप–निर्णयसागर पोथी, अध्याय २१ ओ. १ ते २०६

१५. अमृतराय

१. सुदामचरित्र : अमृतराय कवितासंग्रह सं. वा. दा. ओक आवृत्ती १८९६ पृ. २९–३६

१६. निरंजन माधव

१. ऐशा रमणीय...... : निरंजन माधव यांची कविता भाग २–३ सं. ल. रा. पांगारकर, सर्ग तिसरा पृ. ७७–८३

१७. महिपती

१. एकनाथचरित्र : श्रीभक्तविजय सं. ज. र. आजगांवकर, अध्याय ४६ ओ. १ ते १८५

१८. मोरोपंत

१. सीतागीत : नवनीत सं. गोडबोले–प्रियोळकर पृ. ३४८ ओळी ८ ते ६०
२. हंसकाकीय : कर्णपर्व अध्याय २८ संक्षिप्त करून
३. केकावली : नवनीत सं. गोडबोले–प्रियोळकर पृ. ४४६
४. रसने न : प्राचीन गीत भांडार पृ. १४२
५. दाम रामायण : मोरोपंत समग्रग्रंथ खं. ८ पृ. ४३०
६. निरोष्ठ रामायण ,, पृ. ४२४

१९. रामजोशी

१. लावणी (अ) कोण्या ग : पैंजण सं. अदवंत पृ. २४
(अ) सुंदरा मनामध्ये : ,, ,, पृ. २२
२. पेशव्यांचा शुक्रवारवाडा ,, ,, पृ. ३१
३. फटका–भला जन्म : मऱ्हाटी लावणी सं. म. वा. धोंड पृ. ८१
४. नन्दात्मज मंद मंद : ,, पृ. ११४

संकीर्ण

१. निवृत्तिनाथ : सकलसंतगाथा अभंग १८७, २५०, १९२.
२. चोखामेळा : प्राचीनगीतभांडार पृ. ४३
३. मुक्ताबाई : ताटीचे अभंग–पृ. ८–९ प्रत श्रीपांडुरंग एजन्सी
४. जनाबाई : सकलसंतगाथा अभंग २२५, ७१, ३०
५. सांवतामाळी : प्राचीन गीतभांडार गीत ७१
६. नारायण व्यासः तैसा भरला वोरसू : श्रीऋद्धिपूरवर्णन सं. य. खु. देशपांडे ओ. ३७९–४२२ (संपादन करून)
७. रवळो व्यास : ते सुंदर्य : सह्याद्रिवर्णन सं. वि. भि. कोलते ओ. २२ ते ३९ (संपादन करून)
८. विष्णुदासनामा : नवे नवनीत, पृ. १२९ सं. ज. शां देशपांडे.
९. दासोपंत
   १ पदे : श्री दासोपंतांची पदें सं. का. ना. लेले पदे ८७८, १४२१
   २ पुराणिक आणि त्यांचे श्रोते : गीतार्णव अध्याय २ ओ ३५२०-३५५४
१०. शेख महंमद : भक्तिमार्गप्रदीप पृ. १७८
११. रमावल्लभदास : प्राचीन गीत भांडार पृ. ६४ गीत १२४
१२. विठ्ठल : विठ्ठलकृत कवितासंग्रह–निर्णयसागर प्रत पृ. २९९
१३. देवीदास : भक्तिमार्गप्रदीप पृ. ५६ (संपादन करून)
१४. मध्वमुनीश्वर : प्राचीन गीत भांडार पृ. १३१ गीत क्र. २५० २५१
१५. कृष्ण केशव : भक्तिमार्गप्रदीप पृ. २७
१६. रामानन्द : ,, पृ. २२
१७. श्रीरंगात्मज : ,, पृ. ११९
१८. शिवराम : ,, पृ. १२०
१९. गोविंदबुवा : भक्तिमार्गप्रदीप पृ. १९१
२०. रामाजनार्दन : ,, पृ. ११५
२१. श्रीसोहिरोबानाथ : श्रीसोहिरोबानाथ कवितासंग्रह, प्रकाशक शिवराम देशकुळकर्णी पृ. ६९, १९४, १६८
२२. होनाजी : पैंजण पृ. ६१
२३. प्रभाकर : ,, पृ. १२७
२४. परशराम : परशरामी लावण्या : प्रकाशक तुकाराम शेटे पृ. १२, ९५
२५. गंगू हैबती : प्राचीनगीतभांडार पृ. १८८ गीत क्र. ३१३
२६. आबाकुमर : मराठी आरती, ले. म. वि. गोखले, पृ. २८६

परिशिष्ट ४

प्राचीन कवितांचे प्रकाशित झालेले संग्रह

१. सकलसंतगाथा भा. १, २ : का. अ. जोशी
२. प्राचीन पद्य वेचे : म. सा. परिषद, पुणे.
३. प्राचीन मराठी पद्य : प्रा. मा. चि. टेंभेकर,
प्रा. मा. ग. बुद्धिसागर
४. मराठी आख्यानक कविता : प्रा. प्र. वा. बापट
५. नवनीत भाग १, २ : परशुरामतात्या गोडबोले
६. नवे नवनीत : ज. शां. देशपांडे
७. प्राचीन गीतभांडार : डॉ. ना. ग. जोशी
८. भक्तिमार्गप्रदीप : ल. रा. पांगारकर
९. पंडिती काव्य : डॉ. के. ना. वाटवे
डॉ. कुसुम कुळकर्णी
१०. संतांच्या आत्मकथा : रा. चिं. ढेरे
११. प्राचीन आख्यानक कविता : प्रा. गजमल माळी
१२. संपूर्ण चातुर्मास : का. अ. जोशी
१३. आरतीसंग्रह (महानुभावीय) : परमार्गसेवक मुरलीधर कारंजकर

ॐ ! शांतिः ! शांतिः !! शांतिः !!!

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
४	१	पालणा	पालाणा
५	१६	कुंवररी	कुंवरी
८	(ओव्यांचे आंकडे १६ ते ३० ऐवजी १३ ते २७ असे वाचावे)		
१०	४	चिता	चित्ता
१७	२१	इथें	इये
२८	६	सराड	सराउ
,,	१०	प्रमयांचा	प्रमेयांचा
२९	४	श्रोता	श्रोतां
,,	९	तसें	तैसें
३०	(सतराव्या ओवीचा आंकडा १७ घालण्याचे राहिले आहे.)		
३१	९	चंद	चंद्र
३३	८	नरिंह	नरिंह
३८	१९	सई	रुई
३८	२९	जर्नार्दन	जनार्दन
४०	१९	आपवोपी	आप बोपी
४३	२१	अष्ठौ.	अष्टौ.
४७	(ओवी ८० चा आकडा घालण्याचे राहून गेले आहे)		
४८	१८	मातला	पातला
४९	३	स्वाधिष्ट	स्वादिष्ट
५९	२१	शोजारती	शेजारती.
६५	९	बहिणि	बहिणी.
६६	१	अज्ञान भ्रांतिछेदका	अज्ञानभ्रांतिछेदका
७०	५	प्रपच	प्रपंच
७०	२०	लोकांक रितांचि	लोकांकरितांचि
७१	२	ऐकीकडे	एकीकडे.
७४	११	आह्मीं	आह्मां
७४	१३	नुपेक्षा	नुपेक्षी.
७५	१	रास	राम
८१	८	कु.चेष्ठा	कु-चेष्टा.
८४	२३	पद-नीर जा ते	पद नीरजाते
८४	२४	सुख नीर ज्यातें	सुख-नीर ज्या तें.
८८	१	सकळलोक मनोभिरामा	सकळलोकमनोभिरामा

८९	७	नितंबार्पितरत्न मेखळा	नितंबार्पितरत्नमेखळा
८९	९	कुंडलमंडिते क्षणा	कुंडलमंडितेक्षणा.
८९	१३	व्रीडावलोकन दिमिश्र,	व्रीडावलोकनविमिश्र,
९२	(१३ वी ओळ पुढीलप्रमाणे वाचावी 'पंतोजी काकाला लखोटा घेऊन उमरठ्याला पाठवितात.')		
९२	२४	नालें	नाहीं
९४	२१	सुभोदाराला	सुभेदाराला
९५	(ओळ ८-९ मध्ये 'कोणी उमेराव समजेना। एकापेक्षा एक अधिक' असे वाचावे.)		
९५	१८	तानाजीला	आपल्याला
९५	१८	त्याने	तानाजीने
९७	१	फलाण	फलाणा
९७	१७	प्राण जयाचा	प्राण जायाचा.
११२	१७	क्षुमा	क्षुत्क्षामा
११२	१८	चौढायी	चौठायीं
११३	२८	कटक	कंटक
११४	११	शैऽया	शैऽया
११५	३	देवत	दैवत
११५	२३	सुदासकरींचे	सुदामकरींचे
१२३	२२	चिता	चिंता
१२३	२५	हरा	हरी
१२४	१२	यथेष्ठ	यथेष्ट
१३६	१४	यात्रेथी	यात्रेसी
१३६	२२	एसी	ऐसी.
१४०	३	गननी	गगनी
१४५	२९	मोरीपंत	मोरोपंत.
१५०	१	सोण्याची	सोण्याची
१५८	(शेवटची ओळ)	भेसवा	येसवा.
१६१	२	वोसंडतां भेसवा	ओसंडतां
१६१	१	बडिवारविनोदें	बडिवार विनोदें
१८३	२०	मुकुंदरावांना	मुकुंदराजांना
१९४	२	जीवनचरित्र	जीवनचरित्र
२०७	२८	मूळदेशीआरंभ	देशीनमुना
२१५	२५	लिलिलेली	लिहिलेली.

वस्तुतः सहाहून अधिक शतके प्राचीन मराठी कविता निर्माण होत राहिली; त्यामुळे तिचा विस्तार अफाट झाला आहे. विविध कालखंडांतील तिच्या विविध रूप-विलासांचे नीट दर्शन घडविण्यासाठी त्यांतील निवडक भागांचे किमानपक्षी तीन तरी मोठे संग्रह काढणे योग्य ठरले असते. पण एकाच संग्रहातून का होईना प्राचीन मराठी कवितेचे प्रधान रूपप्रकार, स्थलकालव्यक्तिपरत्वे त्यामध्ये होणारे बदल, त्यातील काव्यविषयक जाणिवा आणि त्या त्या काळातील वाङ्मयाभिरुची यांचे निदर्शन होईल असे नेमके आणि मोजके काव्यखंड रसिक अभ्यासकांच्या हाती यावेत या हेतूने प्रस्तुत कविता संग्रहाचे संपादन करण्यात आले आहे.

या संग्रहामध्ये प्राचीन मराठी कवितेमधील निवडक वेचे कालक्रमानुसार आणि कविपरत्वे [illegible] आले आहेत. वेचे कालक्रमानुसार दिल्याने हा संग्रह ओळीने अभ्यासताना प्राचीन मराठी कवितेचा कालपट सहजपणे आपल्या मनश्चक्षूंपुढून उलगडत जात [illegible] जाणवेल. त्यामुळे कालपरत्वे कवितेत होत जाणाऱ्या बदलांचे चित्रही नकळत उमलत जाईल!

कविपरत्वे ही कविता येथे देण्यातही अनेक हेतू आहेत. त्या त्या कवीची कविप्रवृत्ती, त्याचे काव्यदृष्ट्या वेगळेपण, त्याच्या काव्याची विविधता, त्याच्या काव्याचे मराठी कवितेतील स्थान इत्यादी वैशिष्ट्ये निर्दिष्ट करता यावीत, हा तो हेतू होय.

काव्यप्रकारांच्या दृष्टीने या संग्रहाकडे पाहिल्यास कोणत्या कवीने किती व कोणते वाङ्मयप्रकार कसे हाताळले आहेत याचा अभ्यास करणे सोपे जाईल. तसेच प्रत्येक वाङ्मयप्रकाराचा कालानुसार व कलानुसार होणाऱ्या चढ-उताराचा आलेखही काढता येईल; आणि समग्रतेने प्राचीन मराठी कवितेची वाटचाल नीटपणे न्याहाळता येईल.